सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

# महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१

( दिनांक १ नोव्हेंबर, २००६ पर्यंत फेरबदल केलेला )

**Maharashtra Act No. V of 1962**

# The Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961

*(As modified upto 1st November 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद यांनी मुद्रित केले व संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००७

[ किंमत : रुपये ४६.००]

# महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१

## अनुक्रमणिका


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| उद्देशिका : | | |
| कलमे. | | (i) |
| | **प्रकरण एक** | |
| | **प्रारंभिक** | |
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | ८ |
| २. | व्याख्या. | ८ |
| | **प्रशासकीय क्षेत्रे** | |
| ३. | प्रशासकीय क्षेत्रांमध्ये विभागणी करणे | १२ |
| ४. | जिल्ह्यांची रचना | १२ |
| ५. | गटांची रचना | १२ |
| | **प्रकरण दोन** | |
| | **जिल्हा परिषदांची रचना** | |
| ६. | जिल्हा परिषदांची स्थापना करणे | १२ |
| ७. | परिषदेची प्राधिकरणे व त्यांचे संघटन | १३ |
| ८. | जिल्हा परिषदांचे कायद्याने संस्थापन | १३ |
| ९. | जिल्हा परिषदांची रचना | १३ |
| ९क. | राज्य निवडणूक आयोग | १५ |
| | **परिषद सदस्यांची निवडणूक** | |
| १०. | परिषद सदस्यांची निवडणूक व त्यांचा पदावधी, इ. | १५ |
| १० क. | मतदानाची रीत | १६ |
| ११. | परिषद सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ | १६ |
| १२. | जिल्ह्यांची निवडणूक विभागात विभागणी | १६ |
| १३. | मतदारांची यादी | १८ |
| १४. | निवडणुकीचा दिनांक | १८ |
| १५. | निवडून येण्यास अर्ह असणाऱ्या व्यक्ती | १९ |
| १५क. | जागा रिकाम्या होणे | १९ |
| १६. | निरर्हता | १९ |
| १७. | मतदानाचा हक्क | २४ |
| १८. | मतदानाचा किंवा निवडून येण्याचा हक्क निर्धारित करण्यासाठी मतदारांची यादी निर्णायक पुरावा असेल. | २४ |
| | **निवडणुका व निवडणूकविषयक विवाद** | |
| १९. | निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी परिवास्तू, वाहने, वगैरे यांचे अधिग्रहण | २४ |
| २०. | भरपाई देणे | २५ |
| २१. | माहिती मिळवण्याचा अधिकार | २६ |

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २२. | परिवास्तूंमध्ये वगैरे प्रवेश करण्याचा आणि त्यांचे निरीक्षण करण्याचा अधिकार .. | २६ |
| २३. | अधिग्रहण केलेल्या परिवास्तूंतून निष्कासित करणे .. .. .. | २६ |
| २४. | अधिग्रहणातून परिवास्तू मुक्त करणे .. .. .. | २६ |
| २५. | अधिग्रहणासंबंधीच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती .. | २७ |
| २६. | विवक्षित आकस्मिक परिस्थितीत व्यक्ती निवडून आल्याचे घोषित करण्याचा अधिकार. . | २७ |
| २७. | निवडणुकांच्या विधिग्राह्यतेची निर्मिती करणे ; न्यायाधीशाने चौकशी करणे, कार्यपध्दती | २७ |
| २७-क. | निवडणूक विषयक बाबींमध्ये न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध .. | २९ |
| २८. | अपराधसिध्दीमुळे किंवा भ्रष्टाचारामुळे उद्‌भवणारी निरर्हता .. .. | २९ |
| २८-क. | निवडणुकीच्या संबंधात निरनिराळया वर्गांमध्ये वैरभाव वाढविणे .. | ३० |
| २८-ख. | निवडणुकीच्या आदल्या दिवशी किंवा निवडणुकीच्या दिवशी सार्वजनिक सभा भरविण्यास मनाई. | ३० |
| २८-ग. | निवडणुकीच्या सभांमध्ये दंगल माजविणे .. .. .. | ३० |
| २८-घ. | पत्रके, भित्तिपत्रके, वगैरे मुद्रित करण्यावर निर्बंध .. .. .. | ३१ |
| २९. | मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई .. .. | ३१ |
| ३०. | मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ बेबंद वर्तन केल्याबद्दल शास्ती .. | ३२ |
| ३१. | मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती .. .. .. | ३२ |
| ३२. | मतदानाची गुप्तता राखणे .. .. .. | ३२ |
| ३३. | निवडणुकीसंबंधातील अधिकारी वगैरे यांनी, उमेदवारांच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे. | ३३ |
| ३३-क. | निवडणुकीच्या वेळी वाहने बेकायदेशीररीत्या भाडयाने घेण्याबद्दल किंवा ती प्राप्त करण्याबद्दल शास्ती | ३३ |
| ३४. | निवडणुकांच्या संबंधातील पदीय कर्तव्याचा भंग करणे .. .. .. | ३३ |
| ३५. | मतदान केंद्रातून मतपत्रिका काढून नेणे हा अपराध असणे .. .. | ३३ |
| ३६. | इतर अपराध व त्याबद्दल शास्ती .. .. .. .. | ३४ |
| ३७. | विवक्षित अपराधांच्या संबंधात खटला दाखल करणे .. .. .. | ३४ |


### परिषद सदस्यांचा राजीनामा, त्यांना पदावरुन दूर करणे व त्यांच्या नैमित्तिक रीत्या रिकाम्या झालेल्या जागा, वगैरे


| | | |
|---|---|---|
| ३८. | परिषद सदस्यांचा राजीनामा .. .. .. .. | ३५ |
| ३९. | गैरवर्तणूक, वगैरे केल्याबद्दल परिषद सदस्यास अधिकार पदावरुन दूर करणे .. | ३५ |
| ४०. | परिषद सदस्यांची पदावधीच्या काळातील निरर्हता .. .. .. | ३५ |
| ४१. | नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात .. .. .. | ३६ |

## अनुक्रमणिका — चालू


कलमे — पृष्ठे

### अध्यक्ष आणि उपाध्यक्ष

४२. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांची निवडणूक .. .. .. .. ३६
४३. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांचा पदावधी .. .. .. .. ३८
४४. ( वगळले )
४५. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची कार्यपध्दती.. .. .. ३८ पृ.७.
४६. अध्यक्षाला द्यावयाचे मानधन आणि इतर सुविधा .. .. .. ३९
४६-क.अध्यक्षाला आतिथ्य भत्ता .. .. .. .. ३९
४६-ख.आतिथ्य भत्त्याच्या कमाल मर्यादेत बदल करण्याचा अधिकार .. .. ३९
४७ अध्यक्षाला अनुपस्थिति रजा देणे आणि परिणामरुप तरतुदी .. .. ३९
४७-क.उपाध्यक्षास द्यावयाचे मानधन, अनुपस्थिति रजेसह इतर सवलती आणि परिणामरुप तरतुदी. ३९
४८ अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा राजीनामा .. .. .. ४०
४९ अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव .. .. ४०
५० अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना अधिकारपदावरुन दूर करणे .. .. ४१
५१. अध्यक्ष, परवानगीशिवाय गैरहजर राहिल्याचा परिणाम .. .. ४१
५२. अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची रिकामी झालेली अधिकारपदे भरणे .. .. ४१
५३. कार्यभार, नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या स्वाधीन करण्यास नकार देण्याबद्दल शास्ती. ४२
५४. अध्यक्षाचे अधिकार व त्याची कार्ये .. .. .. .. ४२
५५. उपाध्यक्षाची कार्ये .. .. .. .. ४३

प्रकरण तीन

### पंचायत समित्यांची रचना करणे

५६. पंचायत समित्यांची स्थापना .. .. .. .. ४३
५७. पंचायत समित्यांची रचना करणे .. .. .. .. ४४
५८. निर्वाचक गण, निरर्हता, निवडणुका आणि निवडणुकविषयक विवाद यांच्या संबंधातील तरतुदी. ४४
५८-क. मतदानाची रीत .. .. .. .. ४६
५९. पंचायत समितीच्या सदस्यांचा पदावधी .. .. .. ४७
६०. पंचायत समितीचा सदस्य म्हणून राजीनामा देणे .. .. ४७
६१. गैरवर्तणुकीमुळे सदस्यास अधिकारपदावरुन दूर करणे .. .. ४७
६२. पंचायत समितीच्या सदस्यांची निरर्हता .. .. .. ४८
६३. नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात .. .. .. ४८
६४. पंचायत समितीचा सभापती व उप सभापती यांची निवडणूक.. .. .. ४९

## अनुक्रमणिका -- चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ६५. | पंचायत समितीचा सभापती व उप सभापती यांचा पदावधी .. .. | ४९ |
| ६६. | [ वगळण्यात आले ] | |
| ६७. | पंचायत समितीच्या सभापतीच्या निवडणुकीची कार्यपध्दती .. .. | ४९ |
| ६८. | उप सभापतीची निवडणूक .. .. .. .. | ५० |
| ६८-क. | सभापती किंवा उप सभापती यांच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेच्या संबंधातील विवादावर निर्णय देण्याचा आयुक्ताचा अधिकार. | ५१ |
| ६९. | पंचायत समितीचा सभापती व उप सभापती यांना मानधन व भत्ता देणे .. | ५१ |
| ७०. | पंचायत समितीचे सभापती व उप सभापती यांना अनुपस्थिति रजा देणे व परिणामरुप तरतुदी. | ५१ |
| ७१. | सभापती व उप सभापती यांचा राजीनामा .. .. .. | ५२ |
| ७२. | पंचायत समितीचा सभापती किंवा उप सभापती यांच्याविरुध्द अविश्वासाचा ठराव | ५२ |
| ७३. | पंचायत समितीचा सभापती किंवा उप सभापती यांस गैरवर्तणूक, वगैरे केल्याबद्दल अधिकारपदावरुन दूर करणे. | ५३ |
| ७४. | सभापती किंवा उप सभापती परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्याचा परिणाम .. | ५३ |
| ७५. | सभापती किंवा उप सभापती यांची नैमित्तिक रिकामी अधिकारपदे भरणे .. | ५३ |
| ७५-क. | कार्यभार नवीन सभापती किंवा उप सभापती यांच्या स्वाधीन करण्यास नकार देण्याबद्दल शास्ती. .. | ५४ |
| ७६. | पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व त्याची कार्ये .. .. | ५४ |
| ७७. | पंचायत समितीच्या उप सभापतीचे अधिकार व त्याची कार्ये .. .. | ५५ |
| ७७-क. | सरपंचाची समिती .. .. .. .. | ५५ |


प्रकरण चार

### समित्या


| | | |
|---|---|---|
| ७८. | स्थायी समिती, विषय समित्या व इतर समित्या यांची नेमणूक .. .. | ५६ |
| ७९. | स्थायी समितीची रचना .. .. .. .. | ५६ |
| ७९-क. | जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीची रचना .. .. | ५७ |
| ८०. | विषय समित्यांची रचना करणे .. .. .. .. | ५८ |
| ८१. | समित्यांसाठी निवडणूक .. .. .. .. | ६० |
| ८२. | स्थायी समितीच्या व विषय समितीच्या सदस्यांचा पदावधी .. .. | ६१ |
| ८२-क. | स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या सदस्यांचा राजीनामा .. .. | ६२ |
| ८२ ख. | नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात .. .. .. | ६२ |
| ८३. | विषय समित्यांचे सभापती .. .. .. .. | ६२ |
| ८४. | विषय समित्यांच्या सभापतीस द्यावयाचे मानधन .. .. .. | ६४ |
| ८४ क. | आदेशाद्वारे मानधनाच्या रकमेत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. | ६४ |

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| ८५. | विषय समित्यांच्या सभापतीस अनुपस्थिति रजा देणे आणि परिणामरूप तरतुदी .. | ६४ |
| ८६. | विषय समितीच्या सभापतीचा राजीनामा .. .. .. | ६५ |
| ८७. | विषय समितीच्या सभापतीविरुध्द अविश्वासाचा ठराव .. .. | ६५ |
| ८८. | विषय समितीच्या सभापतीस अधिकारपदावरून दूर करणे .. .. | ६६ |
| ८९. | विषय समितीचा सभापती रजेमुळे अनुपस्थित राहिल्याचा परिणाम .. .. | ६६ |
| ९०. | विषय समितीच्या सभापतीचे अधिकारपद नैमित्तिक रीत्या रिकामे होणे .. .. | ६६ |
| ९०-क. | कार्यभार विषय समितीच्या नवीन सभापतीच्या स्वाधीन करण्यास कलम ५३ च्या तरतुदी लागू असणे. .. | ६६ |
| ९१. | स्थायी समिती व विषय समिती यांच्या सभापतीचे अधिकार व कार्य .. | ६७ |
| ९१-क. | जागा रिकाम्या असताना अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्य पार पाडण्यासाठी पीठासीन प्राधिकारी नेमण्याचा शासनाचा अधिकार. | ६७ |
| ९१-ख. | सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची अधिकारपदे एकत्रच रिकामी झाली असताना अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्याचे राज्य शासनाचे अधिकार . | ६८ |
| ९२. | विनियमांद्वारे विहित करावयाची समित्यांची कर्तव्ये, कार्यपध्दती, इत्यादी .. | ६८ |
| ९३. | ( वगळले ) | |


प्रकरण पाच

### कार्यकारी अधिकारी


| | | |
|---|---|---|
| ९४. | मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक .. | ६९ |
| ९५. | मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये .. .. | ६९ |
| ९६. | मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारांचे प्रत्यायोजन .. .. | ७० |
| ९६क. | कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती व त्याचे अधिकार आणि कार्ये .. .. | ७१ |
| ९७. | गट विकास अधिकाऱ्यांची नेमणूक .. .. .. .. | ७१ |
| ९८. | गट विकास अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये. .. .. .. .. | ७१ |
| ९९. | जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखाचे अधिकार व कार्ये .. .. .. | ७१ |


प्रकरण सहा

### जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि समित्या यांचे अधिकार व कर्तव्ये


| | | |
|---|---|---|
| १००. | जिल्हा परिषदेचे प्रशासकीय अधिकार व कार्ये .. .. .. | ७२ |
| १००क. | अनुसूचित क्षेत्रांमधील जिल्हा परिषदेचे अधिकार व कर्तव्ये. .. .. | ७५ |
| १०१. | विवक्षित विषयांच्या बाबतीत पंचायत समिती प्रथमतः जबाबदार असणे. .. .. | ७६ |
| १०१क. | गट अनुदानामधून खर्च करण्याचा पंचायत समितीचा अधिकार . .. | ७६ |
| १०१ख. | अनुसूचित क्षेत्रातील पंचायत समितीचे सक्षम अधिकार व कर्तव्ये .. .. | ७६ |
| १०२. | इतर बांधकामे करण्याचा व इतर परिसंस्थांची व्यवस्था पाहण्याचा आणि इतर स्थानिक प्राधिकरणांना तांत्रिक मार्गदर्शन करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार. . | ७७ |
| १०३. | बांधकामे व विकास परियोजना हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. . | ७७ |

## अनुक्रमणिका — चालू


कलमे पृष्ठे

१०४. जिल्हा निधी हा सर्वसाधारणपणे जिल्हा परिषदेने केलेला परिव्यय व खर्च यासाठी पात्र असणे. ७७

१०५. जडणांडि करण्याचा अधिकार .. .. .. .. ७७

१०६. जिल्हा परिषदेचे अधिकार व तिची कार्ये .. .. .. .. ७८

१०७. टंचाई, इत्यादी प्रसंगी जिल्हा परिषदेची कर्तव्ये .. .. .. ७९

१०८. पंचायत समितीचे अधिकार व तिची कार्ये. . .. .. .. ७९

१०८क. जिल्हा परिषदेने दिलेल्या आनुदेशांनुसार पंचायत समितीने वागणे .. .. ८०

१०९. स्थायी समिती आणि विषय समित्या यांचे अधिकार व कार्ये .. .. ८०

१०९क. वित्त समितीचे विशेष अधिकार व तिची कार्ये. . .. .. .. ८१

११०. दोन किंवा अधिक जिल्हा परिषदांच्या संयुक्त समित्या .. .. .. ८२


प्रकरण सात

### कामकाज चालवणे

### जिल्हा परिषदा


१११. जिल्हा परिषदांच्या बैठकी .. .. .. .. ८३

११२. अधिकार पद रिकामे झाले असताना परिषद सदस्यांना काम करता येणे, जिल्हा परिषदांच्या कृती, वगैरे अनौपचारिकतेमुळे विधीअग्राह्य न होणे. . . .. .. ८६

११३. प्रतिष्ठित व्यक्तींनी बैठकीमध्ये भाषण करणे .. .. .. ८६

११४. अध्यक्षाने विवक्षित शासकीय अधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्या बैठकीस हजर राहण्यास फर्मावणे. ८६

११५. अध्यक्षाने लेखी प्रतिपादने प्रसृत करणे. . .. .. .. ८६

११६. संविदा करण्याची पद्धती .. .. .. .. ८६


### पंचायत समित्या


११७. पंचायत समित्यांच्या बैठकी .. .. .. .. ८७

११८. पंचायत समित्यांच्या बैठकींना कलमे १११, ११२ व ११५ लागू असणे . . .. ८७


### स्थायी आणि विषय समित्या


११९. स्थायी समित्यांच्या आणि विषय समित्यांच्या बैठकी. . .. .. ८८

१२०. सभापतीने यथास्थिती, स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या बैठकीस हजर राहण्यास शासकीय अधिकाऱ्यास फर्मावणे. ८८

१२१. स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या सभापतीने लेखी प्रतिपादने प्रसृत करणे. ८८

१२२. विवक्षित बाबतीत समित्यांची बैठक बोलावणे. .. .. .. ८९

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| | **प्रकरण आठ** | |
| | **बांधकामे आणि विकास परियोजना पार पाडणे व त्या सुस्थितीत ठेवणे** | |
| १२३. | विकास परियोजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेकडे सोपवणे . . . . | ८९ |
| १२४. | जिल्हा परिषदेने पंचायत समितीमार्फत बांधकामे आणि विकास परियोजना पार पाडणे . . | ८९ |
| १२५. | बांधकामे किंवा विकास परियोजना हाती घेण्यास मंजुरी . . . . | ९० |
| १२६. | बांधकामे किंवा विकास परियोजना यांसाठी संविदा . . . . . . | ९० |
| १२७. | निरीक्षण करण्याचा व तांत्रिक मार्गदर्शन, वगैरे देण्याचा राज्य शासनाचा किंवा अधिकाऱ्याचा अधिकार. . . | ९० |
| | **प्रकरण नऊ** | |
| | **जिल्हा परिषद, तिची मालमत्ता, निधी व खर्च** | |
| १२८. | मालमत्ता संपादन करण्याचा व ती भाडेपट्ट्याने देण्याचा, विकण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार. . . | ९१ |
| १२९. | जिल्हा परिषदेची मालमत्ता . . . . . . . . | ९१ |
| १३०. | जिल्हा निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक . . . . . . . | ९२ |
| १३०-क. | पैसा कर्जाऊ घेणे . . . . . . . . | ९४ |
| १३१. | विशेष निधी निर्माण करणे . . . . . . . . | ९४ |
| १३२. | जिल्हा निधी कोठे खर्च करावा . . . . . . . . | ९४ |
| १३३. | सर्वसाधारण खर्च भागवणे . . . . . . . . | ९५ |
| १३४. | जिल्हा निधीतून रकमा कशा काढाव्यात . . . . . . . . | ९५ |
| १३५. | राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यात लेखे ठेवणे . . . . . . | ९६ |
| १३६. | लेख्यांचे विवरण तयार करणे व लेख्यांच्या विवरणांचा गोषवारा प्रसिद्ध करणे . . | ९६ |
| १३७. | प्राप्तीचे व खर्चाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे . . . . | ९७ |
| १३८. | आवश्यक असेल तेव्हा सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज करणे. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे पुनर्विनियोजन मान्यतेच्या अधीन असणे. . . | ९८ |
| १३९. | अर्थसंकल्पीय अंदाज व पुनर्विनियोजने यांना केव्हा मान्यता द्यावी. . . . . | ९९ |
| १४०. | अर्थसंकल्पीय अंदाजात तरतूद न केलेली कोणतीही रक्कम अत्यंत निकडीचा प्रसंग खेरीज करुन एरव्ही खर्च न करणे. | ९९ |
| १४१. | जिल्हा परिषदेच्या प्राधिकाऱ्यांनी कर्ज किंवा आकस्मिक खर्च मंजूर करणे किंवा येणे असलेल्या रकमा निर्लेखित करणे, अशा अधिकारांच्या मर्यादा. | ९९ |
| १४१क. | जिल्हा परिषदेस येणे असलेली रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे. | १०० |
| १४२. | प्रशासन अहवाल . . . . . . . . | १०० |
| १४२क. | परिषदांचे व समित्यांचे हिशेब तपासण्याचा महालेखाकाराचा अधिकार . . . . | १०० |

## अनुक्रमणिका — चालू

कलमे पृष्ठे

### प्रकरण दहा

### कराधान


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १४३. | प्रकरण लागू असणे | १०१ |
| १४४. | जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसवणे | १०१ |
| १४५. | आकारणीसाठी नियम | १०१ |
| १४६. | पाणीपट्टीवर उपकर बसवणे | १०२ |
| १४७. | कलम १४४ मध्ये वर्णन केलेला उपकर बसवण्याची रीत | १०२ |
| १४८. | कलम १४६ मध्ये वर्णन केलेला उपकर बसवण्याची रीत | १०२ |
| १४९. | वरिष्ठ धारकास सहाय्य | १०२ |
| १५०. | पाणीपट्टीवरील स्थानिक उपकर गोळा करणे व तो जमा करणे | १०३ |
| १५१. | विदर्भ क्षेत्रात जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसवणे | १०३ |
| १५१ क. | (वगळण्यात आले) | |
| १५२. | हैदराबाद क्षेत्रात जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर उपकर बसवणे | १०४ |
| १५२ क. | (वगळण्यात आले) | |
| १५३. | जमीन महसुलावरील स्थानिक उपकर गोळा करणे व तो जमा करणे | १०५ |
| १५४. | स्थानिक उपकर निलंबित करणे किंवा त्यात सूट देणे | १०५ |
| १५५. | उपकराच्या दरात वाढ सुचवण्याचा जिल्हा परिषदेचा किंवा पंचायत समितीचा अधिकार. | १०५ |
| १५६. | एखाद्या जमिनीतील खनिजे शासनाच्या मालकीची असतील आणि शासनाला स्वामित्वधन देय असेल तर अशा जमिनीवर उपकर बसवण्याचा अधिकार. | १०६ |
| १५७. | जिल्हा परिषदेस लादता येतील असे कर | १०७ |
| १५८. | स्थावर मालमत्तेच्या विवक्षित हस्तांतरणावर मुद्रांक शुल्क | १०८ |
| १५९. | कर लादण्यापूर्वीची जिल्हा परिषदेची कार्यपद्धती | १०९ |
| १६०. | कर रद्द करण्याची किंवा त्यात फेरफार करण्याची कार्यपद्धती | १०९ |
| १६१. | फी न दिल्याच्या प्रकरणातील कार्यपद्धती | ११० |
| १६२. | मंजूर केलेले नियम नोटिशीसह प्रसिद्ध करणे | ११० |
| १६३. | जिल्हा परिषदेने लादलेल्या सक्तीच्या सर्वसाधारण व विशेष पाणीपट्ट्या पंचायतीने गोळा करणे. | १११ |
| १६४. | पंचायतीने रक्कम भरण्यात कसूर करणे व तिच्या पैशातून ती रक्कम वसूल करणे | १११ |
| १६५. | आक्षेपार्ह कराची आकारणी निलंबित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार | १११ |

## अनुक्रमणिका — चालू


कलमे पृष्ठे

प्रकरण अकरा

**कर किंवा फी गोळा करणे**

१६६. कराच्या किंवा फीच्या रकमेचे बिल सादर करणे .. .. .. ११२
१६७. अधिपत्र काढणे .. .. .. .. ११२
१६८. अधिपत्रावर सही कोणी करावी .. .. .. .. ११२
१६९. अधिपत्र कोणाच्या नावे काढावे .. .. .. .. ११२
१७०. विशेष आदेशाखाली प्रवेश करण्याचा अधिकार .. .. .. ११३
१७१. अधिपत्र कसे बजावले पाहिजे .. .. .. .. ११३
१७२. अटकावून ठेवलेल्या मालाची विक्री, विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग आणि शिल्लक रकमेची व्यवस्था कशी लावावी. ११४
१७३. जिल्ह्याबाहेरील अटकावणी व विक्री .. .. .. .. ११४
१७४. आकारावयाची फी व परिव्यय .. .. .. .. ११४
१७५. दंडाधिकाऱ्याकडे अपिले .. .. .. .. ११४
१७६. जमिनी, इमारती वगैरे यांचे पट्टी बसविण्याचे दायित्व .. .. ११५
१७७. अटकावणी करुन व विक्री करुन वसुली करण्याचा अधिकार निलंबित करणे .. ११५
१७८. पथकर किंवा विवक्षित फी यांच्या वसुलीचा पट्टा देणे .. .. ११५
१७९. सर्व प्रदानांची पावती देणे .. .. ११६

प्रकरण बारा

**जिल्हा परिषदांना वित्तिय सहाय्य**

१८०. ( वगळण्यात आले )
१८१. ( वगळण्यात आले )
१८१-क. जिल्हा परिषदांना वन महसुलाचे अनुदान देणे .. .. .. ११६
१८२. सप्रयोजन अनुदाने .. .. .. .. ११७
१८३. आस्थापना अनुदान .. .. .. .. ११७
१८४. ( वगळण्यात आले )
१८५. स्थानिक उपकराला अनुरुप अनुदान .. .. .. .. ११८
१८६. प्रोत्साहनपर अनुदाने .. .. .. .. ११८

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १८७. | योजनांतर्गत परियोजनांसाठी अनुदाने .. .. .. .. | ११८ |
| १८८. | गट अनुदाने .. .. .. .. | ११८ |
| १८९. | ( वगळण्यात आले ) | |


### प्रकरण तेरा

### स्वच्छताविषयक व इतर अधिकार


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| १९०. | इमारतींमध्ये प्रवेश करणे व त्यांचे निरीक्षण करणे वगैरे याबाबतचा अधिकार .. | ११८ |
| १९१. | घाणेरड्या इमारती, वगैरे .. .. .. .. | ११९ |
| १९२. | पाणीपुरवठ्याच्या साधनांच्या संबंधातील अधिकार व कर्तव्ये .. .. | ११९ |
| १९३. | दिलेल्या निदेशांचे अनुपालन न केल्यास उपाययोजना .. .. | १२० |
| १९४. | विवक्षित प्रयोजनाकरिता सार्वजनिक झरे, वगैरे अलग राखून ठेवण्याचा अधिकार. . | १२० |
| १९५. | इतर प्रयोजनांकरिता अलग राखून ठेवलेल्या जागा वापरण्याबद्दल शास्ती .. | १२० |
| १९६. | दूषित पाण्यापासून होणारा उपद्रव कमी करणे .. .. .. | १२१ |
| १९७. | प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या जागा बंद करणे .. .. .. | १२१ |
| १९८. | जेथे संक्रामक रोग आहे अशा इमारती, वगैरे यांत तपासणीसाठी प्रवेश करण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी वगैरे यास अधिकार असणे ; इमारती, वगैरे जंतुविरहित करणे. | १२१ |
| १९९. | जिल्हा परिषदेने, संसर्गदूषित वस्तू जेथे धुता येतील व जंतुविरहित करता येतील त्या जागा अधिसूचित करणे ; संसर्गदूषित वस्तूंचा नाश करता येणे ; शास्ती. | १२२ |
| २००. | सार्वजनिक रस्ते, जमीन किंवा इमारत यांवरील अडथळे व अतिक्रमणे .. | १२२ |
| २०१. | वजने व मापे इत्यादींची निरीक्षणे करण्याचे अधिकार .. .. | १२३ |
| २०२. | परिवास्तुंना क्रमांक देणे .. .. .. .. | १२३ |


### सार्वजनिक बाजार


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २०३. | बाजारासंबंधातील अधिकार निहित करणे .. .. .. | १२३ |


### खाजगी बाजार


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २०४. | या तरतुदी गावांना लागू करण्याचा राज्य शासनाचा अधिकार .. .. | १२४ |
| २०५. | खाजगी बाजारांसाठी आवश्यक असलेल्या लायसनासंबंधीच्या तरतुदी .. | १२४ |
| २०६. | फी बसवण्याची हक्क मागणी करताना अनुसरावयाची कार्यपध्दती. . .. | १२४ |
| २०७. | फी बसवण्याच्या हक्कमागणीबाबत घ्यावयाच्या निर्णयाची कारणे . . .. | १२४ |
| २०८. | फी बसवण्याचा हक्क प्रस्थापित करण्यासाठी दावा .. .. | १२५ |
| २०९. | लायसनबद्दल फी .. .. . . | १२५ |

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २१०. | लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणे . . . . . . | १२५ |
| २११. | जिल्हा परिषदेच्या आदेशांविरुद्ध अपील . . . . . . | १२५ |
| २१२. | लायसन देण्यास कसूर करणे आणि अशा आदेशाविरुद्ध अर्ज . . . . | १२५ |
| २१३. | लायसन नसलेल्या बाजारांबाबत शास्ती . . . . . | १२५ |
| | **जत्रा** | |
| २१४ | सार्वजनिक बाजारांच्या संबंधातील तरतुदी जत्रा, वगैरे यांना लागू होणे . . | १२५ |
| | **सार्वजनिक गाडीतळ** | |
| २१५. | या तरतुदी स्थानिक क्षेत्रांना लागू करण्याचा राज्य शासनाचा अधिकार . . | १२६ |
| २१६. | सार्वजनिक तळांची तरतूद करणे . . . . . . . . | १२६ |
| २१७. | सार्वजनिक ठिकाणाच्या किंवा सार्वजनिक रस्त्यांच्या बाजूचा गाडीतळ वगैरे म्हणून उपयोग करण्यास मनाई | १२६ |
| २१८. | या तरतुदींच्या प्रारंभाच्या वेळी अस्तित्वात असलेल्या खाजगी गाडीतळासाठी लायसन मिळविणे. | १२६ |
| | **राज्याच्या हैदराबाद प्रदेशातील नगररचनेसंबंधी विशेष तरतुदी** | |
| २१९. २२०. २२१. २२२. २२३. २२४. २२५. २२६ २२६ क. | — ( निरसित ) | |
| | **नोटिसा, इत्यादींबाबत तरतुदी** | |
| २२७. | व्यक्तींच्या नावाने काढलेल्या नोटीसा, वगैरे बजावणे . . | १२७ |
| २२८. | जमिनींच्या व इमारतींच्या मालकांवर किंवा भोगवटादारांवर नोटिसा बजावणे . . | १२७ |
| २२९. | जाहीर व सर्वसाधारण नोटिसा कशा प्रसिध्द कराव्यात . . | १२७ |
| २३०. | सदोष नमुन्यामुळे नोटीस किंवा बिल विधिअग्राह्य न ठरणे . | १२८ |
| २३१. | आदेश व नोटिसा यांची अवज्ञा केल्याबद्दल कोणत्याही इतर कलमान्वये शिक्षायोग्य नसलेल्या अपराधाबद्दल द्यावयाची शिक्षा. . . . . . | १२८ |
| २३२. | मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केली असता, जिल्हा परिषदेने कामे पार पाडणे व त्याचा खर्च वसूल करणे. . . | १२८ |

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २३३. | खर्चाची किंवा व्ययाची रक्कम कशी ठरवावी व कशी वसूल करावी. . . . | १२९ |
| २३४. | मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा खटला भरण्याचा अधिकार. . . . | १२९ |
| २३५. | जिल्हा परिषदेच्या मालमत्तेचे नुकसान कसे भरुन काढावे. . . . | १२९ |
| २३६. | दावा दाखल करण्याची पर्यायी पद्धती . . . . . . . . | १३० |
| २३७. | पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार . . . . . . . . | १३० |


### प्रकरण चौदा

### सेवासंबंधी तरतुदी


| | | |
|---|---|---|
| २३८. | अर्थ लावणे . . . . . . . . | १३० |
| २३९. | राज्य अधिकाऱ्यांचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अभियंत्यांचे पदस्थापन व सेवांची रचना | १३० |
| २४०. | विद्यमान मंडळांचे विवक्षित अधिकारी राज्य शासनाचे अधिकारी होणे . . . . | १३१ |
| २४१. | विद्यमान मंडळांच्या नोकरीत असलेल्या विवक्षित व्यक्तींची जिल्हा परिषदांकडे बदली | १३१ |
| २४२. | शासकीय कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषदांकडे अंतिमरित्या वाटप करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | १३२ |
| २४२-क. | विवक्षित जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची राज्य शासनाच्या सेवांत बदली करणे. . . | १३२ |
| २४२-ख. | विवक्षित जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची वर्ग एकमध्ये किंवा दोनमध्ये व सर्वसाधारण राज्य सेवांमध्ये नेमणूक. | १३३ |
| २४२-खख. | जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) च्या विवक्षित कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये नेमणुकीसाठी पात्रता. | १३३ |
| २४२-ग. | विवक्षित कर्मचाऱ्यांची जिल्हा परिषदांकडे बदली करणे . . . . . . | १३४ |
| २४३. | प्रत्येक सेवेतील प्रारंभिक कर्मचारी संख्या व घडण कशी असावी हे निर्धारित करणे | १३५ |
| २४३-क. | कर्मचारी नेमून देण्याची पद्धती, इत्यादी ठरवून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार . . | १३६ |
| २४४. | अधिकारी व कर्मचारी यांची प्रारंभिक नेमणूक . . . . . . | १३६ |
| २४५. | जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली नेमणूक केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते राज्याच्या एकत्रीकृत निधीतून काढणे. | १३६ |
| २४६. | अधिकाऱ्यांचा व कर्मचाऱ्यांचा जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी होण्याबाबतच्या विकल्पाचा वापर करण्यासंबंधीचा अधिकार. | १३६ |
| २४७. | सेवाबदल केल्याबद्दल कोणतीही भरपाई देय असणार नाही . . . . | १३७ |
| २४८. | जिल्हा परिषदेत सेवा करण्यासाठी व्यक्तींची भरती व त्यांच्या सेवेच्या शर्ती . . | १३७ |
| २४९. | विवक्षित नेमणुकांचे विधीग्राह्यीकरण . . . . . . . . | १३८ |
| २५०. | ( वगळण्यात आले ) | |
| २५१. | ( वगळण्यात आले ) | |
| २५२. | जिल्हा परिषदेने कर्मचारीवर्गाची अनुसूची तयार करणे व ती मंजूर करणे . . | १३८ |
| २५३. | संविदा करुन व्यक्तींची नेमणूक करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार . . | १३९ |

## अनुक्रमणिका — चालू


कलमे — पृष्ठे

### सेवासंबंधी संक्रमणकालीन तरतुदी

२५३-क. शासकीय कर्मचारी, इत्यादींना मर्यादित कालावधीसाठी वाटून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. १३९

२५३-ख. शासकीय कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवेत प्रतिनियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार १४०

२५३-खख. संविधानाच्या अनुच्छेद २४३-छ याचा महादेश अंमलात आणण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवांवर प्रतिनियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार १४२

२५३-खखख. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवांवर प्रतिनियुक्त करण्याचा राज्य शासमाचा अधिकार. १४२

२५३-ग. कलम २५३-ग (१) खाली येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने नेमून देण्याकरिता किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्तीकरिता तरतूद. १४३

२५३-गग. कलम २५३-खखख खाली येणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने नेमून देण्याकरिता किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्तीकरिता तरतूद. १४४

प्रकरण पंधरा

### जिल्हे आणि गट यांच्या हद्दीत फेरफार करणे

२५४. जिल्ह्याच्या हद्दीत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार . . . . १४५

२५५. जिल्ह्यात फेरफार करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे यथोचित तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. १४५

२५५क. जिल्हे नाहीसे होणे . . . . . . . . १४८

२५६. गटाच्या हद्दीत फेरबदल करण्याचा राज्य शासनाचा अधिकार . . . . १४८

२५७. गटामध्ये फेरबदल करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे यथोचित तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. १४९

२५७क. गटाची किंवा गटांची विभागणी आणि तिचे परिणाम . . . . . . १४९

प्रकरण सोळा

### नियंत्रण

२५८. जिल्हा परिषदेच्या कारभारासंबंधी चौकशी . . . . . . १५०

२५९. जिल्हा परिषदेने कर्तव्ये बजाविण्यात कसूर केली असता ती पार पाडण्याबाबत तरतुद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. १५१

२६०. जिल्हा परिषद विसर्जित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार व परिणामरुप तरतूदी १५१

२६१. बांधकामे व विकासविषयक परियोजना यांच्या संबंधात निदेश देण्याचे राज्य शासनाचे अधिकार १५३

२६१क. नळाने पाणी पुरवठा करण्याची परियोजना आपल्याकडे घेण्यात जिल्हा परिषदेने कसूर केली असता ती परियोजना कार्यान्वित ठेवण्यासाठी अनुदान, इत्यादींमधून खर्च वसूल करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. १५३

## अनुक्रमणिका — चालू


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २६२. | आयुक्ताने जिल्हा परिषदेची, तिच्या समितीची किंवा पंचायत समितीची बैठक बोलावणे. | १५४ |
| २६३. | निरीक्षण व पर्यवेक्षण करण्याचा अधिकार. . . . . . . . | १५४ |
| २६४. | आयुक्ताने जिल्हा परिषदेच्या कार्यालयाचे निरीक्षण करणे . . . . | १५४ |
| २६५. | कर्मचारीवर्गावरील अपव्ययास किंवा निरर्थक खर्चास प्रतिबंध करण्याचा आयुक्ताचा अधिकार. | १५५ |
| २६६. | जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधीची माहिती मागवण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार | १५५ |
| २६७. | जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती, इत्यादींचे आदेश वगैरे यांची अमलबजावणी निलंबित करण्याचा जिल्हा दंडाधिकाऱ्यांचा अधिकार. | १५५ |
| २६७-क. | जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती, इत्यादींचा विधीसंमत नसलेला आदेश किंवा ठराव यांची अमलबजावणी निलंबित करण्याचा आयुक्ताचा अधिकार. | १५६ |
| २६८. | जिल्हाधिकाऱ्यांचे निकडीच्या प्रसंगीचे अधिकार . . . . . . | १५६ |
| २६९. | अक्षमता, कसूर किंवा अधिकारांचा दुरुपयोग याबद्दल पंचायत समिती विसर्जित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | १५७ |
| २७०. | विवक्षित बाबतीत विशेष नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार . . . . | १५८ |
| २७१. | एखाद्या जिल्हा परिषदेने सार्वजनिक आरोग्य संबंधात नोकरीवर ठेवलेल्या कर्मचारी-वर्गाची निकडीच्या परिस्थितीत दुसऱ्या जिल्ह्यात बदली करण्याचा राज्य शासनाचा अधिकार | १५८ |
| २७२. | जिल्हाधिकारी इत्यादींच्या बाबतीत राज्य शासनाचे व आयुक्ताचे अधिकार . . | १५८ |
| २७३. | राज्य शासनाने अधिकार प्रत्यायोजित करणे . . . . . . | १५९ |


प्रकरण सतरा

### नियम, विनियम आणि उप-विधी


| | | |
|---|---|---|
| २७४. | नियम . . . . . . . . . . . . . . | १५९ |
| २७५. | विनियम . . . . . . . . . . . . . . | १६५ |
| २७६. | उप-विधी . . . . . . . . . . . . . . | १६५ |


प्रकरण अठरा

### संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| २७७. | जिल्हा परिषदेशी किंवा पंचायत समितीशी केलेली कोणतीही संविदा, वगैरे यात परिषद-सदस्यांचा, अधिकाऱ्याचा, किंवा कर्मचाऱ्याचा हितसंबंध असल्यास शास्ती . | १६७ |
| २७८. | जिल्हा परिषद, वगैरेच्या परिषद-सदस्य इत्यादी व्यक्ती लोकसेवक असणे . . | १६८ |
| २७९. | जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी अधिकार सोपविणे . . . . . . | १६८ |
| २८०. | दावे इत्यादी दाखल करण्याची मुदत . . . . . . | १६८ |
| २८०क. | पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती मोजताना आणि त्यांना मानधन व इतर सुविधा देताना जून १९७५ मध्ये घोषित केलेल्या आणीबाणीच्या काळातील स्थानबद्धतेचा कालावधी दुर्लक्षित करणे. | १६९ |

## अनुक्रमणिका — समाप्त


| कलमे | | पृष्ठे |
|---|---|---|
| २८१. | जिल्हा परिषदेचा आपले अधिकार सोपविण्याचा अधिकार. . . . . . | १६९ |
| २८२. | दोन किंवा अधिक स्थानिक प्राधिकरणांची संयुक्त बैठक. . . . . . | १६९ |
| २८३. | महानगरपालिका वगैरेंना दिलेल्या महसुलाच्या हिश्श्याचा उपयोग करणे. . . | १७० |
| २८४. | (वगळण्यात आले) | |
| २८५. | जमीन संपादन करणे . . . . . . . . | १७० |
| २८५क. | जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांची मुख्यालये नेमून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार. | १७१ |
| २८६. | (वगळण्यात आले) | |
| २८७. | कायदा अनुकूल करुन घेण्यासंबंधी राज्य शासनाचा अधिकार . . . . | १७१ |
| २८८. | संक्रामी तरतुदी आणि व्यावृत्ती . . . . . . . . | १७१ |
| २८९. | अडचणी दूर करणे . . . . . . . . . . | १७२ |
| २९०. | निरसन . . . . . . . . . . | १७२ |
| | **पहिली अनुसूची** . . . . . . . . . . | १७३ |
| | **दुसरी अनुसूची** . . . . . . . . . . | १८० |
| | **तिसरी अनुसूची** (वगळण्यात आली) | |
| | **चौथी अनुसूची** . . . . . . . . . . | १८४ |
| | **पाचवी अनुसूची** . . . . . . . . . . | १८५ |
| | **सहावी अनुसूची** . . . . . . . . . . | १८५ |
| | **सातवी अनुसूची** . . . . . . . . . . | १८६ |
| | **आठवी अनुसूची** . . . . . . . . . . | १८७ |
| | **नववी अनुसूची** (वगळण्यात आली) | |
| | **दहावी अनुसूची** (वगळण्यात आली) | |
| | **अकरावी अनुसूची** . . . . . . . . | १८७ |

# सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५

## [महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१][1]

[या अधिनियमाला दिनांक ५ मार्च १९६२ रोजी राष्ट्रपती यांची अनुमती मिळाल्यानंतर तो **महाराष्ट्र शासन राजपत्र** भाग चारमध्ये दिनांक १३ मार्च १९६२ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला.]

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ *

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९ व सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३. @

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०. ‡

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५. $

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७. *i*

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३.

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३.

सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. *f*

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र**, १९६१, भाग ५, पृष्ठे ६०३-६११ (इंग्रजी) पहा; संयुक्त समितीच्या अहवालासाठी याच राजपत्राचा भाग ५, पृष्ठे ७७३-९६७ (इंग्रजी) पहा.

* सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ याचे कलम १५ पुढीलप्रमाणे आहे :--

" १५. उपरोक्त तरतुदीअन्वये (कलम १३ खेरीजकरून) मुख्य अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणा ज्या ज्या तारखेस मुख्य अधिनियम पारित करण्यात आला त्याच तारखेस त्या अधिनियमात समाविष्ट करण्यात आल्या आहेत आणि ज्या तारखेस मुख्य अधिनियम अंमलात आला त्याच तारखेपासून त्या अंमलात आल्या आहेत असे समजण्यात येईल.

मुख्य अधिनियम पारित झाल्याच्या तारखेपासून सुधारणा अंमलात येणे

@ सन १९६४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २६ अन्वये निरसित करण्यात आला.

‡ सन १९६५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

$ सन १९६६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

*i* सन १९६७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९६७ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम १२ अन्वये निरसित करण्यात आला.

*f* सन १९६८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ हा सन १९६८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १८ अन्वये निरसित करण्यात आला.

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ @

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४. △

सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२.

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. (३० एप्रिल १९७२) +

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. ††( : मे १९७२) +

सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६.

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. (१५ नोव्हेंबर १९७६) +

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४. (१ जून १९७३) +

सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. £ (३ मे १९७३) +

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८. ‖ (१३ जुलै १९७४) +

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५. (१ एप्रिल १९७४) +

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. (२६ एप्रिल १९७४) +

सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४. " (२९ एप्रिल १९७४) +

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ //

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६. (१ एप्रिल १९७५) +

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११. (१४ एप्रिल १९७६) +

---

@ सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ हा सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १४ अन्वये निरसित करण्यात आला.

△ सन १९६९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ हा सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये निरसित करण्यात आला.

†† सन १९७२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

+ ही खुण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

£ सन १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

‖ सन १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

" सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

// (त्याची ७, १२, २० आणि ३६ ही कलमे वगळता) तो दिनांक १ मे १९७५ रोजी अंमलात आला. (महा– शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए [illegible], दिनांक २३ एप्रिल १९७५). सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७, दिनांक १ सप्टेंबर १९७५ रोजी अंमलात आले. (महा– शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए, १०७५, दिनांक ९ ऑगस्ट १९७५).

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ £ (१९ एप्रिल १९७६) /

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१. (१ जानेवारी १९७८) /

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. ‡‡‡ (२९ एप्रिल १९७८) /

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. ÷ (१० ऑगस्ट १९७८) /

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०. ÷ (११ जानेवारी १९७९) /

सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४. (१ जून १९७९) /

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३. @ (२९ एप्रिल १९८०) /

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७.

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०. (२० जून १९८१) /

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६. (१५ सप्टेंबर १९८१) /

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६.

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११. (८ एप्रिल १९८२) /

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७. (१९ फेब्रुवारी १९८२) /

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६. ** (१४ ऑगस्ट १९८२) /

सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७. *** (१८ जून १९८२) /

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९. @@ (१२ ऑक्टोबर १९८२) /

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५. (२२ एप्रिल १९८३) /

---

£ सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ अन्वये निरसित करण्यात आला.

‡‡‡ सन १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

÷ सन १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ हा सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

/ ही खुण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते

÷ सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ हा सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० कलम १४ अन्वये निरसित करण्यात आला.

@ सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

** सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० हा सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आला.

*** सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ हा सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८(१) अन्वये निरसित करण्यात आला.

@@ सन १९८३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ हा सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, ‡‡(१८ जून १९८३) †

---

† ही खुण अधिनियमाच्या प्रारंभीची तारीख दर्शवते.

‡‡ सन १९८२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४ हा सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याची कलमे ४ आणि ५ यामध्ये खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे :-

दुय्यम सेवेमधील विवादित नेमणूका विधिग्राह्य करणे.

"४. महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळे अधिनियम, १९७३ यात काहीही अंतर्भूत असले तरी हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेच्या लगतपूर्वीच्या दिवशी किंवा त्यापूर्वी दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावर नेमणूक करण्यात आलेली, आणि या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस अजूनही सेवेत असलेली प्रत्येक व्यक्ती ही निवड मंडळाने किंवा यथास्थिति विशेष निवड मंडळाने उक्त अधिनियमान्वये किंवा महाराष्ट्र लोकसेवा (दुय्यम) निवड मंडळ नियम, १९७६, या अन्वये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही नियमाअन्वये किंवा आदेशान्वये नामनिर्देशित केलेली किंवा शिफारस केलेली नसली तरीही, किंवा निवड मंडळाने किंवा विशेष निवड मंडळाने उमेदवारांच्या निवडीसाठी सुधारित नियम तयार केलेले नसले तरीही, त्या पदावर कायदेशीर रीत्या नेमणूक करण्यात आलेली आहे असे समजण्यात येईल आणि ती व्यक्ती रीतसर निवडण्यात या नेमण्यात आलेली नाही याच केवळ कारणास्तव त्या नेमणुकीबाबत कोणत्याही न्यायालयात किंवा प्राधिकरणासमोर आक्षेप घेता येणार नाही : १९७३ चा महा. ३१

परंतु—

(अ) राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली अशी नेमणूक करण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीची प्रारंभिक नेमणूक ही,--

(एक) अशा नेमणुकीच्या वेळी, त्या पदाकरिता जे सेवाप्रवेश नियम अंमलात असतील त्या नियमांत विहित केलेल्या वयोमर्यादेस व किमान अर्हतेस धरून असली पाहिजे,

(दोन) सेवायोजन कार्यालयाने किंवा समाजकल्याण अधिकाऱ्याने शिफारस केलेल्या किंवा राज्य शासनाने शासकीय सेवेत नेमणूक करण्यासाठी उमेदवार पाठवण्याकरिता प्राधिकृत केलेल्या मागासवर्ग संघटनांनी शिफारस केलेल्या किंवा जिल्हाधिकाऱ्याने १९७७-७८ च्या संपकाळात नोकरीला लागलेल्या उमेदवारांच्या यादीतून शिफारस केलेल्या, उमेदवारांमधून करण्यात आलेली असली पाहिजे.

(तीन) शासनाने, मागासवर्गातील, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींसाठी, माजी सैनिकांसाठी, अपंग व्यक्तींसाठी या अन्य कोणत्याही वर्गाच्या व्यक्तींसाठी पदे राखून ठेवण्यासंबंधात वेळोवेळी जे आदेश दिले असतील त्यांना धरून असली पाहिजे.

(ब) अशा प्रकारची नेमणूक जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ अन्वये स्थापन करण्यात आलेली नगरपालिका शाळा मंडळे, विद्युत (पुरवठा) अधिनियम १९४८ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य वीज मंडळ आणि मार्ग परिवहन महामंडळ अधिनियम, १९५० अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या नियंत्रणाखाली करण्यात आली असेल त्या बाबतीत त्या व्यक्तीची प्रारंभिक नेमणूक ही, अशा नेमणुकीच्या वेळी अंमलात असलेल्या संबंधित नियमांना वा विनियमांना किंवा त्या पदाशी संबंधित अशा प्राधिकरणाने दिलेल्या आदेशांना, किंवा शासनाने त्या संदर्भात दिलेल्या कोणत्याही आदेशाला धरून करण्यात आलेली असली पाहिजे; १९४७ चा मुंबई ६१. १९४८ चा ५४ १९५० चा ६४

**स्पष्टीकरण.**— या कलमाच्या परंतुकामध्ये निर्देश केलेली प्रारंभिक नेमणूक निश्चित करताना दुय्यम सेवेत भरती करण्यासंबंधी केलेल्या कोणत्याही नियमांनुसार किंवा आदेशांनुसार आवश्यक असलेल्या गोष्टीचे अनुपालन

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०. (१७ ऑक्टोबर १९८४) ÷

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११. (३ मार्च १९८६) ÷

सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. *(१० मे १९८५) ÷

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६. @ (६ डिसेंबर १९८५) ÷

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२. (११ डिसेंबर १९८६) ÷

सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३. (११ डिसेंबर १९८६) ÷

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. (१८ फेब्रुवारी १९८८) ÷

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. (१ नोव्हेंबर १९८७) ÷

सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७. ( ४ डिसेंबर १९८७) ÷

सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. @ @(२९ फेब्रुवारी १९८८) ÷

सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११. @ @ @ (१७ फेब्रुवारी १९८९) ÷

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०. ÷÷÷

---

करण्यासाठी दुय्यम सेवेतील कोणत्याही पदावर चालू ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तींची तांत्रिक कारणासाठी खंडीत केलेली सेवा आणि त्यानंतरचा कोणताही औपचारिक नेमणूक आदेश विचारात घेतला जाणार नाही.

१९०४ चा मुंबई १ — ५. या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त मुंबईच्या सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ च्या कलम ७ च्या निरसनाच्या परिणामांच्या संबंधाने असलेल्या तरतुदी लागू होतील." व्यावृत्ती

÷ ही खुण अधिनियनाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

* सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ८ अन्वये निरसित करण्यात आला.

@ सन १९८५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ हा सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

@ @ सन १९८८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

@ @ @ सन १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ हा सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

÷÷÷ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १० खालीलप्रमाणे आहे:—

१९६२ चा महाराष्ट्र ५. १९९०चा महाराष्ट्र १०. १९६२ चा महाराष्ट्र ५. १९५९चा मुंबई ३. १९९०चा महाराष्ट्र १०. — "१०. शंका निवारणार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या, यथास्थिती कोणत्याही जिल्हा परिषदेवर स्वीकृत करण्यात आलेली महिला परिषद सदस्य किंवा पंचायत समितीवर स्वीकृत करण्यात आलेली स्त्री सदस्य किंवा ग्रामपंचायतींमध्ये राखीव जागेवर निवडून आलेली आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, १९९० याच्या प्रारंभाच्या दिनांकास अनुक्रमे असा परिषद सदस्य किंवा सदस्य म्हणून पद धारण करणारी स्त्री सदस्य, तिचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी तिने आपल्या पदाचा राजीनामा दिला नसेल तर किंवा असे परिषद सदस्याचे किंवा सदस्यांचे पद धारण करण्यास ती अनर्ह ठरवण्यात आली नसेल तर, जणू काही, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यामध्ये, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, १९९० अन्वये करण्यात आलेल्या सुधारणा अधीन करण्यात आल्या नव्हत्या असे समजून तिचा पदावधी समाप्त होईपर्यंत यथास्थिति अशी परिषद सदस्य किंवा सदस्य राहील." विद्यमान महिला परिषद सदस्यांनी आणि सदस्यांनी पद धारण करणे चालू ठेवणे.

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ ‡‡‡ §§§ (१२ फेब्रुवारी १९९०) †

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९. £££(१२ मे १९९०) †

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५. $ (१४ नोव्हेंबर १९९०) †

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४. * (२८ फेब्रुवारी १९९१) †

---

‡‡‡ सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ८ अन्वये निरसित करण्यात आला.

§§§ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ७ खालीलप्रमाणे आहे :—

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ अन्वये करण्यात आलेल्या काही नियमांचे विधिग्राह्यीकरण व ते पुन्हा अधिनियमित करणे.

७. शंका निरसनासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येते की, कोणत्याही न्यायालयाच्या कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यातील प्रत्येक जिल्ह्यासाठी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम २७४, पोट-कलम (२) च्या, अनुक्रमे खंड (दोन) व खंड (तेरा) अन्वये तयार करण्यात आलेले, " जिल्हा परिषदा (मतदार विभाग व जागांचे आरक्षण) नियम, १९८५" आणि उपरोक्त तरतुदीअन्वये या कोणत्याही नियमांत करण्यात आलेली कोणतीही सुधारणा ही योग्य व वैध रीतीने त्याच स्वरूपात पुन्हा अधिनियमित करण्यात आली असल्याचे समजण्यात येईल आणि ते नियम व त्या सुधारणा ह्या अंमलात असण्याचे केव्हाही बंद झाले होते असे समजण्यात येणार नाही आणि जणू काही या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणेच्या महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ अन्वये ते नियम पुन्हा अधिनियमित करण्यात आले होते आणि त्या सुधारणा करण्यात आल्या होत्या असे समजून अशा नियमातील प्रत्येक नियम किंवा त्यातील सुधारणा, ज्या तारखेस त्या करण्यात आल्या होत्या, त्या तारखेपासून अंमलात असण्याचे चालू राहील; आणि या नियमान्वये केलेली कोणतीही कृती किंवा केलेली कोणतीही कारवाई ही, जणू काही कायद्यानुसार केलेली कृती केलेली कारवाई असल्याप्रमाणे वैध व अंमलात राहील, आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) अधिनियम, १९७६ याच्या कलम ५ अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येची आकडेवारी ही जिल्हानिहाय किंवा ग्रामनिहाय निश्चित करण्यात आली नव्हती किंवा अधिसूचित करण्यात आली नव्हती किंवा असे कोणतेही नियम तयार करण्याचा किंवा त्यात सुधारणा करण्याचा, राज्य शासनाला कोणताही अधिकार नव्हता केवळ याच कारणास्तव, असे नियम किंवा त्या अन्वये केलेली कोणतीही कृती किंवा त्या अन्वये केलेली कोणतीही कारवाई यास कोणत्याही न्यायालयात हरकत घेता येणार नाही.

(उजव्या समासातील टिपा: १९६२चा महाराष्ट्र ५; १९६२चा महाराष्ट्र ५; १९७६चा महाराष्ट्र १०८)

£££ सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ हा सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ९ अन्वये निरसित करण्यात आला.

$ सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ हा सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

* सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ हा सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. £*(२३ जानेवारी १९९२) †

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १.

सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९. £**

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९. £***(१ सप्टेंबर १९९३) †

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११. ££* (२ सप्टेंबर १९९३) †

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. ££**(२५ सप्टेंबर १९९३) †

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१. (२३ एप्रिल १९९४) †

सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६. ££***(१७ सप्टेंबर १९९४) †

सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२. £££* (३० ऑक्टोबर १९९५) †

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३. ıııı** (१४ नोव्हेंबर १९९६) †

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०. ıııı* (३ जानेवारी १९९७) †

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४. ıııı** (१८ फेब्रुवारी १९९७) †

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६.

सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४. (१३ नोव्हेंबर १९९८) †

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३.

सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०.

---

£* सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ हा सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

£** सन १९९२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ हा सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

£*** सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ हा सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

££* सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ हा सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ अन्वये निरसित करण्यात आला.

££** सन १९९३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ हा सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ५ अन्वये निरसित करण्यात आला.

† ही मूळ अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

££*** सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ हा सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम ७ अन्वये निरसित करण्यात आला.

£££* सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १९ हा सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आला.

ıııı** सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १५ हा सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ अन्वये निरसित करण्यात आला.

ıııı* सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ हा सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ९ अन्वये निरसित करण्यात आला.

ıııı** सन १९९७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ हा सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १० अन्वये निरसित करण्यात आला.

ग्रामिण क्षेत्रांमध्ये जिल्हा परिषदांची आणि पंचायत समित्यांची स्थापना करणे, त्यांच्याकडे स्थानिक शासनविषयक कामे नेमून देणे, आणि अशा संस्थांकडे राज्याच्या पंचवार्षिक योजनांमधील विवक्षित कामांची व विकास परियोजनांची अंमलबजावणी करण्याचे काम सोपवून देणे, तसेच, लोकशाही परिसंस्थांच्या विकासास उत्तेजन मिळावे आणि उक्त योजनांत आणि स्थानिक व सरकारी कामकाजात जनतेस मोठ्या प्रमाणात सहभागी होता यावे म्हणून विवक्षित अधिनियमाखालील अधिकार व कामे यांचे विकेंद्रीकरण करून असे अधिकार व कामे त्या स्थानिक संस्थांकडे सोपवून देण्याची तरतूद करणे याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, ग्रामिण क्षेत्रांमध्ये जिल्हा परिषदांची आणि पंचायत समित्यांची स्थापना करण्यासाठी तरतूद करणे, त्यांच्याकडे स्थानिक शासनविषयक कामे नेमून देणे, आणि अशा संस्थांकडे राज्याच्या पंचवार्षिक योजनांमधील विवक्षित कामांची व विकास परियोजनांची अंमलबजावणी करण्याचे काम सोपवून देणे, तसेच लोकशाही परिसंस्थांच्या विकासास उत्तेजन मिळावे आणि उक्त योजनांत आणि स्थानिक व सरकारी कामकाजात जनतेस मोठ्या प्रमाणात सहभागी होता यावे म्हणून विवक्षित अधिनियमाखालील अधिकार व कामे यांचे विकेंद्रीकरण करून असे अधिकार व कामे त्या परिसंस्थांकडे सोपवून देणे यासाठी आणि उपरोक्त बाबींशी संबंधित असलेल्या प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बाराव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ असे म्हणावे.

(२) तो बृहन्मुंबई व्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो, राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जो [१] दिनांक नेमून देईल त्या [१]दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या

२. संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या अधिनियमात, –

[२] * * *

[३][ "(२) "नागरिकांचा मागासवर्ग" या संज्ञेचा अर्थ राज्य शासनाने इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गाचे भाग अथवा त्यामधील गट असा आहे ;]

[४][ "(२ क) "मतपेटी" किंवा "मतपत्रिका" यात, निवडणुकीच्या वेळी, मते देण्याकरिता आणि मतांची नोंदणी करण्याकरिता, वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या समावेश होतो ;]

(३) "गट" या संज्ञेचा अर्थ, कलम ५ अन्वये राज्य शासन एखाद्या जिल्ह्यातील ज्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राची एखादा गट म्हणून रचना करील असे स्थानिक क्षेत्र असा आहे,

---

१ १ मे १९६२, सहकार व ग्रामविकास विभागाची शासकीय अधिसूचना क्रमांक झी. पी. डी. ६९६२-एन, दिनांक २६ मार्च १९६२ पहा.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ३३(१) अन्वये खंड (१) वगळण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ३३(२) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

४ सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, याच्या कलम ४ द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

(४) "गट-अनुदान" या संज्ञेचा अर्थ, कलम १८८ अन्वये, राज्य शासनाने एखाद्या पंचायत समितीस दिलेले अनुदान असा आहे. [1][आणि यात [2][कलमे १०० आणि १५५] अन्वये अनुदान म्हणून देण्यात आलेल्या [3][किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये गट-अनुदान म्हणून दिलेल्या ] कोणत्याही रकमेचा समावेश होतो];

(५) "गट विकास अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, कलम ९७ अन्वये त्या पदनामानिशी नेमण्यात आलेला अधिकारी असा आहे ;

(६) "उपविधी" या संज्ञेचा अर्थ, कलम २७६ अन्वये केलेले उपविधि असा आहे.

(७) "मुख्य कार्यकारी अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, कलम ९४ अन्वये नेमण्यात आलेला जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी असा आहे ;

[4] * * *

(९) "परिषद सदस्य" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये रचना केलेल्या एखाद्या जिल्हा परिषदेचा सदस्य असा आहे;

(१०) "विकास परियोजना" या संज्ञेत, एखादे कार्य, परियोजना, प्रकल्प, काम, विकासविषयक कार्ये यांचा किंवा कार्ये, परियोजना, प्रकल्प, कामे आणि विकास कार्ये यांच्या योजनेचा समावेश होतो;

(११) "जिल्हा " या संज्ञेचा अर्थ, कलम ४ अन्वये रचना केलेला जिल्हा असा आहे ;

(१२) "जिल्हा यादी" या संज्ञेचा अर्थ, कलम १०० अन्वये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद करण्यात आलेल्या ज्या विषयांच्या संबंधात तरतूद करण्याचे अधिकार जिल्हा परिषदेस, देण्यात आले आहेत अशा विषयांची यादी असा आहे;

[5] * * * * *

(१५) "निवडणूक" या संज्ञेचा अर्थ, यथास्थिति, एखाद्या जिल्हा परिषदेसाठी किंवा पंचायत समितीसाठी घ्यावयाची निवडणूक असा आहे; आणि यात पोट-निवडणुकीचा समावेश होतो;

[6]["(१५क) "कार्यकारी अधिकारी" या संज्ञेचा अर्थ, कलम ९६क अन्वये नियुक्त करण्यात आलेला कार्यकारी अधिकारी असा आहे;]

[7]["(१५ख) "वित्त आयोग" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३झ च्या तरतुदीनुसार रचना केलेला वित्त आयोग असा आहे ;]

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[2] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २(अ) अन्वये "कलम १५५" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २८ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३३(३) अन्वये खंड ८ वगळण्यात आले

[5] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये खंड (१३) व (१४) वगळण्यात आले.

[6] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९२, कलम (२) अन्वये खंड (१५क) समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३३(४) अन्वये खंड (१५ख) समाविष्ट करण्यात आला.

(१६) "वित्तीय वर्ष" या संज्ञेचा अर्थ, दिनांक १ एप्रिल पासून किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जो कोणताही इतर दिनांक नेमून देईल त्या दिनांकापासून सुरू होणारे वर्ष असा आहे.

[1][(१६क) "पाटबंधारे विकास महामंडळ" याचा अर्थ, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ अधिनियम, १९९६ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, किंवा विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम,१९९७ अन्वये स्थापन करण्यात आलेले विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, किंवा कोकण पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ अन्वये स्थापन करण्यात आलेले कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, किंवा महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, १९९७ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र तापी पाटबंधारे विकास महामंडळ, किंवा महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम १९९८ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, असा आहे;] १९९६ चा महा. ५१. १९९७ चा महा. २६. १९९८ चा महा. ३.

(१७) "मतदारांची यादी" या संज्ञेचा अर्थ, कलम १३ अन्वये, तरतूद करण्यात आलेली व ठेवण्यात आलेली मतदारांची यादी असा आहे. १९९८ चा महा. ४.

(१८) "सदस्य" या संज्ञेचा अर्थ कोणत्याही पंचायत समितीचा किंवा या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या समितीचा सदस्य असा आहे. १९९८ चा महा. २३.

(१९) "पंचायत" या संज्ञेचा अर्थ, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अन्वये स्थापन करण्यात आलेली किंवा स्थापन करण्यात आल्याचे समजण्यात येणारी ग्रामपंचायत असा आहे; १९५९ चा

(२०) "पंचायत समिती" किंवा "समिती" या संज्ञेचा अर्थ, कलम ५७ अन्वये प्रत्येक गटासाठी रचना करण्यात आलेली पंचायत समिती असा आहे; मुंबई ३.

[2][(२०क) "लोकसंख्या" या संज्ञेचा अर्थ [3][ ज्या शेवटच्या लगतपूर्वीच्या जनगणनेची संबद्ध आकडेवारी तात्पुरती किंवा अंतिमतः प्रसिद्ध करण्यात आली आहे] त्या जनगणनेत निश्चित करून दि[लेली] लोकसंख्या असा आहे;]

[4]**स्पष्टीकरण.**– अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची आकडेवारी ही जिल्हानिहाय व ग्रामनिहाय निश्चित करण्यात आलेली नव्हती आणि अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आदेश (सुधारणा) अधिनियम, १९७६, याच्या कलम ५ अन्वये अधिसूचितही करण्यात आलेली नव्हती आणि त्यामुळे अशी आकडेवारी उपलब्ध नाही, अशी जनगणना प्राधिकरणाने सादर केलेली माहिती विचारात घेतल्यानंतर, जिल्हा परिषदांमध्ये व पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी जागा राखून ठेवण्यासाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची असलेली लोकसंख्या किंवा पंचायत समित्यांचे सभापती व उप सभापती यांची निवडणूक घेण्यासाठी असलेली लोकसंख्या, जनजाती विकास गटातील अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येची टक्केवारी ही कलम १२, ५८ आणि ६४ च्या प्रयोजनांसाठी, केवळ १९७१ च्या जनगणनेमध्ये मूलतः निश्चित केल्याप्रमाणे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येप्रमाणे असेल.] १९७६ चा १०८

(२१) "विहित" या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे.

(२२) "अध्यक्ष" या संज्ञेचा अर्थ, जिल्हा परिषदेचा अध्यक्ष असा आहे;

(२३) "पिठासीन प्राधिकारी या शब्दप्रयोगाचा अर्थ, अध्यक्ष किंवा पंचायत समिती, किंवा स्थायी समिती किंवा विषय समिती किंवा जिल्हा परिषदेने नेमलेली इतर कोणतीही समिती यांचा सभापती असा आहे आणि त्या संज्ञेत, उपाध्यक्ष आणि पंचायत समितीचा उप सभापती आणि यथास्थिति, जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा स्थायी समिती किंवा विषय समिती यांच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून काम चालविण्यासाठी निवडण्यात आलेली कोणतीही व्यक्ती यांचा समावेश होतो;

(२४) "विनियम" या संज्ञेचा अर्थ, कलम २७५ अन्वये केलेले विनियम असा आहे.

(२५) "संबद्ध संहिता" [5][या संज्ञेचा अर्थ, दिनांक १५ ऑगस्ट १९६७ पूर्वीच्या कोणत्याही कालावधीच्या बाबतीत-] १९८९ चा

(क) राज्याच्या मुंबई क्षेत्राच्या संबंधात, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ असा आहे. मुंबई ५

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम २ द्वारे हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३३(५) अन्वये, मूळ खंड (२०क) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[3] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, याच्या कलम २ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २ अन्वये, दिनांक १० मे १९८५ रोजी हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[5] सन १९६८ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २(ड) अन्वये, "या संज्ञेचा अर्थ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सन १९५५ चा मध्यप्रदेश २. (ख) राज्याच्या विदर्भ विभागाच्या संबंधात, मध्यप्रदेश भू-राजस्व संहिता, १९५४ असा आहे; आणि

१३१७ फसलीचा हैद्राबाद ८. (ग) राज्याच्या हैद्राबाद क्षेत्राच्या संबंधात, हैद्राबाद जमीन महसूल अधिनियम;

सन १९६६ चा महा. ४१. [1][ आणि त्या नंतरच्या कोणत्याही कालावधीच्या संबधात, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६] असा आहे

२६. "संबंधित जिल्हा मंडळ अधिनियम," या संज्ञेचा अर्थ-

१९२३ चा मुंबई ६. (क) राज्याच्या मुंबई क्षेत्राच्या संबंधात, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ असा आहे,

१९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ३०. (ख) राज्याच्या विदर्भ विभागाच्या संबधात, मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ असा आहे,

१९५६ चा हैद्राबाद १. (ग) राज्याच्या हैद्राबाद क्षेत्राच्या संबधात, हैद्राबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ असा आहे,

[2][ (२६क) "अनुसूचित क्षेत्रे" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४४ च्या खंड (१) मध्ये निर्देश करण्यात आलेली अनुसूचित क्षेत्र, ]

[3] * * *

[4] * * * * * *

(२९) "अनुसूचित जाती" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती म्हणून समजण्यात आल्या असतील अशा जाती, वंश किंवा जनजाती किंवा अशा जातींचे, वंशाचे किंवा जनजातींचे भाग किंवा त्यातील गट असा आहे;

(३०) "अनुसूचित जमाती" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती म्हणून समजण्यात आल्या असतील अशा जनजाती किंवा जनजाती-समाज अथवा अशा जनजातीचे किंवा जनजाती समाजाचे भाग किंवा त्यातील गट असा आहे;

(३१) "स्थायी समिती" या संज्ञेचा अर्थ, कलम ७९ अन्वये रचना करण्यात आलेली स्थायी समिती असा आहे;

[5][ (३१क) "राज्य निवडणूक आयोग" या संज्ञेचा अर्थ, भारताच्या संविधानाचा अनुच्छेद २४३ट, खंड (१) याच्या तरतुदींनुसार नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निवडणूक आयुक्ताचा समावेश असलेला राज्य निवडणूक आयोग असा आहे;]

(३२) "नेमून दिलेले विषय" या शब्दप्रयोगाचा अर्थ, एखाद्या जिल्हा परिषदेने विनियमांअन्वये स्थायी समितीकडे किंवा विषय समितीकडे वाटून दिलेले विषय असा आहे;

(३३) "विषय समिती" या संज्ञेचा अर्थ, कलम ८० अन्वये घटित करण्यात आलेली विषय समिती असा आहे;

---

१. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३(ड) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम ७ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३३(६) अन्वये खंड (२७) वगळण्यात आला.

४. सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये खंड (२८) वगळण्यात आला.

५. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३३(७) अन्वये खंड (३१क) समाविष्ट करण्यात आला.

(३४) " उपाध्यक्ष " या संज्ञेचा अर्थ, जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असा आहे;

(३५) " जिल्हा परिषद " किंवा " परिषद " या संज्ञेचा अर्थ, कलम ९ अन्वये रचना करण्यात आलेली जिल्हा परिषद असा आहे;

(३६) या अधिनियमात जे कोणतेही शब्द किंवा शब्दप्रयोग वापरण्यात आले असतील परंतु ज्यांची त्यात व्याख्या दिलेली नसेल अशा शब्दांचा व शब्दप्रयोगांचा अर्थ, संबंधित संहितेत त्यांना अनुक्रमे जो अर्थ दिला असेल त्या अर्थाप्रमाणेच राहील.

## प्रशासकीय क्षेत्रे

प्रशासकीय क्षेत्रांमध्ये विभागणी करणे.

३. या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्याची जिल्ह्यांमध्ये विभागणी करण्यात येईल आणि जिल्ह्यांची गटांमध्ये विभागणी करण्यात येईल.

जिल्ह्यांची रचना.

४. (१) प्रकरण पंधराच्या तरतुदींनुसार हद्दीत जो कोणताही फेरबदल करण्यात येईल त्यास अधीन राहून, संबंधित संहितेअन्वये एखादा जिल्हा म्हणून बनविण्यात किंवा रचना करण्यात आलेले प्रत्येक स्थानिक क्षेत्र हे (मात्र त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा तदनुसार रचना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या, महानगरपालिकेच्या, नगरपालिकेच्या, कटकाच्या किंवा अधिसूचित क्षेत्र समितीच्या हद्दी वगळून), या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी जिल्हा असेल.

(२) जर कोणत्याही जिल्ह्यात, संबंधित संहितेअन्वये रचना करण्यात आलेल्या जिल्ह्याचा केवळ एखादा भाग किंवा याप्रमाणे रचना करण्यात आलेले दोन किंवा अधिक जिल्हे किंवा अशा दोन किंवा अधिक जिल्ह्यांचे भाग समाविष्ट असतील तर, राज्य शासनाला, राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन प्रस्तुत अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता अशा जिल्ह्याच्या संबंधात कोणते अधिकारी, जिल्हाधिकारी व आयुक्त म्हणून समजले जातील व या अधियिमात उल्लेख केलेले इतर कोणते अधिकारी, असे अधिकारी म्हणून समजले जातील हे जाहीर करता येईल.

गटांची रचना

५. प्रकरण पंधराच्या तरतुदींनुसार हद्दीत जो कोणताही फेरबदल करण्यात येईल त्यास अधीन राहून राज्य शासनाला, राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करुन प्रत्येक जिल्ह्यात अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या संख्येइतक्या गटांची रचना करता येईल; अशा प्रत्येक गटात जे स्थानिक क्षेत्र समाविष्ट असेल ते स्थानिक क्षेत्र त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करता येईल.

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषदांची रचना

जिल्हा परिषदांची स्थापना करणे.

६. (१) प्रत्येक जिल्ह्याकरिता, अध्यक्ष व परिषद सदस्य यांची मिळून , एक जिल्हा परिषद स्थापन करण्यात येईल, आणि या अधिनियमान्वये किंवा तदनुसार किंवा अन्यथा, जिल्हा परिषदेकडे जे अधिकार व जी कार्ये निहित करण्यात येतील त्या सर्व अधिकारांचा जिल्हा परिषद वापर करील आणि ती सर्व कार्ये जिल्हा परिषद पार पाडील.

(२) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता जिल्हा परिषदेचा प्राधिकार, ज्या क्षेत्रासाठी अशा परिषदेची स्थापना करण्यात आली असेल त्या क्षेत्रावर असेल; तसेच राज्य शासन यासाठी राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा एका किंवा अनेक प्रयोजनांसाठी आणि अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा अतिरिक्त क्षेत्रावर देखील असा प्राधिकार असेल.

(१) प्रत्येक जिल्ह्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे काम ज्या प्राधिकरणाकडे सोपविण्यात येईल ती प्राधिकरणे पुढीलप्रमाणे असतील. :-- परिषदेची प्राधिकरणे व त्यांचे संघटन.

(क) जिल्हा परिषद..

(ख) पंचायत समित्या.

(ग) स्थायी समिती.

(घ) विषय समित्या.

(ङ) पीठासीन प्राधिकारी.

(च) मुख्य कार्यकारी अधिकारी.

१ * * *

२ [ (च-क) कार्यकारी अधिकारी, आणि ],

(छ) गट विकास अधिकारी.

राज्य शासन निदेश देईल इतके विभाग जिल्हा परिषदेस तिच्या कार्यात सहाय्य करतील आणि विभाग हा राज्य सेवेतील वर्ग एकच्या किंवा वर्ग दोनच्या श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या (ज्याचा यात जिल्हा परिषदेचा विभाग प्रमुख म्हणून निर्देश करण्यात आला आहे) स्वाधीन असेल.

प्रत्येक जिल्हा परिषद ही " ...................................... जिल्हा परिषद" या नावाचा एक निकाय असेल आणि तिची अखंड अधिकार परंपरा असेल व तिचा सामाईक शिक्का असेल आणि वापर करण्यास आणि ज्या क्षेत्रावर तिचा प्राधिकार असेल अशा क्षेत्राच्या हद्दीतील आणि हद्दी बाहेरील व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्यास व धारण करण्यास सक्षम असेल आणि निगम निकाय म्हणून जे नाव असेल त्या नावाने तिला व तिच्यावर दावा लावता येईल. जिल्हा परिषदांचे कायद्याने संस्थापन.

(१) जिल्हा परिषद पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल –

(क) २ [ राज्य निवडणूक आयोग] राजपत्रातील अधिसूचनेद्वारे ठरवील असे ३ [ जास्तीत जास्त बहात्तर आणि कमीत कमी पन्नास इतके,] जिल्ह्यातील निवडणूक विभागातून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडण्यात आलेले परिषद सदस्य; तथापि, वाजवी रीत्या व्यवहार्य असेल तेथवर, ३ [ जिल्हा परिषदेच्या प्रादेशिक क्षेत्राची लोकसंख्या आणि अशा जिल्हा परिषदेमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांची संख्या यांमधील गुणोत्तर संपूर्ण राज्यभर सारखेच असेल ]. जिल्हा परिषदांची रचना.

१ [ (ख ) जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती ]

४ * * * *

---

१. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ३(अ) अन्वये " आणि " हा शब्द वगळण्यात आला. त्यातील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३४(१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३४(१) (ब) अन्वये खंड (ब) समाविष्ट करण्यात आला. त्यातील अधिनियमाच्या कलम ३४(१) (क) अन्वये खंड (क) (ड), (डड) आणि (ई) वगळण्यात आले.

[1] [ (२) (क) [2] [ सार्वत्रिक निवडणूकीमध्ये पोट-कलम (१) च्या खंड (क) खाली यणाऱ्या परिषद सदस्यांच्या संख्येच्या दोन-तृतीयाश इतक्या किंवा त्याहून अधि परिषद सदस्यांची निवड झाल्यानंतर राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा वेळी आणि अशा रीतीने, [3] [ राज्य निवडणूक आयोगाकडून ] त्या परिषद सदस्यांची नावे, त्यांच्या कायम पत्त्यासह, प्रसिध्द करण्यात येतील आणि नावे अशा प्रकारे प्रसिध्द करण्यात आल्यानंतर, जिल्हा परिषदेची रीतसर रचना झाल्याचे मानण्यात येईल,] दोन तृतीयांश परिषद सदस्यांची संख्या निर्धारित करताना अपूर्णांक विचारात घेण्यात येणार नाही ];

परंतु, ती नावे अशा रीतीने प्रसिध्द करण्यात आल्यामुळे,-

(एक) कोणत्याही निवडणूक विभागातील निवडणुकीचे काम पूर्ण करण्यास [4] [ आणि निवडून आलेल्या परिषद सदस्यांची नावे आणि त्यांचे कायम पत्ते जससजे उपलब्ध होतील त्याप्रमाणे, [5] [ राज्य निवडणूक आयोगाकडून ] तशाच रीतीने प्रसिध्द करण्यास, प्रतिबंध होतो, किंवा ]

(दोन) या अधिनियमाखालील परिषद सदस्यांच्या पदावधीवर परिणाम होतो;

असे मानण्यात येणार नाही.

(ख) पोट-कलम (१) [6] [ खंड ] [7] [ * * ] [6] [ (ख) ] खाली येणाऱ्या परिषद सदस्यांची नावे (त्यांच्या कायम पत्त्यांसह) त्यानंतर तशाच रीतीने, [8] [ राज्य निवडणूक आयोगाकडून ] प्रसिध्द करण्यात येतील ].

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २(अ) अन्वये " कलेक्टरने, पोट-कलम (१), कंडिका (अ) खाली येणाऱ्या " या शब्दांनी सुरु होणाऱ्या आणि " असे समजले पाहिजे " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३४(२) (अ) (एक) अन्वये " जिल्हाधिकारी " या मुळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले

४. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २(ब) अन्वये " किंवा " या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ३४(२)(अ)(दोन) अन्वये " जिल्हाधिकारी " या शब्दाऐवजी, हे शब्द दाखल करण्यात आले

६. वरील अधिनियमाच्या कलम ३४ (२) (ब) (एक) अन्वये " खंड (क), (ड) आणि (ई) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

७. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २(अ) अन्वये " (ब) " हे अक्षर व कंस वगळण्यात आला

८. वरील अधिनियमाच्या कलम ३४ (२) (ब) (दोन) अन्वये " जिल्हाधिकाऱ्याकडून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) उप मुख्य कार्यकारी अधिकारी [१] [ आणि एकाहून अधिक उप मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात आले असतील त्या बाबतीत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून नामनिर्देशित करण्यात येईल त्या प्रमाणे ज्यांच्या पैकी कोणताही एक अधिकारी ] हा जिल्हा परिषदेचा पदसिध्द सचिव असेल.

[२] [ ९क. (१) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासंबंधातील अधीक्षण, संचालन व नियंत्रण आणि त्या सर्व निवडणुका घेणे हे राज्य निवडणूक आयोगाकडे निहित असेल. राज्य निवडणूक आयोग.

(२) राज्य निवडणूक आयोग, त्यांचे कोणतेही अधिकार आणि कामे, आदेशाद्वारे, राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसणाऱ्या राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवू शकेल.

(३) या अधिनियमान्वये किंवा नियमान्वये मतदार याद्या, मतदार विभाग व निर्वाचक गण तयार करण्यासाठी आणि जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यासाठी नेमलेले किंवा कामावर लावण्यात आलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी वर्गातील सदस्य हे राज्य निवडणूक आयोगाच्या अधीक्षणाखाली, संचालनाखाली व नियंत्रणाखाली काम करतील.

(४) या अधिनियमात किंवा नियमांत काहीही अंतर्भूत असले तरीही, राज्य निवडणूक आयोग न्याय्य व मुक्त वातावरणात निवडणुका व्हाव्यात म्हणून हा अधिनियम आणि नियम यांतील तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश किंवा निदेश काढू शकेल.]

## परिषद सदस्यांची निवडणूक

१०. (१) या अधिनियमांन्वये किंवा त्याखाली तरतूद केलेल्या रीतीने, परिषद सदस्य निवडून देण्यात येतील. परिषद सदस्यांची निवडणूक व त्यांचा पदावधी इ.

* (२) या अधिनियमांत अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त, परिषद सदस्यांच्या अधिकारपदाचा अवधी [३][ (पाच वर्षांचा ] असेल.

परंतु पंचायत समितीचा [४] [ * * ( सभापती असण्याच्या आधारे त्या व्यक्ती परिषद सदस्य असतील त्या व्यक्ती, त्यांचे असा सभापती म्हणून अधिकारपद धारण करणे ज्या कालावधीपर्यंत चालू राहील त्या कालावधीपर्यंतच, ते अधिकारपद धारण करतील.

[५] * * * * *

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

┼ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ४ पुढीलप्रमाणे असेल:-

४. कोणताही संशय दूर करण्यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या कलम १०, पोट-कलम (२) मध्ये केलेल्या सुधारणा सर्व जिल्हा परिषदांना (त्यांच्या पंचायत समित्या, त्यांच्या समित्या आणि त्यांच्या पंचायत समित्यांच्या समित्या धरुन) आणि त्यांच्या परिषद सदस्यांना, सदस्यांना, पीठासीन प्राधिकाऱ्यांना आणि त्यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांची कर्तव्ये पार पाडण्यासाठी नेमलेल्या व ज्या या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस कार्य करीत असतील किंवा यथास्थिति अधिकार पद धारण करीत असतील अशा व्यक्तींना, प्रारंभापासूनच मुळ कालावधी सहा वर्षे असल्याप्रमाणे लागू होतील. या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेनंतर या सर्व प्रकरणांतसुध्दा कोणत्याही परिषद सदस्याचा आणि इतर व्यक्तींचा पदावधी किंवा वाढविलेला पदावधी मुख्य अधिनियमाच्या संबध्द तरतुदीखाली वेळोवेळी आणखी वाढविण्यास किंवा कमी करण्यास राज्य शासन सक्षम असेल.

३. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम २ अन्वये ''सहा वर्षांचा'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३५(१)(अ) द्वारे ''किंवा सहकारी संस्थेचा'' हा मजकूर वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३५(१)(ब) द्वारे दुसरे, तिसरे व चौथे ही परंतुके वगळण्यात आली.

[1] [ (३) पोट-कलम (२) अन्वये जिल्हा परिषदेची मुदत समाप्त होण्यापूर्वी तिचे विसर्जन करण्यात आल्यानंतर रचना करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेचे परिषद सदस्य, तिचे अशा प्रकारे विसर्जन करण्यात आले नसते तर ज्या उर्वरित कालावधीसाठी पोट-कलम (२) अन्वये सदस्य असण्याचे चालू राहिले असते, त्या कालावधीपुरतेच सदस्य असण्याचे चालू राहील.]

मतदानाची रीत. [2] [ **१०क.** परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल आणि बदली व्यक्तीद्वारे कोणतीही मते स्विकारण्यात येणार नाहीत.]

परिषद सदस्यांच्या पदावधीचा प्रारंभ. **११.** (१) सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या परिषद सदस्यांचा पदावधी हा, जिल्हा परिषदेच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकास सुरु होत असल्याचे, मानण्यात येईल.

(२) जिल्हा परिषदेची पहिली बैठक [3] [ जिल्हाधिकारी, निवडून आलेल्या सदस्यांची नावे कलम ९, पोट-कलम (२) अन्वये प्रसिध्द करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर घेईल, आणि असा दिनांक.-

(एक) सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीच्या बाबतीत, मावळत्या परिषद सदस्यांचा पदावधी समाप्त होण्याच्या दिनांकाच्या लगतनंतरच्या दिवसापेक्षा उशिराची नसेल, आणि

(दोन) जिल्हा परिषदेच्या विसर्जनानंतर घेण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत, जिल्हा परिषदेच्या विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकापेक्षा उशिराचा नसेल.]

[4] * * * * *

[5] * * * * *

जिल्ह्याची निवडणूक विभागात विभागणी. **१२.** (१) [6] [ परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी राज्य निवडणूक आयोग प्रत्येक जिल्ह्याची विभागणी ] निवडणूक विभागात करील (अशा कोणत्याही विभागाची प्रादेशिक सीमा त्याच गटाच्या सीमेबाहेर नसेल) अशा प्रत्येक विभागातून एक परिषद सदस्य निवडून देण्यात येईल, आणि प्रत्येक मतदार विभागासाठी स्वतंत्र निवडणूक घेण्यात येईल.

[7] [ परंतु, अशा निवडणूक विभागाची विभागणी अशा प्रकारे करण्यात येईल की, प्रत्येक विभागाची लोकसंख्या आणि जिल्हा परिषदेसाठी निवडून द्यावयाच्या परिषद सदस्यांची एकुण संख्या यांच्यामधील गुणोत्तर, व्यवहार्य असेल तेथवर, संपूर्ण जिल्हा क्षेत्रामध्ये सारखेच असेल;]

[8] [ ''परंतु, आणखी असे की, पंचायत समित्यांमध्ये अशा निवडणूक विभागांची विभागणी करताना प्रत्येक पंचायत समितीला किमान दोन निवडणूक विभाग नेमून देण्यात येतील.]

---

१. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३५(२) द्वारे पोट-कलमे (३) ते (७) याऐवजी पुढील पोट कलम दाखल करण्यात आले.

२. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ५ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ३६(१)(अ) द्वारे '' जिल्हाधिकाऱ्यांकडून '' या मजकुराने सुरु होणाऱ्या व '' आतील असेल '' या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३६(१) (ब) द्वारे परंतुक वगळण्यात आले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३६(२) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले

६. वरील अधिनियमाच्या कलम ३७(१) (अ) द्वारे '' परिषद सदस्यांच्या '' या शब्दांनी सुरु होणारा व '' विभागणी करण्यात येईल '' या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ३७(१) (ब)द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

८. सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, याच्या कलम ३ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[1] [ (२)(क) जिल्हा परिषदेतील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या एकूण जागांमध्ये, राज्य निवडणूक आयोग विहित रीतीने ठरवून देईल इतक्या जागा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांमधील व्यक्ती आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतील.

(ख) जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जमातींच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांचे त्या जिल्हा परिषदेमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे, जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, त्या जिल्हा परिषद क्षेत्रातील अनुसूचित जातींच्या किंवा यथास्थिति, अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल आणि अशा जागा जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या निवडणूक विभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येईल :

[2] [ परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्र समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये, अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा जिल्हा परिषदेमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाहीत :

परंतु, आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये असलेल्या जिल्हा परिषदेमधील अनुसूचित जमातींसाठी असणारे आरक्षण खंड (ख) च्या तरतुदीनुसार असेल. ]

[3] [ परंतु तसेच,] अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश जागा अनुसूचित जातींच्या किंवा यथास्थिति, अनुसूचित जमातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील;

(ग) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, जिल्हा परिषदेमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांइतक्या असतील आणि अशा जागा जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या निवडणूक विभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

[4] [ (परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात यावयाच्या जागा अनुसूचित जमाती आणि अनुसूचित जाती यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर राहिलेल्या (कोणत्याही असल्यास) जागांच्या २७ टक्के इतक्या असतील :

परंतु, आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये असलेल्या जिल्हा परिषदेमधील नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी असणारे आरक्षण खंड (क) च्या तरतुदीनुसार असेल :]

[5] [ (परंतु तसेच ] अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांश जागा नागरीकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील;

(घ) जिल्हा परिषदेमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक-तृतीयांश (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांसह) जागा स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि अशा जागा जिल्हा परिषदेमधील वेगवेगळ्या निवडणूक विभागांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील.

(३) पोट-कलम (२) अन्वये करावयाचे जागांचे आरक्षण (स्त्रियांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त इतर.) हे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर अमलात असण्याचे बंद होईल.]

---

१ सन १९९४ चा अधिनियम क्रमांक २१, कलम ३७(२) अन्वये पोट-कलमे (२), (२अ), (३) व (४) याऐवजी पोट-कलमे (२) आणि (३) दाखल करण्यात आली.

२. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, याच्या कलम ३(अ) द्वारे ही परंतुके समाविष्ट करण्यात आली.

३ वरील अधिनियमाच्या कलम ३(अ)(दोन) द्वारे " परंतु " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ३(ब)(एक) द्वारे ही परंतुके समाविष्ट करण्यात आली

५. वरील अधिनियमाच्या कलम ३(ब)(दोन) द्वारे " परंतु " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

मतदारांची यादी. **१३.** (१) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०, याच्या तरतुदींखाली महाराष्ट्र विधानसभेसाठी तयार केलेली [1] [ लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५०, खाली केलेले मतदार नोंदणी नियम, १९६० यांच्या नियम ५, पोट-नियम (२) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे यादीचा शेवटचा भाग अपवर्जित केलेली आहे ]. आणि विधानसभेच्या मतदारसंघाचा जो भाग निवडणूक विभागात समाविष्ट करण्यात आला असेल अशा भागासाठी, [2] [ राज्य निवडणूक आयोग ] या बाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अधिसूचित करील अशा दिनांकास अंमलात असलेली मतदारांची यादी ही, अशा निवडणूक विभागासाठी मतदारांची यादी असेल. १९५० चा ४३ १९५० चा ४३

[3] [ (१क) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही असले तरी, ज्या पीठासीन प्राधिकाऱ्यास त्याच्या अधिकारपदपरत्वे, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली निवासयोग्य जागेची किंवा त्या ऐवजी घरभाडे मिळण्याची तरतूद करण्यात आली असेल आणि जो, असा प्राधिकारी म्हणून आपल्या कर्तव्याच्या संबंधात, जिल्ह्यातील कोणत्याही निवडणूक विभागात गैरहजर राहिल्यामुळे आपल्या पदावधीत त्या निवडणूक विभागाचा सामान्यतः रहिवासी राहिला नसेल परंतु तो ज्या जिल्हा परिषदेच्या जिल्ह्याच्या संबंधात असा प्राधिकारी असेल त्या जिल्ह्याबाहेरील कोणत्याही जागेचा सामान्यतः रहिवासी असेल आणि परिणामी, त्याचे नाव जिल्ह्यातील कोणत्याही निवडणूक विभागाच्या मतदारांच्या यादीत नसेल, अशा पीठासीन प्राधिकाऱ्याच्या बाबतीत, अशा पीठासीन प्राधिकाऱ्याने असे अधिकारपद धारण केले नसते तर तो ज्या निवडणूक विभागाचा सामान्यतः रहिवासी राहिला असता त्या निवडणूक विभागात त्यास आपली नोंदणी करवून घेणे शक्य व्हावे यासाठी [2] [ राज्य निवडणूक आयोगास] मतदारांच्या यादीत सुधारणा करील. उपरोक्त प्रयोजनासाठी मतदारांच्या यादीत ज्या रीतीने सुधारणा करण्यात येईल ती रीत आणि त्याला पूरक, त्याच्या परिणामरूप व त्यास आनुषंगिक असतील अशा सर्व बाबी, या बाबतीत केलेल्या नियमांद्वारे तरतूद करण्यात येईल त्या प्रमाणे असतील.]

(२) [4] [ राज्य निवडणूक आयोगाने ] या बाबतीत नेमलेले असे कार्यालय प्रत्येक मतदार विभागासाठी मतदारांची एक यादी ठेवील.

निवडणुकीचा दिनांक. **१४.** [5] [ (१) जिल्हा परिषदेची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक :—

(क) कलम १०, पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी, राज्य निवडणूक आयोग या संबंधात नेमून देईल अशा दिनांकास किंवा दिनांकाना पूर्ण करण्यात येईल.

(ख) विसर्जित जिल्हा परिषदेच्या बाबतीत, विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल;

परंतु, विसर्जित जिल्हा परिषद जोपर्यंत चालू राहिली असती तो उर्वरित कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असेल त्या बाबतीत, अशा कालावधीसाठी जिल्हा परिषदेची रचना करण्याकरिता या खंडान्वये कोणतीही निवडणूक घेण्याची गरज असणार नाही;

(ग) कलम २७, पोट-कलम (२) अन्वये नवीन निवडणूक घेणे आवश्यक असेल तर त्या बाबतीत, राज्य निवडणूक आयोग निश्चित करील अशा, व्यवहार्य असेल तितक्या लवकरच्या दिनांकास पूर्ण करण्यात येईल;]

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३८(२) द्वारे "राज्य शासन" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ द्वारे पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

४. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, क ३८(२) द्वारे "जिल्हाधिकारी" या ऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३९ अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

(२) राज्य शासन अशा निवडणुका घेण्यासाठी नियम तयार करील. त्यात [१] [ उमेदवारांनी ठेवावयाच्या अनामत रकमा आणि त्या परत करणे किंवा त्यांचे समपहरण करणे आणि ] नामनिर्देशन पत्र स्वीकारणाऱ्या किंवा स्वीकारण्यास नकार देणाऱ्या निर्वाचन अधिकाऱ्याच्या निर्णयाविरुध्द [२] [ जिल्हा न्यायालयाकडे करावयाचे अपील ] आणि त्याच्या निर्णयाची अंतिमता यासंबंधीतील [१] [ तरतुदींचा समावेश असेल ] आणि पोट-कलम (१) आणि कलमे १५, १७ आणि १८ यांच्या तरतुदींच्या अधीनतेने अशी निवडणूक त्या नियमांनुसार घेण्यात येईल.

**१५.** [३] [ प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीसाठी किंवा पोट-निवडणुकीसाठी नामनिर्देशने करण्याकरिता निश्चित करण्यात आलेल्या अंतिम दिनांकास जिचे वय एकवीस वर्षांपेक्षा कमी नसेल आणि ] जिल्ह्यातील कोणत्याही निवडणूक विभागाच्या मतदारांच्या यादीत जिचे नाव आहे अशी प्रत्येक व्यक्ती, तिला या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कायद्याखाली निरर्ह ठरविण्यात आले नसेल तर, निवडून येण्यास अर्ह असेल आणि [४] [ पूर्वोक्तप्रमाणे जिच्या वयाची एकवीस वर्षे पूर्ण झालेली नसतील आणि ] जिचे नाव अशा यादीत नसेल अशी प्रत्येक व्यक्ती, त्या जिल्ह्याच्या कोणत्याही निवडणूक विभागातून निवडून येण्यास अर्ह असणार नाही. निवडून येण्यास अर्ह असणाऱ्या व्यक्ती.

[५] [ **१५-क.** जर एखादी व्यक्ती जिल्हा परिषदेत एकाहून अधिक जागांवर निवडून आली असेल तर [६] [ राज्य निवडणूक आयोगास ] किंवा या बाबतीत [६] [ राज्य निवडणूक आयोगाने ] प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, तिने एक जागा सोडून सर्व जागांच्या स्वतःच्या सहीनिशी राजीनामा दिल्याचे विहित केलेल्या अवधित कळविले नसेल तर, सर्व जागा रिकाम्या होतील. ] जागा रिकाम्या होणे

**१६.** (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून कोणतीही व्यक्ती, पुढील बाबतीत निवडून येण्यास आणि परिषद सदस्य होण्यास निरर्ह ठरेल — निरर्हता

(क) जर या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर तिला सिध्दापराध ठरविण्यात आले असेल, किंवा एखाद्या निवडणुकीची विधिग्राह्यता किंवा तिची नियमानुसारिता, यासंबंधी घेण्यात आलेल्या हरकतीबाबतच्या कार्यवाहीत --

(एक) ज्यामुळे जिल्हा परिषदेचा किंवा पंचायत समितीचा सदस्य होण्यास निरर्ह ठरविण्यात येते, अशा कलम २७ किंवा कलम २८ खालील कोणत्याही भ्रष्टाचाराबद्दल ती दोषी असल्याचे आढळून आले असल्यास कलम २७ खालील न्यायाधीशाच्या निर्णयात उल्लेखिलेला किंवा कलम २८ अन्वये तरतूद करण्यात आलेला कालावधी उलटून गेलेला नसेल तोपर्यंत;

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७५ चा चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५ अन्वये " जिल्हा न्यायाधीशापेक्षा कमी दर्जा नसलेल्या न्यायाधीशाकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५४, कलम ३(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५ अन्वये कलम १५-क समाविष्ट करण्यात आले.

६. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४० अन्वये " जिल्हाधिकारी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१] *                    *                    *                    *

(तीन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली रचना केलेल्या किंवा स्थापन केलेल्या, कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचा सदस्य होण्यास ज्यामुळे निरर्ह ठरवण्यात येते अशा कोणत्याही भ्रष्टाचाराबद्दल ती दोषी असल्याचे आढळून आले असल्यास निरर्हतेचा कालावधी उलटून गेला नसेल किंवा अशा कायद्याखाली निरर्हता काढून टाकलेली नसेल तोपर्यंत;

[२] [ (क-१) राज्य विधानमंडळाच्या निवडणुकांच्या प्रयोजनार्थ त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तदन्वये तिला निरर्ह ठरवण्यात आले असेल तर ;

परंतु, कोणत्याही व्यक्तीच्या वयाची २१ वर्षे पूर्ण झाली असतील तर तिचे वय २५ वर्षापेक्षा कमी असल्याच्या कारणावरून तिला निरर्ह ठरविण्यात येणार नाही;]

(ख) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर, भारतातील न्यायालयाने तिला कोणत्याही अपराधाबद्दल सिध्दापराध ठरवून कमीत कमी एक वर्ष कैदेची शिक्षा दिलेली असल्यास ती कैदेतून सुटल्यापासून पाच वर्षांचा कालावधी किंवा राज्य शासन कोणत्याही विशिष्ट बाबतीत परवानगी देईल असा त्याहून कमी कालावधी लोटलेला नसेल तोपर्यंत; अथवा

(ग) जर, कोणत्याही शासनाच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या अधीन असलेले कोणतेही अधिकारपद धारण केल्यानंतर, मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो, किंवा प्रारंभानंतर असो, तिला गैरवर्तणुकीबद्दल बडतर्फ करण्यात आले असल्यास, तिच्या बडतर्फीनंतर पाच वर्षांचा कालावधी लोटलेला नसेल तोपर्यंत; अथवा

(घ) जर तिला कलम ३९ खाली अधिकारपदावरुन काढून टाकण्यात आले असेल आणि तिला अशा प्रकारे काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी किंवा राज्य शासन कोणत्याही विशिष्ट बाबतीत अधिसूचित करील असा त्याहून कमी असलेला कालावधी लोटलेला नसेल तोपर्यंत, अथवा

(ङ) ती विकल मनाची असेल व सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल; अथवा

(च) ती अविमुक्त दिवाळखोर असेल; अथवा

(छ) ती बहिरी व मुकी असेल; अथवा

(ज) ती पंचायतीत किंवा जिल्हा परिषदेत किंवा शासनामध्ये किंवा शासनाकडून बक्षीस म्हणून मिळालेले एखादे लाभपद धारण करीत असेल; अथवा

(झ) जर , जिल्हा परिषदेच्या आदेशान्वये केलेल्या कोणत्याही कामात किंवा जिल्हा परिषदेशी केलेल्या किंवा जिल्हा परिषदेकडून किंवा तिच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदाराचा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल अथवा

(ञ) जिल्हा परिषदेला दिलेल्या किंवा जिल्हा परिषदेकडून घेतलेल्या कर्जाच्या पैशाच्या कोणत्याही व्यवहारात तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदाराचा, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर; अथवा

(ट) जिल्ह्यातील कोणत्याही पंचायतीस किंवा जिल्हा परिषदेस देणे असलेला कोणताही कर किंवा फी, ज्या दिनांकास अशा कराच्या किंवा फीच्या रकमेची मागणी करण्यात आली असेल आणि त्या रकमेचे देयक रीतसर तिच्यावर बजावण्यात आले असेल त्या दिनांकापासून, सहा महिन्यांच्या आत, देण्यात तिने कसूर केली असेल ; अथवा

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४१(१) द्वारे उपखंड (दोन) वगळण्यात आला.
२ वरील अधिनियमाच्या कलम ४१(२) अन्वये खंड (क-१) समाविष्ट करण्यात आला.

(ठ) जर ती भारताचा नागरिक नसेल किंवा तिने स्वच्छेने परकीय देशाचे नागरिकत्व संपादन केले असेल किंवा तिने परकीय देशाशी निष्ठा ठेवणार असल्याची किंवा इमान राखणार असल्याची कोणत्याही स्वरुपात कबुली दिली असेल तर ;

(ड) जर ती, राज्य विधानमंडळाच्या किंवा संसदेचा किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली रचना करण्यात किंवा स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही महानगरपालिकेची, नगरपालिकेची किंवा कटक मंडळाची सदस्य असेल तर ;

[१][(ढ) जर तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर

[२][**स्पष्टीकरण.**-या पोट-कलमाच्या खंड (ट) च्या प्रयोजनाकरिता, अविभक्त हिंदू कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने, किंवा ज्यातील व्यक्ती रूढीनुसार संपदेच्या किंवा निवासाच्या बाबतीत, एकत्र आहेत अशा गटातील किंवा घटकातील व्यक्तीने, जिल्ह्यातील कोणत्याही पंचायतीस किंवा जिल्हा परिषदेस देणे असलेला कोणताही कर किंवा फी देण्यात कसूर केल्यामुळे अशा अविभक्त हिंदू कुटुंबातील सर्व व्यक्ती किंवा यथास्थिति, अशा गटातील किंवा घटकातील सर्व व्यक्ती निरर्ह ठरल्याचे मानण्यात येईल.]

[३][(१क) एखाद्या व्यक्तीस तिच्या पदावधीत 'महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्याची निरर्हता अधिनियम, १९८६' खाली परिषद सदस्य असण्यास निरर्ह ठरवण्यात आले असेल, ती असा परिषद सदस्य म्हणून अधिकारपद धारण करण्याचे बंद होईल.]

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी—

(क) जी व्यक्ती घोषित केल्यावरून निरर्ह ठरली असेल किंवा जी व्यक्ती अपराधसिध्दीमुळे व शिक्षा देण्यात आल्यामुळे अशा रीतीने निरर्ह ठरली असेल आणि अशा निरर्ह ठरण्याच्या दिनांकास जी परिषद सदस्य असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत, त्या पोट-कलमाच्या खंड (क) किंवा खंड (ख) खालील निरर्हता, अशा निरर्हतेच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा अवधी उलटून जाईपर्यंत किंवा अपराधसिध्दी अथवा शिक्षा यांच्या बाबतीत या तीन महिन्यांच्या अवधीत अपिलासाठी किंवा पुनरीक्षणासाठी विनंती अर्ज करण्यात आला असेल तर असे अपील किंवा विनंती-अर्ज निकालात काढण्यात येईपर्यंत, अमलात येणार नाही ; * * * *

[५][(कक) ज्यावर राज्य शासनाकडून नेमणूक केली जाते असे कोणत्याही सहकारी संस्थेच्या (म्हणजे सहकारी संस्थांची नोंदणी करण्याच्या संबंधात त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली जी नोंदलेली असेल किंवा जी नोंदण्यात आल्याचे मानण्यात येत असेल अशा सहकारी संस्थेच्या) समितीच्या सभापतीचे किंवा सदस्यांचे अधिकारपद, ज्यावर सहकारी संस्थांच्या निबंधकाकडून नेमणूक केली जाते असे समापकाचे किंवा सहसमापकाचे अधिकारपद किंवा निबंधकाने नामनिर्देशित केलेले अधिकारपद—मग त्यावर एकट्याची नेमणूक झालेली असो किंवा नामनिर्देशित व्यक्तींच्या मंडळातील एक व्यक्ती म्हणून नेमणूक करण्यात आलेली असो—धारण करणारी एखादी व्यक्ती, केवळ त्याच कारणावरून त्या पोट-कलमाच्या खंड (ज) खाली निरर्ह ठरवण्यात येणार नाही.]

---

१. सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, ३(अ) द्वारे खंड (ढ) जादा दाखल करण्यात आले.
२. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ४(अ) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.
३. सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ११ च्या अनुसूचीद्वारे पोट कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.
४. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ५(१) अन्वये येथील 'आणि' हा शब्द नेहमीकरताच वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.
५. वरील अधिनियमाच्या कलम ५(२) अन्वये खंड (कक) हा नेहमीकरिताच समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(ख) कोणतीही व्यक्ती,—

(एक) जिल्हा परिषदेबरोबर कंत्राट करील किंवा अशा जिल्हा परिषदेकडून किंवा तिच्या वतीने कामावर नेमली जाईल अशा कोणत्याही संयुक्त भांडवल कंपनीत किंवा कोणत्याही सहकारी संस्थेत अशा व्यक्तींचा हिस्सा आहे किंवा त्या संस्थेत तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे; किंवा

(दोन) जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधी कोणतीही जाहिरात ज्यात देता येईल अशा कोणत्याही वृत्तपत्रात तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे; किंवा

(तीन) जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने काढलेले ऋणपत्र ती धारण करते किंवा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने उभारलेल्या कोणत्याही कर्जात तिचा अन्यथा संबंध आहे; किंवा

(चार) विधि-व्यवसायी म्हणून जिल्हा परिषदेच्या वतीने तिला व्यवसाय दृष्ट्या कामावर लावले आहे; किंवा

"[(पाच) कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या पन्नास वर्षांहून अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी केलेल्या कोणत्याही पट्ट्यात किंवा त्याबाबतच्या कोणत्याही करारात तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे आणि असा पट्टा किंवा करार, करून देण्यापूर्वी, जिल्हा परिषदेस पट्ट्यावर इतर कोणतीही योग्य परिवास्तू उपलब्ध नव्हती असे जिल्हाधिकाऱ्याने प्रमाणित केले असेल; किंवा

(सहा) ज्या वस्तूचा ती नियमितपणे व्यापार करीत असेल अशा कोणत्याही वस्तूच्या जिल्हा परिषदेस करण्यात आलेल्या प्रासंगिक विक्रीमध्ये किंवा जिल्हा परिषदेकडून कोणत्याही वस्तूची खरेदी करण्यामध्ये तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे; मात्र या प्रत्येक बाबतीतील मूल्य हे कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये पाचशे रुपयांपेक्षा अधिक असणार नाही; किंवा

(सात) कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेवर किंवा राज्य शासनाची मंजुरी घेऊन जिल्हा परिषद या बाबतीत निश्चित करील त्याप्रमाणे पाचशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेवर, कोणतीही वस्तू जिल्हा परिषदेस अधूनमधून भाड्याने देण्यामध्ये किंवा जिल्हा परिषदेकडून भाड्याने घेण्यामध्ये तिचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे;]

याच केवळ कारणावरून, तिला त्या पोट-कलमाच्या खंड (झ) खाली निरर्ह ठरवले जाणार नाही;

(ग) जिल्हा परिषदेने किंवा जिल्हा परिषदेच्या वतीने दिलेल्या कर्जाच्या किंवा अनुदानाच्या व्यवहारात एखाद्या व्यक्तीचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे याच केवळ कारणावरुन तिला त्या पोट-कलमाच्या खंड (झ) किंवा (ञ) अन्वये निरर्ह ठरवण्यात येणार नाही (मात्र परिषद-सदस्यांचे अधिकारपद धारण केलेले असताना तिने असा हिस्सा किंवा हितसंबंध राज्य शासनाने विहित केलेल्या नियमानुसार संपादन केलेला असला पाहिजे);

(घ) एखादी व्यक्ती, नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या दिनांकास, जिल्ह्यातील कोणत्याही पंचायतीस किंवा जिल्हा परिषदेस देय असलेल्या कोणत्याही कराची किंवा फीची मागणी केली असता त्याबाबतची थकबाकी देणे लागत नसेल तर, पोट-कलम (१) च्या खंड (ट) खाली परिषद-सदस्य म्हणून निवड केली जाण्यास तिला निरर्ह ठरवले जाणार नाही;

[(ङ) मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, (या खंडात यापुढे ज्याचा निर्देश "अशा प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे, त्या व्यक्तीला दोन मुलांपेक्षा अधिक मुले असतील तर, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत ती व्यक्ती पोट-कलम (१) खंड (ढ) अन्वये, परिषदेचा सदस्य म्हणून निवडली जाण्यास किंवा सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाही :

परंतु, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत, एकाच प्रसूतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले पोट-कलम (१) च्या, खंड (ढ) मध्ये नमूद केलेल्या, निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण.**–पोट-कलम (१) च्या, खंड (ढ) आणि या पोट-कलमाच्या खंड (ड) यांच्या प्रयोजनार्थ,-

(एक) ज्यावेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल;

(दोन) "मूल" यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.]

(३) पोट-कलम (१) च्या प्रयोजनाकरिता एखाद्या व्यक्तीस पूरक भत्ता मिळतो, याच केवळ कारणावरून ती कोणत्याही शासनाचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे लाभपद धारण करते असे मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण.**–पोट-कलम (३) मधील, "पूरक भत्ता" या संज्ञेचा अर्थ, परिषद सदस्याचे अधिकारपद धारण करणाऱ्या व्यक्तीस प्रवास भत्ता, दैनिक भत्ता आणि त्या अधिकारपदाची कामे पार पाडताना केलेला कोणताही खर्च तिला भागविता यावा म्हणून द्यावयाची कोणतीही रक्कम असा होईल.

[३][(४) (क) एखादी व्यक्ती, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग (यात यापुढे ज्याचा निर्देश "राखीव प्रवर्ग" म्हणून करण्यात आला आहे) यातील व्यक्तीकरिता राखून ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदेच्या सदस्यांच्या जागेवर, ती व्यक्ती अशा राखीव प्रवर्गातील आहे असे घोषित करणाऱ्या खोट्या दाव्याच्या किंवा जातीच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे, परिषद सदस्य म्हणून निवडून आली होती असा निर्णय देणारा आदेश संबंधित प्राधिकाऱ्याने कलम २७ किंवा यथास्थिति, कलम ४० खाली दिलेला असल्यास अशी व्यक्ती परिषद-सदस्य म्हणून राहण्यास किंवा परिषद-सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी निवडणूक लढवण्यास सहा वर्षांच्या कालावधीकरिता अनर्ह होईल.

(ख) संबंधित प्राधिकाऱ्याने, कलम २७ च्या पोट-कलम (५) अन्वये किंवा यथास्थिति, कलम ४० च्या पोट-कलम (२) अन्वये असा आदेश दिल्याच्या दिनांकापासून असा अनर्हतेचा कालावधी मोजण्यात येईल.

(५) (क) पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (४) मध्ये निर्देश केल्याप्रमाणे, जो राखून ठेवलेल्या जागेवर निवडून आला आहे असा परिषद सदस्य जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीने किंवा जाती प्रमाणपत्र छाननीच्या प्रयोजनाकरिता राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने, अशा परिषद-सदस्याचे जाती प्रमाणपत्र विधिअग्राह्य असल्याचे घोषित करून ती व्यक्ती, राखीव प्रवर्गाची आहे असा दावा करणाऱ्या अशा व्यक्तीच्या खोट्या दाव्यावर किंवा प्रतिज्ञापत्रावर आधारित असल्याच्या कारणास्तव ते रद्द केल्याचा परिणाम म्हणून, तो असा परिषद-सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह होईल; आणि नंतर उक्त समितीने असे प्रमाणपत्र खोटे असल्याचे घोषित करून ते रद्द केल्याच्या दिनांकास व त्या दिनांकापासून परिषद-सदस्याने, आपले पद रिकामे केले असल्याचे मानण्यात येईल.

(ख) खंड (क) अन्वये, कोणतीही व्यक्ती, परिषद-सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह झाल्यावर आणि परिणामी, परिषद-सदस्य म्हणून तिची जागा रिकामी झाल्यावर विभागीय आयुक्त, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अशा व्यक्तीस परिषद-सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा परिषद-सदस्य असण्यास अशा आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीकरिता अनर्ह ठरवील.]

---

१ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६ अन्वये खंड (पाच) ते (सात) समाविष्ट करण्यात आले.

२ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ३(ब) द्वारे हे खंड जादा दाखल करण्यात आले.

३ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ४ द्वारे ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

मतदानाचा हक्क.

**१७.** (१) कोणत्याही निवडणूक विभागाच्या मतदारांच्या यादीत ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव त्या त्या वेळी नोंदवण्यात आले नसेल तिला त्या निवडणूक विभागात मतदानाचा हक्क असणार नाही आणि या अधिनियमान्वये स्पष्टपणे तरतूद केलेली असेल तेवढे खेरीज करून एरव्ही जिचे नाव कोणत्याही निवडणूक विभागाच्या मतदारांच्या यादीत त्या त्या वेळी नोंदवण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीस त्या निवडणूक विभागात मतदान करण्याचा हक्क असेल.

(२) एखादी व्यक्ती कलम १६, पोट-कलम (१) च्या खंड (ड) आणि (ढ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रकारे निरर्ह असेल तर, अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही निवडणूक विभागातील निवडणुकीत मतदान करणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती कोणत्याही निवडणुकीत एकापेक्षा अधिक निवडणूक विभागात मतदान करणार नाही आणि जर तिने तसे केले तर अशा सर्व निवडणूक विभागात तिने केलेले मतदान रद्दबातल होईल.

(४) कोणत्याही व्यक्तीचे नाव एखाद्या निवडणूक विभागातील मतदारांच्या यादीत एकाहून अधिक वेळा नोंदण्यात आले असले तरीही, ती त्याच निवडणूक विभागात कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, एकाहून अधिक वेळा मतदान करणार नाही आणि तिने तसे केल्यास, त्या निवडणूक विभागात तिने केलेले मतदान रद्दबातल होईल.

(५) कोणतीही व्यक्ती कैदेच्या शिक्षेमुळे किंवा अन्यथा कारागृहात बंदिस्त असेल किंवा पोलिसांच्या कायदेशीर अभिरक्षेत असेल तर ती कोणत्याही निवडणुकीत मतदान करणार नाही :

परंतु, या पोट-कलमातील कोणताही मजकूर त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली प्रतिबंधक स्थानबध्दतेत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस लागू असणार नाही.

मतदानाचा किंवा निवडून येण्याचा हक्क निर्धारित करण्यासाठी मतदारांची यादी निर्णायक पुरावा असेल.

**१८.** एखाद्या व्यक्तीने एखादी निरर्हता ओढवून घेतली असेल त्याच्या अधीनतेने कलमे १५ आणि १७ खाली कोणत्याही निवडणुकीत अशी व्यक्ती, यथास्थिति, मतदान करण्यास किंवा निवडून येण्यास अर्ह आहे किंवा अर्ह नाही हे निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी मतदारांची यादी निर्णायक पुरावा असेल.

## निवडणुका व निवडणूकविषयक विवाद

निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी परिवास्तु, वाहने, वगैरे यांचे अधिग्रहण.

**१९.** (१) या अधिनियमाखाली निवडणुका घेण्यासाठी [1][राज्य निवडणूक आयोगाने] प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास (ज्यास यात पुढे "अधिग्रहण प्राधिकारी" असे म्हटले आहे) या अधिनियमाखाली घ्यावयाच्या एखाद्या निवडणुकीच्या संबंधात असे दिसून येईल की,

(क) मतदान केंद्र म्हणून उपयोग करण्यासाठी किंवा मतदान घेण्यात आल्यावर मतपेट्या ठेवण्यासाठी कोणत्याही परिवास्तूंची आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता असण्याचा संभव आहे, किंवा

(ख) कोणत्याही मतदान केंद्राकडे किंवा मतदान केंद्रातून मतपेट्यांची ने-आण करण्यासाठी किंवा अशी निवडणूक चालू असताना सुव्यवस्था राखण्याकरिता पोलीस दलातील व्यक्ती नेण्यासाठी किंवा अशा निवडणुकीच्या संबंधात कोणतीही कर्तव्ये पार पाडण्यासाठी कोणताही अधिकारी किंवा इतर व्यक्ती नेण्याकरिता कोणतेही वाहन, जलयान किंवा जनावर आवश्यक आहे किंवा त्याची आवश्यकता असण्याचा संभव आहे, तर अधिग्रहण प्राधिकाऱ्यास, लेखी आदेशाद्वारे यथास्थिति, अशी परिवास्तु किंवा असे वाहन

---

१. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३ द्वारे "राज्य शासनाने" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

जलयान किंवा जनावर यांचे अधिग्रहण करता येईल. तसेच त्यास अशा अधिग्रहणाच्या संबंधी आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे आणखी आदेश देता येतील.

परंतु, ज्या कोणत्याही वाहनाचा, जलयानाचा किंवा जनावराचा एखाद्या उमेदवाराकडून किंवा त्याच्या प्रतिनिधीकडून, अशा उमेदवाराच्या निवडणुकीच्या संबंधातील कोणत्याही प्रयोजनासाठी कायदेशीर रीत्या उपयोग करण्यात येत असेल त्या वाहनाचे, जलयानाचे किंवा जनावराचे अधिग्रहण अशा निवडणुकीतील मतदान पूर्ण होईपर्यंत, या पोट कलमाखाली करता येणार नाही.

(२) अधिग्रहण प्राधिकाऱ्याच्या मते जी व्यक्ती मालमत्तेचा मालक असेल तिच्या नावे किंवा ती मालमत्ता जिच्या कब्जात असेल त्या व्यक्तीच्या नावे लेखी आदेश काढून, अधिग्रहणाचे काम करण्यात येईल आणि असा आदेश ज्या व्यक्तीच्या नावे काढला असेल त्या व्यक्तीवर राज्य शासनाने केलेल्या नियमाद्वारे विहित करण्यात येईल त्या रीतीने तो बजावण्यात येईल.

(३) जेव्हा जेव्हा पोट-कलम (१) खाली कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्यात येईल तेव्हा तेव्हा अशा अधिग्रहणाचा कालावधी हा, त्या पोट-कलमात उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी अशी मालमत्ता ज्या कालावधीसाठी आवश्यक असेल त्या कालावधीपेक्षा अधिक असणार नाही.

(४) या कलमातील—

(क) "परिवास्तु" या संज्ञेचा अर्थ, कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा भाग असा होतो; आणि तीत झोपडी, छपरी किंवा इतर सरचना किंवा त्याचा कोणताही भाग यांचा समावेश होतो;

(ख) "वाहन" या संज्ञेचा अर्थ रस्त्यावरील वाहतुकीच्या प्रयोजनासाठी उपयोगात आणलेले किंवा उपयोगात आणण्यास योग्य असलेले कोणतेही वाहन असा होतो, मग ते यांत्रिक शक्तीने किंवा अन्य प्रकारे चालविण्यात येत असो.

२०. (१) जेव्हा जेव्हा कलम १९ अनुसार अधिग्रहण प्राधिकारी कोणत्याही परिवास्तूचे अधिग्रहण करील तेव्हा तेव्हा [1][अधिग्रहण प्राधिकारी] हितसंबंधित व्यक्तींना भरपाई देईल. अशा भरपाईची रक्कम अधिग्रहण प्राधिकारी पुढील गोष्टी लक्षात घेऊन निर्धारित करील :- भरपाई देणे.

(एक) अशा परिवास्तूबद्दल द्यावयाचे भाडे, किंवा अशा रीतीने कोणतेही भाडे देण्यात येत नसेल तर त्या वसतिस्थानातील तशाच परिवास्तूसाठी देण्यात येत असलेले भाडे;

(दोन) परिवास्तूचे अधिग्रहण करण्यात आल्यामुळे, हितसंबंधित व्यक्तीस, आपली राहती जागा किंवा धंद्याचे ठिकाण बदलणे भाग झाले असेल तर अशा बदलाच्या अनुषंगाने येणारा वाजवी खर्च (कोणताही असल्यास) :

परंतु, अशा रीतीने निर्धारित करण्यात आलेल्या भरपाईच्या रकमेमुळे व्यथित झालेल्या हितसंबंधित व्यक्तीने, ती बाब लवादाकडे निर्देशित करण्यासाठी, राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या अवधीत अधिग्रहण प्राधिकाऱ्याकडे अर्ज केला असेल तर, द्यावयाची भरपाईची रक्कम ही, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत नेमलेल्या लवादाकडून निर्धारित करण्यात येतील त्याप्रमाणे असेल :

परंतु आणखी असे की, भरपाईची रक्कम मिळवण्याच्या स्वत्वाधिकाराविषयी किंवा भरपाईच्या रकमेच्या वाटणीविषयी कोणताही विवाद असेल तर अधिग्रहण प्राधिकारी ती बाब त्याच्याकडून याबाबत नेमण्यात येईल अशा लवादाकडे निर्धारणासाठी निर्देशित करील आणि अशा लवादाच्या निर्णयानुसार त्याचा निर्णय करील.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमातील "हितसंबंधित व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ, कलम १९ खाली जी परिवास्तू अधिग्रहीत करण्यात आली असेल ती परिवास्तू अधिग्रहण करण्याच्या निकटपूर्वी ज्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष कब्जात होती ती व्यक्ती किंवा कोणत्याही व्यक्तीकडे असा प्रत्यक्ष कब्जा नसेल तर अशा परिवास्तूचा मालक असा आहे.

---

१. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९०, कलम ८(अ) अन्वये "जिल्हा परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) जेव्हा जेव्हा अधिग्रहण अधिकारी, कलम १९ अनुसार कोणतेही वाहन, जलयान किंवा जनावर याचे अधिग्रहण करील तेव्हा तेव्हा [1][अधिग्रहण प्राधिकारी] अशा वाहनाच्या, जलयानाच्या किंवा जनावराच्या मालकास भरपाई देईल, आणि अशा भरपाईची रक्कम, अधिग्रहण प्राधिकारी, असे वाहन, जलयान किंवा जनावर भाड्याने देण्यासाठी त्या वसतिस्थानात प्रचलित असलेली भाडी किंवा दर यांच्या आधारे निर्धारित करील :

परंतु, अशा रीतीने निर्धारित करण्यात आलेल्या भरपाईच्या रकमेमुळे व्यथित झालेल्या अशा वाहनाच्या, जलयानाच्या मालकाने, ती बाब लवादाकडे निर्देशित करण्यासाठी, राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या अवधीत, अधिग्रहण प्राधिकाऱ्याकडे अर्ज केला असेल तर द्यावयाची भरपाईची रक्कम, ही, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत नेमलेल्या लवादाकडून निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल :

परंतु, आणखी असे की, अधिग्रहण करण्याच्या निकटपूर्वी, उक्त वाहन किंवा जलयान, भाडे-खरेदी कराराच्या आधारे मालकाव्यतिरिक्त इतर व्यक्तीच्या कब्जात असेल तर, अधिग्रहणाच्या संबंधात देय असलेली एकूण भरपाईची रक्कम म्हणून, या पोट-कलमाखाली निर्धारित करण्यात आलेली रक्कम, ती व्यक्ती आणि मालक संमत करतील त्या रीतीने संविभाजित करण्यात येईल आणि मतैक्य घडून न आल्यास, ती अधिग्रहण प्राधिकाऱ्याकडून या बाबतीत नेमण्यात आलेला लवाद निर्धारित करील त्या रीतीने संविभाजित करण्यात येईल.

माहिती मिळवण्याचा अधिकार.

२१. कलम १९ खाली कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्यासाठी किंवा कलम २० खाली देय असलेली भरपाई निर्धारित करण्यासाठी, अधिग्रहण प्राधिकाऱ्यास, आदेशाद्वारे, कोणत्याही व्यक्तीस, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याकडे, अशा विनिर्दिष्ट केलेल्या मालमत्तेसंबंधी तिला असलेली माहिती पुरवण्यास फर्मावता येईल.

परिवास्तुंमध्ये वगैरे प्रवेश करण्याचा आणि त्यांचे निरीक्षण करण्याचा अधिकार.

२२. (१) अधिग्रहण प्राधिकाऱ्याने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणतीही परिवास्तू व तेथील वाहन, जलयान किंवा जनावर याच्या बाबतीत, कलम १९ खाली आदेश देण्यात यावा किंवा कसे व तो कोणत्या रीतीने देण्यात यावा ते निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी, किंवा त्या कलमाखालील कोणत्याही आदेशाचे पालन खात्रीने व्हावे या हेतूने अशा परिवास्तूत प्रवेश करता येईल आणि अशी परिवास्तू तेथील कोणतेही वाहन, जलयान किंवा जनावर यांचे निरीक्षण करता येईल.

(२) या कलमातील "परिवास्तू" आणि "वाहन" या शब्दप्रयोगांना कलम १९ मध्ये जो अर्थ देण्यात आला असेल तोच अर्थ असेल.

अधिग्रहण केलेल्या परिवास्तुंतून निष्कासित करणे.

२३. (१) कलम १९ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून जी कोणी व्यक्ती कोणतीही अधिग्रहण केलेली परिवास्तू कब्जात ठेवील त्या व्यक्तीस, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने या बाबतीत अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकरवी त्या परिवास्तुतून विनासोपस्कार निष्कासित करता येईल.

(२) अशा रीतीने अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, चारचौघांपुढे उघडपणे न वावरणाऱ्या कोणत्याही स्त्रीस वाजवी ताकीद दिल्यानंतर व निघून जाण्याची सोय करून दिल्यानंतर कोणत्याही इमारतीचे कोणतेही कुलूप काढून टाकता येईल किंवा कडी उघडता येईल, किंवा कोणताही दरवाजा फोडून उघडता येईल किंवा असे निष्कासन घडवून आणण्यास आवश्यक वाटेल अशी इतर कोणतीही कृती करता येईल.

अधिग्रहणातून परिवास्तु मुक्त करणे.

२४. (१) कलम १९ खाली ज्याचे अधिग्रहण करण्यात आले असेल अशी कोणतीही परिवास्तु, अधिग्रहणातून मुक्त करावयाची असेल तेव्हा अशा जागेचे अधिग्रहण करतेवेळी ती ज्या व्यक्तीच्या कब्जात होती त्या व्यक्तीच्या किंवा जर अशी व्यक्ती नसेल तर, अधिग्रहण प्राधिकाऱ्याच्या मते जी कोणी व्यक्ती अशा

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३(अ) अन्वये "जिल्हा परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

जागेची मालक असेल त्या व्यक्तीच्या कब्जात देण्यात येईल, आणि अशा रीतीने परिवास्तु कब्जात दिल्यानंतर, अधिग्रहण अधिकारी, असा कब्जा देण्यासंबंधीच्या सर्व दायित्वातून पूर्णपणे मुक्त होईल; परंतु त्यामुळे ज्या व्यक्तीच्या कब्जात ती परिवास्तु अशा रीतीने देण्यात आली असेल त्या व्यक्तीविरुध्द अशा परिवास्तुच्या संबधात रीतसर विधिप्रक्रिया करुन जे अधिकार बजावण्याचा कोणत्याही अन्य व्यक्तीस हक्क असेल त्या कोणत्याही अधिकारास बाध येणार नाही.

(२) जेव्हा कलम १९ खाली अधिग्रहण केलेली कोणतीही परिवास्तु पोट-कलम (१) खाली ज्या व्यक्तीच्या कब्जात द्यावयाची ती व्यक्ती सापडत नसेल किंवा सहजगत्या विनिश्चित करता येण्यासारखी नसेल किंवा तिच्या वतीने कब्जा स्वीकारण्यास अधिकार प्रदान केलेला तिचा कोणताही अभिकर्ता किंवा इतर कोणतीही व्यक्ती नसेल तेव्हा अधिग्रहण प्राधिकारी, ती परिवास्तु अधिग्रहणातून मुक्त झाली आहे असे जाहीर करणारी एक नोटीस, अशा परिवास्तुच्या एखाद्या ठळक भागावर आणि मामलेदार, महालकरी, तहसीलदार किंवा, यथास्थिती, नायब तहसीलदार यांच्या कार्यालयातील सूचक फलकावर लावण्याची तजवीज करील.

(३) जेव्हा पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे सूचना फलकावर नोटीस लावण्यात येईल तेव्हा, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली परिवास्तु, अशा रीतीने नोटीस लावण्यात आल्याच्या दिनांकास व त्या दिनांकापासून, अधिग्रहणाधीन असण्याचे बंद होईल; आणि तिचा कब्जा मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीच्या ती स्वाधीन करण्यात आली आहे असे मानण्यात येईल; आणि उक्त दिनांकानंतरच्या कोणत्याही कालावधीबद्दल अशा परिवास्तूच्या संबंधात कोणतीही भरपाई किंवा इतर हक्कमागणी याबाबत अधिग्रहण प्राधिकारी किंवा जिल्हा परिषदा दायी असणार नाहीत.

**२५.** एखाद्या व्यक्तीने कलम १९ किंवा कलम २१ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्यास तिला अपराधसिध्दीनंतर, एक वर्षापर्यंत वाढवता येईल इतक्या अवधीच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

अधिग्रहणासंबंधीच्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**२६.** कोणत्याही निवडणुकीत मतमोजणी पूर्ण झाल्यावर कोणत्याही उमेदवारांना समसमान मते मिळाली असल्याचे दिसून आले व एका मताची भर घातली असता त्यांपैकी कोणत्याही उमेदवारास तो निवडून आल्याचे जाहीर केले जाण्याचा हक्क प्राप्त होत असेल तर, [1][राज्य निवडणूक आयोग] या बाबतीत ज्यास अधिकार देईल असा अधिकारी ताबडतोब चिठ्ठया टाकून त्या उमेदवारांबाबत निर्णय करील आणि ज्या उमेदवाराच्या नावे चिठ्ठी निघेल त्यास जणू काही ज्यादा मत मिळाले असावे त्याप्रमाणे कार्यवाही करील.

विवक्षित आकस्मिक परिस्थितीत व्यक्ती निवडून आल्याचे घोषित करण्याचा अधिकार.

**२७.** (१) जर एखाद्या परिषद सदस्याच्या कोणत्याही निवडणुकीच्या विधिग्राह्यतेविषयी किंवा कलम २६ खाली दिलेला कोणताही आदेश किंवा केलेले कोणत्याही कार्यवाह्या यांच्या कायदेशीरपणाविषयी आक्षेप घेण्यात आला असेल आणि [2][अशा निवडणुकीतील कोणत्याही उमेदवाराने किंवा] असा आक्षेप ज्या निवडणुकीसंबंधी असेल त्या निवडणुकीत मतदान करण्यास अर्ह असलेल्या कोणत्याही व्यक्तीने तो घेतला असेल तर, निवडणुकीचा निकाल ज्या दिनांकास घोषित झाला असेल त्या दिनांकानंतर किंवा आदेशाच्या अथवा कार्यवाहीच्या दिनांकानंतर पंधरा दिवसांच्या आत, कोणत्याही वेळी [3][अशा उमेदवारास किंवा व्यक्तीस] ज्या जिल्ह्यात निवडणूक घेण्यात आली असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा न्यायाधीशाकडे, अशा आक्षेपाच्या निर्णितीसाठी, अर्ज करता येईल.

निवडणूकांच्या विधिग्राह्यतेची निर्णिती करणे; न्यायाधीशाने चौकशी करणे; कार्यपध्दती

---

१. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४२ अन्वये "जिल्हाधिकारी" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७(१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ७ (१) (ब) अन्वये "अशा इसमास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) राज्य शासनाने एखाद्या प्रकरणी विशेषतः किंवा अशा प्रकरणासाठी सर्वसाधारणतः नेमलेल्या, सहाय्यक न्यायाधीशाच्या दर्जाहून कमी दर्जाच्या नसलेल्या न्यायाधीशाकडून त्यानंतर चौकशी केली जाईल. आणि अशा न्यायाधीशास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, निवडणुकीचा घोषित केलेला निकाल किंवा [१][ [२][राज्य निवडणूक आयोग] कलम २६ खाली त्या बाबतीत ज्यास अधिकार दिलेला आहे अशा कोणत्याही अधिकाऱ्याने ] दिलेला आदेश कायम करण्यासाठी किंवा तो सुधारण्यासाठी किंवा निवडणुका रद्द ठरण्यासाठी, आदेश देता येईल. उक्त चौकशीच्या प्रयोजनासाठी, त्या न्यायाधीशास, दिवाणी न्यायालयाच्या कोणत्याही अधिकारांचा वापर करता येईल आणि त्याचा निर्णय निर्णायक असेल. जर निवडणूक रद्द ठरण्यात आली तर, नवीन निवडणूक घेण्यासाठी कलम १४ खाली तावडतोब दिनांक निश्चित करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) खाली मिळालेल्या ज्या अर्जात,--

(क) एकाच निवडणूक विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबद्दल आक्षेप घेण्यात आला असेल अशा सर्व अर्जांची सुनावणी एकच न्यायाधीश करील; आणि

(ख) एकाच निवडणूक विभागाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी निवडून आलेल्या एकाच परिषद सदस्याच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबद्दल आक्षेप घेण्यात आला असेल अशा सर्व अर्जांची सुनावणी एकत्रितपणे करण्यात येईल.

(४) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, न्यायाधीश-- १९०८

(क) कोणत्याही अर्जाबाबत तडजोड करण्यास किंवा तो मागे घेण्यास, किंवा चा ५

(ख) वादकथनात कोणताही फेरबदल किंवा सुधारणा करण्यास, कोणत्याही व्यक्तीस, तडजोडीसाठी किंवा मागे घेण्यासाठी केलेला असा अर्ज किंवा अशा फेरबदलासाठी किंवा सुधारणेसाठी केलेला अर्ज, सद्भावनापूर्वक केलेला असून, संगनमताने केलेला नाही अशी त्याची खात्री पटल्याशिवाय परवानगी देणार नाही.

(५) (क) अशी चौकशी केल्यानंतर, उमेदवाराने, निवडणुकीच्या प्रयोजनासाठी पोट-कलम (६) च्या अर्थातर्गत कोणताही भ्रष्टाचार केला आहे [३][किंवा खोटा दावा किंवा जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर केले आहे] असे न्यायाधीशास आढळून आल्यास, तो अशा उमेदवारास, त्या निवडणुकीच्या तसेच पोट-कलम (२) खाली जी नवीन निवडणूक घेण्यात येईल त्या निवडणूकीच्या प्रयोजनासाठी निरर्ह ठरवील आणि उमेदवार जर निवडून आला असेल तर त्याची निवडणूक रद्द ठरवील.

(ख) खंड (क) लागू होत नाही अशा कोणत्याही प्रकरणात जेव्हा एखाद्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेविषयी दोन किंवा अधिक उमेदवारांमध्ये विवाद निर्माण होईल आणि अशा प्रत्येक उमेदवाराच्या नावे नोंदलेल्या मतांची छाननी व संगणना केल्यानंतर, न्यायाधीशाचे जर असे मत झाले की, जो निवडून आल्याचे घोषित करण्याची मागणी करण्यात आली आहे त्या कोणत्याही उमेदवाराला सर्वात जास्त विधिग्राह्य मते मिळाली आहेत तर, न्यायाधीश निवडून आलेल्या उमेदवाराची निवडणूक रद्दबादल ठरवून, जो निवडून आल्याचे घोषित करण्याची मागणी केली असेल तो उमेदवार रीतसर निवडून आला आहे असे घोषित करील :

परंतु, अशा संगणनेसाठी, कोणतेही मत देण्यात किंवा मिळविण्यात कोणत्याही ज्ञात अगर अज्ञात व्यक्तीने, कोणताही भ्रष्टाचार केला आहे असे न्यायाधीशास आढळून आल्यास ते मत विधिग्राह्य समजले जाणार नाही ;

परंतु, आणखी असे की, अशा संगणनेनंतर जी कोणत्याही उमेदवारांना समसमान मते मिळाली असल्याचे आढळून आले आणि एका मताची भर घातली असता त्यांच्यापैकी कोणत्याही उमेदवारास निवडून आल्याचे घोषित केले जाण्याचा हक्क प्राप्त होत असेल तर, न्यायाधीश निर्धारित करील अशा रीतीने त्यांच्या समक्ष चिठ्ठया टाकून निवडलेल्या उमेदवाराला जी विधिग्राह्य मते मिळाल्याचे आढळून येईल त्या मतांच्या एकूण संख्येत एका जादा मताची भर टाकली जाईल.

---

१ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ५ अन्वये "कलेक्टरने किंवा त्याने कलम २६ अन्वये त्या बाबतीत ज्यास अधिकृत केले असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६३ अन्वये "जिल्हाधिकाऱ्याने" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले

३ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ याच्या कलम ५ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला

१९५१ चा ४३. (६) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या भ्रष्टाचारांपैकी कोणताही भ्रष्टाचार उक्त कलम १२३ यात केलेल्या पुढील फेरबदलांच्या अधीनतेने या कलमाच्या प्रयोजनाकरिता भ्रष्टाचार आहे असे मानण्यात येईल. ते फेरबदल असे—

(क) खंड (१), उपखंड (ख) मधील स्पष्टीकरणातील "आणि कलम ७८ मध्ये उल्लेख केलेल्या निवडणूक खर्चाच्या हिशेबात योग्य रीतीने दाखल केलेल्या" हा मजकूर वगळण्यात येईल.

(ख) खंड (५) मधील "कलम २५ अन्वये तरतूद करण्यात आलेले ......... किंवा मतदानासाठी कलम २९ चे पोट-कलम (१) याअन्वये ठरवलेली कोणतीही जागा "या मजकुराऐवजी" किंवा याबाबत राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या तरतुदींअनुसार मतदानासाठी ठरवलेली कोणतीही जागा" हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ग) खंड (६) वगळण्यात येईल;

१९६२ चा महाराष्ट्र ५. (घ) [1][ खंड (७) मधील "शासनाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीकडून" या मजकुराऐवजी "महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याचे कलम २३९, खंड (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जिल्हा सेवेतील किंवा शासनाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीकडून" हा मजकूर दाखल करण्यात येईल आणि बाब (छ) मधील, ] विहित करण्यात येतील असे" या मजकुराऐवजी "राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांनी विहित करण्यात येतील असे" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(७) कलम १२ चे किंवा कलम १४ चे पोट-कलम (२) याखाली याबाबत केलेल्या नियमांची अंमलबजावणी करण्याचे काम ज्याच्याकडे सोपविले आहे त्या अधिकाऱ्याने एखादी चूक केली आहे किंवा जी भ्रष्टाचारामुळे घडलेली नाही अशी कोणतीही नियमबाह्यता किंवा रीतिबाह्यता झालेली आहे याच केवळ कारणावरून, निवडणुकीच्या कोणत्याही विधिग्राह्यतेबद्दल आक्षेप घेण्यात आला असेल तर न्यायाधीश ती निवडणूक रद्द ठरवणार नाही.

(८) पोट-कलम (५), खंड (क) खाली न्यायाधीशाने एखादी निवडणूक रद्द केल्यास त्यास योग्य वाटल्यास, या कलमाच्या अर्थांतर्गत जिने कोणताही भ्रष्टाचार केला आहे अशा कोणत्याही व्यक्तीस, पाच वर्षांपेक्षा अधिक नाही इतक्या अवधीपर्यंत, कोणत्याही जिल्हा परिषदेचा सदस्य होण्यास निरर्ह म्हणून घोषित करता येईल आणि न्यायाधीशाचा असा निर्णय निर्णायक असेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, अशी कोणतीही घोषणा करण्यात येणार नाही.

**निवडणुकविषयक बाबींमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध**

[2][२७क. कलम २७ च्या तरतुदींनुसार असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत कोणत्याही जिल्हा परिषदेच्या कोणत्याही निवडणुकीस हरकत घेता येणार नाही; आणि त्या कलमामध्ये निर्देशिलेल्या न्यायाधीशाखेरीज कोणतेही न्यायालय अशा निवडणुकीच्या संबंधातील कोणताही विवाद दाखल करून घेणार नाही.]

**अपराधसिध्दीमुळे किंवा भ्रष्टाचारामुळे उद्भवणारी निरर्हता**

२८. (क) कोणत्याही व्यक्तीस,–

१९६० चा ४५. [3][भारतीय दंड संहितेच्या कलम १५३-क किंवा कलम १७१-ङ किंवा कलम १७१-च किंवा कलम ५०५, पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३)] खाली कैदेची शिक्षा होण्याजोग्या अपराधबद्दल किंवा या अधिनियमाच्या [4][कलम २८क किंवा कलम ३५ किंवा कलम ३६, पोट-कलम (२), खंड (क)] खाली शिक्षा होण्याजोग्या अपराधाबद्दल सिध्दपराध ठरविण्यात आले असेल; किंवा

(ख) कलम २७ खालील निवडणूक अर्जाची न्यायचौकशी केल्यानंतर ती कोणताही भ्रष्टाचार केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल;

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७(२) अन्वये "खंड (७) बाब (म) मधील "याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४४ अन्वये, कलम २७अ समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४(अ) अन्वये "भारतीय दंड संहितेच्या कलम १७१-ई किंवा कलम १७१ फ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ८ अन्वये "कलम ३५ अन्वये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

तर तिला सिध्दपराध ठरविण्यात आल्याच्या दिनांकापासून किंवा त्या उमेदवारास निरर्ह ठरविण्यात आले आहे असे कलम २७ च्या पोट-कलम (५) अन्वये ज्या दिनांकास घोषित करण्यात आले असेल त्या दिनांकापासून [१][सहा वर्षांच्या] कालावधीपर्यंत, जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही निवडणूकीत निवडून येण्यास किंवा मतदान करण्यास निरर्ह ठरवण्यात येईल.

निवडणुकीच्या संबधात निरनिराळ्या वर्गांमध्ये वैरभाव वाढविणे.

[२][२८क. जी कोणी व्यक्ती या अधिनियमाखालील निवडणुकीसंबंधात भारतातील नागरिकांच्या निरनिराळ्या वर्गामध्ये धर्म, वंश, जात, समाज किंवा भाषा या भूमिकेवरुन वैरभाव किंवा द्वेषभाव पसरवील किंवा पसरवण्याचा प्रयत्न करील तिला अपराधसिध्दीनंतर तीन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकीच्या आदल्या दिवशी किंवा निवडणुकीच्या दिवशी सार्वजनिक सभा भरविण्यास मनाई.

२८ख. (१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदार विभागामध्ये, मतदानास सुरुवात होण्याच्या दिनांकापूर्वी चोवीस तासांमध्ये किंवा त्या मतदार विभागात निवडणुकीसाठी ज्या दिनांकास किंवा दिनांकास मतदान घेण्यात येईल त्या दिनांकास किंवा दिनांकास कोणतीही सार्वजनिक सभा बोलावणार नाही, भरवणार नाही किंवा अशा सभेस हजर राहणार नाही.

(२) जी कोणी व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराधसिध्दीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

निवडणुकीच्या सभांमध्ये दंगल माजविणे.

२८ग. (१) जी कोणी व्यक्ती हे कलम जिला लागू असेल अशा एखाद्या सार्वजनिक सभेमध्ये जे काम चालवण्यासाठी सभा बोलावण्यात आली असेल ते काम चालण्यास प्रतिबंध करण्याच्या हेतूने गैरशिस्त रीतीने वागेल किंवा तशा रीतीने वागण्यास इतरांस चिथावणी देईल तिला अपराधसिध्दीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) कोणत्याही मतदार विभागास परिषद सदस्य निवडून देण्यास आवाहन करणारी या अधिनियमाखालील अधिसूचना ज्या दिनांकास काढण्यात येईल तो दिनांक आणि अशी निवडणूक ज्या दिनांकास घेण्यात येईल तो दिनांक यांमधील कालावधीत त्या मतदार विभागात भरविण्यात आलेल्या राजकीय स्वरुपाच्या कोणत्याही सार्वजनिक सभेस हे कलम लागू असेल.

(३) जर कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) खालील अपराध करीत असल्याचा वाजवी संशय येत असेल तर त्यास सभेच्या अध्यक्षाने तसे करण्यासाठी विनंती केली असता, त्या व्यक्तीस तिचे नाव व पत्ता ताबडतोब त्यास सांगण्यासाठी फर्मावता येईल आणि जर अशी व्यक्ती तिचे नाव व पत्ता सांगण्यास नकार देईल किंवा कसूर करील किंवा ती खोटे नाव व पत्ता देत असल्याचा पोलीस अधिकाऱ्यास वाजवी संशय येईल तर त्या पोलीस अधिकाऱ्यास तिला अधिपत्राशिवाय अटक करता येईल.

---

१. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ४(ब) "पाच वर्षांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ९ अन्वये कलम २८-क ते २८ ग समाविष्ट करण्यात आली.

२८घ. (१) कोणतीही व्यक्ती, ज्यावर मुद्रक व प्रकाशक यांची नावे व पत्ते मुद्रित करण्यात आले नसतील असे कोणतेही निवडणूकविषयक पत्रक किंवा भित्तिपत्रक मुद्रित करणार किंवा प्रसिध्द करणार नाही किंवा मुद्रित करविणार किंवा प्रसिध्द करविणार नाही. पत्रके, भित्तिपत्रके वगैरे मुद्रित करण्यावर निर्बंध.

(२) कोणतीही व्यक्ती निवडणुकीसंबंधीचे कोणतेही पत्रक किंवा भित्तिपत्रक,—

(क) तिने सही केलेल्या आणि तिला जे व्यक्तिशः ओळखत असतील अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेल्या उक्त पत्रकांच्या प्रकाशकाच्या ओळखीसबंधातील अभिकथनाच्या दोन प्रती, तिने, मुद्रकास दिल्या असल्याशिवाय; आणि

(ख) ते कागदपत्र मुद्रित करण्यात आल्यावर वाजवी वेळेच्या आत मुद्रकाने अभिकथनाची एक प्रत त्या कागदपत्राच्या एका प्रतीसह,—

(एक) जर ते बृहन्मुंबईत मुद्रित करण्यात आले असेल तर, बृहन्मुंबईच्या पोलीस आयुक्ताकडे; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत, ज्या जिल्ह्यात ते मुद्रित करण्यात आले असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे ;

पाठविली असल्याशिवाय, मुद्रित करणार किंवा करविणार नाही.

(३) या कलमाच्या प्रयोजनांसाठी,—

(क) एखाद्या कागदपत्राची हाताने प्रत लिहून काढणे याव्यतिरिक्त त्याच्या अनेक प्रती काढण्याची प्रक्रिया ही मुद्रण म्हणून मानण्यात येईल आणि "मुद्रक" या शब्दप्रयोगाचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल; आणि

(ख) "निवडणूकविषयक पत्रक किंवा भित्तिपत्रक" या शब्दप्रयोगाचा अर्थ, एखादा उमेदवार किंवा उमेदवारांचा गट निवडून येण्यास उत्तेजन देण्याच्या किंवा बाध आणण्याच्या प्रयोजनासाठी वाटण्यात आलेले कोणतेही छापील पत्रक, हस्तपत्रक किंवा इतर कागदपत्र किंवा निवडणुकीसबंधातील कोणताही घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक असा आहे; परंतु त्यामध्ये, ज्यात केवळ निवडणुक सभेचा दिनांक, वेळ, जागा आणि इतर तपशील जाहीर करण्यात आला असेल किंवा ज्यामध्ये निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांना देण्यात येणाऱ्या नेहमीच्या सूचना असतील असे कोणतेही हस्तपत्रक, घोषणाफलक किंवा भित्तीपत्रक यांचा अंतर्भाव होत नाही.

(४) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराधसिध्दीनंतर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.]

२९. (१) ज्या दिनांकास किंवा दिनांकास कोणत्याही मतदान केंद्रात मतदान चालू असेल त्या दिनांकास किंवा त्या दिनांकास त्या मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासून शंभर यार्डाच्या आतील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत कोणतीही व्यक्ती पुढीलपैकी कोणतेही कृत्य करणार नाही :— मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ प्रचार करण्यास मनाई.

(क) मतासाठी प्रचार करणे, किंवा

(ख) कोणत्याही मतदाराकडे मतासाठी याचना करणे; किंवा

(ग) कोणत्याही विशिष्ट उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

(घ) निवडणुकीत मतदान न करण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविणे; किंवा

(ङ) निवडणुकीसंबंधीची (सरकारी नोटीस सोडून) इतर कोणतीही नोटीस किंवा निशाणी प्रदर्शित करणे.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराधसिध्दीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) या कलमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल

मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राजवळ बेबंद वर्तन केल्याबद्दल शास्ती.

३०. (१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात मतदान होईल त्या दिनांकास त्या दिनांकास मतदानासाठी मतदान केंद्रात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तींस उपद्रव होईल अशा रीतीने किंवा मतदान केंद्रात कामावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि इतर व्यक्तींच्या कामात व्यत्यय येईल अशा रीतीने,–

(क) ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यासारखा मानवी आवाज मोठा करणारा किंवा पुन्हा निर्माण करणारा कोणताही उपकरण संच मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत वापरणार किंवा चालवणार नाही;

(ख) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्याच्या जवळपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत ओरडणार नाही किंवा अन्यथा बेबंदपणे वागणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा असे उल्लंघन करण्यास बुद्ध्या मदत करील किंवा अपप्रेरणा देईल तिला अपराधसिद्धीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) जर कोणतीही व्यक्ती या कलमानुसार शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे मतदान केंद्राध्यक्षास सकारण वाटेल तर त्याला अशा व्यक्तीस अटक करण्याविषयी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास निदेश देता येईल आणि त्यानंतर पोलीस अधिकारी त्यास अटक करील.

(४) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होऊ नये म्हणून वाजवीरित्या आवश्यक असतील असे उपाय योजता येतील आणि अशा बलाचा उपयोग करता येईल आणि असे उल्लंघन करण्याच्या कामी वापरण्यात आलेला कोणताही उपकरण संच जप्त करता येईल.

मतदान केंद्रावर गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती.

३१. (१) जी कोणी व्यक्ती कोणत्याही मतदान केंद्रात मतदानासाठी निश्चित केलेल्या वेळात गैरवर्तन करील किंवा मतदान केंद्राध्यक्षाने दिलेले कायदेशीर निदेश पाळण्यात कसूर करील तिला मतदान केंद्राध्यक्ष किंवा कामावर असलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा याबाबत अशा मतदान केंद्राध्यक्षाने प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती मतदान केंद्रातून घालवून देऊ शकेल.

(२) मतदान केंद्रात मतदान करण्याचा अन्यथा हक्क असलेल्या कोणत्याही मतदारास त्या मतदान केंद्रात मतदान करण्याची संधी मिळण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करण्यात येणार नाही.

(३) जर अशा रीतीने मतदान केंद्रातून घालवून देण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीने मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीवाचून मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश केला तर, तिला अपराधसिद्धीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(४) पोट-कलम (३) खाली शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.

मतदानाची गुप्तता राखणे.

३२. (१) निवडणुकीत मत नोंदणीशी किंवा मत मोजणीशी संबंधित असलेले कोणतेही काम करणारा प्रत्येक अधिकारी, लिपिक, प्रतिनिधी किंवा इतर व्यक्ती मतदानाची गुप्तता राखील व गुप्तता राखण्याच्या कामी मदत करील आणि अशा गुप्ततेचा भंग करण्याच्या हेतूने (कोणत्याही कायद्याखाली किंवा कायद्यान्वये प्राधिकृत केलेल्या एखाद्या प्रयोजनाव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता) कोणत्याही व्यक्तीस कोणतीही माहिती देणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला अपराधसिद्धीनंतर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीची कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकी-संबंधातील अधिकारी, वगैरे यांनी उमेदवारांच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे.

**३३.** (१) निवडणुकीच्या वेळी निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असलेल्या किंवा निवडणुकीसंबंधीचे कोणतेही कर्तव्य करण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्याने किंवा मतदान केंद्राध्यक्षाने नेमलेला एखादा अधिकारी किंवा लिपिक असलेली कोणतीही व्यक्ती निवडणुकीचे काम चालविताना किंवा निवडणुकीसंबंधी व्यवस्था ठेवताना एखादा उमेदवार निवडून येण्याची संभाव्यता वाढवण्यासाठी (आपले मत देण्याशिवाय अन्य) कोणतेही कृत्य करणार नाही.

(२) पूर्वोक्तप्रमाणे कोणतीही व्यक्ती आणि पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती—

(क) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने आपले मत द्यावे म्हणून तिचे मन वळविण्याचा, किंवा

(ख) निवडणुकीत आपले मत देण्यापासून कोणत्याही व्यक्तीस परावृत्त करण्याचा, किंवा

(ग) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीच्या मतदानाच्या बाबतीत कोणत्याही रीतीने वजन खर्च करण्याचा प्रयत्न करणार नाही.

(३) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला
१९५१ अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल, इतक्या अवधीची कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा किंवा
चा ४३. या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकीच्या वेळी वाहने बेकायदेशीर रीत्या भाड्याने घेण्याबद्दल किंवा ती प्राप्त करण्याबद्दल शास्ती.

[१][**३३क.** कलम २७, पोट-कलम (६) खाली जो भ्रष्टाचार म्हणून मानण्यात आला आहे आणि लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याचे कलम १२३, पोट-कलम (५) मध्ये विनिर्दिष्ट केलेला आहे असा कोणताही भ्रष्टाचार निवडणुकीच्या वेळी किंवा निवडणुकीच्या संबंधात केल्याबद्दल जर कोणतीही व्यक्ती दोषी असेल तर तिला दोनशे पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.]

निवडणुकांच्या संबंधातील पदीय कर्तव्याचा भंग करणे.

**३४.** (१) हे कलम जिला लागू आहे अशी कोणतीही व्यक्ती वाजवी कारणाशिवाय आपल्या पदीय कर्तव्याचा भंग करुन कोणतेही कृत्य केल्याबद्दल किंवा न केल्याबद्दल दोषी असेल तर तिला अपराधसिद्धीनंतर पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) पूर्वोक्तप्रमाणे कोणतेही कृत्य केल्याबद्दल किंवा न केल्याबद्दल अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नुकसानभरपाईसाठी कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही करता येणार नाहीत.

(३) हे कलम ज्यांना लागू आहे त्या व्यक्ती म्हणजे निर्वाचन अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि मतदारांची यादी ठेवणे, नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे किंवा उमेदवारी मागे घेण्याच्या किंवा निवडणुकीच्या वेळी मतनोंदणी किंवा मतमोजणी करण्याच्या संबंधातील कोणतेही काम करणे यासाठी नेमलेल्या इतर कोणत्याही व्यक्ती या होत आणि "पदीय कर्तव्य" या शब्द प्रयोगाचा अर्थ, या कलमाच्या प्रयोजनाकरिता त्याप्रमाणे लावण्यात येईल; परंतु या शब्दप्रयोगात या अधिनियमान्वये किंवा त्याखाली लादण्यात आलेल्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कर्तव्यांचा अंतर्भाव होणार नाही.

मतदान केंद्रातून मतपत्रिका काढून नेणे हा अपराध असणे.

**३५.** (१) जी कोणी व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या वेळी एखाद्या मतदान केंद्रातून मतपत्रिका लबाडीने घेईल किंवा घेण्याचा प्रयत्न करील किंवा असे कोणतेही कृत्य करण्यास बुद्ध्या मदत करील किंवा अपप्रेरणा देईल तिला अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जर कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) खाली शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे मतदान केंद्राध्यक्षास सकारण वाटले तर, अशा अधिकाऱ्यास अशी व्यक्ती मतदान केंद्र

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम १० अन्वये कलम ३३क समाविष्ट करण्यात आले.

सोडून जाण्यापूर्वी तिला करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास निदेश देता येईल आणि त्यास अशा व्यक्तींची झडती घेता येईल किंवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकडून तिची झडती घेण्याची तजवीज करता येईल :

परंतु, जेव्हा एखाद्या स्त्रीची झडती घेण्याची तजवीज करणे आवश्यक असेल, तेव्हा अशी झडती सभ्यतेचे नियम काटेकोरपणे पाळून दुसऱ्या एखाद्या स्त्रीकडून घेण्यात येईल.

(३) अटक केलेल्या व्यक्तीजवळ, झडती कोणतीही मतपत्रिका सापडल्यास, ती मतदान केंद्राध्यक्ष सुरक्षित ताब्यात ठेवण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील किंवा अशी झडती एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने घेतली असेल तर, मतपत्रिका असा अधिकारी सुरक्षित ताब्यात ठेवील.

(४) पोट-कलम (१) खाली शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.

इतर अपराध व त्याबद्दल शास्ती.

३६. (१) जर एखादी व्यक्ती कोणत्याही निवडणुकीच्या वेळी—

(क) कोणतेही नामनिर्देशनपत्र लबाडीने विरुपित करील किंवा लबाडीने नष्ट करील; किंवा

(ख) निवडणूक निर्वाचन अधिकाऱ्याच्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली लावलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्र लबाडीने विरुपित करील, नष्ट करील किंवा काढून टाकील; किंवा

(ग) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत निशाणी लबाडीने विरुपित करील किंवा लबाडीने नष्ट करील; किंवा

(घ) योग्य प्राधिकारावाचून कोणत्याही व्यक्तीस कोणतीही मतपत्रिका पुरवील; किंवा

(ङ) कोणत्याही मतपेटीत मतपत्रिका टाकण्यास कायद्यानुसार जी प्राधिकृत असेल त्या मतपत्रिकेविरुद्ध इतर कोणतीही वस्तू अशा मतपेटीत लबाडीने टाकील;

(च) निवडणुकीच्या प्रयोजनांकरिता त्यावेळी उपयोगात असलेली कोणतीही मतपेटी किंवा मतपत्रिका योग्य प्राधिकारावाचून नष्ट करील, घेईल, उघडील किंवा अन्यथा तीत ढवळाढवळ करील;

(छ) लबाडीने किंवा यथास्थिति योग्य प्राधिकाराशिवाय पूर्वगामी कृतीपैकी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करील किंवा अशी कोणतीही कृती करण्यास बुध्द्या मदत करील किंवा अपप्रेरणा देईल;

तर ती अपराधाबद्दल दोषी असेल.

(२) या कलमाखालील अपराधाबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती—

(क) जर ती एखाद्या मतदान केंद्रावरील निर्वाचन अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष असेल किंवा निवडणूकीच्या संबंधात पदीय कर्तव्य बजावण्यासाठी सेवा नियुक्त केलेला कोणताही इतर अधिकारी किंवा लिपिक असेल तर, तिला अपराधसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(ख) जर ती कोणतीही व्यक्ती असेल तर तिला अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या कैदेची शिक्षा किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(३) मतमोजणी धरून एखाद्या निवडणुकीचे किंवा निवडणुकीच्या भागाचे काम चालवण्यात भाग घेणे किंवा निवडणुकीनंतर, अशा निवडणुकीच्या संबधात उपयोगात आणलेल्या मतपत्रिका व इतर कागदपत्रे याबद्दल जबाबदार असणे हे एखाद्या व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, या कलमाच्या प्रयोजनाकरिता ती पदीय कर्तव्य बजावीत आहे असे मानण्यात येईल, पण "पदीय कर्तव्य" या शब्दप्रयोगात या अधिनियमान्वये किंवा त्याखाली लावण्यात आलेल्या कर्तव्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कर्तव्यांचा अंतर्भाव होणार नाही.

(४) पोट-कलम (२), खंड (ख) खाली शिक्षापात्र असलेला अपराध दखलपात्र असेल.

विवक्षित अपराधांच्या संबंधात खटला दाखल करणे

३७. (१) जर [१][राज्य निवडणूक आयोगास,] जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या कोणत्याही निवडणूकीला अनुलक्षून कलम ३३ किंवा कलम ३४ किंवा कलम ३६ चे पोट-कलम (२), खंड (क) खाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध करण्यात आला आहे असे सकारण वाटत असेल तर जिल्हाधिकाऱ्याने त्या प्रकरणाच्या परिस्थितीवरून त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करण्याची आणि असे खटले दाखल करण्याची तजवीज करणे हे त्याचे कर्तव्य असेल.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४५ अन्वये "जिल्हाधिकाऱ्यास" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) [1][राज्य निवडणूक आयोगाच्या] आदेशावरून किंवा त्याने दिलेल्या प्राधिकारान्वये तक्रार करण्यात आली असल्याशिवाय कोणतेही न्यायालय पूर्वोक्त तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

## परिषद सदस्यांचा राजीनामा, त्यांना पदावरून दूर करणे व त्यांच्या नैमित्तिक रीत्या रिकाम्या झालेल्या जागा, वगैरे

परिषद सदस्याचा राजीनामा

३८. निवडून आलेल्या [2][ * * * ] कोणत्याही परिषद सदस्यास अध्यक्षाच्या नावे स्वतःच्या सहीनिशी लिहून, आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल आणि अध्यक्षास [3][ आयुक्ताकडे तत्सम नोटीस देऊन, परिषद सदस्य म्हणून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल, आणि त्यानंतर परिषद सदस्याचे अधिकारपद रिकामे होईल.] [4][ ही नोटीस विहित रीतीने देण्यात येईल.]

गैरवर्तणूक वगैरे केल्याबद्दल परिषद सदस्यास अधिकार पदावरून दूर करणे.

३९. जर कोणताही परिषद सदस्य आपली कर्तव्ये बजावीत असता गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा कोणतेही लज्जास्पद वर्तन केल्याबद्दल दोषी असेल, किंवा तो परिषद सदस्य म्हणून आपली कर्तव्ये बजावण्यास असमर्थ झाला असेल तर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटल्यास जिल्हा परिषदेच्या हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या परिषद सदस्यांपैकी [5][दोन-तृतीयांशहून कमी नाहीत इतक्या परिषद सदस्यांनी] पाठींबा दिलेल्या जिल्हा परिषदेच्या शिफारशीवरून अशा कोणत्याही परिषद सदस्यास अधिकारपदावरून दूर करता येईल:

परंतु, अशा कोणत्याही परिषद सदस्यास आपले स्पष्टीकरण देण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज अधिकारपदावरून दूर करता येईल :

परिषद सदस्यांची पदावधीच्या काळातील निरर्हता.

४०. (१) कलम ६२, पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, जर कोणताही परिषद सदस्य त्याच्या पदावधीत—

(क) कलम १६, पोट-कलम (१) [6][किंवा (४)] खाली निरर्ह ठरला असेल तर, किंवा

(ख) जिल्हा परिषदेच्या परवानगीशिवाय, जिल्हा परिषदेच्या बैठकींना (पीठासीन प्राधिकाऱ्याच्या बाबतीत रीतसर मंजूर केलेल्या रजेचा कालावधी वगळून) लागोपाठ सहा महिने गैरहजर असेल [7][किंवा अशा बैठकींना लागोपाठ बारा महिने गैरहजर असेल] तर, अशा परिषद सदस्याचे अधिकारपद हे, कलम ९ चे पोट-कलम (१) याचा खंड (ग) [8]* * * मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, रिकामे होईल :

[9][ * * * * * * * * * ]

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४५ अन्वये "जिल्हाधिकाऱ्यास" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ४६ अन्वये "किंवा स्वीकृत करून घेतलेल्या" हे शब्द वगळण्यात आले.

[3] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ११ अन्वये "कमिशनरास तत्सम नोटीस देऊन" या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि "तारखेपासून अंमलात येईल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २ अन्वये "अशी नोटीस" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "दिली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ६ अन्वये "दोन-तृतीयांश सदस्यांनी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, याच्या कलम ६ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३(अ) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[8] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये "किंवा खंड (ड)" हा मजकूर वगळण्यात आला.

[9] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[1][(२) या कलमाखाली एखादी जागा रिकामी झाली आहे किंवा कसे याविषयी आयुक्ताने स्वतः होऊन किंवा त्याच्याकडे या बाबतीत कोणत्याही व्यक्तीने अर्ज केल्यावरून कोणताही प्रश्न उपस्थित केल्यास, आयुक्त [2][ शक्य असेल तेथवर] असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत त्या प्रश्नाचा निर्णय करील; आणि त्याचा त्यावरील निर्णय अंतिम असेल. जागा रिकामी झाली आहे असा आयुक्त निर्णय देईपर्यंत परिषद सदस्य म्हणून राहण्यास त्या परिषद सदस्यास वंचित केले जाणार नाही :

परंतु, परिषद सदस्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय कोणत्याही परिषद सदस्याविरुद्ध कोणताही निर्णय दिला जाणार नाही.]

नैमित्तिक जागा कशा भराव्यात.

४१. एखादा परिषद सदस्य त्याचा पदावधी संपण्यापूर्वी मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास निरर्ह ठरवल्यामुळे किंवा त्यास पदावरून दूर करण्यात आल्यामुळे किंवा तो काम करण्यास असमर्थ झाल्यामुळे, किंवा अन्यथा एखादी जागा रिकामी झाली असेल तर त्या प्रसंगी, [3][ उप मुख्य कार्यकारी अधिकारी] ही घटना [4][ राज्य निवडणूक आयोगास] ताबडतोब कळवील, आणि ती रिकामी जागा, सोईप्रमाणे होईल तितक्या लवकर एखाद्या व्यक्तीची त्या जागी निवडणूक घेऊन, [5][ * * * ] भरण्यात येईल आणि ती व्यक्ती, ज्या परिषद सदस्यांच्या जागी तिला निवडून दिले असेल, [6][ * * * ] त्या परिषद सदस्याने ती जागा रिकामी झाली नसती तर, जितक्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण केले असते तितक्याच कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करील:

परंतु, कलम ९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी जागा परिषद सदस्याचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होईल त्या दिनांकाच्या पूर्ववर्ती सहा महिन्यांच्या आत रिकामी झाली असेल तर ती भरण्यात येणार नाही :

[7]* * * * * *

## अध्यक्ष आणि उपाध्यक्ष

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक.

[8][४२. (१) प्रत्येक जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी एक अध्यक्ष असेल व तो पोट-कलम (२), [9][ व (३)] यांच्या तरतुदींना अधीन राहून, [10][ त्या जिल्हा परिषदेच्या निवडून आलेल्या परिषद सदस्यांकडून व सदस्यांमधून निवडण्यात येईल.] जिल्हा परिषद अशाच प्रकारे आपल्या निवडून आलेल्या परिषद सदस्यांपैकी एका परिषद सदस्याची उपाध्यक्ष म्हणून निवड करील.

(२) कोणत्याही परिषद सदस्य [11] * * * त्याने एकूण दहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीसाठी कोणत्याही जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाचे किंवा उपाध्यक्षाचे पद धारण केलेले असेल तर अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष असणार नाही किंवा असण्याचे चालू राहणार नाही.

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम १२ अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.
[2] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[3] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४ अन्वये "अध्यक्षाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[4] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४७ (१) अन्वये "जिल्हाधिकाऱ्यास" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[5] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (२) अन्वये "किंवा यथास्थिति एखाद्या व्यक्तीस स्वीकृत करून घेऊन" हा मजकूर वगळण्यात आला.
[6] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (३) अन्वये "किंवा स्वीकृत करून घेतले असेल" हा मजकूर वगळण्यात आला.
[7] वरील अधिनियमाच्या कलम ४७ (४) अन्वये दुसरे व तिसरेही परंतुके वगळण्यात आली.
[8] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४२ दाखल करण्यात आले.
[9] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४८ (१) (अ) अन्वये "(३) व (४)" या ऐवजी हे आकडे व कंस दाखल करण्यात आले.
[10] वरील अधिनियमाच्या कलम ४८ (१) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[11] वरील अधिनियमाच्या कलम ४८ (२) अन्वये "महाराष्ट्र जिल्हा परिषदा" या मजकुराने प्रारंभ होणारा व "उपाध्यक्ष यांच्यासह" या मजकुराने संपणारा मजकूर वगळण्यात आला.

(३) जर एखादा परिषद सदस्य,--

(क) कोणत्याही विनिर्दिष्ट सहकारी संस्थेचा किंवा कोणत्याही कामगार कंत्राट सहकारी संस्थेचा सभापती असेल व अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून निवडण्यात आलेला असेल तर; किंवा

(ख) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष असेल आणि उपरोक्तप्रमाणे अशा कोणत्याही सहकारी संस्थेचा सभापती म्हणून निवडण्यात आलेला असेल तर, असा परिषद सदस्य, त्याची अशा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा यथास्थिति, अशा सहकारी संस्थेचा सभापती म्हणून निवड झाल्यापासून सात दिवसांच्या आत, त्यास कोणत्या पदावर रहायची किंवा कोणते पद स्वीकारण्याची इच्छा आहे या संबंधातील त्याचा विकल्प लेखी स्वरुपात जिल्हाधिकाऱ्यास कळवील, आणि त्यानंतर ज्या पदावर काम करायची त्याची इच्छा नसेल ते पद या अधिनियमात किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यामध्ये किंवा त्याखाली तयार केलेले नियम किंवा कोणत्याही संस्थेची उपविधी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी रिक्त होईल. अशाप्रकारे दिलेली सूचना रद्द करता येण्याजोगी नसेल. उपरोक्त कालावधीच्या आत अशाप्रकारे कळवण्यात न आल्यास ज्या पदावर त्याची निवड करण्यात आली असेल ते पद रिक्त होईल.

१९६१ चा महा. २४.

[1][ (४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाच्या पदामध्ये पुढीलप्रमाणे राखीव जागा असतील :--

(क) जिल्हा परिषदांमध्ये, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या अध्यक्षांच्या पदांच्या संख्येचे, जिल्हा परिषदांमधील अशा पदांच्या एकूण संख्येशी असणारे प्रमाण हे जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, राज्यातील अनुसूचित जातींच्या किंवा राज्यातील अनुसूचित जमातींच्या [2][ संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या जिल्हा परिषदेतील अनुसूचित जमातींची लोकसंख्या वगळून] लोकसंख्येचे, राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल :

[3][ परंतु, अनुसूचित क्षेत्रांमध्ये संपूर्णपणे समाविष्ट होत असलेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे पद केवळ अनुसूचित जमातींच्या व्यक्तींकरिता राखीव ठेवण्यात येईल ;

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये असलेल्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांचे पद खंड (क) च्या तरतुदींनुसार अनुसूचित जमातींच्या व्यक्तींकरिता राखीव ठेवण्यात येईल;]

[4][ परंतु तसेच,] अशा प्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या एकूण संख्येच्या एकतृतीयांश पदे अनुसूचित जातींच्या किंवा यथास्थिति, अनुसूचित जमातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील;

[5][ परंतु असेही की, जेथे अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक असेल अशा अनुसूचित क्षेत्रांमधील जिल्हा परिषदेमध्ये, अध्यक्षाचे पद हे केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींकरिता राखून ठेवण्यात येईल.]

(ख) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची अध्यक्षांची पदे, जिल्हा परिषदांमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के एवढी असतील :

परंतु, अशा प्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या संख्येच्या एकतृतीयांश पदे नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(ग) जिल्हा परिषदांमधील अध्यक्षांच्या पदांच्या संख्येच्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या पदांची संख्या धरून) एकतृतीयांश पदे स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(५) पोट-कलम (४) याच्या खंड (क), (ख) किंवा (ग) अन्वये राखून ठेवलेल्या पदांची संख्या केवळ दोन असेल, त्याबाबतीत त्या त्या खंडामध्ये निर्देश केल्याप्रमाणे दोनपैकी एक पद अशा प्रकारच्या कोणत्याही आरक्षणातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येईल.

(६) पूर्वोक्तप्रमाणे राखून ठेवलेल्या पदांची संख्या वेगवेगळ्या जिल्हा परिषदांना विहित रीतीने आळीपाळीने नेमून देण्यात येईल;

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४८(३) अन्वये मूळ पोट-कलम (४) ऐवजी पोट-कलमे (४) ते (७) दाखल करण्यात आली.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये ही परंतुके समाविष्ट करण्यात आली.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये परंतु या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ५ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(७) अध्यक्षाच्या पदांचे आरक्षण (स्त्रियांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त अन्य), भारताच्या संविधानाचा अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर अंमलात असण्याचे बंद होईल.]

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी.

[1][ ४३. (१) अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी अडीच वर्षांचा असेल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक २ मार्च २००० रोजी पदावर असलेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा पदावधी यात पुढे तरतूद केल्याप्रमाणे असेल :—

(क) सार्वत्रिक निवडणूकानंतरच्या त्यांच्या पहिल्या सभेपासून ज्यांनी एक वर्षाचा अवधी पूर्ण केलेला नसेल अशा जिल्हा परिषदांच्या बाबतीत, अशा परिषदांच्या अध्यक्षांचा पदावधी प्रत्येकी अडीच वर्षाचा असेल;

(ख) सार्वत्रिक निवडणूकानंतरच्या त्यांच्या पहिल्या सभेपासून ज्यांनी एक वर्षाचा अवधी पूर्ण केलेला असेल परंतु, अद्याप दोन वर्षाचा अवधी पूर्ण केलेला नसेल अशा जिल्हा परिषदांच्या बाबतीत, अशा परिषदांच्या अध्यक्षांचा पदावधी प्रत्येकी दोन वर्षाचा असेल; आणि

(ग) इतर सर्व बाबतीत, उक्त दिनांकास या पदावर असतील अशा अध्यक्षांचा पदावधी, कलम १० मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या पदावधीपर्यंत वाढविण्यात येईल आणि त्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल.]

[2]* * * * * *

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीची कार्यपद्धती.

४५. (१) सार्वत्रिक निवडणुकीनंतर किंवा अन्यथा जिल्हा परिषदेची रचना करण्यात आल्यावर व कलम ११, पोट-कलम (२) खाली जिल्हाधिकाऱ्याने निश्चित केलेल्या दिनांकास अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीसाठी एक बैठक बोलाविण्यात येईल.

(२) जिल्हाधिकारी किंवा याबाबत लेखी आदेश देऊन जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा ज्या अधिकाऱ्यास जिल्हाधिकारी नेमील, असा अधिकारी पोट-कलम (१) खाली बोलाविलेल्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी, अशा बैठकीच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा त्यास, अध्यक्षाला जिल्हा परिषदेच्या बैठकीच्या अध्यक्षपदी असतांना जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, मात्र त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

परंतु, [3][ कलम १११ च्या पोट-कलम (२) किंवा (१०) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अशा बैठकीच्या अध्यक्षपदी असणाऱ्या जिल्हाधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास त्यांच्या मते पुरेशी असण्याची कारणे लेखी नमूद करून, यथास्थिति, अशी बैठक तहकूब करण्यास नकार देता येईल किंवा अशी बैठक तहकूब करता येईल.]

(३) अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या निवडणुकीत जर समान मते पडली तर निवडणुकीचा निकाल जिल्हाधिकारी किंवा अध्यक्षपदी असलेला अधिकारी हा आपल्या समक्ष, तो निर्धारित करील त्या रीतीने चिठ्ठ्या टाकून देईल.

(४) अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या निवडणुकीच्या विधीग्राह्यतेबाबत एखादा विवाद उपस्थित झाल्याच्या प्रसंगी [4][ जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा बैठकीत अध्यक्षपदी असणाऱ्या अधिकाऱ्यास किंवा [5][ * * * ] कोणत्याही परिषद सदस्यास निवडणुकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत ] तो विवाद निर्णयासाठी आयुक्ताकडे निर्देशित करता येईल. [6][ आयुक्ताच्या निर्णयाविरुद्धचे अपील, अशा निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे दाखल करता येईल.]

(५) अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेस, [7] * * अध्यक्ष मुभा देईल असे इतर तातडीचे, कामकाज चालविण्यासाठी, अध्यक्षाच्या अध्यक्षतेखाली आपली बैठक चालू ठेवता येईल :

[8] * * * * * * * * *

---

[1] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ द्वारे कलम ४३ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४९ अन्वये कलम ४४ वगळण्यात आले.

[3] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम १४(१) अन्वये "पोट-कलम (२) मध्ये" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "अधिकार आहे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १४(२) अन्वये "कलेक्टरने" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

[5] सन १९९४चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१,कलम ५०(१) अन्वये "सहयोगी परिषद सदस्य नसेल अशा" हा मजकूर वगळण्यात आला.

[6] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम १४(१) अन्वये "कमिशनरचा निर्णय" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "करता येणार नाही" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५०(२) (अ) अन्वये "आवश्यक वाटल्यास जिल्हा परिषदेवर अनेक व्यक्ती स्वीकृत करून घेण्यासाठी आणि" हा मजकूर वगळण्यात आला

[8] वरील अधिनियमाच्या कलम ५०(२) (ब) अन्वये "परंतुक" वगळण्यात आले.

**४६.** (१) कलम ४७, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, अध्यक्षास दरमहा [1][पाच हजार रुपये.] मानधन देण्यात येईल.

अध्यक्षाला द्यावयाचे मानधन आणि इतर सुविधा.

(२) [2][अध्यक्षासाठी, भाडे न घेता सुसज्य निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबतीत, जे नियम करील त्या नियमांच्या अधीनतेने, जिल्हा परिषदेस योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता त्यास देता येईल.] आणि त्यास राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल असा प्रवास भत्ता इतर भत्ते देण्यात येतील.

(३) अध्यक्ष आपल्या अधिकारपदाच्या कर्तव्यांसाठी पुरेसा वेळ देईल व पुरेसे लक्ष केंद्रित करील.

(४) या कलमाखाली अध्यक्षास मानधन किंवा कोणतेही भत्ते किंवा सुखसोयी मिळतात याच केवळ कारणावरून तो परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा परिषद सदस्य होण्यास किंवा कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा सदस्य होण्यास निरर्ह ठरवला जाणार नाही.

[3][**४६क.** राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, जिल्हा परिषद ठरवील त्याप्रमाणे, दरसाल [4][सहा हजारांपेक्षा] अधिक नसेल इतकी रक्कम, अतिथ्य भत्ता म्हणून अध्यक्षांच्या स्वाधीन करण्यात येईल.]

अध्यक्षाला अतिथ्य भत्ता.

[5][**४६ख.** कलम ४६ क मध्ये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांत काहीही अंतर्भूत केलेले असले तरी राज्य शासनाला या बाबतीत वेळोवेळी काढण्यात येतील अशा आदेशाद्वारे अध्यक्षाला दरवर्षी देय असणाऱ्या अतिथ्य भत्त्याच्या कमाल मर्यादेत बदल करता येईल.]

अतिथ्य भत्याच्या कमाल मर्यादेत बदल करण्याचा अधिकार.

**४७.** (१) अध्यक्षास, वर्षातून तीस दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी परवानगी शिवाय गैरहजर राहता येईल, आणि स्थाई समितीस, त्यास तीस दिवसांहून अधिक कालावधीची आणि एका वर्षात एकूण नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतकी अनुपस्थिती रजा मंजूर करता येईल, आणि राज्य शासनास नव्वद दिवसांहून अधिक अशा कोणत्याही कालावधीची अनुपस्थिती रजा त्यास मंजूर करता येईल. परंतु कोणत्याही एका वर्षात एकशेऐंशी दिवसांपेक्षा अधिक अशी कोणतीही रजा मंजूर करण्यात येणार नाही.

अध्यक्षाला अनुपस्थिती रजा देणे आणि परिणामस्वरूप तरतूदी.

(२) अध्यक्षास, पोट-कलम (१) खाली एका वर्षात तीस दिवसांहून अधिक होणाऱ्या कोणत्याही अनुपस्थितीच्या कालावधीमध्ये कोणतेही मानधन मिळण्याचा हक्क असणार नाही.

(३) राज्य शासनाकडून, या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वैद्यकीय प्राधिकाऱ्याने रीतसर प्रमाणित केलेल्या आजाराच्या कारणावरून, जेव्हा अध्यक्ष आपल्या पदावधीत नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अनुपस्थित असेल तेव्हा पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

[6][**४७क.** (१) पोट-कलम (५) मधील तरतुदींना अधीन राहून उपाध्यक्षास दरमहा [7][चार हजार रुपये] मानधन देण्यात येईल.

उपाध्यक्षास द्यावयाचे मानधन, अनुपस्थिती रजेसह इतर सवलती आणि परिणामस्वरूप तरतूदी.

(२) उपाध्यक्षासाठी, भाडे न घेता सुसज्य निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन याबाबतीत जे नियम करील त्या नियमांना अधीन, राहून जिल्हा परिषदेस योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता आणि राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल असा प्रवास भत्ता व इतर भत्ते देण्यात येतील.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम (२) द्वारे "एक हजार पाचशे रुपये" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ द्वारे "जिल्हा परिषदेस" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "जागेची सोय करून देण्यात आली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर नेहमीकरता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ९ द्वारे कलम ४६-क समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम २ द्वारे "दोन हजारांपेक्षा" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे कलम ४६-ख समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ३ अन्वये कलम ४७-क समाविष्ट करण्यात आले

[7] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम (३) अन्वये "एक हजार दोनशे" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(३) या कलमाखाली, उपाध्यक्षास मानधन किंवा कोणतेही भत्ते किंवा सुखसोयी मिळतात याच केवळ कारणावरून तो परिषद सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा सदस्य होण्यास निरर्ह ठरवला जाणार नाही.

(४) उपाध्यक्षास, वर्षातून तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी परवानगीशिवाय गैरहजर राहता येईल, आणि स्थायी समितीस, त्यास तीस दिवसांहून अधिक कालावधीची आणि एका वर्षात एकूण नव्वद दिवसांहून अधिक अशा कोणत्याही कालावधीची अनुपस्थिती रजा मंजूर करता येईल, परंतु कोणत्याही एका वर्षात एकशेऐंशी दिवसांपेक्षा अधिक अशी कोणतीही रजा मंजूर करण्यात येणार नाही.

(५) उपाध्यक्षास.—

(क) पोट-कलम (४) खाली एका वर्षात तीस दिवसांहून अधिक होणाऱ्या अनुपस्थितीच्या कोणत्याही कालावधीमध्ये कोणतेही मानधन मिळण्याचा हक्क असणार नाही; आणि

(ख) त्याचप्रमाणे कोणत्याही समित्यांचा सभापती म्हणून कोणतेही मानधन, भत्ते किंवा अनुपस्थिती रजेसह इतर सवलती मिळण्याचा हक्क असणार नाही.

(६) राज्य शासनाकडून, या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वैद्यकीय प्राधिकाऱ्याने रीतसर प्रमाणित केलेल्या आजाराच्या कारणावरून, जेव्हा उपाध्यक्ष आपल्या पदावधीत नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अनुपस्थित असेल तेव्हा या बाबतीत पोट-कलम (५) च्या खंड (क) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

**स्पष्टीकरण.--** शंका निरसनासाठी याद्वारे घोषित करण्यात येते की, समित्यांच्या सभापतींना लागू करण्याजोग्या पोट-कलम (२) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या बाबींच्या संदर्भात, १७ ऑक्टोबर १९८४ च्या लगतपूर्वी कोणतेही नियम अमलात असल्यास, ते त्या बाबतीत नवीन नियम करण्यात येई पर्यंत उपाध्यक्षाला लागू राहतील.]

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा राजीनामा.

**४८.** (१) अध्यक्षास, आयुक्तास संबोधून आपल्या अधिकारपदाचा स्वतःच्या सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल ; [१][आणि लागोलाग त्याचे अधिकारपद रिकामे होईल.]

(२) उपाध्यक्षास, अध्यक्षास संबोधून आपल्या अधिकारपदाचा स्वतःच्या सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल; [१][आणि लागोलाग त्याचे अधिकारपद रिकामे होईल.]

[२][(३) राजीनाम्याची नोटीस विहित केलेल्या रीतीने सुपूर्द करण्यात येईल.]

अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव.

[३][**४९.** [४][(१) जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्याचा व मतदानाचा त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या, निवडून आलेल्या परिषद सदस्याच्या एकूण संख्येपैकी [७][दोन तृतीयांश बहूमताने.] जिल्हा परिषदेच्या विशेष बैठकीत, अविश्वासाचा ठराव संमत करण्यात येईल तर, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष, हा यथास्थिति, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून असण्याचे बंद होईल व त्यानंतर अशा अध्यक्षाचे किंवा उपाध्यक्षाचे अधिकारपद रिकामे झाले असल्याचे मानण्यात येईल:

[परंतु, जेथे महिलेसाठी राखीव असलेले अध्यक्षाचे पद एखादी महिला धारण करीत असेल तेथे, असा अविश्वासाचा ठराव, जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीमध्ये भाग घेण्याचा आणि मतदानाचा त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या, परिषद सदस्यांच्या एकूण संख्येपैकी तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमतानेच संमत करता येईल :]

[६][परंतु, आणखी असे की,] यथास्थिती, अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या निवडणूकीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत असा अविश्वासाचा कोणताही ठराव मांडण्यात येणार नाही.

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम १५ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ५ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५० अन्वये मूळ कलम ४९ या ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ (१) अन्वये पोट-कलम (१) व (२) दाखल करण्यात आले.

[५] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ५ (क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५ (ख) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४ द्वारे द्वारे "बहुमताने" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अशा विशेष बैठकीसाठी केलेल्या मागणीपत्रावर, जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्याचा व मतदान त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या, निवडून आलेल्या परिषद सदस्यांच्या एकूण संख्येच्या [१][दोन तृतीयांशापेक्षा] कमी नसतील इतक्या सदस्यांनी सह्या केलेल्या असतील व ते जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाधीन करण्यात येईल. मागणीपत्रांवर अशी मागणी करणाऱ्यांनी सह्या केलेल्या असतील व ते राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा रीतीने करण्यात येईल.]

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) खालील मागणीपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, जिल्हा परिषदेची विशेष बैठक बोलावील, बैठकीची नोटीस काढल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा उशीराची नसेल अशा दिनांकास, बैठक घेण्यात येईल.

(४) बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी किंवा याबाबतीत त्याच्याकडून प्राधिकृत करण्यात येईल असा, उपजिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसणारा अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी, अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल तेव्हा त्यास, जिल्हा परिषदेच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असताना अध्यक्षास जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा हक्क असणार नाही.

(५) या कलमाखाली बोलावण्यात आलेली बैठक कोणत्याही कारणासाठी, तहकूब करण्यात येणार नाही.

(६) ठरावाच्या बाजूने व ठरावाच्या विरुद्ध मतदान करणाऱ्या परिषद सदस्यांची नावे बैठकीत वाचण्यात येतील व कलम ११५, पोट-कलम (१३) खाली ठेवलेल्या कार्यवृत्त पुस्तकात ती नमूद करण्यात येतील.

[२][(७) अविश्वासाचा ठराव मांडण्यात आला नाही, किंवा यथास्थिति, फेटाळण्यात आला तर, पोट-कलम (३) अन्वये बोलावण्यात आलेल्या विशेष बैठकीच्या दिनांकापासून [३][[४]एक वर्षाच्या] कालावधीत अविश्वासाचा कोणताही नवीन ठराव जिल्हा परिषदेसमोर मांडता येणार नाही.]

**५०.** अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने आपली कर्तव्ये पार पाडीत असताना केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा हयगयीबद्दल किंवा आपले कर्तव्ये, पार पाडण्याच्या त्याच्या असमर्थतेबद्दल किंवा ते पार पाडण्यात त्याने सतत हेळसांड करण्याबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तनामुळे दोषी ठरण्याबद्दल राज्य शासनास कलम ४९ च्या तरतुदीस बाधा येऊ न देता अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास अधिकारपदावरून दूर करता येईल; आणि अशा रीतीने अधिकारपदावरून दूर करण्यात आलेला अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा परिषद सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष म्हणून पुन्हा निवडून येण्यास पात्र असणार नाही: (अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना अधिकार पदावरून दूर करणे.)

परंतु, अशा अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास आपले स्पष्टीकरण सादर करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय, त्यास अधिकारपदावरून दूर करता येणार नाही.

**५१.** याबाबत राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या अधीनतेने जो अध्यक्ष एका वर्षात एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी परवानगीशिवाय कामावर गैरहजर राहील तो अध्यक्ष म्हणून राहण्याचे बंद होईल. (अध्यक्ष, परवानगीशिवाय गैरहजर राहिल्याचा परिणाम.)

**५२.** (१) अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास अधिकारपदावरून दूर केल्यामुळे किंवा अन्यथा त्याचे अधिकारपद रिकामे झाले असता असे रिकामे अधिकारपद कलमे ४२ व ५० यांच्या तरतुदींच्या अधीनतेने शक्य तितके सोयीप्रमाणे नवीन अध्यक्षाची किंवा उपाध्यक्षाची निवडणूक करून भरण्यात येईल, [५][आणि ते पद रिक्त झाले नसते, तर ज्या व्यक्तीच्या जागी त्याला निवडून देण्यात आले असेल त्या व्यक्तीने ते पद जेवढ्या मुदतीकरिता धारण केले असते तेवढ्याच मुदतीकरिता ते पद धारण करील.] (अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची रिकामी झालेली अधिकार पदे भरणे.)

[१] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४ (२) द्वारे "एकपंचमांशापेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३(२) द्वारे मूळ पोट-कलम (७) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २(२) द्वारे "एक वर्षाच्या" या ऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ०६, याच्या कलम ३ अन्वये "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, कोणत्याही कारणामुळे अध्यक्ष व उपाध्यक्ष या दोघांचीही अधिकारपदे एकाच वेळी रिकामी झाल्यास [1][किंवा अध्यक्ष व उपाध्यक्ष एकाच वेळी रजेवर असल्यास] मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून निवडलेला विषय समितीचा सभापती हा, अध्यक्षाची निवडणूक होईपर्यंत [1][किंवा, यथास्थिती, अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष कामावर परत रुजू होईपर्यंत] अध्यक्षाच्या अधिकाराचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.

(२) पूर्वोक्त कारणांपैकी कोणत्याही कारणास्तव [2][अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची अधिकारपदे किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकाचे अधिकारपद रिकामे झाल्यास], अध्यक्षांच्या किंवा उपाध्यक्षांच्या निवडणुकीसाठी बैठक बोलावण्यास व अशा बैठकीत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीस कलम ४५ च्या तरतुदी शक्य तेथवर लागू होतील.

कार्यभार, नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्या स्वाधीन करण्यास नकार देण्याबद्दल शास्ती.

**५३.** (१) नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष निवडून आल्यानंतर, ज्याच्या जागेवर नवीन अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष निवडून आला असेल असा मावळता अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष आपल्या अधिकारपदाचा कार्यभार ताबडतोब अशा नवीन अध्यक्षाच्या किंवा, यथास्थिति, उपाध्यक्षाच्या स्वाधीन करील.

(२) मावळत्या अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने, पोट-कलम (१) खाली आवश्यक असल्याप्रमाणे कार्यभार स्वाधीन करण्यात कसूर केल्यास किंवा तसे करण्यास नकार दिल्यास राज्य शासनास किंवा राज्य शासनाने या बाबतीत अधिकार दिलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास, लेखी आदेशाद्वारे, यथास्थिति अशा अध्यक्षास किंवा उपाध्यक्षास आपल्या अधिकारपदाचा कार्यभार आणि असा अध्यक्ष किं . उपाध्यक्ष म्हणून त्याच्या कब्जात असलेली जिल्हा परिषदेची सर्व कागदपत्रे व कोणतीही मालमत्ता, असल्यास ती, ताबडतोब नवीन अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या स्वाधीन करण्याबाबत निदेश देता येईल.

(३) ज्यास पोट-कलम (२) खाली निदेश दिला आहे अशा मावळत्या अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने अशा निदेशाचे पालन न केल्यास, राज्य शासनास, अशा अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या कब्जात असलेली जिल्हा परिषदेची कोणतीही कागदपत्रे व मालमत्ता असल्यास ती सर्व कागदपत्रे व मालमत्ता परत घेण्यासाठी उपाययोजना करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी त्यास झडतीचे अधिपत्र काढण्यासाठी व फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, * प्रकरण सात, याच्या तरतुदीन्वये दंडाधिकारी कायदेशीर रीत्या ज्या कोणत्याही अधिकारांचा वापर करील अशा सर्व अधिकारांचा त्या संबंधात वापर करण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. अशा रीतीने परत घेतलेली कागदपत्रे व मालमत्ता ही यथास्थिती, नवीन अध्यक्षाच्या किंवा उपाध्यक्षाच्या स्वाधीन करण्यात येतील. १८९८ चा ५.

(४) ज्यास पोट-कलम (२) खाली निदेश देण्यात आला आहे अशा मावळत्या अध्यक्षाने किंवा उपाध्यक्षाने, त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांवरून असेल ते खेरीज करून एरव्ही अशा निदेशाचे पालन न केल्यास, त्यास, अपराधसिध्दीनंतर एक महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या कालावधीच्या साध्या कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

अध्यक्षाचे अधिकार व त्यांची कार्ये

**५४.** (१) अध्यक्ष,—

(क) जिल्हा परिषदेच्या बैठकी बोलावील ; त्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील आणि, त्या बैठकीचे कामकाज चालवील ;

(ख) जिल्हा परिषदेचे अभिलेख पाहू शकेल ;

---

१ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ८, याच्या कलम ३ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, याच्या कलम ११ अन्वये " अध्यक्षाचे अधिकारपद रिकामे होईल किंवा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची अधिकारपदे एकाचवेळी रिकामी होतील तेव्हा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* आता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (सन १९७४ चा महाराष्ट्र २) पहा.

(ग) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली त्याच्यावर लादण्यात आलेली सर्व कर्तव्ये पार पाडील व देण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करील ;

(घ) जिल्हा परिषदेच्या वित्तीय व कार्यपालनविषयक कारभारावर लक्ष ठेवील आणि त्यासंबंधातील ज्या प्रश्नाबाबत जिल्हा परिषदेचे आदेश आवश्यक आहेत असे त्यास वाटेल ते सर्व प्रश्न जिल्हा परिषदेसमोर सादर करील ; आणि

(ङ) जिल्हा परिषदेचे, किंवा स्थायी समितीचे, किंवा कोणत्याही विषय समितीचे, किंवा कोणत्याही पंचायत समितीचे ठराव किंवा निर्णय यांच्या अंमलबजावणीची खात्री करून घेण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर प्रशासनिक पर्यवेक्षण करील व त्यावर प्रशासनिक नियंत्रण ठेवील.

(२) अध्यक्षास, आणीबाणीच्या प्रसंगी ज्यास जिल्हा परिषदेची किंवा तिच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याची मंजुरी मिळणे आवश्यक आहे व जे तावडतोब पार पाडणे किंवा करणे लोकांच्या किंवा सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याच्या मते आवश्यक आहे असे कोणतेही काम पार पाडण्याविषयी किंवा ते निलंबित करण्याविषयी किंवा थांबविण्याविषयी किंवा अशी कोणतीही कृती करण्याविषयी निदेश देता येतील आणि असे काम पार पाडण्यास किंवा अशी कृती करण्यास येणारा खर्च जिल्हा निधीतून देण्यात यावा असा निदेश देता येईल.

[१][(३) जे कोणतेही काम किंवा कोणतीही विकास परियोजना पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजात त्यासंबंधात कोणतीही तरतूद अस्तित्वात नसेल, असे कोणतेही काम किंवा विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा सुस्थितीत देण्याचे काम, राज्य शासनाने, या अधिनियमान्वये किंवा त्याखाली कोणत्याही जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केले असेल किंवा सोपविले असेल तर, अध्यक्षास, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी परियोजना किंवा काम पार पाडण्यासाठी किंवा सुस्थितीत ठेवण्यासाठी निदेश देता येईल ; तसेच, या बाबतीतील खर्च जिल्हा निधीतून देण्यात येईल असा निदेश देता येईल.]

[२][(४) अध्यक्ष] या कलमाखाली केलेली कारवाई आणि त्याबाबतची सर्व कारणे जिल्हा परिषदेस, स्थायी समितीस आणि समुचित विषय समितीस, त्यांच्या पुढील बैठकीच्या वेळी तावडतोब [२][कळवील] आणि अध्यक्षाने दिलेला निदेश जिल्हा परिषदेस किंवा समितीस सुधारता येईल किंवा तो निर्भावित करता येईल.

५५. उपाध्यक्ष.— उपाध्यक्षाची कार्ये

(क) अध्यक्षाच्या गैरहजेरीत जिल्हा परिषदेच्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील ;

(ख) अध्यक्षाच्या अधिकारांपैकी व कर्तव्यांपैकी जे अधिकार व जी कर्तव्ये अध्यक्ष राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांच्या अधीनतेने, लेखी आदेशाद्वारे वेळोवेळी त्याच्याकडे सोपवील त्या अधिकारांचा वापर करील व ती कर्तव्ये पार पाडील ; आणि

(ग) अध्यक्षाची निवडणूक होईपर्यंत किंवा [३][अध्यक्ष जिल्ह्याबाहेर गेल्यामुळे किंवा तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत रजेवर असल्यामुळे] तो अनुपस्थित असताना अध्यक्षांच्या अधिकारांचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.

## प्रकरण तीन

## पंचायत समित्यांची रचना करणे

५६. प्रत्येक गटासाठी एक पंचायत समिती असेल, आणि या अधिनियमान्वये किंवा अन्यथा तिच्यामध्ये निहित केलेली असतील अशी सर्व कार्ये ही पंचायत समितीची कार्ये असतील. पंचायत समित्यांची स्थापना.

---

१ सन १९६६ च्या महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४, कलम ३ (१) अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

२ वरील अधिनियमाच्या कलम ३ (२) अन्वये "परंतु" "या कलमान्वये केलेली उपाययोजना व याबाबतची सर्व कारणे त्याने" "व" "कळविली पाहिजे" या मजकुराऐवजी अनुक्रमे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९६३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ कलम १७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

पंचायत समित्यांची रचना करणे.

५७. [1][(१) प्रत्येक पंचायत समितीमध्ये, कलम ५८ आणि त्याबाबतीतील नियम यात अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार प्रत्येक निर्वाचक गणामधून प्रत्येकी एक याप्रमाणे प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडलेल्या सदस्यांचा समावेश असेल :

परंतु पंचायत समितीच्या प्रादेशीक क्षेत्राची लोकसंख्या आणि अशा पंचायत समितीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांची संख्या यामधील गुणोत्तर व्यवहार्य असेल तेथवर संपूर्ण राज्यामध्ये सारखेच असेल ]

[2][ [3][ * * *]

[4][(३) (अ) [5][सार्वत्रिक निवडणुकीमध्ये, पोट-कलम (१) [6][* * *] खाली येणाऱ्या सदस्यांच्या संख्येच्या दोन तृतीयांश किंवा त्याहून अधिक सदस्यांची निवड झाल्यानंतर राज्य शासन विहित करील अशावेळी व अशा रीतीने [7][ राज्य निवडणूक आयोग ] या सदस्यांची नावे, त्यांच्या कायम पत्यासह, प्रसिध्द करील; आणि अशा प्रसिध्दीनंतर पंचायत समितीची रीतसर रचना झाली असल्याचे मानण्यात येईल.] दोन-तृतीयांश सदस्यांची संख्या ठरविताना, अपूर्णांक दुर्लक्षित करण्यात येईल. ]

परंतु, अशा प्रसिध्दीमुळे —

(एक) कोणत्याही गटातील निवडणुकीचे काम पूर्ण करण्यास [8][ आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे व त्यांचे कायम पत्ते, जसजसे उपलब्ध होतील त्याप्रमाणे [7][ राज्य निवडणूक आयोगाकडून] तशाच रीतीने प्रसिध्द करण्यास ] प्रतिबंध होतो ; [8][ किंवा ]

( दोन ) या अधिनियमाखाली पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीवर त्याचा परिणाम होतो, असे मानले जाणार नाही.

[9]* * * * * *

[10]* * * * * *

(५) गट विकास अधिकारी हा पंचायत समितीचा पदसिध्द सचिव असेल.

[13][निर्वाचक गण] निरर्हता, निवडणुका आणि निवडणूक-विषयक विवाद यांच्या संबंधातील तरतुदी.

५८. [11][(१) कलम ५७, पोट-कलम (१) [12][* * *] अन्वये निवडणुका घेण्याच्या प्रयोजनार्थ,

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५२ (१) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (१) हे दाखल करण्यात आले.

[2] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ४ द्वारे पोट-कलमे (२) व (२क) घालण्यात आली.

[3] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ४ द्वारे पोट-कलमे (२) व (२क) वगळण्यात आली.

[4] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[5] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ५ (अ) "अन्वये कलेक्टरने पोट-कलम (१), खंड (फ) खाली येणाऱ्या सदस्यांची नावे" या शब्दांनी सुरु होणाऱ्या आणि "समजले पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[6] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५२ (२) (ब) द्वारे "च्या खंड" (फ) हा मजकूर वगळण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या क्रमांक ५२ (२) (अ) द्वारे "जिल्हाधिकारी ऐवजी" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ५ (अ) द्वारे "केव्हा" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ५२ (२) (क) द्वारे उपखंड (ब) वगळण्यात आला.

[10] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ९३ (२) द्वारे पोट-कलम (४) वगळण्यात आले.

[11] वरील अधिनियमाच्या कलम १३ (१) द्वारे पोट-कलम (१) ऐवजी पोट-कलम दाखल करण्यात आले.

[12] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५३ (१) (अ) "खंड (फ)" हा मजकूर वगळण्यात आला.

[13] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५० कलम ५० (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[1][(क) [2][ राज्य निवडणूक आयोगांकडून, त्या गटातील प्रत्येक निवडणूक विभागाची दोन निर्वाचक गणांमध्ये विभागणी करण्यात येईल, तथापि, असे निर्वाचक गण अशा पध्दतीने विभागण्यात येतील की, प्रत्येक निर्वाचक गणाची लोकसंख्या ] आणि पंचायत समितीसाठी निवडून द्यावयाच्या सदस्यांची एकूण संख्या, यांमधील गुणोत्तर व्यवहार्य असेल तेथवर, पंचायत समितीच्या संपूर्ण क्षेत्रात सारखेच असेल. ]

[3]* * * * *

[4][(१क)] कलम ५३, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली आणि [5][ राज्य निवडणूक आयोग ] निर्वाचक गणांत अंतर्भूत करण्यात आलेल्या निवडणूक विभागाच्या भागासाठी, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत अधिसूचित करील अशा दिनांकास अमलात असेल अशी, अशा प्रत्येक निवडणूक विभागाची मतदार यादी ही अशा निर्वाचक गणाची मतदार यादी असेल. [6][ राज्य निवडणूक आयोगाने ] पदनिर्देशित केलेला अधिकारी प्रत्येक निर्वाचक गणासाठी मतदार यादी ठेवील.

[7][ (१ख) (क) पंचायत समितीमधील, निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांमध्ये, राज्य निवडणूक आयोग विहित रीतीने निर्धारित करील त्याप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील व्यक्तींसाठी आणि स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागा असतील ;

(ख) पंचायत समितीमध्ये अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जमातींच्या व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांचे, त्या पंचायत समितीमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, त्या पंचायत समिती क्षेत्रातील अनुसूचित जातींच्या किंवा, यथास्थिति, अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल आणि अशा जागा पंचायत समितीमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील:

[8][ परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायत समितीमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाच्या जागा ह्या, त्या पंचायत समितीमधील जागांच्या एकूण संख्येच्या एक-द्वितीयांशापेक्षा कमी असणार नाहीत :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या पंचायत समितीमधील अनुसूचित जमातीसाठीच्या राखीव जागा ह्या, खंड (ख) च्या तरतुदींनुसार असतील : ]

[9][ परंतु तसेच ], अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश जागा अनुसूचित जातींच्या किंवा, यथास्थिति, अनुसूचित जमातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील :

(ग) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागा, पंचायत समितीमधील निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या २७ टक्क्यांइतक्या असतील आणि अशा जागा पंचायत समितीमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील :

[10][ परंतु, संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायत समितीमध्ये अनुसूचित जमाती व अनुसूचित जाती यांच्याकरिता जागा राखून ठेवल्यानंतर उर्वरित जागांपैकी (कोणत्याही असल्यास) २७ टक्के जागा या नागरिकांच्या मागासवर्गाच्या व्यक्तींकरिता राखून ठेवण्यात येतील :

परंतु आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या पंचायत समितीमध्ये नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील;

[11][ परंतु, तसेच] अशा रीतीने राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांश जागा नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील;

---

[1] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १० (अ) द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५३ (१) (ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५३ (१) द्वारे खंड (अ अ), (अ-अ१), खंड (अ-ब) व खंड (अ-क) वगळण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या खंड ५३ (ड) द्वारे खंड (ब) ला (१अ) असा नवा क्रमांक देण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या खंड (ड) (एक) द्वारे "राज्य शासन" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ५३ (१) (ड) (दोन) द्वारे "जिल्हाधिकाऱ्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५३ (२) द्वारे पोट-कलमे (१-क),(१-ख) व (१-ग) समाविष्ट करण्यात आली.

[8] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २०, कलम ५ (अ)(एक) द्वारे ही परंतुके समाविष्ट करण्यात आली.

[9] वरील अधिनियमाच्या कलम ५ (अ) (दोन) द्वारे "परंतु" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[10] वरील अधिनियमाच्या कलम (ब) (एक) द्वारे ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[11] वरील अधिनियमाच्या कलम (ब) (दोन) द्वारे "परंतु" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(घ) पंचायत समितीमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्गाचा प्रवर्ग मधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांसह). एक तृतीयांश जागा स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि अशा जागा पंचायत समितीमधील वेगवेगळ्या निर्वाचक गणांना आळीपाळीने नेमून देण्यात येतील.

(१ग) पोट-कलम (१ख) अन्वये करावयाचे जागांचे आरक्षण ( स्त्रियांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त इतर), हे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर अमलात असण्याचे बंद होईल.

(१घ) पंचायत समितीची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक पुढील कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येईल, —

(क) कलम ५९ च्या पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी ;

(ख) विसर्जन करण्यात आलेल्या पंचायत समितीच्या बाबतीत, तिच्या विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्याचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी :

परंतु, विसर्जित पंचायत समिती, ज्यामध्ये चालू राहिली असती तो उर्वरित कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असेल त्या बाबतीत, अशा कालावधीसाठी पंचायत समितीची रचना करण्याकरिता या खंडान्वये कोणतीही निवडणूक घेणे आवश्यक असणार नाही;

(ग) कलम २७ चे पोट-कलम (२) आणि कलम ५८ चे पोट-कलम (२) यांअन्वये नवीन निवडणूक घेण्याची आवश्यकता असेल त्या बाबतीत, राज्य निवडणूक आयोगाकडून निश्चित करण्यात येईल अशा, व्यवहार्य असेल तितक्या लवकरच्या दिनांकाला. ]

[१][१(ड)] निवडणुकीचा दिनांक, निवडून येण्यास आवश्यक असलेली अर्हता आणि निरर्हता, आणि जिल्हा परिषदेच्या परिषद सदस्यांचा निवडणुकीतील मतदानाचा अधिकार यासंबंधातील कलमे १४,१५,१५-क,१६,१७ आणि १८ यांच्या तरतुदी, जिल्हा परिषदेच्या परिषद सदस्यांच्या बाबतीत त्या जशा लागू हातात त्याचप्रमाणे पुढील फेरबदलांसह पंचायत समितीच्या सदस्यांच्या बाबतीत लागू होतील —

(क) कलम १५ मध्ये, "निवडणूक विभागाच्या" आणि "निवडणूक विभागातून" या मजकुराऐवजी " निर्वाचक गणाच्या" आणि "निर्वाचक गणातून" हा मजकूर आणि "जिल्ह्याचा" व "जिल्ह्यातून" या मजकुराऐवजी "गटातील" व "गटाच्या" हा मजकूर दाखल करण्यात येईल.]

(ख) कलम १६ मध्ये, पोट-कलम (१) च्या खंड (घ) मध्ये "३९" या आकड्याऐवजी "६१" हा आकडा दाखल करण्यात येईल .

(ग) कलम १७ मध्ये "निवडणूक विभाग" हा शब्द जेथे जेथे आला असेल तेथे तेथे "निर्वाचक गण" हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह लागू करण्यात येईल.]

(२) निवडणुका आणि निवडणुकांच्या संबंधातील विवाद या संबंधीची कलमे [२][ १९ ते २७, २७क व २८] (दोन्ही धरुन) आणि [३][ २८क ते २८घ (दोन्ही धरुन) ] २९ ते ३३ (दोन्ही धरुन), ३३ क व ३४ ते ३७ (दोन्ही धरुन) आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांच्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह [४][ कलम ५७, पोट-कलम (१), [५][ * * * ] खालील सदस्यांच्या निवडणुकीच्या संबंधात ] लागू होतील.

[६][ [७][ * * * ] ]

[८]["५८क. सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदानाची रीत करण्यात येईल आणि बदली व्यक्तीद्वारे कोणतीही मते स्वीकारण्यात येणार नाहीत."]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५३ (३) द्वारे पोट-कलम (१क) ला (१ड) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५३(४) (अ) द्वारे कलमे १९ ते २८ याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम १९(४) द्वारे "२७ ते ३७" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ५ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५३ (४) (ब) द्वारे "खंड (फ)" हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ५ द्वारे हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[७] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५ द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[८] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम ६ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[१][५९. (१) या अधिनियमामध्ये अन्य प्रकारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत पंचायत समितीच्या सदस्यांचा पदावधी, पंचायत समितीच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून सुरु होणारी पाच वर्षे, इतका असेल. पंचायत समितीच्या सदस्यांचा पदावधी.

[२][[३][* * * ]]

(२) पंचायत समितीची पोट-कलम (१) खालील मुदत समाप्त होण्यापूर्वी तिचे विसर्जन झाल्यानंतर रचना करण्यात आलेल्या पंचायत समितीचे सदस्य, त्या पंचायत समितीचे अशा प्रकारे विसर्जन करण्यात आले नसते तर तिचे सदस्य पोट-कलम (१) अन्वये उरलेल्या ज्या कालावधीपर्यंत (पदावर) असण्याचे चालू राहिले असते, तेवढ्याच कलावधीपर्यंत ( पदावर ) असण्याचे चालू राहतील.

(३) पंचायत समितीची पहिली बैठक जिल्हाधिकारी किंवा यासंबंधात जिल्हाधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला अधिकारी कलम ५७, पोट-कलम (३) अन्वये सदस्यांची नावे प्रसिध्द करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांद्वारे निश्चित करील अशा दिनांकाला घेण्यात येईल; आणि असा दिनांक, —

(क) सार्वत्रिक निवडणुकीनंतर होणाऱ्या पहिल्या बैठकीच्या बाबतीत मावळत्या सदस्यांचा पदावधी समाप्त होण्याच्या दिनांकाच्या लगतनंतरच्या दिवसापेक्षा उशिराची असणार नाही ;

(ख) पंचायत समितीच्या विसर्जनानंतर घेण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत पंचायत समितीच्या विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी समाप्त होण्याच्या दिनांकापेक्षा उशीराचा असणार नाही.]

६०. [४][ * * * ] पंचायत समितीचा कोणताही सदस्य, सभापतीस संबोधून आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देईल आणि सभापती [५][ अध्यक्षाला संबोधून ] आपल्या पंचायत समितीचा सदस्य या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देईल. [६][ आणि त्यानंतर त्या सदस्याचे पद रिक्त होईल. ] [६][ राजीनाम्याची नोटीस विहित केलेल्या रीतीने सुपूर्द करण्यात येईल. ] पंचायत समितीचा सदस्य म्हणून राजीनामा देणे.

६१. पंचायत समितीचा कोणताही सदस्य आपली कर्तव्ये बजावीत असताना गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा लज्जास्पद वर्तनाबद्दल दोषी असेल किंवा पंचायत समितीचा सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला असेल तर राज्य शासनास, त्यास तसे करणे योग्य वाटल्यास उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या [७][ सदस्यांपैकी दोनतृतीयांशांपेक्षा कमी नाहीत इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिला असेल अशा पंचायत समितीच्या ] शिफारशीवरुन [८][ * * * ] अशा सदस्यांस अधिकार पदावरुन दूर करता येईल. गैरवर्तणुकीमुळे सदस्यास अधिकार – पदावरुन दूर करणे.

परंतु —

[९] * * * * *

(ख) अशा कोणत्याही सदस्याला आपले स्पष्टीकरण सादर करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज अधिकारपदावरुन दूर करण्यात येणार नाही.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ५४ द्वारे मूळ कलम ५९ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ कलम ६ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ६ द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५५ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २० द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ९ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[७] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ९ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५६ (१) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ५६ (२) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

पंचायत समितीच्या सदस्याची निरर्हता.

६२. (१) [1][ * * * ] पंचायत समितीचा कोणताही सदस्य आपल्या पदावधीमध्ये,—

(क) कलम ६८ अन्वये निरर्ह झाला; किंवा

(ख) पंचायत समितीच्या परवानगीवाचून, तिच्या बैठकींना लागोपाठ तीन महिन्यांच्या कालावधीसाठी (पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती यांच्या बाबतीत त्यांना रीतसर मंजूर केलेल्या रजेचा कालावधी वगळून ) गैरहजर असेल. [2][ किंवा अशा बैठकींना लागोपाठ सहा महिन्यांच्या कालावधीसाठी गैरहजर असेल. ]

तर अशा सदस्याचे अधिकार पद रिकामे होईल.

[3] * * * * *

[4][ (३) या कलमाखाली सदस्याचे एखादे अधिकारपद रिकामे झाले आहे किंवा कसे असा कोणताही प्रश्न आयुक्ताने स्वतः होऊन किंवा कोणत्याही व्यक्तीने त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून उपस्थित केल्यास आयुक्त [5][ शक्य असेल तेथवर ] असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत त्या प्रश्नाचा निर्णय करील व त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल. आयुक्त त्या प्रश्नाचा निर्णय करीपर्यंत त्या सदस्याला पंचायत समितीचा सदस्य म्हणून पदावर राहण्यास निःसमर्थ करण्यात येणार नाही;

परंतु, आयुक्त, कोणत्याही सदस्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय, त्याच्याविरुध्द या पोट-कलमाखाली कोणताही आदेश देणार नाही ].

नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात.

६३. पंचायत समितीचा एखादा सदस्य, आपला पदावधी संपण्यापूर्वी मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास निरर्ह ठरवल्यामुळे किंवा त्यास अधिकारपदावरून दूर करण्यात आल्यामुळे किंवा तो कार्य करण्यास असमर्थ झाल्यामुळे किंवा अन्यथा एखादी जागा रिकामी झाली असेल तर त्या प्रसंगी [6][ गटविकास अधिकारी ] ही घटना [7][ राज्य निवडणूक आयोगाला [8][ [9][ * * * ] ] ताबडतोब कळवील आणि अशी रिकामी जागा सोयीचे होईल तितक्या लवकरात लवकर, एखाद्या व्यक्तीची निवड करुन] भरील आणि ती व्यक्ती ज्या सदस्यांच्या जागी तिला निवडण्यात आले असेल [10][ * * * ]

त्या सदस्याने ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण केले असते त्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करील.

परंतु —कलम ५७ यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशी जागा सदस्यांचा पदावधी ज्या दिनांकास समाप्त होईल त्या दिनांकाच्या आधीच्या सहा महिन्यांमध्ये रिकामी झाली असेल तर ती भरण्यात येणार नाही;

[11] * * * * * * * * *

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५७ (१) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५(अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५७ (२) द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले

[4] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम २१ द्वारे मूळ पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[5] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १० द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६ द्वारे "सभापतीने" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५८(१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ७ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला

[10] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५८ (२) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[11] वरील अधिनियमाच्या कलम ५८ (३) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

६४. [1][ (१) पोट-कलम (४) च्या तरतुदींना अधीन राहून प्रत्येक पंचायत समितीच्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेला सभापती हा त्या पंचायत समितीच्या अध्यक्षपदी असेल.] पंचायत समितीचा सभापती व उप सभापती यांची निवडणूक.

(२) [2][[3] [पोट-कलम] (४) च्या तरतुदींना अधीन राहून पंचायत समिती] आपल्या सदस्यांपैकी [4][ * * * ] एकाची उप सभापती म्हणून निवड करील.

[5] * * * * * * * * * * * * * * *

[6] * * * * * * * * * * * * * * *

(४) पंचायत समितीचा कोणताही सदस्य, एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांचा सभापती असेल तर सभापती किंवा उप सभापती म्हणून निवडून येण्यास पात्र असणार नाही, आणि एकापेक्षा अधिक सहकारी संस्थांचा सभापती म्हणून एखादा सभापती किंवा उप सभापती निवडून आल्यास पंचायत समितीच्या, यथास्थिति, सभापतीचे किंवा उप सभापतीचे अधिकारपद ज्या दिनांकाला तो अशा रीतीने निवडून आला असेल त्या दिनांकाला, रिक्त होईल.]

[7] * * * * * * * * * * *

[8][६५. या अधिनियमात अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीजकरून, पंचायत समितीच्या सभापती व उप सभापती पदांच्या पदावधीसंबंधी कलम ४३ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.] पंचायत समितीचा सभापती व उप सभापती यांचा पदावधी.

६७. [10][ (१) प्रत्येक पंचायत समितीच्या कलम ५९ पोट-कलम (३) च्या तरतुदीनुसार घेतलेल्या पहिल्या बैठकीमध्ये, तिच्या निवडून आलेल्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडून दिलेला सभापती त्या पंचायत समितीच्या अध्यक्षपदी असेल.] पंचायत समितीच्या सभापतीच्या निवडणुकीची कार्यपद्धती.

(२) पोट-कलम (१) खाली निवडून देण्यात आलेल्या सभापतीस, कलम ११ पोट-कलम (२) खाली बोलावण्यात आलेल्या परिषदेच्या पहिल्या बैठकीला पदसिध्द परिषद सदस्य म्हणून हजर राहण्याचा हक्क असेल आणि त्यानंतर शक्य तितक्या लवकर तो [11][मावळत्या] सभापतीकडून पंचायत समितीच्या सभापती पदाचा कार्यभार स्वतःकडे घेईल.

(३) [12][ पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या ] बैठकीचे अध्यक्षपद जिल्हाधिकारी किंवा त्याने [13][कलम ५९ च्या पोट-कलम (३) द्वारे] प्राधिकृत केलेला अधिकारी धारण करील. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी बैठकीच्या अध्यक्षपदी असेल तेव्हा त्यास पंचायत समितीच्या सभापतीस पंचायत समितीच्या अध्यक्षपदी असताना जो अधिकार असतील तेच अधिकार असतील मात्र त्यास मतदानाचा अधिकार असणार नाही :

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५९(१) द्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १५(२) द्वारे "पंचायत समिती" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५९(२) (अ) द्वारे "पोट-कलमे (३) व" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम (५९ (२) (ब) द्वारे मजकूर व कंस वगळण्यात आला.

[5] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १५(अ) द्वारे पोट कलमे (३) व (४) वगळण्यात आली.

[6] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५९(अ) द्वारे पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ५९ (४) द्वारे हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[8] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५ द्वारे हे कलम दाखल करण्यात आले.

[9] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६० द्वारे कलम ६६ वगळण्यात आले.

[10] वरील अधिनियमाच्या कलम ६१ (१) द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[11] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २१, (१) अन्वये "निवृत्त होणाऱ्या" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[12] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ६१(५) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[13] वरील अधिनियमाच्या कलम ६१ (१) ब द्वारे "पूर्वोक्तप्रमाणे" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, कलम ११८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास किंवा अशा अधिकाऱ्यास [१][त्याच्या मते पुरेशी असतील अशी कारणे लेखी नमूद करून अशी बैठक तहकूब करण्यास यथास्थिती नकार देता येईल किंवा अशी बैठक तहकूब करता येईल.]

(४) सभापतीच्या निवडणुकीत समसमान मते पडल्यास, निवडणुकीचा निकाल, जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा अध्यक्षपदी असणाऱ्या अधिकाऱ्याच्या समक्ष चिठ्ठ्या टाकून तो निर्धारित करील त्या रीतीने निर्णित करण्यात येईल.

[२][ (५) पंचायत समित्यांमधील सभापतींच्या पदांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांच्या मागासवर्गाचा प्रवर्ग यांमधील व्यक्ती व स्त्रिया यांच्यासाठी पुढीलप्रमाणे आरक्षण करण्यात येईल:-

(क) पंचायत समित्यांमध्ये अनुसूचित जातींसाठी व अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवावयाच्या सभापती पदाच्या संख्येचे, पंचायत समित्यांमधील अशा पदांच्या एकूण संख्येशी असणारे प्रमाण, जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, राज्यातील अनुसूचित जातींच्या किंवा राज्यातील अनुसूचित जमातींच्या [३][संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायत समितीतील अनुसूचित जमातींची लोकसंख्या वगळून] लोकसंख्येचे राज्यातील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल :

[४][परंतु —संपूर्णतः अनुसूचित क्षेत्रे समाविष्ट असलेल्या पंचायत समितीच्या सभापतीचे पद हे केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींकरीता राखून ठेवण्यात येईल :-

परंतु, आणखी असे की, केवळ अंशतः अनुसूचित क्षेत्रांमध्ये येणाऱ्या पंचायत समितीच्या सभापतीचे पद हे खंड (क) च्या तरतुदींनुसार केवळ अनुसूचित जमातींमधील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात येईल;].

[५][परंतु तसेच] अशा रीतीने राखून ठेवलेल्या पदांच्या एकूण संख्येच्या एक तृतियांश पदे अनुसूचित जातींच्या किंवा यथास्थिती, अनुसूचित जमातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

[६][परंतु असेही की, जेथे अनुसूचित जमातींची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक आहे अशा अनुसूचित क्षेत्रांमधील पंचायत समितीमध्ये, सभापतीचे पद हे केवळ अनुसूचित जमातीच्या व्यक्तींकरिता राखून ठेवण्यात येईल.]

(ख) नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाची सभापतीची पदे पंचायत समित्यांमधील अशा पदांच्या एकूण संख्येच्या २७ टक्के इतकी असतील ;

परंतु, अशा रीतीने राखून ठेवलेल्या पदाच्या एक तृतियांश पदे नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ग) पंचायत समित्यांमधील सभापती पदाच्या एकूण संख्येच्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या मागासवर्गाच्या प्रवर्ग यामधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या पदांची संख्या धरुन) एक तृतीयांश पदे स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(६) पोट-कलम (५) चे खंड (क), (ख) किंवा (ग) अन्वये राखून ठेवलेल्या पदांची संख्या फक्त दोन असेल त्या बाबतीत, त्या दोन पदांपैकी एक पद त्या खंडामध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही आरक्षणातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येईल ;

(७) पूर्वोक्तप्रमाणे राखून ठेवलेल्या पदांची संख्या वेगवेगळ्या पंचायत समित्यांना विहित रीतीने आळीपाळीने नेमून देण्यात येईल.

(८) सभापतीच्या पदांचे आरक्षण (स्त्रियांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त अन्य), भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यानंतर अमलात असण्याचे बंद होईल.]

उप सभापतीची निवडणूक. [७][६८. प्रत्येक पंचायत समितीमध्ये पंचायत समितीच्या सदस्यांनी कलम ६७ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्देश करण्यात आलेल्या बैठकीत सभापतीची निवड झाल्यानंतर ताबडतोब, त्यांच्यामधून निवडून दिलेला एक उप सभापती असेल.]

---

[१] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २३ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६१ (३) द्वारे (५), (६), (७) व (८) ही पोट-कलमे मूळ पोट-कलमाऐवजी दाखल करण्यात आली.

[३] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ६ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) द्वारे ही परंतुके समाविष्ट करण्यात आली.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६ (क) द्वारे परंतु ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, याच्या कलम ६ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ६२ द्वारे मूळ कलमाऐवजी हे कलम ६८ दाखल करण्यात आले.

सभापती किंवा उप सभापती यांच्या निवडणुकीच्या विधीग्राह्यतेच्या संबधातील विवादावर निर्णय देण्याचा आयुक्ताचा अधिकार

[1][६८-क. सभापती किंवा उप सभापती यांच्या निवडणुकीच्या विधीग्राह्यतेच्या संबंधात विवाद उपस्थित झाल्यास, त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास किंवा [2][* * *] कोणत्याही सदस्यास तो विवाद निवडणुकीच्या दिनांकापासून तीस दिवसाच्या आत आयुक्ताकडे निर्णयासाठी निर्देशित करता येईल. आयुक्तांच्या निर्णयाविरुद्ध करावयाचे अपील अशा निर्णयाच्या दिनांकापासुन तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे दाखल करता येईल.]

पंचायत समितीचा सभापती व उप सभापती यांना मानधन व भत्ता देणे.

६९. (१) कलम ७० च्या तरतुदींना अधीन राहून, पंचायत समितीच्या सभापतीस व उप सभापतीस, दरमहा, अनुक्रमे [3][ तीन हजार रुपये व एक हजार पाचशे रुपये ] मानधन देण्यात येईल.

(२) [4][ सभापतीसाठी, भाडे न देता सुसज्ज निवासस्थानाची सोय करुन देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन या बाबतीत जे नियम करील अशा नियमांना अधीन राहून जिल्हा परिषदेस योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता त्यास देता येईल] आणि तसेच, राज्य शासन विहित करील असा प्रवास भत्ता व इतर भत्ते सभापती व उप सभापती यांना देता येतील.

(३) सभापती व उप सभापती यांना या कलमाखाली मासिक मानधन किंवा कोणतेही भत्ते किंवा सुखसोयी मिळतात याच केवळ कारणावरुन ते परिषद सदस्य किंवा पंचायत समितीचे सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा असा परिषद सदस्य अथवा सदस्य होण्यास निरर्ह ठरविले जाणार नाहीत.

(४) सभापती व उप सभापती आपल्या अधिकारपदाच्या कर्तव्यासाठी पुरेसा वेळ देईल व त्याकडे पुरेसे लक्ष देईल.

पंचायत समितीचे सभापती व उप सभापती यांना अनुपस्थिती रजा देणे व परिणामरूप तरतुदी.

७०. (१) [5][पंचायत समितीच्या सभापतीस किंवा उप सभापतीस वर्षातून एकूण तीस दिवस परवानगीशिवाय गैरहजर राहता येईल आणि त्यास तीस दिवसाहून अधिक कालावधीसाठी परंतु वर्षातून एकूण नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतकी अनुपस्थिती रजा पंचायत समिती मंजूर करू शकेल आणि नव्वद दिवसांहून अधिक अशा कोणत्याही कालावधीची अनुपस्थिती रजा स्थायी समिती मंजूर करू शकेल] परंतु कोणत्याही एका वर्षात एकशेऐंशी दिवसांपेक्षा अधिक अशी कोणतीही रजा मंजूर करता येणार नाही :

[6][परंतु, सभापती आणि उप सभापती एकाचवेळी रजेवर असतील तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल अशा रीतीने चिठ्ठया टाकून निवडलेल्या विषय समितीचा सभापती, यथास्थिती, समितीचा सभापती किंवा उप सभापती कामावर रूजू होईपर्यंत सभापतीच्या अधिकाराचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.]

(२) सभापतीस किंवा उप सभापतीस, पोट-कलम (१) अन्वये एका वर्षात तीस दिवसांहून अधिक होणाऱ्या अनुपस्थितीच्या कालावधीमध्ये कोणतेही मानधन मिळण्याचा हक्क असणार नाही.

---

[1] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम २४ द्वारे कलम ६८(क) दाखल करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "एक हजार रुपये व आठशे रुपये" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ४ द्वारे हा मजकूर नेहमीकरता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

[5] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २५ द्वारे "समितीच्या सभापतीस" या शब्दांनी सुरु होणाऱ्या व "रजा देण्याचा अधिकार असेल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ५ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

कार्यभार नवीन सभापती किंवा उप सभापती याच्या स्वाधीन करण्यास नकार देण्याबद्दल शास्ती.

[1][(७५क.) (१) नवीन सभापती किंवा उप सभापती निवडून आल्यानंतर, ज्याच्या जागेवर नवीन सभापती निवडून आला असेल असा मावळता सभापती [2][कलम ७५, पोट-कलम (१) खाली येणाऱ्या प्रकरणांच्या संबंधात नवीन सभापतीकडे ताबडतोब आणि इतर कोणत्याही प्रकरणात] कलम ६७ चे पोट-कलम (२) यात निर्देश केलेल्या परिषदेच्या पहिल्या बैठकीनंतर शक्य तितक्या लवकर आपल्या अधिकारपदाचा कार्यभार नवीन सभापतीच्या स्वाधीन करील आणि उप सभापती आपल्या अधिकार पदाचा कार्यभार ताबडतोब अशा नवीन सभापतीच्या स्वाधीन करील.

(२) मावळत्या सभापतीने किंवा उप सभापतीने पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आपल्या अधिकारपदाचा कार्यभार स्वाधीन करण्यात कसूर केल्यास किंवा तसे करण्यास नकार दिल्यास, राज्य शासनास किंवा राज्य शासनाने या बाबतीत अधिकार दिलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे सभापतीस किंवा यथास्थिती उप सभापतीस आपल्या अधिकारपदाचा कार्यभार आणि असा सभापती किंवा उप सभापती म्हणून त्याच्या कब्जात असलेली पंचायत समितीची कोणतीही कागदपत्रे व मालमत्ता असल्यास ती सर्व कागदपत्रे व ती मालमत्ता, ताबडतोब नवीन सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या स्वाधीन करण्याबाबत निदेश देता येईल.

(३) ज्यास पोट-कलम (२) खाली निदेश दिला आहे अशा मावळत्या सभापतीने किंवा उप सभापतीने निदेशाचे पालन न केल्यास, राज्य शासनास, अशा सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या कब्जात असलेली पंचायत समितीची कोणतीही कागदपत्रे व मालमत्ता असल्यास ती सर्व कागदपत्रे व मालमत्ता परत घेण्यासाठी उपाययोजना करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी त्यास झडतीचे अधिपत्र काढण्यासाठी व फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, प्रकरण सात याच्या तरतुदींअन्वये दंडाधिकारी कायदेशीर रीत्या ज्या कोणत्याही अधिकाराचा वापर करील अशा सर्व अधिकारांचा त्यासंबंधात वापर करण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. अशा रीतीने परत घेतलेली कागदपत्रे व मालमत्ता ही यथास्थिती, नवीन सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या स्वाधीन करण्यात येतील. १८९८ चा ५

(४) ज्यास पोट-कलम (२) खाली निदेश दिला आहे अशा मावळत्या सभापतीने किंवा उप सभापतीने त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणावरुन नव्हे तर अन्यथा अशा निदेशाचे पालन न केल्यास त्यास अपराध सिध्दीनंतर एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या कालावधीच्या साध्या कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा देण्यात येईल किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.]

पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व त्यांची कार्ये.

**७६.** या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम किंवा विनियम यांना अधीन राहून —

(१) पंचायत समितीचा सभापती.—

(क) पंचायत समितीच्या बैठकी बोलावील, त्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील व त्यांचे कामकाज चालवील;

(ख) पंचायत समितीचे अभिलेख पाहू शकेल;

(ग) अंमलबजावणीच्या किंवा (पंचायत समितीचे ठराव आणि निर्णय कार्यान्वित करण्याचे काम धरुन) प्रशासनाच्या बाबतीत आणि पंचायत समितीचे हिशेब व अभिलेख यांच्या बाबतीत गटास काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या किंवा जिल्हा परिषदेखालील अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कृतींचे पर्यवेक्षण करील व त्यावर नियंत्रण ठेवील;

(घ) गट अनुदानातून हाती घ्यावयाची कामे व विकास परियोजना यांच्या बाबतीत, मालमत्ता संपादन करण्यास किंवा तिची विक्री अथवा तिचे हस्तांतरण करण्यास मंजुरी देण्यासंबंधात, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २९ अन्वये कलम ७५-क समाविष्ट करण्यात आले
२. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला

(२) पंचायत समितीच्या सभापतीस,–

(क) पंचायत समितीकडे कामावर असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागवता येईल.

(ख) गटातील जिल्हापरिषदेच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा गटातील जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या नियंत्रणाखालील व व्यवस्थापनाखालील कोणत्याही परिसंस्थेत किंवा जिल्हा परिषदेने अथवा पंचायत समितीने अथवा तिच्या निदेशानुसार हाती घेतलेले कोणतेही काम किंवा विकास परियोजना, गटात चालू असेल त्या ठिकाणी प्रवेशाकरता येईल व त्याचे निरीक्षण करता येईल.

**७७.** (१) पंचायत समितीचा उप सभापती,— पंचायत समितीच्या उप सभापतीचे अधिकार व त्याची कार्ये.

(क) सभापतीच्या गैरहजेरीत पंचायत समित्यांच्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील;

(ख) पंचायत समितीच्या सभापतीच्या अधिकारांपैकी व कर्तव्यांपैकी जे अधिकार व जी कर्तव्ये सभापती राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांना अधीन राहून लेखी आदेशाद्वारे वेळोवेळी त्यांच्याकडे सोपवील त्या अधिकारांचा वापर करील व ती कर्तव्ये पार पाडील; आणि

(ग) सभापतीची निवडणूक होईपर्यंत किंवा [१][सभापती जिल्ह्याबाहेर गेल्यामुळे किंवा रजेवर असल्यामुळे तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत] सभापती अनुपस्थित असतांना सभापतींच्या अधिकारांचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.

(२) पंचायत समितीच्या उप सभातीस गटातील जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत, किंवा गटातील जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या नियंत्रणाखालील व व्यवस्थापनाखालील कोणत्याही परिसंस्थेत किंवा जिल्हा परिषदेने अथवा पंचायत समितीने अथवा तिच्या निदेशानुसार हाती घेतलेले जे कोणतेही काम किंवा विकास परियोजना, गटात चालू असेल त्या ठिकाणी प्रवेश करता येईल व त्यांचे निरीक्षण करता येईल आणि तो अशा निरीक्षणाचा अहवाल पंचायत समितीच्या सभापतीकडे पाठवील.

[२][**७७क.** (१) प्रत्येक पंचायत समिती, यात यापुढे तरतुद केलेल्या रीतीने, पंधरा किंवा गटातील पंचायतींच्या एकूण संख्येच्या एक पंचमांश यापैकी जी संख्या अधिक होईल तेवढ्या संख्येतील सरपंचांची मिळून झालेली व "सरपंचांची समिती" या नावाने ओळखण्यात येणारी, एक समिती नेमिल. सरपंचांची समिती.

(२) उप सभपती हा, समितीचा पदसिध्द सभापती असेल.

(३) विस्तार अधिकारी (पंचायती) व एकापेक्षा अधिक विस्तार अधिकारी(पंचायती) नेमण्यात आले असतील तर त्याबाबतीत, गट विकास अधिकाऱ्यांकडून या बाबतीत नामनिर्देशित करण्यात येईल असा त्यांच्यापैकी एक अधिकारी हा, समितीचा पदसिध्द सचिव असेल.

(४) पंचायत समित्या दरवर्षी आळीपाळीने सरपंच नामनिर्देशित करतील असे नामनिर्देशन करण्याची रीत व आळीपाळीची नियतकालिकता राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असेल.

१९५९ चा मुंबई ३. (५) समिती ही, समंत्रक व सल्लागार संस्था असेल आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या तरतुदीअनुसार पंचायत समितीने पार पाडावयाच्या पंचायतीच्या नियंत्रणविषयक व पर्यवेक्षणविषयक कामाच्या संबंधातील सर्व बाबींवर, पंचायत समितीस; आपला सल्ला देईल ; पंचायत समिती, समितीकडून देण्यात आलेल्या सल्ल्यावर यथायोग्य विचार करील.

(६) समिती, आवश्यक असेल तितक्या वेळा, आपली बैठक भरवील; परंतु तिची मागील बैठक व पुढील बैठकीसाठी निश्चित करण्यात आलेला दिवस यांमध्ये एक महिन्यांचा अवधी जाणार नाही आणि ती कामकाज चालवण्याच्या संबंधात राज्य शासन, आदेशाद्वारे त्या बाबतीत निर्धारित करील अशी पध्दती अनुसरील.

(७) समितीमध्ये कोणतीही जागा रिकामी झाल्यास, तीमधील सदस्यांस, जणूकाही कोणतीही जागा रिकामी झालेली नसावी त्याप्रमाणे काम करता येईल.]

---

१ सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० कलम ३० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २० अन्वये कलम ७७-क समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण चार

## समित्या

स्थायी समिती, विषय समित्या व इतर समित्या यांची नेमणूक.

७८. (१) प्रत्येक जिल्हा परिषद [१][कलम ४५ खाली बोलावलेल्या तिच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत] यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने, एक स्थायी समिती, तसेच पुढील विषय समित्या [१][नेमिल] :—

(क) वित्त समिती,

(ख) कार्य समिती,

[२][(ग) कृषी [[३]* * *] समिती,

(घ) समाजकल्याण समिती]†

(ङ) शिक्षण समिती, [४]* * *

(च) आरोग्य समिती,

[५][(छ) पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती]

[६][(ज) महिला व बालकल्याण समिती]

[७]["(१क) कलम ७९ क च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेली एक जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती देखील असेल].

(२) जिल्हा परिषदेस, राज्य शासन विहित करील अशा नियमांना अधीन राहून, परिषद ठरवील इतके परिषद सदस्य व इतर व्यक्ती यांची मिळून बनलेली इतर कोणतीही समिती वेळोवेळी नेमता येईल, जिल्हा परिषदेस योग्य वाटतील अशा या अधिनियमाच्या प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबी, चौकशीसाठी व अहवालासाठी अशा समितीकडे निर्दिष्ट करता येतील आणि अशा समितीने आपला अहवाल जिल्हा परिषद विनिर्दिष्ट करील अशा स्थायी समितीस किंवा विषय समितीस सादर करावा असा निदेश देता येईल.

स्थायी समितीची रचना.

७९. (१) कलम ८१ च्या तरतुदींना अधीन राहून, स्थायी समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

(क) अध्यक्ष;

(ख) विषय समित्यांचे सभापती;

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २१(अ) अन्वये "नेमिल" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २(१) अन्वये नोंदी (क) व (ङ) ऐवजी या नोंदी दाखल करण्यात आल्या.

† सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, याचे कलम २, पोट-कलम (२) पुढीलप्रमाणे आहे :—
"(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या प्रारंभाच्या वेळी, अस्तित्वात असलेली कृषी समिती व सहकार समिती ही, पहिल्या कृषी व सहकार समितीची रचना करण्यात येईल व तिची पहिली सभा घेण्यात येईल अशा वेळेपर्यंत अधिकारपद धारण करण्याचे व कार्य करण्याचे चालू ठेवील."

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २१(ब) अन्वये हे शब्द वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम २१ (क) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २१ (ड) अन्वये खंड (छ) समाविष्ट करण्यात आला.

६. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम (३) अन्वये खंड (ज) जादा दाखल करण्यात आला.

७. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम (२) अन्वये पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[1][६८-क. सभापती किंवा उप सभापती यांच्या निवडणुकीच्या विधीग्राह्यतेच्या संबंधात विवाद उपस्थित झाल्यास, त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्यास किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास किंवा [2][* * *] कोणत्याही सदस्यास तो विवाद निवडणुकीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे निर्णयासाठी निर्देशित करता येईल. आयुक्तांच्या निर्णयाविरुद्ध करावयाचे अपील अशा निर्णयाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत राज्य शासनाकडे दाखल करता येईल.] सभापती किंवा उप सभापती यांच्या निवडणुकीच्या विधीग्राह्यतेच्या संबंधातील विवादावर निर्णय देण्याचा आयुक्ताचा अधिकार

६९. (१) कलम ७० च्या तरतुदींना अधीन राहून, पंचायत समितीच्या सभापतीस व उप सभापतीस, दरमहा, अनुक्रमे [3][ तीन हजार रुपये व एक हजार पाचशे रुपये ] मानधन देण्यात येईल. पंचायत समितीच्या सभापती व उप सभापती यांना मानधन व भत्ता देणे.

(२) [4][ सभापतीसाठी, भाडे न देता सुसज्ज निवासस्थानाची सोय करुन देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन या बाबतीत जे नियम करील अशा नियमांना अधीन राहून जिल्हा परिषदेस योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता त्यास देता येईल] आणि तसेच, राज्य शासन विहित करील असा प्रवास भत्ता व इतर भत्ते सभापती व उप सभापती यांना देता येतील.

(३) सभापती व उप सभापती यांना या कलमाखाली मासिक मानधन किंवा कोणतेही भत्ते किंवा सुखसोयी मिळतात याच केवळ कारणावरुन ते परिषद सदस्य किंवा पंचायत समितीचे सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा असा परिषद सदस्य अथवा सदस्य होण्यास निरर्ह ठरविले जाणार नाहीत.

(४) सभापती व उप सभापती आपल्या अधिकारपदाच्या कर्तव्यासाठी पुरेसा वेळ देईल व त्याकडे पुरेसे लक्ष देईल.

७०. (१) [5][पंचायत समितीच्या सभापतीस किंवा उप सभापतीस वर्षातून एकूण तीस दिवस परवानगीशिवाय गैरहजर राहता येईल आणि त्यास तीस दिवसाहून अधिक कालावधीसाठी परंतु वर्षातून एकूण नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतकी अनुपस्थिती रजा पंचायत समिती मंजूर करू शकेल आणि नव्वद दिवसांहून अधिक अशा कोणत्याही कालावधीची अनुपस्थिती रजा स्थायी समिती मंजूर करु शकेल] परंतु कोणत्याही एका वर्षात एकशेऐंशी दिवसांपेक्षा अधिक अशी कोणतीही रजा मंजूर करता येणार नाही : पंचायत समितीचे सभापती व उप सभापती यांना अनुपस्थिती रजा देणे व परिणामरुप तरतुदी.

[6][परंतु, सभापती आणि उप सभापती एकाचवेळी रजेवर असतील तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल अशा रीतीने चिठ्ठया टाकून निवडलेल्या विषय समितीचा सभापती, यथास्थिती, समितीचा सभापती किंवा उप सभापती कामावर रूजू होईपर्यंत सभापतीच्या अधिकाराचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.]

(२) सभापतीस किंवा उप सभापतीस, पोट-कलम (१) अन्वये एका वर्षात तीस दिवसांहून अधिक होणाऱ्या अनुपस्थितीच्या कालावधीमध्ये कोणतेही मानधन मिळण्याचा हक्क असणार नाही.

---

[1] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ याच्या कलम २४ द्वारे कलम ६८(क) दाखल करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे "एक हजार रुपये व आठशे रुपये" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ४ द्वारे हा मजकूर नेहमीकरता दाखल करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

[5] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २५ द्वारे "समितीच्या सभापतीस" या शब्दांनी सुरु होणाऱ्या व "रजा देण्याचा अधिकार असेल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ५ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(३) राज्य शासनाकडून या बाबतीत विहित करण्यात येईल अशा वैद्यकीय प्राधिकाऱ्याने रीतसर प्रमाणित केलेल्या आजाराच्या कारणावरून सभापती किंवा उप सभापती हा आपल्या पदावधीत नव्वद दिवसांहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी अनुपस्थित राहिल्यास त्या बाबतीत पोट-कलम (२) मधील कोणताही मजकूर लागू होणार नाही.

सभापती व उप सभापती यांचा राजीनामा.

७१. (१) सभापतीस, अध्यक्षास संबोधून आपल्या सहीनिशी आपल्या अधिकाराचा राजीनामा देता येईल [1][आणि त्यानंतर त्याचे अधिकारपद रिकामे होईल].

(२) उप सभापतीस सभापतीला संबोधून आपल्या सहीनिशी आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल [1][आणि त्यानंतर त्याचे अधिकारपद रिकामे होईल].

[2][(३) राजीनाम्याची नोटीस विहित केलेल्या रीतीने देण्यात येईल.]

पंचायत समितीचा सभापती किंवा उप सभापती यांच्याविरूद्ध अविश्वासाचा ठराव.

[3][७२. [4][(१) पंचायत समितीच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्याचा व मतदानाचा त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या पंचायत सदस्यांच्या एकूण संख्येपैकी [5][दोन तृतीयांश बहुमताने] पंचायत समितीच्या विशेष बैठकीत अविश्वासाचा ठराव संमत करण्यात आल्यास, सभापती किंवा उप सभापती, हा यथास्थिती, सभापती किंवा उप सभापती म्हणून असण्याचे बंद होईल व त्यानंतर अशा सभापतीचे किंवा उप सभापतीचे अधिकारपद रिकामे झाले असल्याचे मानण्यात येईल :

[6][परंतु जेथे महिलेसाठी राखीव असलेले सभापती पद एखादी महिला धारण करीत असेल तेथे असा अविश्वासाचा ठराव, पंचायत समितीच्या कोणत्याही बैठकीमध्ये भाग घेण्याचा व मतदानाचा त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या, एकूण सदस्य संख्येपैकी तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमतानेच संमत करता येईल].

[7][परंतु आणखी असे की,] पंचायत समितीच्या यथास्थिति, सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या निवडणुकीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत असा कोणताही अविश्वासाचा ठराव मांडण्यात येणार नाही.

(२) अशा विशेष बैठकीसाठी केलेल्या मागणीपत्रावर, पंचायत समितीच्या कोणत्याही बैठकीत भाग घेण्याचा व मतदानाचा त्या त्यावेळी हक्क असणाऱ्या पंचायत सदस्यांच्या एकूण संख्येच्या [8][एक तृतीयांशापेक्षा] कमी नसेल एवढ्या पंचायत सदस्यांनी सह्या केलेल्या असतील व ते जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन करण्यात येईल. मागणीपत्रावर अशी मागणी करणाऱ्यांनी सह्या केलेल्या असतील व ते राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा रीतीने करण्यात येईल.]

(३) जिल्हाधिकारी, पोट-कलम (२) अन्वये मागणीपत्र मिळाल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, पंचायत समितीची विशेष बैठक बोलावील. बैठकीची नोटीस काढल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा उशिराची नसेल अशा दिनांकाला बैठक घेण्यात येईल.

(४) बैठकीच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी, किंवा याबाबतीत त्यांच्याकडून प्राधिकृत करण्यात येईल असा कोणताही अधिकारी असेल. जिल्हाधिकारी किंवा असा अधिकारी अशा बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल तेव्हा त्यास, पंचायत समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असताना सभापतीस जे अधिकार असतात तेच अधिकार असतील, परंतु त्यास मतदानाचा अधिकार असणार नाही.

(५) या कलमान्वये बोलाविण्यात आलेली बैठक कोणत्याही कारणासाठी, स्थगित करता येणार नाही.

(६) ठरावाच्या बाजूने आणि ठरावाच्या विरूध्द मतदान करणाऱ्या सदस्यांची नावे बैठकीत वाचण्यात येतील व कलम ११८ व कलम ११९ चे पोट-कमल (१३) अन्वये ठेवण्यात आलेल्या कार्यवृत्त पुस्तकात ती नमूद करण्यात येतील.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २६ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ११ द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम १८ द्वारे मूळ कलम ७२ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

४. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ३(१) द्वारे मूळ पोट-कलमे (१) व (२) ऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

५. सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, याच्या कलम ६(१) द्वारे "बहुमताने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६. सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, याच्या कलम ६(क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ६(ख) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. वरील अधिनियमाच्या कलम ६(२) द्वारे "एक पंचमांशापेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][(७) अविश्वासाचा ठराव मांडण्यात आला नाही किंवा यथास्थिती, फेटाळण्यात आला तर पोट-कलम (३) अन्वये बोलावण्यात आलेल्या विशेष बैठकीच्या दिनांकापासून [2][ [3][एक वर्षाच्या] [कालावधीच्या आत पंचायत समितीसमोर अविश्वासाचा कोणताही नवीन ठराव आणला जाणार नाही.]

पंचायत समितीचा सभापती किंवा उप सभापती यांस गैरवर्तणूक वगैरे केल्याबद्दल अधिकारपदावरून दूर करणे.

७३. पंचायत समितीच्या सभापतीने किंवा उप सभापतीने आपली कर्तव्ये पार पाडीत असताना केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा हयगयीबद्दल, किंवा आपले कर्तव्य पार पाडण्याच्या त्याच्या असमर्थतेबद्दल किंवा ते पार पाडण्यात सतत हेळसांड करण्याबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तनामुळे दोषी ठरण्याबद्दल, राज्य शासनास, कलम ७२ च्या तरतुदींना बाध येऊ न देता सभापतीस किंवा उप सभापतीस अधिकारपदावरून दूर करता येईल ; आणि अशा रीतीने अधिकारपदावरून दूर करण्यात आलेला सभापती किंवा उप सभापती हा पंचायत समितीच्या सदस्यांच्या उरलेल्या पदावधीसाठी सभापती किंवा उप सभापती म्हणून पुन्हा निवडून येण्यास पात्र असणार नाही :

परंतु, अशा सभापतीस किंवा उप सभापतीस [4][आपले स्पष्टीकरण सादर करण्याची] संधी देण्यात आल्याशिवाय त्यास अधिकारपदावरून दूर करण्यात येणार नाही.

सभापती किंवा उप सभापती परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्याचा परिणाम.

७४. राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांना अधीन राहून जो सभापती किंवा उप सभापती एका वर्षात एकूण तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी परवानगीशिवाय कामावर अनुपस्थित राहील तो यथास्थिति, सभापती किंवा उप सभापती म्हणून असण्याचे बंद होईल.

सभापती किंवा उप सभापती यांची नैमित्तिक रिकामी अधिकारपदे भरणे.

७५. (१) सभापती किंवा उप सभापती मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्यास अधिकारपदावरून दूर केल्यामुळे किंवा अन्य कारणाने त्याचे अधिकारपद रिकामे झाले असता असे रिकामे अधिकारपद, कलमे ६४ व ७३ यांच्या तरतुदींच्या अधीन राहून शक्य तितके सोयीप्रमाणे, नवीन सभापतीची किंवा उप सभापतीची निवडणूक घेऊन भरण्यात येईल : [5][आणि तो ज्या व्यक्तीच्या जागी त्याला निवडून देण्यात आले असेल त्या व्यक्तीने ते पद रिक्त झाले नसते तर जेवढ्या मुदतीकरिता ते पद धारण केले असते, तेवढ्याच मुदतीकरिता ते पद धारण करील ] :

परंतु, कोणत्याही कारणामुळे सभापती व उप सभापती या दोघांची अधिकारपदे एकाच वेळी रिकामी झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने त्यास योग्य वाटेल त्या रीतीने चिठ्ठया टाकून निवडलेला विषय समितीचा सभापती हा, सभापतीची निवडणूक होईपर्यंत, सभापतीच्या अधिकारांचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील :

[6][परंतु, आणखी असे की, पहिल्या परंतुकाच्या कोणत्याही तरतुदीच्या आधारे, असा सभापती, जिल्हा परिषदेचा सदस्य होणार नाही.]

[7][(२) पूर्वोक्त कारणांपैकी कोणत्याही कारणामुळे, सभापती आणि उप सभापती यांची अधिकारपदे किंवा त्या दोहोंपैकी कोणाही एकाचे अधिकारपद रिकामे झाल्यास, कलम ६७ किंवा यथास्थिति, कलम ६८ यांच्या तरतुदी, बैठक बोलावणे आणि सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या किंवा त्या दोघांच्या निवडणुकीसाठी बोलावलेल्या अशा बैठकीत अनुसरावयाची कार्यपध्दती यांच्या संबंधात, शक्य असेल तेथवर, लागू होतील.]

---

१. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, याच्या कलम ३(२) द्वारे मूळ पोट-कलम (७) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३(२) द्वारे "एक वर्षाच्या" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, याच्या कलम ८ अन्वये "सहा महिन्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ११ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ९ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६५ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

७. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १९ द्वारे पोट-कलम (२) मूळ पोटकलमाऐवजी दाखल करण्यात आले.

कार्यभार नवीन सभापती किंवा उप सभापती यांच्या स्वाधीन करण्यास नकार देण्याबद्दल शास्ती.

[१][(७५क.) (१) नवीन सभापती किंवा उप सभापती निवडून आल्यानंतर, ज्याच्या जागेवर नवीन सभापती निवडून आला असेल असा मावळता सभापती [२][कलम ७५, पोट-कलम (१) खाली येणाऱ्या प्रकरणांच्या संबंधात नवीन सभापतीकडे ताबडतोब आणि इतर कोणत्याही प्रकरणात] कलम ६७ चे पोट-कलम (२) यात निर्देश केलेल्या परिषदेच्या पहिल्या बैठकीनंतर शक्य तितक्या लवकर आपल्या अधिकारपदाचा कार्यभार नवीन सभापतीच्या स्वाधीन करील आणि उप सभापती आपल्या अधिकार पदाचा कार्यभार ताबडतोब अशा नवीन सभापतीच्या स्वाधीन करील.

(२) मावळत्या सभापतीने किंवा उप सभापतीने पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आपल्या अधिकारपदाचा कार्यभार स्वाधीन करण्यात कसूर केल्यास किंवा तसे करण्यास नकार दिल्यास, राज्य शासनास किंवा राज्य शासनाने या बाबतीत अधिकार दिलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास लेखी आदेशाद्वारे सभापतीस किंवा यथास्थिती उप सभापतीस आपल्या अधिकारपदाचा कार्यभार आणि असा सभापती किंवा उप सभापती म्हणून त्याच्या कब्जात असलेली पंचायत समितीची कोणतीही कागदपत्रे व मालमत्ता असल्यास ती सर्व कागदपत्रे व ती मालमत्ता, ताबडतोब नवीन सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या स्वाधीन करण्याबाबत निदेश देता येईल.

(३) ज्यास पोट-कलम (२) खाली निदेश दिला आहे अशा मावळत्या सभापतीने किंवा उप सभापतीने निदेशाचे पालन न केल्यास, राज्य शासनास, अशा सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या कब्जात असलेली पंचायत समितीची कोणतीही कागदपत्रे व मालमत्ता असल्यास ती सर्व कागदपत्रे व मालमत्ता परत घेण्यासाठी उपाययोजना करता येईल आणि त्या प्रयोजनासाठी त्यास झडतीचे अधिपत्र काढण्यासाठी व फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, प्रकरण सात याच्या तरतुदींअन्वये दंडाधिकारी कायदेशीर रीत्या ज्या कोणत्याही अधिकाराचा वापर करील अशा सर्व अधिकारांचा त्यासंबंधात वापर करण्यासाठी कोणत्याही अधिकाऱ्यास प्राधिकृत करता येईल. अशा रीतीने परत घेतलेली कागदपत्रे व मालमत्ता ही यथास्थिती, नवीन सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या स्वाधीन करण्यात येतील. १८९८ चा ५.

(४) ज्यास पोट-कलम (२) खाली निदेश दिला आहे अशा मावळत्या सभापतीने किंवा उप सभापतीने त्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणावरुन नव्हे तर अन्यथा अशा निदेशाचे पालन न केल्यास त्यास अपराध सिध्दीनंतर एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या कालावधीच्या साध्या कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा देण्यात येईल किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.]

पंचायत समितीच्या सभापतीचे अधिकार व त्यांची कार्ये.

**७६.** या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली केलेले नियम किंवा विनियम यांना अधीन राहून —

(१) पंचायत समितीचा सभापती.—

(क) पंचायत समितीच्या बैठकी बोलावील, त्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील व त्यांचे कामकाज चालवील;

(ख) पंचायत समितीचे अभिलेख पाहू शकेल;

(ग) अंमलबजावणीच्या किंवा (पंचायत समितीचे ठराव आणि निर्णय कार्यान्वित करण्याचे काम धरुन) प्रशासनाच्या बाबतीत आणि पंचायत समितीचे हिशेब व अभिलेख यांच्या बाबतीत गटात काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या किंवा जिल्हा परिषदेखालील अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या कृतींचे पर्यवेक्षण करील व त्यावर नियंत्रण ठेवील;

(घ) गट अनुदानातून हाती घ्यावयाची कामे व विकास परियोजना यांच्या बाबतीत, मालमत्ता संपादन करण्यास किंवा तिची विक्री अथवा तिचे हस्तांतरण करण्यास मंजुरी देण्यासंबंधात, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करील.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २९ अन्वये कलम ७५-क समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला

(२) पंचायत समितीच्या सभापतीस,—

(क) पंचायत समितीकडे कामावर असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागवता येईल.

(ख) गटातील जिल्हापरिषदेच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा गटातील जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या नियंत्रणाखालील व व्यवस्थापनाखालील कोणत्याही परिसंस्थेत किंवा जिल्हा परिषदेने अथवा पंचायत समितीने अथवा तिच्या निदेशानुसार हाती घेतलेले कोणतेही काम किंवा विकास परियोजना, गटात चालू असेल त्या ठिकाणी प्रवेश करता येईल व त्याचे निरीक्षण करता येईल.

पंचायत समितीच्या उप सभापतीचे अधिकार व त्याची कार्ये.

**७७.** (१) पंचायत समितीचा उप सभापती,—

(क) सभापतीच्या गैरहजेरीत पंचायत समित्यांच्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील;

(ख) पंचायत समितीच्या सभापतीच्या अधिकारांपैकी व कर्तव्यांपैकी जे अधिकार व जी कर्तव्ये सभापती राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांना अधीन राहून लेखी आदेशाद्वारे वेळोवेळी त्यांच्याकडे सोपवील त्या अधिकारांचा वापर करील व ती कर्तव्ये पार पाडील; आणि

(ग) सभापतीची निवडणूक होईपर्यंत किंवा [1][सभापती जिल्ह्याबाहेर गेल्यामुळे किंवा रजेवर असल्यामुळे तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत] सभापती अनुपस्थित असतांना सभापतींच्या अधिकारांचा वापर करील व त्याची कर्तव्ये पार पाडील.

(२) पंचायत समितीच्या उप सभापतीस गटातील जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत, किंवा गटातील जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या नियंत्रणाखालील व व्यवस्थापनाखालील कोणत्याही परिसंस्थेत किंवा जिल्हा परिषदेने अथवा पंचायत समितीने अथवा तिच्या निदेशानुसार हाती घेतलेले जे कोणतेही काम किंवा विकास परियोजना, गटात चालू असेल त्या ठिकाणी प्रवेश करता येईल व त्यांचे निरीक्षण करता येईल आणि तो अशा निरीक्षणाचा अहवाल पंचायत समितीच्या सभापतीकडे पाठवील.

सरपंचांची समिती.

[2][**७७क.** (१) प्रत्येक पंचायत समिती, यात यापुढे तरतुद केलेल्या रीतीने, पंधरा किंवा गटातील पंचायतींच्या एकूण संख्येच्या एक पंचमांश यापैकी जी संख्या अधिक होईल तेवढ्या संख्येतील सरपंचांची मिळून झालेली व "सरपंचांची समिती" या नावाने ओळखण्यात येणारी, एक समिती नेमिल.

(२) उप सभपती हा, समितीचा पदसिध्द सभापती असेल.

(३) विस्तार अधिकारी (पंचायती) व एकापेक्षा अधिक विस्तार अधिकारी(पंचायती) नेमण्यात आले असतील तर त्याबाबतीत, गट विकास अधिकाऱ्यांकडून या बाबतीत नामनिर्देशित करण्यात येईल असा त्यांच्यापैकी एक अधिकारी हा, समितीचा पदसिध्द सचिव असेल.

(४) पंचायत समित्या दरवर्षी आळीपाळीने सरपंच नामनिर्देशित करतील असे नामनिर्देशन करण्याची रीत व आळीपाळीची नियतकालिकता राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असेल.

१९५९ चा मुंबई ३.

(५) समिती ही, संमंत्रक व सल्लागार संस्था असेल आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या तरतुदीअनुसार पंचायत समितीने पार पाडावयाच्या पंचायतींच्या नियंत्रणविषयक व पर्यवेक्षणविषयक कामाच्या संबंधातील सर्व बाबींवर, पंचायत समितीस, आपल्या सल्ला देईल, पंचायत समिती, समितीकडून देण्यात आलेल्या सल्ल्यावर यथायोग्य विचार करील.

(६) समिती, आवश्यक असेल तितक्या वेळा, आपली बैठक भरवील; परंतु तिची मागील बैठक व पुढील बैठकीसाठी निश्चित करण्यात आलेला दिवस यांमध्ये एक महिन्यांचा अवधी जाणार नाही आणि ती कामकाज चालविण्याच्या संबंधात राज्य शासन, आदेशाद्वारे त्या बाबतीत निर्धारित करील अशी पध्दती अनुसरील.

(७) समितीमध्ये कोणतीही जागा रिकामी झाल्यास, तीमधील सदस्यांस, जणूकाही कोणतीही जागा रिकामी झालेली नसावी त्याप्रमाणे काम करता येईल.]

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ कलम ३० अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २० अन्वये कलम ७७-क समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण चार

## समित्या

स्थायी समिती, विषय समित्या व इतर समित्या यांची नेमणूक.

**७८.** (१) प्रत्येक जिल्हा परिषद [१][कलम ४५ खाली बोलावलेल्या तिच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत] यात यापुढे तरतूद केलेल्या रीतीने, एक स्थायी समिती, तसेच पुढील विषय समित्या [१][नेमिल] :-

(क) वित्त समिती,

(ख) कार्य समिती,

[२][(ग) कृषी [३* * *] समिती,

(घ) समाजकल्याण समिती][२]

(ङ) शिक्षण समिती, [४]* * *

(च) आरोग्य समिती,

[५][(छ) पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती]

[६][(ज) महिला व बालकल्याण समिती]

[७]["(१क) कलम ७९ क च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेली एक जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती देखील असेल].

(२) जिल्हा परिषदेस, राज्य शासन विहित करील अशा नियमांना अधीन राहून, परिषद ठरवील इतके परिषद सदस्य व इतर व्यक्ती यांची मिळून बनलेली इतर कोणतीही समिती वेळोवेळी नेमता येईल, जिल्हा परिषदेस योग्य वाटतील अशा या अधिनियमाच्या प्रयोजनांशी संबंधित असलेल्या बाबी, चौकशीसाठी व अहवालासाठी अशा समितीकडे निर्दिष्ट करता येतील आणि अशा समितीने आपला अहवाल जिल्हा परिषद विनिर्दिष्ट करील अशा स्थायी समितीस किंवा विषय समितीस सादर करावा असा निदेश देता येईल.

स्थायी समितीची रचना.

**७९.** (१) कलम ८१ च्या तरतुदींना अधीन राहून, स्थायी समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

(क) अध्यक्ष;

(ख) विषय समित्यांचे सभापती;

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २१(अ) अन्वये "नेमिल" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २(१) अन्वये नोंदी (क) व (ड) ऐवजी या नोंदी दाखल करण्यात आल्या.

[†] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, याचे कलम २, पोट-कलम (२) पुढीलप्रमाणे आहे :—
"(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या प्रारंभाच्या वेळी, अस्तित्वात असलेली कृषी समिती व सहकार समिती ही, पहिल्या कृषी व सहकार समितीची रचना करण्यात येईल व तिची पहिली सभा घेण्यात येईल अशा वेळेपर्यंत, अधिकारपद धारण करण्याचे व कार्य करण्याचे चालू ठेवील."

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २१(ब) अन्वये हे शब्द वगळण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम २१ (क) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम २१ (ड) अन्वये खंड (छ) समाविष्ट करण्यात आला.

६. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम (३) अन्वये खंड (ज) जादा दाखल करण्यात आला.

७. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम (२) अन्वये पोट-कलम (१क) समाविष्ट करण्यात आले.

[१][(ग) राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांस अधीन राहून जिल्हा परिषदेने आपल्या परिषद सदस्यांमधून निवडून दिलेले [२][आठ परिषद सदस्य], मात्र अनुसूचित जातींच्या किंवा अनुसूचित जमातींच्या किंवा [३][* * * ] नागरिकांच्या मागासवर्गातील परिषद सदस्यांसाठी दोनपेक्षा अधिक नसतील इतक्या जागा राखून ठेवण्यात येतील .

[४]* * * * * *]

[५]* * * * * *

(२) अध्यक्ष हा स्थायी समितीचा पदसिध्द सभापती असेल

[६]* * * * * *

(४) उप मुख्य कार्यकारी अधिकारी [७][व एकापेक्षा अधिक उप मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात आले असतील त्याबाबत, मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबतीत नामनिर्देशित करील असा त्यांच्यापैकी एक] हा स्थायी समितीचा पदसिध्द सचिव असेल.

[८]* * * * * *

[९][७९क. (१) कलम ८१ च्या तरतुदींना अधीन राहून, जल व्यवस्थापन व स्वच्छता समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल.— जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीची रचना

| | | |
|---|---|---|
| (क) | जिल्हा परिषदेचा अध्यक्ष, | पदसिध्द सभापती |
| (ख) | कलम ७८ च्या पोट-कलम (१) अन्वये रचना केलेल्या सर्व विषय समित्यांचे सभापती, | पदसिध्द सदस्य; |
| (ग) | जिल्हा परिषदेने परिषद सदस्यांमधून निवडून द्यावयाचे चार परिषद सदस्य ; यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतके सदस्य, महिला सदस्य असतील. | सदस्य ; |
| (घ) | मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिध्द सदस्य ; |
| (ङ) | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा), जिल्हा परिषद ; कार्यकारी अभियंता (लहान पाटबंधारे), जिल्हा परिषद, | पदसिध्द सदस्य ; |
| (च) | स्वच्छता पाहणारे जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिध्द सदस्य ; |
| (छ) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), आणि | पदसिध्द सदस्य ; |
| (ज) | अपर मुख्य कार्यकारी अधिकारी, | पदसिध्द सदस्य-सचिव ; |

परंतु, समितीस, आपली कामे आणि कर्तव्ये पार पाडताना समितीस सहाय्य किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनाकरिता, विशेष निमंत्रित म्हणून, जलसंधारण, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता या विषयातील क्षेत्रात काम करणाऱ्या व या विषयांचे विशेष ज्ञान व अनुभव असणाऱ्या, जिल्ह्यातील सहाय्य संघटनांच्या (अशासकीय संघटना, समंत्रक, शैक्षणिक संस्था) दोन पेक्षा अधिक नाही इतक्या प्रतिनिधींना निमंत्रित करता येईल :

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३१(एक) द्वारे मूळ उप खंड (ग) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

२. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २२(अ) द्वारे "सात परिषद सदस्य" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६६(एक) (अ) (एक) 'सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या' हा मजकूर वगळण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ६६(१) (अ) (दोन) द्वारे परंतुक वगळण्यात आले.

५. वरील अधिनियमाच्या कलम ६६(१) (ब) द्वारे खंड (ङ) वगळण्यात आले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ६६(२) द्वारे पोट कलम (3) वगळण्यात आले.

७ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २२(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

८. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

९. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम ३ द्वारे कलम ७९ क ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

(१) परंतु, आणखी असे की, खंड (घ), (ङ), (च), (छ) व (ज) अन्वये नियुक्त केलेले पदसिध्द सदस्य आणि समितीच्या बैठकीला किंवा बैठकींना हजर राहण्यासाठी निमंत्रित केलेले विशेष निमंत्रक, यांना समितीच्या चर्चेत भाग घेता येईल परंतु अशा बैठकीमध्ये मत देण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

(२) जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तदन्वये विषय समितीला नेमून देण्यात आलेल्या विषयांच्या संबंधात विषय समितीला जे सर्व अधिकार असतील आणि ज्या अधिकारांचा ती वापर करीत असेल ते, सर्व अधिकार जल व्यवस्थापन व स्वच्छता समितीला जलसंधारण, जतन, वापर, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व स्वच्छता या विषयांच्या संबंधात असतील आणि ती त्यांचा वापर करील."]

विषय समित्यांची रचना करणे.

८०. (१) [2][कलमे ८१ व ८३] यांच्या तरतुदींना अधीन राहून [4][ [3][(क) कृषी समिति] पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :-

(एक) जिल्हा परिषदेने आपल्या परिषद सदस्यांमधून निवडून दिलेले [5][दहा परिषद सदस्य]

[6]* * *

[7]* * * * * *

[8]* * * * * *

[9][(ख) समाजकल्याण समिती पुढील व्यक्तींची मिळून होईल :—

(एक) जिल्हा परिषदेने [10][आपल्या परिषद सदस्यांमधून] निवडून दिले [11][नऊ परिषद सदस्य] तथापि [12][उपलब्धतेच्या अधीन राहून] यांपैकी,--

(क) पाच जागा अनुसूचित जातींच्या आणि अनुसूचित जमातींच्या परिषद सदस्यांसाठी राखीव असतील; आणि यांपैकी किमान दोन अनुसूचित जमातीसाठी राखीव असतील ;

(ख) [13][चार] जागा [14][नागरीकांच्या मागासवर्गाच्या] परिषद सदस्यांसाठी राखीव असतील ;

[15]* * * *

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३२(अ) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
२. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ४ द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.
३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३(१) (अ) द्वारे खंड (क) ला नव्याने क्रमांक देण्यात आला.
४. वरील अधिनियमाच्या कलम २३(१) (अ) (एक) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. वरील अधिनियमाच्या कलम ६ कलम २३ (१) (अ) (दोन) द्वारे "नऊ परिषद सदस्य" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
६. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८ (अ) (एक) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.
७. वरील अधिनियमाच्या कलम ६८ (अ) (दोन) द्वारे खंड (दोन) वगळण्यात आला.
८. वरील अधिनियमाच्या कलम ६८ (अ) (तीन) द्वारे खंड (तीन) वगळण्यात आला.
९. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३ (ब) द्वारे खंड (एक-क) ला नवीन क्रमांक देण्यात आला.
१०. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
११. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, याच्या कलम २३ (ब) (एक) द्वारे "आठ परिषद सदस्य" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
१२. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८(ब) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
१३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३ (ब) (तीन) द्वारे "तीन" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
१४. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८ (ब) (तीन) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
१५. वरील अधिनियमाच्या कलम ६८ (ब) (तीन) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

(दोन) जिल्हा परिषदेने [1][आपल्या महिला परिषद सदस्यांमधून] निवडून दिलेल्या दोन महिला परिषद सदस्या ;

[2] * * * * * *

(तीन) जिल्हा परिषदेचा समाजकल्याण अधिकारी हा समितीचा पदसिध्द सचिव असेल.

**स्पष्टीकरण**. या परिच्छेदाच्या प्रयोजनांकरिता, कलम २, खंड (२९) आणि (३०) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे, अनुसूचित जातीपैकी किंवा अनुसूचित जमातींपैकी कोणत्याही अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातींची असेल अशी व्यक्ती, कोणत्याही जिल्ह्यातील समाजकल्याण समितीवर, [3] * * * * निवडून येण्यास [3] * * * * पात्र असेल ; मग अशी व्यक्ती ज्या जातीची किंवा जमातीची असेल ती जात किंवा जमात राज्यातील ज्या वसतिस्थानाच्या संबंधात अनुसूचित जात किंवा, यथास्थिति, अनुसूचित जमात असल्याचे मानण्यात येत असेल अशा वसतिस्थानातील रहिवासी असो अथवा नसो ; ]

[4][[5][ग] शिक्षण समिती पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल.—

(एक) जिल्हा परिषदेने आपल्या परिषद सदस्यांमधून निवडून दिलेले [6][आठ परिषद सदस्य]];

[7] * * * * * *

[8] * * * * * *

[9] * * * * * *]

[10][घ] काम समिती, पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल.—

(एक) जिल्हा परिषदेने आपल्या परिषद सदस्यांमधून निवडून दिलेले आठ परिषद सदस्य;

[11] * * * * * *

[12] * * * * * *]

---

१. सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४(२) द्वारे "निवडून आलेल्या महिला परिषद सदस्यांमधून" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६ (ब) द्वारे हे परंतुक वगळण्यात करण्यात आले.

३. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८(ब) (चार) अन्वये "यथास्थिति" या शब्दांनी सुरु होणारा व "कोणत्याही जागेवर" या शब्दांनी संपणारा मजकूर आणि "किंवा स्वीकृत करुन घेतली जाण्यास" हा मजकूर वगळण्यात येईल.

४. सन १९६३चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ कलम ३२ (अ) (दोन) अन्वये खंड (अअ), समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३(१) (क) अन्वये खंड (अअ) यास खंड (ग) असा फेर क्रमांक देण्यात आला.

६. वरील अधिनियमाच्या कलम २३ (१) (एक) (क) (अन्वये) "सात सभासद" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

७. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८(क) (दोन) अन्वये उप खंड (दोन) वगळण्यात आला.

८. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३(१) (क) द्वारे उप खंड (तीन) वगळण्यात आला.

९. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८(क) (दोन) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.

१०. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३(ड) द्वारे खंड (घ) समाविष्ट करण्यात आला.

११. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८(ड) (एक) अन्वये उप खंड (दोन) व (तीन) वगळण्यात आले.

१२. वरील अधिनियमाच्या कलम ६८ (ड) (दोन) अन्वये परंतुक वगळण्यात आले.

[1][(ङ) इतर विषय समित्या, प्रत्येकी, पुढील व्यक्तींच्या मिळून बनलेल्या असतील,---

(एक) जिल्हा परिषदेने आपल्या परिषद सदस्यांमधून निवडून दिलेले [2][आठ परिषद सदस्य];

[3] * * * * * *

[4][परंतु, महिला व बालकल्याण समितीवरील परिषद सदस्यांपैकी किमान सत्तर टक्के, महिला परिषद सदस्य असतील.]

**स्पष्टीकरण.**— सत्तर टक्के सदस्यसंख्येची गणना करण्याच्या प्रयोजनासाठी अपूर्णांकातील संख्या पूर्णांकात धरली जाईल].

[5] * * * * * * *

[6] * * * * * * *

[7] * * * * * * *

(३) जिल्हा परिषदेने या बाबतीत विनिर्दिष्ट केलेला जिल्हा परिषदेचा विभाग प्रमुख हा जिल्हा परिषद त्या बाबतीत निदेश देईल त्याप्रमाणे अशा विषय समितीचा पदसिध्द सचिव असेल.

समित्यांसाठी निवडणूक. ८१. (१) कोणताही परिषद सदस्य, [8][एकापेक्षा] अधिक समित्यांवर (स्थायी समिती धरुन) निवडून दिला जाणार नाही ;

[9][परंतु, जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती धरून कोणत्याही जिल्हा परिषदेच्या परिषद सदस्यांची एकूण संख्या, सर्व समित्यांच्या सदस्यांची संख्या पूर्ण होण्यासाठी आवश्यक असलेल्या संख्येपेक्षा कमी असल्यास, एका परिषद सदस्यास आवश्यक असेल, तेवढ्या मर्यादेपर्यंतच केवळ दोन समित्यांवर निवडून देता येईल.

[10] * * * * *

(३) समितीची प्रत्येक निवडणूक (स्थायी समिती धरून) ही, एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या पध्दतीनुसार घेण्यात येईल.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २३(ई) द्वारे खंड (ख) पासून, खंड (ङ) असा फेरक्रमांक देण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम (ई) द्वारे "सात सभासद" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

३. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ६(अ) द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

४. सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम (अ) द्वारे हे परंतुक व स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

५. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६८(ई) (तीन) द्वारे, १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ द्वारे दाखल करण्यात आलेले हे परंतुक वगळण्यात आले.

६. वरील अधिनियमाच्या कलम ६८ (ई) (दोन) द्वारे उप खंड (दोन) वगळण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ६८(फ) द्वारे पोट-कलम (२) वगळण्यात आले.

८. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २४(१) (अ) द्वारे "दोनपेक्षा" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९. वरील अधिनियमाच्या कलम २४(१) (ब) द्वारे हे परंतुक नव्याने दाखल करण्यात आले.

१०. वरील अधिनियमाच्या कलम २४(२) द्वारे पोट-कलमे (२) व (२अ) वगळण्यात आली.

[१][(४) कलम ७९ किंवा कलम ८० खाली कोणत्याही परिषद सदस्याच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेबद्दल विवाद उपस्थित झाल्यास (त्यात, कोणत्याही कारणावरून नामनिर्देशनपत्र स्वीकारल्यामुळे किंवा नाकारल्यामुळे उपस्थित होणाऱ्या प्रश्नांचा किंवा कोणताही परिषद सदस्य हा अनुसूचित जातीचा किंवा अनुसूचित जमातीचा किंवा नागरिकांच्या [२] * * * मागासलेल्या वर्गाचा आहे किंवा नाही या कारणावरून उपस्थित झालेल्या कोणत्याही प्रश्नाचा समावेश होईल) कोणत्याही परिषद सदस्यास तो विवाद आयुक्ताकडे निर्देशित करता येईल, आणि आयुक्ताचा त्यावरील निर्णय हा अंतिम असेल :

परंतु,—

(क) असा विवाद हा परिषद सदस्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या कालावधीच्या आत आयुक्ताकडे निर्देशित करण्यात आलेला असेल ;

(ख) परिषद सदस्याला, आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय त्याच्याविरुध्द कोणताही निर्णय दिला जाणार नाही.]

८२. (१) जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या आणि विषय समितीच्या सदस्यांचा पदावधी, त्या जिल्हा परिषदेच्या सदस्यांच्या पदावधीबरोबर समाप्त होणारा असेल. स्थायी समितीच्या व विषय समितीच्या सदस्यांचा पदावधी.

(२) जर कोणताही सदस्य, समितीच्या परवानगीवाचून, समितीच्या बैठकींना लागोपाठ तीन महिन्यांच्या कालावधीसाठी (सभापतीच्या बाबतीत, त्यास रीतसर मंजूर केलेला रजेचा कोणताही कालावधी वगळून), अनुपस्थित राहिल्यास, [३][ किंवा कोणताही सदस्य अशा बैठकींना लागोपाठ सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अनुपस्थित राहिल्यास, ] [४] * * * [५] * * * त्याचे अधिकारपद रिकामे होईल :

[६] * * *

परंतु, आणखी असे की, या पोट-कलमातील कोणताही मजकूर, कलम ७९, पोट-कलम (१), खंड (ख) खाली येणाऱ्या स्थायी समितीच्या सदस्याच्या सबंधात, असा सदस्य जोपर्यंत कोणत्याही विषय समितीचा सभापती असण्याचे चालू असेल तोपर्यंत, लागू होणार नाही.]

[७][(३) या कलमाखाली एखादी जागा रिकामी झाली आहे किंवा कसे याबद्दल आयुक्ताने स्वतः होऊन किंवा कोणत्याही व्यक्तीने त्या बाबतीत त्याच्याकडे केलेल्या अर्जावरून प्रश्न उपस्थित केल्यास आयुक्त [८][शक्य असेल तेथवर असा अर्ज त्यास मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत] त्यावर निर्णय देईल; आणि त्यावरील त्याचा निर्णय अंतिम असेल, आयुक्त त्या प्रश्नाचा निर्णय देईपर्यंत सदस्य स्थायी समितीचा किंवा विषय समितीचा सदस्य म्हणून राहण्यास निःसमर्थ होणार नाही :

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३३ (२) द्वारे पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आले.
२. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६९ द्वारे "सामाजिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या" हा मजकूर वगळण्यात आला.
३. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २५ (१) द्वारे "कलम ७९, पोट-कलम (१), खंड (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी" हा मजकूर वगळण्यात आला.
५. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७ (ब) द्वारे "किंवा कलम ८०, पोट-कलम (१), खंड (क) चा उपखंड (दोन)" हे शब्द वगळण्यात आले.
६. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७० द्वारे हे परंतुक वगळण्यात आले.
७. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३४ अन्वये मूळ पोट-कलम (३) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.
८. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

परंतु, सदस्यास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय कोणत्याही सदस्याविरुध्द कोणताही निर्णय दिला जाणार नाही].

स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या सदस्यांचा राजीनामा.

[1][८२क. स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या (कलम ७९, पोट-कलम (१) चा खंड (ख) किंवा कलम ८०, पोट-कलम (१), [2][खंड (क) च्या उप खंड (दोन)] याखाली येणाऱ्या सदस्य नसलेल्या) कोणत्याही सदस्यास समितीच्या सभापतीस संबोधून आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल ; आणि त्यानंतर त्याचे अधिकारपद रिकामे होईल. [3][राजीनाम्याची नोटीस विहित केलेल्या रीतीने सुपूर्द करण्यात येईल.]

नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्यात.

८२ख. स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या सदस्याने राजीनामा दिल्यामुळे किंवा अन्यथा कोणतीही जागा रिकामी झाल्यास [4][त्या समितीचा सचिव], अशी जागा रिकामी झाल्याचे ताबडतोब जिल्हा परिषदेला कळवील आणि कलम ८१ च्या तरतुदींना अधीन राहून अशी रिकामी जागा शक्य तितक्या लवकर, यथास्थिती, एखाद्या व्यक्तीची त्या जागेवर निवडणूक करून किंवा तिला स्वीकृत करून घेऊन भरण्यात येईल आणि अशी व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिला निवडून देण्यात आले असेल किंवा स्वीकृत करून घेण्यात आले असेल त्या सदस्याने ती जागा रिकामी झाली नसती तर जोपर्यंत अधिकारपद धारण केले असते तोपर्यंत अधिकारपद धारण करील].

विषय समित्यांचे सभापती.

[5][८३. (१) प्रत्येक जिल्हा परिषदेच्या विषय समित्यांचे [6][पाच] सभापती असतील व उपाध्यक्ष हा त्यांपैकी एक सभापती असेल.

[7][(१-क) कलम ४५ खाली बोलावलेल्या जिल्हा परिषदेच्या पहिल्या बैठकीपासून १५ दिवसांपेक्षा उशिरा नसेल अशा दिवशी जिल्हाधिकारी (उपाध्यक्षाहून अन्य) विषय समित्यांच्या सभापतींच्या निवडणुकीकरिता जिल्हा परिषदेची आणखी एक बैठक बोलावील. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी, जिल्हाधिकारी किंवा जिल्हाधिकारी याबाबतीत लेखी आदेशाद्वारे नेमिल असा, उप जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला अधिकारी असेल. कलम ४५, पोट-कलम (२) व (३) च्या तरतुदी, लागू असतील तेथवर, अशा बैठकीत अनुसरावयाच्या कार्यपध्दतीस लागू होतील].

(२) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, परिषद सदस्य हे, निवडून आलेल्या परिषद सदस्यांमधून (अध्यक्ष आणि उपाध्यक्ष वगळून), विषय समित्यांचे सभापती म्हणून [8][चार] व्यक्तींची निवड करतील आणि असा प्रत्येक सभापती व उपाध्यक्ष, यांच्याकडे परिषद निर्धारित करील अशा समितीच्या किंवा समित्यांचा (परंतु दोन समित्यांहून अधिक समित्यांचा नाही) प्रभार सोपवण्यात येईल :

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ३५ द्वारे कलमे ८२-क व ८२-ख समाविष्ट करण्यात आली.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम २६ अन्वये "खंड (अ) च्या उप खंड (दोन)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४३, कलम १५ अन्वये "अशी नोटीस" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "स्वाधीन केली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २१, कलम ८ "सभापती" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

५ सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ५, कलम ४ अन्वये कलम ८३ बदली दाखल करण्यात आले.

६ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४, कलम ५(अ) अन्वये "चार" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

७ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम २७(१) अन्वये कलम (१-क) समाविष्ट करण्यात आली.

८ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४, कलम ५(ब) द्वारे हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[१][परंतु, महिला व बालकल्याण समितीचा सभापती हा, निवडून आलेल्या महिला परिषद सदस्यांमधील असेल.]

[२][(२क) परिषद सदस्य हा कोणत्याही विनिर्दिष्ट सहकारी संस्थेचा किंवा कामगार कंत्राट सहकारी संस्थेचा सभापती असेल व विषय समितीचा सभापती म्हणून निवडून येईल, आणि कोणत्याही विषय समितीचा सभापती हा अशा कोणत्याही सहकारी संस्थेचा सभापती म्हणून निवडून येईल तर, असा परिषद सदस्य, तो अशा प्रकारे निवडून आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत, जिल्हाधिकाऱ्याला, अशा सहकारी संस्थेच्या सभापतीच्या पदाचा राजीनामा, देऊन विषय समितीचा सभापती म्हणून पदावर राहण्यासंबंधीचा याचा विकल्प लेखी कळवील. अशा प्रकारे दिलेली सूचना रद्द करता येणार नाही. पूर्वोक्त कालावधीत अशी सूचना देण्यात आली नाही तर, विषय समितीच्या सभापतीच्या ज्या पदावर तो निवडून आला असेल ते पद रिक्त होईल.

**स्पष्टीकरण.**— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० किंवा त्याखाली केलेले नियम यांमध्ये, किंवा अशा संस्थेच्या उपविधीमध्ये एतद्‌विरुध्द कोणत्याही तरतुदी असल्या तरीही, या पोट-कलमाच्या प्रयोजनांसाठी, अशा सहकारी संस्थेच्या सभापतीपदाचा अशा प्रकारे दिलेला राजीनामा हा, त्या राजीनाम्याच्या दिनांकापासून अमलात येईल.]

१९६१ चा महा. २४.

[३][(३) कृषी समिती आणि पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती यांचा प्रभार एका सभापतीकडे सोपवण्यात येईल ; आणि समाजकल्याण समितीचा प्रभार जी अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा भटक्या जमातीची किंवा विमुक्त जातीची व्यक्ती असेल अशा दुसऱ्या सभापतीकडे सोपवण्यात येईल.]

(४) (क) उपाध्यक्ष हा, अनुसूचित जातीची किंवा अनुसूचित जमातीची किंवा भटक्या जमातीची किंवा विमुक्त जातीची व्यक्ती असेल आणि अशा जातीतील किंवा जमातीतील निवडून आलेला दुसरा परिषद सदस्य नसेल तर, तो समाजकल्याण समितीचा सभापती असेल ;

(ख) जर निवडून आलेल्या परिषद सदस्यांमध्ये,—

(एक) अशा जातीतील किंवा जमातीतील फक्त एकच परिषद सदस्य असेल तर (जिल्हा परिषदेचा अध्यक्ष म्हणून तो आधीच निवडून आला नसेल तर, तो समाजकल्याण समितीचा सभापती असेल ;

[४]* * * * *

**स्पष्टीकरण.**— या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ, जी व्यक्ती, कलम ८०, पोट-कलम (१) मधील [५][खंड(क), उप खंड (एक), परिच्छेद **(ख)**] च्या स्पष्टीकरणाखाली, समाजकल्याण समितीवर अनुसूचित जातींसाठी किंवा अनुसूचित जमातींसाठी राखून ठेवलेल्या जागांपैकी कोणत्याही जागेवर निवडून येण्यास [६][* *] पात्र असेल ती व्यक्ती, उक्त समितीचा सभापती म्हणून निवडून येण्यास [६][* *] सुध्दा पात्र असेल.

(५) राहिलेल्या चार विषय समित्यांचा प्रभार जिल्हा परिषद या बाबतीत निर्धारित करील अशा राहिलेल्या दोन सभापतींकडे सोपवील :

[७]* * * * *

[८][“(६) विषय समितीच्या सभापतीच्या नेमणुकीच्या पदावधीच्या बाबतीत कलम ८३ च्या तरतुदी योग्य त्या फेरफारासह लागू होतील.”]

---

१ सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ५(क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४, कलम ३ द्वारे पोट-कलम (२अ) दाखल करण्यात आले.

३ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम २७(३) द्वारे पोट-कलम (३) मूळ कलमाऐवजी दाखल करण्यात आले.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २१, कलम ७१(१)(अ) द्वारे उप खंड (दोन), (तीन) व परंतुक वगळण्यात आले.

५ वरील अधिनियमाच्या कलम ७१ (३) (ब) (दोन) द्वारे हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ७१ (३) (ब) (एक) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम ७१ (२) अन्वये परंतुक वगळण्यात आले.

८ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ कलम ७ द्वारे पोट-कलम (६) ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

विषय समित्यांच्या सभापतीस द्यावयाचे मानधन.

८४. [1][(१) कलम ८५ च्या तरतुदींना अधीन राहून, कलम ८३ मध्ये निर्देश करण्यात आलेल्या (उपाध्यक्षाव्यतिरिक्त इतर) प्रत्येक सभापतीला दरमहा [2][चार हजार रुपये] एकत्रित मानधन मिळेल.]

(२) [3][प्रत्येक सभापतीसाठी, भाडे न घेता सुसज्ज निवासस्थानाची सोय करून देता येईल किंवा त्याऐवजी राज्य शासन या बाबतीत जे नियम करील त्या नियमांना अधीन राहून, जिल्हा परिषदेस योग्य वाटेल असा घरभाडे भत्ता त्यास देता येईल.] आणि त्यास राज्य शासन विहित करील असा प्रवास भत्ता व इतर भत्ते मिळण्याचा हक्क असेल. [4]* * *

(३) या कलमाखाली सभापतीस मानधन किंवा कोणतेही भत्ते किंवा सुखसोयी मिळतात, केवळ याच कारणावरून तो, परिषद सदस्य म्हणून किंवा पंचायत समितीचा सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा असा परिषद सदस्य किंवा पंचायत समितीचा सदस्य होण्यास निरर्ह ठरविला जाणार नाही.

आदेशाद्वारे मानधनाच्या रकमेत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[5][८४क. कलमे ४६, ४७अ, ६९ आणि ८४ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनाला अध्यक्ष, उपाध्यक्ष, पंचायत समितीचा सभापती व उप सभापती किंवा समितीचे सभापती यांना देण्यात येणाऱ्या मासिक मानधनाच्या रकमेत वेळोवेळी आदेश काढून त्याद्वारे फेरफार करता येईल.]

विषय समित्यांच्या सभापतीस अनुपस्थिती रजा देणे आणि परिणामस्वरूप तरतुदी.

८५. (१) विषय समितीच्या सभापतीस, वर्षातून तीस दिवसांहून अधिक नाही इतक्या कालावधीसाठी परवानगीशिवाय अनुपस्थित राहता येईल ; आणि स्थायी समिती त्यास तीस दिवसांहून अधिक कालावधीची परंतु एका वर्षात एकूण नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतकी अनुपस्थिती रजा देऊ शकेल ; आणि राज्य शासन त्यास नव्वद दिवसांपेक्षा जास्त कालावधीची अनुपस्थिती रजा देऊ शकेल ; परंतु कोणत्याही एका वर्षात एकशे ऐंशी दिवसांहून अधिक असणारी कोणतीही रजा देण्यात येणार नाही.

(२) विषय समितीच्या सभापतीस पोट-कलम (१) खाली तीस दिवसांपेक्षा जास्त होणाऱ्या कोणत्याही अनुपस्थितीच्या कालावधीमध्ये मानधन मिळण्याचा हक्क असणार नाही.

(३) राज्य शासनाकडून या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वैद्यकीय प्राधिकाऱ्याने रीतसर प्रमाणित केलेल्या आजाराच्या कारणावरुन, जेव्हा सभापती आपल्या पदावधीत नव्वद दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अनुपस्थित असेल तेव्हा त्या बाबतीत पोट-कलम (२) मधील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

---

१ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १०, कलम ५(अ) अन्वये मूळ पोट-कलम (१) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११, कलम ५ अन्वये "एक हजार रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ८, कलम ७ अन्वये "प्रत्येक सभापतीसाठी" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "जागेची तरतूद करण्यात आली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला व तो नेहमीच तसा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

४ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १०, कलम ५(ब) अन्वये "उपाध्यक्षास" या शब्दांनी सुरू होणारा आणि "हक्क असेल" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

५ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११, कलम ६ अन्वये कलम ८४क समाविष्ट करण्यात आले.

(४) सभापतीने जर इतर कोणत्याही पीठासीन प्राधिकाऱ्याचे अधिकारपद धारण केले तर, अशा अधिकारपदांपैकी ज्या अधिकारपदाची तो निवड करील केवळ त्या एकाच अधिकारपदाशी संलग्न असलेले मानधन मिळण्याचा त्यास हक्क असेल.

८६. विषय समितीच्या [1][निवडून दिलेल्या किंवा स्वीकृत करून घेतलेल्या] सभापतीस, अध्यक्षास संबोधून आपल्या अधिकारपदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल, [2][आणि लागोलाग त्याचे अधिकारपद रिकामे होईल.] [3][राजीनाम्याची नोटीस विहित केलेल्या रीतीने सुपूर्द करण्यात येईल.] विषय समितीच्या सभापतीचा राजीनामा.

८७. [4][विषय समितीच्या सभापतीविरुद्ध आणलेल्या अविश्वासाच्या ठरावावर विचार करण्यासाठी] [5][जिल्हाधिकारी] [6][ज्यांना त्या त्या वेळी जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्याचा व त्यात मतदान करण्याचा हक्क असेल अशा] [7]* * * एकूण परिषद सदस्यांच्या [8][ [9][एक तृतीयांशापेक्षा कमी नाही] इतक्या परिषद सदस्यांनी मागणी केली असता [10][जिल्हा परिषदेची] विशेष बैठक बोलावली. अशी मागणी करणारे मागणीपत्रावर सही करतील आणि ते शासन विहित करील अशा नमुन्यात व त्या रीतीने केलेले असेल] ; आणि लागोलाग कलम ४९ च्या तरतुदी, परिषदेचा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष याच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या विषय समितीच्या सभापतीविरुध्द करण्यात आलेल्या अशा अविश्वासाच्या ठरावाच्या संबंधात लागू होतील : विषय समितीच्या सभापतीविरुध्द अविश्वासाचा ठराव.

[11][परंतु, महिला व बालकल्याण समितीच्या अध्यक्षाविरुध्दचा ठराव, जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीमध्ये भाग घेण्याचा व मतदानाचा त्या त्या वेळी हक्क असणाऱ्या, परिषद सदस्यांच्या एकूण संख्येपैकी तीन-चतुर्थांशापेक्षा कमी नसेल इतक्या बहुमतानेच संमत करता येईल]:

[12][ [13][परंतु, आणखी असे की, विषय समितीच्या सभापतीच्या निवडणुकीच्या दिनांकापासून [14][सहा महिन्यांच्या] कालावधीत असा कोणताही अविश्वासाचा ठराव आणता येणार नाही.] :

[15][ [16][परंतु, तसे की, अविश्वासाचा ठराव मांडण्यात आला नसेल किंवा, यथास्थिति, फेटाळण्यात आला असेल तर, विशेष बैठकीच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालामध्ये कोणताही नवीन अविश्वासाचा ठराव आणता येणार नाही.]

---

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ५, कलम ५ द्वारे "निवडलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ३८ द्वारे "आणि अध्यक्ष" या शब्दांनी सुरु होणाऱ्या व "अमलात येईल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४३, कलम १६ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम १७ द्वारे "सहकारी सभासद वगळून" या शब्दांनी सुरू होणाऱ्या "व अविश्वासाचा ठराव आणता येईल" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४, कलम ४ द्वारे मूळ मजकुराऐवजी "अध्यक्षाने" हा शब्द दाखल करण्यात आला व सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम २८(अ) अन्वये "अध्यक्षाने" याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

६ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम २८(ब) द्वारे, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

७ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २१, कलम ७२ द्वारे, "सहयोगी परिषद सदस्याव्यतिरिक्त" हा मजकूर वगळण्यात आले.

८ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १२, कलम ५(१) द्वारे "एक तृतीयांश पेक्षा कमी नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९ सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २७ याच्या कलम ८ अन्वये "एक पंचमांशापेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१० सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४, कलम ४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

११ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २८ याच्या कलम ७(क) द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

१२ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४६, कलम ६ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

१३ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २८ याच्या कलम ७(ख) द्वारे, हा मजकूर दाखल करण्यात आला.

१४ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १२, कलम ५(२) द्वारे "एक वर्षाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१५ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ५१, याच्या कलम ५ द्वारे, हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

१६ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २८ याच्या कलम ७(ग) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

विषय समितींच्या सभापतीस अधिकारपदावरून दूर करणे.

८८. विषय समितीच्या सभापतीने आपली कर्तव्ये पार पाडीत असतांना केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा हयगयीबद्दल किंवा आपले कर्तव्य पार पाडण्याच्या त्यांच्या असमर्थतेबद्दल किंवा ते पार पाडण्यात त्याने सतत हेळसांड करण्याबद्दल किंवा कोणत्याही लज्जास्पद वर्तनामुळे दोषी ठरल्याबद्दल, राज्य शासनास कलम ८७ च्या तरतुदींस बाध न देता त्यास अधिकारपदावरुन दूर करता येईल ; आणि अशा रीतीने अधिकारपदावरून दूर करण्यात आलेला सभापती हा परिषद सदस्य म्हणून आपल्या उरलेल्या पदावधीमध्ये सभापती म्हणून पुन्हा निवडून येण्यास पात्र असणार नाही :

परंतु, सभापतीस आपले स्पष्टीकरण देण्याची संधी देण्यात आल्याशिवाय त्यास अधिकारपदावरुन दूर करण्यात येणार नाही.

विषय समितीच्या सभापतीचे रजेवाचून अनुपस्थित राहिल्याचा परिणाम.

८९. [१][राज्य शासनाने याबाबतीत केलेल्या नियमांना अधीन राहून, विषय समितीचा जो सभापती] एका वर्षात एकूण तीस दिवसांहून अधिक कालावधीकरिता स्वतः [२][कामगार] अनुपस्थित राहील त्यास कलम ८५ खाली अशा प्रकारे अनुपस्थिती रजा देण्यात आलेली नसेल तर तो त्या विषय समितीचा सभापती असण्याचे बंद होईल.

विषय समितीच्या सभापतीचे अधिकारपद नैमित्तिकरीत्या रिकामे होणे.

९०. (१)(क) ज्याच्याविरुध्द कलम ८७ खाली अविश्वासाचा ठराव संमत करण्यात आला असेल, किंवा

(ख) ज्यास कलम ८८ खाली अधिकारपदावरून दूर करण्यात आले असेल , किंवा

(ग) कलम ८९ खाली जो सभापती म्हणून असण्याचे बंद झाले असेल, असा विषय समितीचा सभापती हा जर उपाध्यक्षही असेल तर, यथास्थिति, ज्या दिनांकाला अशा सभापतीचे अधिकारपद रिकामे होईल किंवा त्यास, अधिकारपदावरून दूर करण्यात येईल किंवा तो, असा सभापती असण्याचे बंद होईल त्या दिनांकापासून त्याचे उपाध्यक्षाचे अधिकारपद रिकामे झाले आहे असे मानण्यात येईल.

(२) सभापतीची रिकामी जागा, कलम ८३ च्या तरतुदींमध्ये दिलेल्या रीतीने भरण्यात येईल [३][आणि नवीन सभापती, ज्या व्यक्तीच्या जागी त्याला निवडून देण्यात आले असेल त्या व्यक्तीने ते पद रिक्त झाले नसते तर जेवढ्या मुदतीकरिता पद धारण केले असते, तेव्हाढयाच मुदतीकरिता ते पद धारण करील.]

(३) विषय समित्यांच्या गटाचा सभापती कोणत्याही एका विषय समितीचा सभापती असण्याचे बंद झाले तर तो इतर विषय समित्यांचा सभापती असण्याचे बंद झाले आहे असे मानण्यात येईल.

कार्यभार विषय समितीच्या नवीन सभापतीच्या स्वाधीन करण्यास कलम ५३ च्या तरतुदी लागू असणे.

**[४][९०क.** नवीन अध्यक्षाकडे किंवा उपाध्यक्षाकडे कार्यभार स्वाधीन करण्यासंबंधीच्या कलम ५३ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या नवीन सभापतीकडे कार्यभार स्वाधीन करण्याच्या संबंधात लागू होतील.]

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३९(अ) द्वारे "विषय समितीचा सभापती " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ३९(ब) द्वारे "जिल्ह्यात " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४, कलम ११ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला

४ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४० द्वारे कलम ९०क समाविष्ट करण्यात आले.

**९१.** (१) या अधिनियमाच्या वा त्याखाली राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून,— स्थायी समिती व विषय समिती यांच्या सभापतीचे अधिकार व कार्ये.

(क) स्थायी समितीचा सभापती किंवा विषय समितीचा सभापती—

(एक) समितीच्या बैठकी बोलावील, त्या बैठकीचे अध्यक्षपद धारण करील व त्याचे कामकाज चालवील ; आणि

(दोन) समितीचे अभिलेख पाहू शकेल ;

(ख) अशा कोणत्याही समितीच्या सभापतीस, समितीकडे नेमून देण्यात आलेल्या विषयांच्या संबंधात,—

(एक) जिल्हा परिषदेने कामावर लावलेल्या किंवा तिच्या नियंत्रणाखालील अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागवता येईल ;

(दोन) जिल्हा परिषदेच्या ताब्यातील कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली असलेल्या कोणत्याही परिसंस्थेमध्ये किंवा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या निदेशानुसार हाती घेतलेले कोणतेही काम किंवा विकास परियोजनेचे काम चालू असेल त्या ठिकाणी प्रवेश करता येईल व त्याचे निरक्षण करता येईल :

परंतु, स्थायी समितीच्या सभापतीस, कोणत्याही विषय समितीकडे नेमून देण्यात आलेल्या कोणत्याही विषयाच्या संबंधातसुध्दा या खंडातील अधिकाराचा वापर करता येईल.

(२) स्थायी समितीच्या सभापतीस, जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील अधिकारपद धारण करणाऱ्या पहिल्या वर्गाच्या सेवेतील (मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून अन्य) किंवा दुसऱ्या वर्गाच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यास, दोन महिन्यांपेक्षा जास्त, परंतु चार महिन्यांपेक्षा जास्त नसेल, अशा कोणत्याही कालावधीची अनुपस्थिती रजा देता येईल.

[1][**९१क.** (१) अध्यक्षाची किंवा उपाध्यक्षाची किंवा त्या दोघांची किंवा स्थायी समितीच्या सभापतीची निवडणूक होईपर्यंत किंवा त्या पीठासीन प्राधिकाऱ्यांपैकी कोणताही प्राधिकारी जिल्ह्यामध्ये तीस दिवसांपेक्षा अधिक कालावधीसाठी सतत किंवा रजेच्या कारणास्तव अनुपस्थित राहिल्यास त्या कालावधीत राज्य शासन याबाबत राजपत्रातील अधिसुचनेद्वारे विनिर्दिष्ट करील [2][किंवा, यथास्थिति, नियुक्त करील] अशांपैकी कोणताही प्राधिकारी [3][किंवा अधिकारी,] स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या संबंधाने पीठासीन प्राधिकाऱ्याच्या या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करील व त्याची कर्तव्य पार पाडील. जागा रिकाम्या असताना अधिकारांचा वापर करण्यासाठी व कर्तव्ये पार पाडण्यासाठी पीठासीन प्राधिकारी नेमण्याचा शासनाचा अधिकार.

(२) जेव्हा अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हा या कलमाखाली इतर कोणत्याही पीठासीन प्राधिकाऱ्याचे अधिकारपद धारण करीत असेल तेव्हा, अधिकारपदांपैकी तो निवड करील अशा केवळ एकाच अधिकारपदाला सलग्न असलेले मानधन मिळण्याचा त्याला हक्क असेल.]

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ४१ अन्वये कलम ९१क समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २१, कलम ७३(२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७३(१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची अधिकारपदे एकत्रच रिकामी झाली असताना अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी अधिकाऱ्यांना प्राधिकृत करण्याचे राज्य शासनाचे अधिकार.

[1][९१ख. अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची अधिकारपदे कोणत्याही कारणांमुळे कोणत्याही वेळी, एकत्रच रिकामी झाली असतील अशा बाबतीत, या अधिनियमात किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमात काहीही अंतर्भूत असेल तरी, नवीन अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची निवडणूक होईपर्यंत, राज्य शासनाला राजपत्रात आदेश प्रसिध्द करून, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला किंवा त्याबाबतीत, त्यांच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर अधिकाऱ्याला,-

*(क) परिषद सदस्यांचे अधिकार वगळून, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्या यांचे सभापती यांचे अधिकार धरून जिल्हा परिषद, स्थायी समिती व विषय समित्या आणि इतर समित्या यांचे सर्व अधिकार वापरण्यास आणि त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यास, किंवा

(ख) अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्या आणि इतर समित्या यांचे सभापती यांचे सर्व अधिकार वापरण्यास व त्यांची सर्व कर्तव्ये पार पाडण्यास,

प्राधिकृत करता येईल.]

विनियमांद्वारे विहित करावयाची समित्यांची कर्तव्ये, कार्यपध्दती इत्यादी.

९२. [2][(१)] या अधिनियमान्वये किंवा त्याखाली अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, स्थायी समितीने व विषय समित्यांपैकी प्रत्येक विषय समितीने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये आणि त्या समित्यांस नेमून द्यावयाचे जिल्हा यादीत नमूद केलेले विषय हे, विनियमांद्वारे विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील, [3]* * * *

[2][(२) या बाबतीत केलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने, विषय समिती, जिल्हा परिषदेने फर्माविल्यास, कोणत्याही विकास परियोजनेवर बोलणी करण्याच्या किंवा उक्त परियोजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी इतर कोणत्याही विषय समित्यांबरोबर संयुक्त बैठक घेईल आणि (सभापतीने अशा संयुक्त बैठकीचे अध्यक्षपद स्वीकारणे, एखाद्या व्यक्तीने अशा बैठकीचा सचिव म्हणून

---

सर्व पीठासीन अधिकाऱ्यांची अधिकारपदे एकसमयावच्छेदेकरून, रिकामी झाली असतील त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, अमरावती यांनी केलेल्या कृती विधिग्राह्य ठरवणे.

१ सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १७, कलम २ अन्वये कलम ९१ख समाविष्ट करण्यात आले.

* सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १७, कलम ३ खालीलप्रमाणे आहे :-

"३. मुख्य अधिनियम आणि त्याखाली तयार करण्यात आलेले नियम यांत काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि विषय समित्यांचे सभापती यांची अधिकारपदे एकसमयावच्छेदेकरून रिकामी झाली असतील अशा वेळी, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमात समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ९१ख च्या खंड (अ) खाली, राज्य शासनाने अमरावती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला १८ फेब्रुवारी १९८२ पासून प्राधिकृत केले आहे, असे मानण्यात येईल ; आणि उक्त खंड (अ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना आणि अशी कर्तव्ये पार पाडताना केल्याचे अभिप्रेत असेल अशी उक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने केलेली कोणतीही कार्यवाही किंवा कोणतीही कृती त्यांच्याकडून विधिग्राह्यपणे आणि विहित रीतीने करण्यात आल्याचे मानण्यात येईल, आणि उक्त जिल्हा परिषदेच्या नवीन अध्यक्षाची किंवा उपाध्यक्षाची निवड होईपर्यंत तो, ते सर्व अधिकार वापरणे आणि ती सर्व कर्तव्ये पार पाडणे चालू ठेवील."

२ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४३, कलम १२ अन्वये कलम ९२ यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व त्या कलमाचे पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

३ सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २२, कलम ५ अन्वये "परंतु समाजकल्याणाच्या संबंधातील" या शब्दांनी सुरू होणारा व "स्थायी समितीस वाटून देण्यात आले आहेत" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

काम करणे, राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कोणत्याही बँकेचे प्राधिकारी यास उपस्थित राहण्यास फर्माविणे, या तरतुदी समाविष्ट करुन) अशा कोणत्याही संयुक्त बैठकीत अनुसरावयाची कार्यपध्दती जिल्हा परिषदेने केलेल्या विनियमात तरतूद केल्याप्रमाणे असेल.]

९३. [1]* * * *

प्रकरण पाच

**कार्यकारी अधिकारी**

९४. (१) प्रत्येक जिल्हा परिषदेसाठी एक मुख्य कार्यकारी अधिकारी [2][व एक किंवा अधिक उप मुख्य कार्यकारी अधिकारी असतील] व त्यांची नेमणूक राज्य शासन करील.

मुख्य कार्यकारी अधिकारी आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नेमणूक.

(२) प्रत्येक मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी हे राज्य शासनाकडून बदली केले जाण्यास पात्र असतील.

(३) जर जिल्हा परिषदेच्या एखाद्या विशेष बैठकीत [3][ज्यांना त्या त्या वेळी जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असेल अशा] (सहयोगी परिषद सदस्यांव्यतिरिक्त) एकूण परिषद सदस्यांपैकी दोन तृतीयांशाहून कमी नसेल इतक्या परिषद सदस्यांनी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास अधिकारपदावरून परत बोलावण्याची राज्य शासनाकडे मागणी करणाऱ्या ठरावाच्या बाजूने [3][मत दिल्यास], राज्य शासन अशा अधिकाऱ्यास परिषदेच्या सेवेतून परत बोलवील.

९५. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, या अधिनियमाच्या तरतुदी कार्यान्वित करण्याच्या प्रयोजनाकरिता असणारे कार्यकारी अधिकार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये निहित असतील व तो,—

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे अधिकार व कार्ये.

(क) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याखाली त्याच्यावर विनिर्दिष्टपणे लादण्यात आलेल्या किंवा त्यास प्रदान करण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करील. [4]* * * *

(ख) राज्य शासनाने केलेल्या नियमानुसार जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये ठरवून देईल ;

[5][(क) आजारीपणामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसल्यास, जिल्हा परिषदेच्या प्रत्येक बैठकीस उपस्थित राहील आणि बैठकीत ज्या बाबींवर चर्चा चालू असेल तिच्या संबंधात पीठासीन प्राधिकाऱ्याच्या परवानगीने माहिती किंवा स्पष्टीकरण देऊ शकेल.],

---

१ सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३४, कलम ३ द्वारे कलम ९३ वगळण्यात आले.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम २९(अ) द्वारे "व एक उप मुख्य कार्यकारी अधिकारी असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम २९(ब) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ३० (१)(अ) द्वारे "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ३० (१)(ब) द्वारे खंड(क) समाविष्ट करण्यात आला.

(२) हा अधिनियम आणि त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून मुख्य कार्यकारी अधिकारी-

(क) [१][(एक) जिल्हा परिषदेच्या कोणत्याही समितीच्या आणि जिल्ह्यामधील कोणत्याही पंचायत समितीच्या बैठकींना हजर राहण्यास ;]

(दोन) जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागवण्यास ;

(तीन) वर्ग एक आणि वर्ग दोनच्या अधिकाऱ्यांना दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अनुपस्थिती रजा मंजूर करण्यास ;

[२][(तीन-क) कोणत्याही अधिकारी रजेवर असताना किंवा त्याची बदली झाली असताना त्याच्या अनुपस्थितीत, त्याच्या अधिकारपदाचा कार्यभार धारण करण्यासाठी आणि त्या अधिकारपदाची कामे पार पाडण्यासाठी तात्पुरती व्यवस्था करण्यास ;]

(चार) जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून स्पष्टीकरण मागवण्यास ;

हक्कदार असेल.

[३][[४][(ख) राज्य शासन, याबाबतीत वेळोवेळी देईल अशी कोणतयाही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून,] कलम २३९, खंड (ख) खाली रचना करण्यात आलेल्या जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन) आणि जिल्हा सेवा (वर्ग तीन) यांमधील अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक, राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या अभिकरणाने किंवा संघटनेने निवड केलेल्या उमेदवारांच्या यादीतून करील.]

(खख) विहित केलेल्या रीतीने वर्ग चारच्या सेवेमधील कर्मचाऱ्यांची नेमणूक करील.]

(ग) जिल्हा परिषदेच्या सर्व कामांच्या कार्यान्वयनावर देखरेख व नियंत्रण ठवील.

(घ) जिल्हा परिषदेच्या सर्व कामांचे व विकास योजनांचे जलद कार्यान्वयन करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करील.

(ङ) जिल्हा परिषदेच्या आणि (पंचायत समिती वगळून) तिच्या समित्यांच्या बैठकींच्या कामकाजांशी संबंधित असलेली सर्व कागदपत्रे आणि दस्तऐवज आपल्या अभिरक्षेत ठेवील.

(च) जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या वर्ग एक आणि वर्ग दोनच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या कामांचे दरवर्षी मुल्यमापन करील आणि त्यावर आपले मत गोपनीय रीत्या व्यक्त करील आणि ते राज्य शासन विहित करील अशा प्राधिकाऱ्याकड पाठवील आणि जिल्हा परिषदेच्या वर्ग तीन आणि वर्ग चारच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या कामाविषयी असे अहवाल लिहिण्यासाठी कार्यपध्दती ठरवून देईल.

(छ) जिल्हा निधीतून पैसे काढील व त्याचे संवितरण करील.

(ज) जिल्हा परिषदेचे कार्यकारी प्रशासन आणि तिचे हिशेब व अभिलेख या बाबतीतील जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्या कृतींवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवील ; आणि

(झ) राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कार्य पार पाडील.

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या अधिकारांचे प्रत्यायोजन.

**९६.** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी लेखी आदेशाद्वारे सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या ज्यास अधिकार देईल अशा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली व त्यास ज्या कोणत्याही शर्ती व मर्यादा घालून देणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधिनतेने या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास दिलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही

---

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम ३०(२) द्वारे मूळ उप खंडाऐवजी हा उप खंड (एक) दाखल करण्यात आला.

२ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४३, कलम ५३ द्वारे उप खंड (तीन-क) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६१, कलम ४ अनुसूचीद्वारे खंड(ब) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

४ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४, कलम ४ द्वारे खंड (ख) दाखल करण्यात आला.

अधिकारांचा वापर करता येईल किंवा त्याच्यावर लादण्यात आलेल्या किंवा त्याच्यामध्ये निहित केलेल्या कर्तव्यांपैकी व कार्यांपैकी कोणतीही कर्तव्ये व कार्ये पार पाडता येतील.

(२) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा असा प्रत्येक आदेश अध्यक्ष, स्थायी समिती आणि संबंधित विषय समिती किंवा विषय समित्या यांच्यापुढे माहितीसाठी ठेवण्यात येईल.

कार्यकारी अधिकाऱ्याची नियुक्ती व त्याचे अधिकार आणि कार्ये.

[१][९६क. (१) राज्य शासन वेळोवेळी निश्चित करील अशा प्रत्येक निवडक एकात्मीकृत जनजाती विकास प्रकल्प गटासाठी राज्य शासनाकडून कार्यकारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येईल.

(२) निवडक एकात्मीकृत जनजाती विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य शासन कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी कार्यकारी अधिकाऱ्यांना प्रदान करील आणि नेमून देईल असे मुख्य कार्यकारी अधिकारी वापरतील आणि अशी कर्तव्ये किंवा कार्ये पार पाडतील.]

गट विकास अधिकाऱ्याची नेमणूक

**९७.** प्रत्येक पंचायत समितीसाठी एक गट विकास अधिकारी असेल व त्याची नेमणूक राज्य शासन करील.

गट विकास अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये.

**९८.** (१) हा अधिनियम आणि त्याखाली केलेले कोणतेही नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून गट विकास अधिकाऱ्यास—

(क) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण आदेशांना अधीन राहून, पंचायत समितीच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या जिल्हा परिषदेच्या वर्ग तीन किंवा वर्ग चारच्या सेवेतील अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना अनुपस्थिती रजा मंजूर करता येईल ; आणि

(ख) अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशेब, अहवाल किंवा स्पष्टीकरण मागविता येईल.

(२) गट विकास अधिकारी—

(क) पंचायत समितीच्या बैठकीच्या कामकाजाशी संबंधित असलेली सर्व कागदपत्रे व दस्तऐवज आपल्या अभिरक्षेत ठेवील ;

(ख) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही या अधिनियमाच्या तरतुदी गटात कार्यान्वित करण्यासाठी त्या गटात कार्यकारी अधिकारांचा वापर करील ;

(ग) [२][कलम १५५, पोट-कलम (६) आणि कलम १८८] या खाली पंचायत समितीस प्रदेय असणाऱ्या अनुदानाच्या किंवा अनुदानांच्या रकमांतून पैसे काढील व संवितरित करील ;

(घ) गट अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामांच्या व विकास प्रयोजनेच्या संबंधात, राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, मालमत्ता संपादन करण्यास किंवा तिची विक्री किंवा हस्तांतरण करण्यास मंजुरी देण्याच्या अधिकारांचा वापर करील.

जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखाचे अधिकार व कार्ये.

**९९.** हा अधिनियम आणि त्याअन्वये केलेले नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून, जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभाग प्रमुखास,—

(क) आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कामांच्या व विकास परियोजनांच्या बाबतीत तांत्रिक मंजुरी देता येईल ;

(ख) तो प्रत्येक वर्षी, आपल्या विभागात काम करणाऱ्या वर्ग दोनच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या कामाचे मुल्यमापन करील आणि त्याबाबतचे आपले मत गोपनीयरीत्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठवील ;

[३][(ग) आजारपणामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झाला नसल्यास, तो जिल्हा परिषदेच्या व जिचा तो सचिव असेल अशा समितीच्या प्रत्येक बैठकीस उपस्थित राहील आणि त्यास, बैठकीत ज्या बाबींवर चर्चा चालू असेल तिच्या संबंधात पीठासीन प्राधिकाऱ्याच्या परवानगीने माहिती किंवा स्पष्टीकरण देता येईल.]

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ३(क) द्वारे कलम ९६ क समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३३, कलम १८ द्वारे "कलम १५५ व १८८" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ६, कलम ३१ द्वारे खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

प्रकरण सहा

## जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि समित्या यांचे अधिकार व कर्तव्ये

जिल्हा परिषदेचे प्रशासकीय अधिकार व कर्तव्ये

**१००.** (१) (क) पोट-कलम (२) खाली वेळोवेळी सुधारण्यात येणाऱ्या पहिल्या अनुसूचीमध्ये (जिचा या अधिनियमात "जिल्हा यादी " असा उल्लेख केला आहे) नमूद केलेल्या विषयांपैकी सर्व किंवा कोणत्याही विषयांच्या संबंधात परिषदेच्या स्वाधीन करण्यात आलेल्या जिल्हा निधीतून जेथवर तरतूद करता येणे शक्य असेल तेथवर, जिल्ह्यामध्ये वाजवी तरतूद करणे आणि जिल्ह्यात अशा कोणत्याही विषयाशी संबंधित असलेली कामे किंवा विकास परियोजना अंमलात आणणे किंवा ती सुस्थितीत ठेवणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल.

(ख) या पोट-कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जिल्हा यादीत नमूद केलेल्या कोणत्याही विषयांच्या संबंधात पूर्ण झालेली अशी सर्व कामे किंवा विकास परियोजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करील व राज्य शासनास, चालू असलेली तशाच प्रकारची कामे व विकास परियोजना जिल्हा परिषदेकडे तशाच रीतीने हस्तांतरीत करता येतील.

(ग) अशा हस्तांतरणानंतर, ती कामे व विकास परियोजना जिल्हा परिषदेमध्ये निहित होतील, परंतु ती खंड (ख) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्याप्रमाणे अशा अटिंच्या व शर्तीच्या, [१] [ ज्यामध्ये जिल्हा परिषदेच्या संमतीने वेळोवेळी फेरबदल करता येतील] अधीन असतील :

परंतु कोणत्याही अटींच्या किंवा शर्तीचा भग करण्यात आल्यास, परिषदेमध्ये निहित असलेली मालमत्ता, राज्य शासनामध्ये पुन्हा निहित होईल आणि राज्य शासनाने तिचा परत कब्जा घेणे हे विधिसंमत असेल :

[२] [ परंतु आणखी असे की, वर म्हटल्याप्रमाणे हस्तांतरीत करण्यात आलेली कोणतीही कामे किंवा विकास परियोजना याची स्वतः राज्य शासनाने व्यवस्था ठेवणे किंवा ती सुस्थितीत ठेवणे किंवा कार्यान्वित करणें आवश्यक आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास, [३] [ किंवा वर म्हटल्याप्रमाणे हस्तांतरीत करण्यात आलेली कोणतीही अशी कामे किंवा विकास परियोजना याच्याशी संबध्द असलेल्या कोणत्याही मालमत्तेची राज्य शासनाला आवश्यकता असेल] तर राज्य शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी कामे किंवा विकास परियोजना [४] [ किंवा, यथास्थिती, अशा कामाशी किंवा विकास परियोजनाशी संबध्द असलेली मालमत्ता ] ही राज्य शासन आणि जिल्हा परिषद यांनी मान्य केलेल्या कोणत्याही अटींना व शर्तींना अधीन राहून , तीत नमूद केलेल्या दिनांकापासून जिल्हा परिषदेमध्ये निहित असण्याचे बंद होईल आणि ती पुन्हा राज्य शासनामध्ये निहित होईल :]

[५] [ परंतु आणखी असेही की, राज्य शासनाच्या मते, उपरोक्तप्रमाणे हस्तांतरीत केलेली कोणतेही काम किंवा विकास परियोजना बंद करणे आवश्यक असेल तर, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेले काम किंवा विकास परियोजना किंवा अशा कोणत्याही कामाशी किंवा विकास परियोजनेशी संबध्द असलेली कोणतीही मालमत्ता ही त्यात नमूद केलेल्या दिनांकापासून, जिल्हा परिषदेमध्ये निहित असण्याचे बंद होईल आणि ती पुन्हा राज्य शासनामध्ये निहित होईल असा निदेश देता येईल. ]

---

१ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १९ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १४ (अ) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १९ (ब) (एक) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम १९ (ब) (दोन) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

५ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३२ (अ) द्वारे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१] [ (ग-क१) (क) खंड (क) आणि पहिल्या अनुसूचीतील नोंदी ५८ आणि ५९ यात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हा परिषदेस, राज्य शासनाने दिलेल्या सहायक अनुदानाच्या मदतीने व शासनाच्या अभिकरणामार्फत अशा प्रत्येक परियोजनेसाठी एक लाख रूपये किंवा त्यापेक्षा अधिक तितक्या निव्वळ भाडवली खर्चासह नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासंबंधीच्या परियोजनांची (कामांसह) अंमलबजावणी हाती घेता येईल.

(ख) नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासंबंधीच्या परियोजनेचा निव्वळ भांडवली खर्च एक लाख रूपये किंवा त्याहून अधिक असेल अशी परियोजना पार पाडण्यासाठी राज्य शासनाने व्यवस्था करावी अशी विनंती करण्यात आणि ती परियोजना विनिर्दिष्ट कालावधीत आपल्याकडे घेण्याचे अभिवचन देणाऱ्या जिल्हा परिषदेने संमत केलेल्या ठरावानुसार ती परियोजना राज्य शासन हाती घेईल तेव्हा, अशी परियोजना ती कार्यान्वित करण्याकरिता व ती सुस्थितीत ठेवण्याकरिता विनिर्दिष्ट कालावधीत आपल्याकडे घेणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल, कोणतीही अशी परियोजना पूर्ण झालेली असेल. परंतु ती, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती आणि मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अधिनियम, १९८१ यांच्या प्रारंभाच्या
१९८१ दिनांकापूर्वी जिल्हा परिषदेने, आपल्याकडे घेतलेली नसेल त्याबाबतीत, जिल्हा परिषद उक्त दिनांकापासून
चा तीस दिवसाच्या आत ती परियोजना आपल्याकडे घेईल व हा कालावधी अशा परियोजनेसाठी विनिर्दिष्ट
५६. कालावधी असेल आणि कोणतीही परियोजना उक्त दिनांकानंतर पूर्ण झालेली असेल त्याबाबतीत जिल्हा परिषद ती परियोजना राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा कालावधीत आपल्याकडे घेईल.]

[२] [ (ग-१) या कलमाचा खंड (ख) आणि (ग) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या कलम १२७ खाली प्राधिकृत करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास या कलमाखाली जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या कोणत्याही कामाचा किंवा विकास परियोजनेचा जिला लाभ झाला आहे अशा कोणत्याही व्यक्तीच्या आस्थापनेस किंवा कार्यालयास भेट देता येईल अथवा अशा व्यक्तीच्या अभिलेखांचे निरीक्षण करता येईल किंवा लेख्यांची लेखापरीक्षा करता येईल आणि आवश्यक असेल तर, अनुपालनासाठी अशा व्यक्तीला समुचित निदेश देता येतील.]

(घ) [३] [ खंड (ख) खाली हस्तांतरित केलेल्या] कामांच्या किंवा परियोजनांच्या संबंधत कोणत्याही संविदेखाली किंवा कराराखाली किंवा अन्यथा राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाविरूध्द बजावता येतील असे सर्व हक्क व दायित्वे ही जिल्हा परिषदेकडून किंवा जिल्हा परिषदेविरूध्द बजावता येतील [४] [ आणि खंड (ग) च्या [५] [ दुसऱ्या व तिसऱ्या परंतुकाखाली ] राज्य शासनामध्ये पुन्हा निहित झालेल्या कामाच्या किंवा परियोजनांच्या किंवा तत्संबध्द मालमत्तेच्या संबंधात कोणत्याही संविदेखाली किंवा कराराखाली किंवा अन्यथा, जिल्हा परिषदेकडून किंवा जिल्हा परिषदेविरूध्द बजावता येतील असे, सर्व हक्क व दायित्वे राज्य शासनाकडून किंवा राज्य शासनाविरूध्द बजावता येतील.]

---

१ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम २ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३२(ब) द्वारे खंड (ग-१) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ५ (अ) हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३२ (क) द्वारे दुसऱ्या परंतुकाच्या या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1] [ (ड) राज्य शासनाकडून या बाबतीत देण्यात येतील अशा कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांना अधीन राहून, प्रत्येक जिल्हा परिषदेस, दुसऱ्या अनुसूचीत नमूद केलेले विषय विचारात घेऊन, आपल्या अधिकारितेतील कोणत्याही पंचायत समितीस, जिल्हा परिषद या बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा प्रकारची कोणतीही कामे किंवा विकास परियोजना पार पाडण्यासाठी किंवा ती सुस्थितीत ठेवण्यासाठी दरवर्षी अनुदान देता येईल.]

(२) राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पहिल्या अनुसूचीतून कोणतीही नोंद वगळता येईल किंवा तिच्यात कोणतीही नोंद जादा दाखल करता येईल किंवा अशा कोणत्याही नोंदीत सुधारणा करता येईल आणि अधिसूचना काढण्यात आल्यानंतर अशा अनुसूचीत त्या अनुसार सुधारणा करण्यात आली आहे असे मानण्यात येईल :

परंतु --

(क) पहिल्या अनुसूचीतील कोणतीही नोंदी गाळण्यासंबंधीची अशी कोणतीही अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय काढता येणार नाही; आणि

(ख) इतर कोणतीही अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि अशा रीतीने ती ज्या अधिवेशनात ठेवण्यात आली असेल त्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ तीत जे फेरबदल करील त्यांना अधीन राहून ती राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

(३) जिल्हा परिषदेस, जिल्ह्यातील रहिवाश्यांचे आरोग्य, सुरक्षितता, शिक्षण, आराम, सोय यांचे किंवा त्यांच्या सामाजिक, आर्थिक किंवा सांस्कृतिक कल्याणाचे ज्यामुळे संवर्धन होण्याचा संभव असेल असे इतर कोणतेही काम किंवा उपाययोजना त्या जिल्ह्यात अमलात आणण्यासाठी ही तरतूद करता येईल.

(४) जिल्हा परिषद, स्थानिक साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करून जिल्ह्याचा योजनाबध्द विकास करण्याचा प्रयत्न करील, आणि त्या प्रयोजनासाठी, पंचायत समितीने आधीच तयार केलेल्या योजना लक्षात घेऊन वार्षिक व दीर्घ मुदतीच्या योजना तयार करील.

(५) या बाबतीत राज्य शासनाने केलेल्या नियमांना अधीन राहून जिल्हा परिषदेस, तिच्या बैठकीत संमत झालेल्या आणि तिच्या परिषद सदस्यांच्या एकूण संख्येच्या [2] [ दोनतृतीयांशपेक्षा कमी नाहीत इतक्या]. परिषद सदस्यांनी (सहयोगी परिषद सदस्यांव्यतिरिक्त) पाठिंबा दिलेल्या ठरावान्वये, जिल्ह्यातील कोणताही जाहीर स्वागत समारंभ, समारंभ किंवा करमणुकीचा कार्यक्रम यांसाठी तरतूद करता येईल किंवा जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषदेने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही संमेलनासाठी अंशदान देता येईल.

(६) अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती आणि सामाजिक दृष्ट्या व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले कोणेही वर्ग यांच्या स्थिति सुधारासाठी करावयाच्या उपाययोजनेच्या बाबतीत, आणि विशेषत: अस्पृश्यता निवारणाकरिता, जिल्हा परिषद, राज्य शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या निदेशांची व काढण्यात आलेल्या आदेशांची अंमलबजावणी करील आणि त्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषद पुरेशा रकमांची तरतूद करील.

(७) जिल्हा परिषद त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये किंवा त्याद्वारे तिच्याकडे सोपविण्यात आलेली कर्तव्ये व कार्ये पार पाडील

---

१ सन १९६[illegible] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम [illegible] उप खंड (ड) हा [illegible] दाखल करण्यात [illegible].

२ सन १९६[illegible] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible] कलम [illegible] द्वारा " [illegible] " या शब्दांऐवजी [illegible] करण्यात आले.

(८) जिल्हा परिषदेस [१] [तो जिल्हा ज्या महसुली जिल्ह्याचा भाग असेल त्या महसुली जिल्ह्यास्त या अधिनियमाखाली सिच्छाकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही कामांवर किंवा विकास परियोजनेवर] अशा जिल्ह्याबाहेर खर्च करता येईल.

(९) परिषद सदस्यास, पंचायत समितीच्या सदस्यांस आणि स्थायी समितीच्या, विषय समित्यांच्या व इतर कोणत्याही समितीच्या सदस्यांस, त्यांनी जिल्हा परिषदेच्या किंवा, यथास्थिति, पंचायत समितीच्या कामकाजाच्या प्रयोजनाकरीता केलेल्या सर्व प्रवास खर्च देण्यासाठी राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमानुसार पु... तरतूद करणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल.

(१०) जिल्हा परिषदेस, भारतातील कोणत्याही भागातील लोकांवर ओढवलेल्या कोणत्याही संकटास तोंड देण्यासाठी शासनाने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही निधीस अंशदान करता येईल.

**स्पष्टीकरण**.– एखादा निधी शासनाने पुरस्कृत केला आहे किंवा नाही याबाबत शंका उपस्थित झाल्यास आयुक्त त्या प्रश्नाचा निर्णय करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

(११) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या कामावर सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि नियंत्रण ठेवील.

[२] [**१०० (क)** संबधित जिल्ह्यातील एकापेक्षा अधिक गटामध्ये मोडणारे अनुसूचित क्षेत्र असणारी प्रत्येक अनुसूचित क्षेत्रामधील जिल्हा परिषदेचे अधिकार व कर्तव्ये जिल्हा परिषद.– अनुसूचित क्षेत्रामधील जिल्हा परिषदेचे अधिकार व कर्तव्ये

(एक) या भूमिसंपादन प्राधिकरण अनुसूचित क्षेत्रामधील कोणतीही जमीन विकास प्रकल्पांसाठी आणि अशा प्रकल्पांमुळे बाधित व्यक्तींचे अशा अनुसूचित क्षेत्रांमध्ये पुनर्वसन किंवा पुनर्वसाहत करण्यासाठी संपादन करण्यापूर्वी, सल्ला घेईल.

(दोन) प्रत्येक जिल्हा परिषद अनुज्ञप्ती प्राधिकरणाला,–

(अ) अशा अनुसूचित क्षेत्रांमधील गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खाणी भाडे पट्टयाने देणे;

(ब) गौण खनिजांचे समुपयोजन करण्यासाठी लिलावाद्वारे सवलत देणे यांसाठी अनुज्ञप्ती किंवा परवानगी देण्यापूर्वी अशा प्राधिकरणाकडे शिफारशी करण्यास सक्षम असेल;

(तीन) अनसूचित जनजातीच्या व्यक्तींच्या जमिनीचे हस्तांतरण किंवा अन्यसंक्रामण करण्यासंबंधात त्यावेळेपुरता अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी विचारात घेता, अनुसूचित जनजातीच्या व्यक्तीच्या जमिनीचे बेकायदेशीररीत्या हस्तांतरण किंवा अन्यसंक्रामण करण्यास प्रतिबंध करणे आणि कोणतीही बेकायदेशीररीत्या हस्तांतरित किंवा अन्यसंक्रामित जमीन त्यांना परत करणे या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल;

१९४७ चा मुंबई ३१. (चार) ज्या ज्या वेळी एखादी व्यक्ती अशा अनुसूचित क्षेत्रात सावकारीसाठी अनुज्ञप्ती मिळण्याकरिता अर्ज करील त्यावेळी मुंबई सावकार अधिनियम, १९४६ च्या कलम ३ अन्वये नियुक्त केलेल्या निबंधकाकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम असेल;

परंतु संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय हा, संबंधित जिल्हा परिषदेवर बंधनकारक राहील.]

---

१ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ४३ द्वारे "या अधिनियमाच्या" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "दिलेली असली पाहिजे" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, याच्या कलम ८ द्वारे कलम १०० नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

विवक्षित विषयांच्या बाबतीत पंचायत समिती प्रथमतः जबाबदार असणे.

१०१ (१) कलम १०० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (२) खाली वेळोवेळी सुधारण्यात आलेल्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या विषयांपैकी सर्व किंवा कोणत्याही विषयाच्या संबंधात,पंचायत समितीच्या स्वाधीन असलेल्या निधीतून जेथवर तरतूद करता येणे शक्य असेल तेथवर, गटांमध्ये वाजवी तरतूद करणे ही पंचायत समितीची प्राथमिक जबाबदारी असेल.

(२) राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, दुसऱ्या अनुसूचीतून कोणतीही नोंद वगळता येईल किंवा तिच्यात कोणतीही नोंद जादा दाखल करता येईल किंवा अशा कोणत्याही नोंदीत सुधारणा करता येईल आणि अधिसूचना काढण्यात आल्यानंतर, अशा अनुसूचीत त्यानुसार सुधारणा करण्यात आली आहे. असे मानण्यात येईल :

परंतु,--

(क) दुसऱ्या अनुसूचीतील कोणतीही नोंद गाळण्यासंबंधीची अशी कोणतीही अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या पूर्वमान्यतेशिवाय काढण्यात येणार नाही; आणि

(ख) इतर कोणतीही अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि अशा रीतीने ती ज्या अधिवेशनात ठेवण्यात आली असेल त्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ तीत जे फेरबदल करील त्यांना अधीन राहून ती राजपत्रात प्रसिध्द करण्यात येईल.

गट अनुदानामधून खर्च करण्याचा पंचायत समितीचा अधिकार.

[1][ **१०१ (क)** कोणतेही अनुदान धरून गट अनुदानामधून पंचायत समितीने करावयाचा खर्च, या अधिनियमान्वये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पंचायत समितीच्या प्राधिकाराखाली असलेल्या क्षेत्रातच केवळ केला पाहिजे; परंतु, कलम १०१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, असा खर्च संबंधित जिल्हा परिषदेच्या मार्फत आयुक्तांची मंजुरी मिळवून, या अधिनियमाच्या प्रयोजनापैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता अशा क्षेत्राच्या बाहेर करता येईल; परंतु अशा क्षेत्राच्या बाहेर, जिल्हा परिषदेने तिला दिलेली कोणतीही मालमत्ता सुस्थितीत ठेवण्याच्या प्रयोजनासाठी अशी मंजुरी आवश्यक असणार नाही.]

अनुसूचित क्षेत्रांतील पंचायत समितीचे सक्षम अधिकार व कर्तव्ये

[2][ **१०१ (ख)** संबंधित गटामधील एकापेक्षा अधिक पंचायतीमध्ये अनुसूचित क्षेत्र असणारी पंचायत समिती,--

(एक) या भूमिसंपादन प्राधिकरण अनुसूचित क्षेत्रामधील कोणतीही जमीन विकास प्रकल्पासाठी आणि अशा प्रकल्पामुळे बाधित असलेल्या व्यक्तींचे अशा अनुसूचित क्षेत्रांमध्ये पुनर्वसन किंवा पुनर्वसाहत करण्यासाठी संपादन करण्यापूर्वी, अशा प्राधिकरणाचा सल्ला घेईल,

(दोन) त्या वेळेपुरत्या अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या किंवा विनिमयाच्या तरतुदींच्या अधीन अनुज्ञप्ती प्राधिकरणास,-

(अ) अशा अनुसूचित क्षेत्रांमधील गौण खनिजांसाठी पूर्वेक्षण अनुज्ञप्ती किंवा खाणी भाडेपट्ट्याने देणे ;

(ब) गौण खनिजांचे समुपयोजन करण्यासाठी लिलावाद्वारे सवलत; यांसाठी अनुज्ञप्ती किंवा परवानगी देण्यापूर्वी अशा प्राधिकरणाकडे शिफारशी करण्यास सक्षम असेल ;

(तीन) अशा अनुसूचित क्षेत्रात, सामाजिक काम सोपविलेल्या संस्था व कार्यकारी संस्था यांच्या प्रगतीचे संनियंत्रण करणे व कामकाजाचे पर्यवेक्षण करणे यासाठी सक्षम असेल.

सन १९५९ चा मुंबई ३

**स्पष्टीकरण**.- या खंडाच्या प्रयोजनार्थ, "सामाजिक क्षेत्र" या अर्थ या अधिनियमाच्या कलम १००, १०२, १०३ किंवा १२३ च्या तरतुदी अन्वये जिल्हा परिषदेकडे आणि कलम १०१ अन्वये पंचायत समितीकडे, तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम ४५ अन्वये पंचायतीकडे सोपविलेली योजना, कार्यक्रम प्रकल्प किंवा काम, असा आहे.

(चार) अनुसूचित जनजातीच्या व्यक्तींच्या जमिनीचे अन्यसंक्रामण किंवा हस्तांतरण करण्यासंबंधात, त्यावेळेपुरता अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी विचारात घेता; अनुसूचित जनजातींच्या व्यक्तींच्या जमिनीचे बेकायदेशीररीत्या हस्तांतरण अन्यसंक्रामण हस्तांतरण किंवा करण्यास प्रतिबंध करणे आणि अनुसूचित जनजातींच्या सदस्यांच्या बेकायदेशीररीत्या हस्तांतरीत किंवा अन्यसंक्रामित केलेल्या कोणत्याही जमिनी त्यांना परत करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या शिफारशी करण्यास सक्षम राहील,

सन १९४७ चा मुंबई ३१

(पाच) ज्या ज्या वेळी एखादी व्यक्ती अशा अनुसूचित क्षेत्रात सावकारीसाठी अनुज्ञप्ती मिळण्याकरिता अर्ज करील त्यावेळी मुंबई सावकार अधिनियम, १९४६, याच्या कलम ३ अन्वये नियुक्त केलेल्या निबंधकाकडे योग्य त्या शिफारसी करण्यास सक्षम राहील:

परंतु संबंधित ग्रामसभांपैकी बहुतांश ग्रामसभांनी वरीलपैकी कोणत्याही बाबतीत ठराव संमत करून घेतलेला निर्णय हा संबंधित पंचायत समितीवर बंधनकारक राहील:

---

१. सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम २ द्वारे कलम १०१-क समाविष्ट करण्यात आले

२. वरील अधिनियमाच्या कलम ९ द्वारे कलम १०१ क नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले

१०२. [1][ (१)] जिल्हा परिषदेने, कबूल करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर , केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनांच्या किंवा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा कोणत्याही प्राधिकरणाच्या वतीने कोणतेही बांधकाम करणे, ते सुस्थितीत ठेवणे व त्यांची दुरुस्ती करणे किंवा कोणत्याही परिसंस्थेची व्यवस्था पाहणे हे कायदेशीर असेल.

इतर बांधकामे करण्याचा व इतर परिसंस्थांची व्यवस्था पाहण्याचा [2][आणि इतर स्थानिक प्राधिकरणांना तांत्रिक मार्गदर्शन करण्याचा] जिल्हा परिषदेचा अधिकार

परिषद सदस्यांच्या पदावधिचा प्रारंभ

[2][ (२) जिल्हा परिषदेस, इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कामाच्या किंवा परियोजनेच्या संबंधात जिल्हा परिषद व ते स्थानिक प्राधिकरण यांच्यामध्ये कबूल करण्यात येतील अशा अटींवर व शर्तींवर, तांत्रिक मार्गदर्शन व सहाय्य करता येईल व त्या प्रयोजनाकरिता तिच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास असे कोणतेही काम किंवा परियोजना यांचे निरीक्षण करता येईल.]

१०३. राज्य शासनास जिल्हा परिषदेच्या संमतीने, कोणत्याही वेळी, जिल्ह्यातील रहिवाशांच्या कल्याणाचे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संवर्धन करणाऱ्या कोणत्याही बांधकामाच्या किंवा कोणत्याही विकास परियोजनांच्या अंमलबजावणीचे काम त्या जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करता येईल आणि त्यानंतर अशा जिल्हा परिषदेने अशा रीतीने हस्तांतरित करण्यात आलेल्या कामाची किंवा विकास परियोजनेची अंमलबजावणी हाती घेणे हे कायदेशिर असेल :

बांधकामे व विकास परियोजना हस्तांतरित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

परंतु, अशा प्रत्येक बाबतीत मान्य करण्यात येईल असा निधी राज्य शासन जिल्हा परिषदेच्या स्वाधीन करील.

१०४. यात यापुढे अन्यथा तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, जिल्हा परिषदेचा कोणताही पीठासीन प्राधिकारी, तिचा परिषद सदस्य किंवा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणारा कोणताही अधिकारी किंवा तिचा कर्मचारी हा, अशा जिल्हा परिषदेने, किंवा तिच्या वतीने रीतसर केलेल्या कोणत्याही संविदेच्या किंवा कराराच्या संबंधात किंवा तिने अथवा तिच्या वतीने रीतसर केलेल्या खर्चाबद्दल व्यक्तिशः जबाबदार असणार नाही; आणि राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या अधीनतेने, प्रत्येक जिल्हा परिषदेच्या स्वाधीन असलेल्या जिल्हा निधीतून, आणि जेव्हा एखादे दायित्व कोणत्याही पंचायत समितीने केलेल्या संविदेच्या किंवा कराराच्या संबंधात उद्‌भवलेले असेल तेव्हा अशा पंचायत समितीच्या स्वाधीन असलेल्या गट अनुदानातून अशा कोणत्याही संविदेच्या किंवा कराराच्या संबंधात झालेला सर्व परिव्यय तसेच अशा प्रकारचा सर्व खर्च करता येईल आणि त्याचा भार अशा निधीवर किंवा अनुदानावर असेल.

जिल्हा निधी हा सर्व साधारणपणे जिल्हा परिषदेने केलेला परिव्यय व खर्च यांसाठी पात्र असणे.

१०५. (१) जिल्हा परिषदेस, तिने किंवा तिच्याविरुध्द लावलेल्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात किंवा या अधिनियमाखाली तिने किंवा तिच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही हक्कमागणीच्या किंवा मागणीच्या संबंधात तिला पुरेशी वाटेल अशा रकमेसाठी किंवा इतर भरपाईसाठी तडजोड करता येईल :

तडजोड करण्याचा अधिकार.

परंतु, कोणतीही संविदा करण्याच्या कामी या अधिनियमान्वये कोणतीही मंजुरी घ्यावी लागत असेल तर, अशा संविदेतून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही हक्कमागणीची किंवा मागणीची तडजोड करण्यासाठी तशीच पूर्वमंजुरी घेण्यात येईल.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४४ (एक) द्वारे कलम १०२ यास त्या कलमाचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

२. वरील अधिनियमाच्या कलम ४४ (दोन) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला

(२) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये जिल्हा परिषदेमध्ये, तिच्या समित्यांमध्ये किंवा पंचायत समित्यांमध्ये किंवा पीठासीन प्राधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्यामध्ये निहित असलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकारांचा सद्‌भावनापूर्वक वापर केल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे नुकसान झाले असेल त्या व्यक्तीला जिल्हा परिषदेस त्याबद्दल जिल्हा निधीतून भरपाई देता येईल.

जिल्हा परिषदेचे अधिकार व तिची कार्ये

**१०६.** हा अधिनियम आणि त्याखाली राज्य शासनाने केलेल्या नियम यांच्या तरतुदींना अधीन राहून जिल्हा परिषदेस,-

(एक) या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये तिच्यावर लादण्यात आलेली कार्ये व कर्तव्ये योग्यरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक त्या गोष्टी करता येतील ;

(दोन) जिल्ह्यातील कामे किंवा विकास परियोजना यांना (या अधिनियमान्वये गटातील ज्या कोणत्याही कामांच्या किंवा विकास परियोजनांच्या संबंधात गट अनुदानातून मंजुरी देण्याचे अधिकार पंचायत समितीस देण्यात आले आहेत, अशी कामे आणि विकास परियोजना नसलेली) मंजुरी देता येईल ;

(तीन) कोणत्याही वेळी, स्थायी समितीचा किंवा कोणत्याही विषय समितीचा कोणतेही कामकाज वृत्तांत किंवा तिला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयांबद्दलचे किंवा त्याच्याशी संबंधित असलेले कोणतेही विवरण, विवरणपत्र, लेखा किंवा अहवाल मागवता येतील;

(चार) आपल्या अधिकाऱ्यांपैकी व कर्मचाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीस हजर राहण्यास आणि असा अधिकारी किंवा कर्मचारी ज्या विभागात काम करीत असेल त्या विभागाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींवर त्यास सल्ला देण्यास फर्मावता येईल; आणि असा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी अशा आदेशांचे पालन करील;

(पाच) या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये जे अधिकार व जी कार्ये पंचायत समितीकडे किंवा स्थायी समितीकडे किंवा विषय समितीकडे किंवा पीठासीन प्राधिकाऱ्याकडे किंवा जिल्हा परिषदेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे स्पष्टपणे प्रदान करण्यात आलेली नाहीत किंवा त्यांच्यावर लादण्यात आलेली नाहीत अशा बाबींसंबंधातील अधिकारांचा वापर करता येईल व कार्ये पार पाडता येतील;

(सहा) [१] [ कलम २६१, पोट-कलम (१) खाली कोणत्याही सूचना दिलेल्या असल्यास किंवा कोणतेही निदेश काढलेले असल्यास, त्यांच्या अधीनतेने ] स्थायी समितीने, विषय समितीने, पीठासीन प्राधिकाऱ्याने किंवा जिल्हा परिषदेच्या किंवा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयात [१] [ सुधारणा करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येईल ];

(सात) जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर प्रशासनिक नियंत्रण ठेवता येईल; आणि

(आठ) या अधिनियमाखालील सर्व कर्तव्ये व कार्ये यांच्या अंमलबजावणीवर पर्यवेक्षण करता येईल.

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६५ द्वारे "सुधारणा करण्यात येईल किंवा फेरबदल करण्यात येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ४६, अन्वये "दुष्काळी क्षेत्र किंवा अवर्षणाच्या तीव्र टंचाईचे क्षेत्र" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५ कलम ३ दुसऱ्या अनुसूची अन्वये "दुष्काळ" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**१०७.** राज्य शासनाने कोणत्याही एखाद्या वर्षी कोणतेही एखादे क्षेत्र [२] [ टंचाईचे क्षेत्र ] म्हणून जाहीर केले असेल आणि संबंधित संहिते अन्वये राज्य शासनाने याबाबतीत विहित केलेल्या प्रमाणानुसार जमीन महसूल निलंबित केला असेल किंवा माफ केला असेल किंवा एखाद्या क्षेत्रात पुरामुळे किंवा इतर नैसर्गिक आपत्तीमुळे कष्टदायक स्थिती निर्माण झाली असेल तर, राज्य शासनाने जिल्हा परिषदेस तसा निदेश दिला असल्यास, बेकारी भत्त्याच्या स्वरुपात अनुग्रह सहाय्य देऊन किंवा त्या निदेशात राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी सरकारी कामे किंवा प्रतिबंधात्मक किंवा सुधारात्मक उपाययोजना यावर खर्च करुन अशा क्षेत्रात सहाय्य देण्यासंबंधी कामे हाती घेणे हे, त्या क्षेत्रावर अधिकारिता असलेल्या जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल.

[२] [ टंचाई [ इत्यादी प्रसंगी जिल्हा परिषदेची कर्तव्ये.

**१०८.** (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक पंचायत समिती,–

पंचायत समितीचे अधिकार व तिची कार्ये

(क) (एक) जिल्हा परिषदेस आपल्या विकास योजना तयार करता याव्यात म्हणून गटात हाती घ्यावयाच्या कामाचा व विकास परियोजनांचा एक संपूर्ण आराखडा तयार करील ;

(दोन) गटातील स्थानिक साधनसंपत्तीचा शक्यतोवर जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्याच्या दृष्टीने गट अनुदानातून हाती घ्यावयाच्या कामांचा व विकास परियोजनांचा एक आराखडा तयार करील;

(ख) गट अनुदानातुन कोणत्याही कामास किंवा विकास परियोजनांना मंजूरी देईल, त्याची अंमलबजावणी करील, त्यावर पर्यवेक्षण करील किंवा [illegible]त्याचा कारभार पाहील आणि या प्रयोजनासाठी त्यातून खर्च करील;

(ग) तिच्या सभापतीकडे, उप सभापतीकडे किंवा गटात काम करणाऱ्या परिषदेच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे, या अधिनियमांद्वारे किंवा त्या अन्वये गट अनुदानाशी संबंधित असलेल्या बाबतीत जे अधिकार किंवा जी कार्ये स्पष्टपणे सोपवलेली नसतील अशा अधिकारांचा, वापर करील व अशी कार्ये पार पाडील;

(घ) जिल्हा परिषदेची कामे व विकास परियोजना अंमलात आणील, सुस्थितीत ठेवील, त्यांच्यावर पर्यवेक्षण करील व त्यांचा कारभार पाहील;

(ङ) जिल्हा परिषदेने किंवा जिल्हा परिषदेच्या वतीने तिच्याकडे सोपवण्यात आली असतील अशी जिल्हा परिषदेची कार्ये गटामध्ये पार पाडील ;

(च) गटामध्ये जिल्हा परिषदेने जी कोणतीही कामे किंवा विकास परियोजना हाती घ्यावयाच्या असतील त्यांची जिल्हा परिषदेच्या विचारासाठी शिफारस करु शकेल, आणि अशा कामात किंवा विकास परियोजनांत कोणत्या मर्यादेपर्यंत स्थानिक साधनसंपत्ती प्राप्त होण्याचा संभव आहे हे दर्शवू शकेल;

(छ) [१] [ कलम २६१, पोट-कलम (१) खाली दिलेल्या किंवा काढलेल्या कोणत्याही सूचनांच्या व निदेशांच्या अधीनतेने ] सभापतीने किंवा उप सभापतीने किंवा गटविकास अधिकाऱ्याने किंवा गटात काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने घेतलेल्या कोणत्याही निर्णयात सुधारणा करु शकेल किंवा त्यात फेरबदल करु शकेल.

(झ) आपल्या बैठकींच्या कामकाजाचा सारांश, दर तीन महिन्यांनी जिल्हा परिषदेला पाठवील; आणि

(ञ) तिच्यामध्ये निहित असलेल्या कार्यांच्या व कर्तव्यांच्या संबंधात गटविकास अधिकाऱ्यांच्या कामावर सर्वसाधारण पर्यवेक्षण करील व नियंत्रण ठेवील,

---

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम [illegible] द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम [illegible] द्वारे खंड [illegible] गाळण्यात आला.

(२) पंचायत समितीस [1] * * * गटात बसविण्यात आलेल्या करांमध्ये किंवा फीमध्ये वाढ करण्याबाबत जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव करता येतील आणि [2] * * करामधील किंवा फीमधील अशी कोणतीही वाढ अशा प्रस्तावात दर्शविण्यात आलेल्या प्रयोजनाकरिता किंवा प्रयोजनांकरिता त्या गटात उपयोगात आणता येईल.

जिल्हा परिषदेने दिलेल्या अनुदेशानुसार पंचायत समितीने वागणे.

[3] [१०८क. (१) पंचायत समिती, या अधिनियमाखालील आपली कार्ये व कर्तव्ये पार पाडताना जिल्हा परिषदेकडून तिला वेळोवेळी जे कोणतेही अनुदेश देण्यात येतील त्याप्रमाणे वागेल.

(२) गट अनुदानाशी संबंधित असलेल्या बाबतीत पंचायत समितीने वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कार्ये यांच्याबाबत सूचना देण्याचा जिल्हा परिषदेस अधिकार आहे असा पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीचा अर्थ लावण्यात येणार नाही.]

स्थायी समिती आणि विषय समित्या यांचे अधिकार व कार्ये.

**१०९.** (१) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, स्थायी समिती किंवा विषय समिती, तिच्याकडे नेमून दिलेल्या विषयाच्या संबंधात, —

(क) (१) अशा विषयाशी संबंधित असलेली कामे आणि विकास परियोजना यांचा प्रभार सांभाळील,

(दोन) कामे आणि विकास परियोजना यांचे अंदाज तयार करण्यात व मंजूर करण्यात येतात किंवा नाही याबद्दल खात्री करुन घेईल आणि त्यांच्या अंमलबजावणीवर पर्यवेक्षण करील,

(तीन) अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदींच्या खर्चावर पर्यवेक्षण करील,

[4] [(तीन-क) जिल्हा परिषदेच्या कामांच्या प्रगतीचा नियत कालावधीनंतर आढावा घेईल आणि त्यावरील अहवाल जिल्हा परिषदेपुढे ठेवील ;]

(चार) समितीच्या प्रत्येक बैठकीच्या कामकाजवृत्ताची एक प्रत जिल्हा परिषदेकडे पाठवील ;

(ख) (एक) जिल्हा परिषदेच्या ताब्यातील कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या निदेशाखाली हाती घेतलेले कोणतेही काम किंवा विकास परियोजना चालू असेल त्या ठिकाणी प्रवेश करण्यास व तिच्या वतीने निरीक्षण करण्यास, कोणत्याही अधिकाऱ्यास फर्मावू शकेल;

(दोन) आपल्या सभापतीकडून किंवा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून कोणतीही माहिती, विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागवू शकेल.

[5] * * * * * *

(२) स्थायी समितीस किंवा विषय समितीस, जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेले अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास समितीच्या कोणत्याही सभेस हजर राहण्यास, आणि असा अधिकारी किंवा कर्मचारी ज्या विभागात काम करीत असेल त्या विभागाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींवर सल्ला देण्यास फर्माविता येईल आणि असा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी अशा आदेशाचे पालन करील.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ कलम ४८ (२) " द्वारे गटात बसविण्यात आलेल्या जमीन महसुलावरील उपकराच्या दरात कलमे १४४,१५१ किंवा १५२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल एवढी वाढ करण्याबाबत किंवा " हा मजकूर वगळण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या त्याच कलमाद्वारे " स्थानिक उपकरातील किंवा " हा मजकूर वगळण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४८ द्वारे कलम १०८ क समाविष्ट करण्यात आले.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३३(१) द्वारे उप खंड (तीन-क) समाविष्ट करण्यात आला.

५. वरील अधिनियमाच्या कलम ३३(२) द्वारे उप खंड (तीन) वगळण्यात आला.

(३) (क) या अधिनियमाद्वारे आणि त्या अन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदींना अधीन राहून, पूर्वगामी तरतुदींत विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांव्यतिरिक्त आणि कार्यांव्यतिरिक्त, स्थायी समिती, —

(एक) कर, दर, देय रकमा, फी किंवा पथकर बसवणे आणि तो गोळा करणे यांवर पर्यवेक्षण करील व नियंत्रण ठेवील ;

(दोन) बांधकामे आणि विकास परियोजना यांच्या अमलबजावणीच्या संबंधातील दरांची एक अनुसूची ठेवील आणि असे दर राज्य शासनाने त्या भागातील तत्सम कामे किंवा विकास परियोजना यासाठी ठरवून दिलेल्या दरांपेक्षा अधिक होणार नाहीत अशा रीतीने त्या अनुसूचीमध्ये नियत कालावधीने सुधारणा करील ;

(तीन) जिल्हा निधीच्या गुंतवणुकीची व्यवस्था आणि विनियमन करील ; आणि

(चार) जिल्हा परिषदेच्या जमेच्या व खर्चाच्या मासिक लेख्यांची [1][ (पंचायत समितीला दिलेल्या गट अनुदानांच्या संबंधातील मासिक लेखे नसलेल्या)] तपासणी करील आणि ते संमत करील.

(ख) स्थायी समिती, तिच्याकडे नेमून देण्यात आलेले विषय धरुन, कोणत्याही विषय समितीस नेमून देण्यात आलेल्या विषयांच्या संबंधात, —

(एक) जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेत किंवा जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली व व्यवस्थापनाखाली असलेल्या कोणत्याही परिसंस्थेत किंवा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या निदेशाखाली हाती घेतलेले कोणतेही काम किंवा विकास योजना चालू असेल त्या ठिकाणी प्रवेश करण्यास व त्यांचे निरीक्षण करण्यास, कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास प्राधिकृत करु शकेल ;

(दोन) आपले अधिकार व कार्ये या संबंधी जिल्हा परिषदेकडे कोणताही प्रस्ताव करु शकेल ; आणि

(तीन) जिल्हा परिषदेच्या सर्व कामांच्या प्रगतीचे नियत कालावधीने पुनर्विलोकन करील आणि त्याबाबतचे अहवाल जिल्हा परिषदेपुढे ठेवील.

(ग) स्थायी समितीस, कोणत्याही वेळी, कोणत्याही विषय समितीचे कोणतेही कामकाजवृत्त किंवा अशा विषय समितीस नेमून दिलेल्या कोणत्याही विषयाबद्दलचे किंवा त्या संबंधीचे कोणतेही विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा अहवाल मागवता येईल.

(घ) स्थायी समितीस, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, एक महिन्यापेक्षा अधिक नाही इतकी आणि जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेली अधिकारपदे धारण करणाऱ्या प्रथम श्रेणीच्या व द्वितीय श्रेणीच्या सेवेतील इतर अधिकाऱ्यांस चार महिन्यांपेक्षा अधिक नाही इतकी अनुपस्थिती रजा देता येईल.

(४) स्थायी समिती किंवा विषय समिती विनिर्दिष्ट करील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांना अधीन राहून तिला या अधिनियमाखाली आपले कोणतेही अधिकार, कार्ये व कर्तव्ये कोणत्याही पंचायत समितीकडे सोपवता येतील.

[2][१०९क. (१) कलम १०९, पोट-कलमे (१) आणि (२) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेले अधिकार व कार्ये यांच्या जोडीने, वित्त समिती,— वित्त समितीचे विशेष अधिकार व तिची कार्ये

(एक) जिल्हा परिषद व पंचायत समित्या यांच्या, कलम १३७ खाली तयार केलेल्या उत्पन्नाच्या व खर्चाच्या वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाजांचे, तिला आवश्यक वाटेल असे तपशीलवार परिनिरीक्षण करील आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती यांची उद्दिष्टे अत्यंत काटकसरीने व कार्यक्षम रीतीने पार पाडली जातात हे सुनिश्चित होण्यासाठी सल्ला देईल .

---

१ सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम १० द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३४ द्वारे कलम १०९ क समाविष्ट करण्यात आले.

(दोन) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या कलम १३८ खाली तयार केलेल्या सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाजाचे त्या रीतीने परिनिरीक्षण करील,

(तीन) जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांच्या, कलम १३६ खाली तयार केलेल्या जमा व खर्चाच्या लेखा विवरणपत्राची तपासणी करील,

(चार) जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील काम करणाऱ्या अन्य कोणत्याही परिसंस्था किंवा उपक्रम यांच्या लेखापरिक्षा अहवालाचे परिनिरीक्षण करील,

(२) पुढील गोष्टींबाबत आपली खात्री करुन घेणे हे वित्त समितीचे कर्तव्य असेल —

(एक) जमा खर्चाच्या लेखा विवरणपत्रात दर्शविण्यात आलेल्या पैशांसाठी, जिल्हा परिषदेच्या किंवा यथास्थिति, पंचायत समितीच्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये रीतसर तरतूद करण्यात आली आहे आणि ज्या सेवेसाठी वा प्रयोजनासाठी त्याची तरतुद करण्यात आली त्याच सेवेसाठी किंवा प्रयोजनासाठी त्याचे उपयोजन करण्यात आले आहे.

(दोन) खर्चाचे ज्या प्राधिकारान्वये नियमन होत असेल त्या प्राधिकारानुरुप खर्च आहे,

(तीन) निधीचे प्रत्येक पुनर्विनियोजन हे सक्षम प्राधिकाऱ्याकडून आणि निधीच्या पुनर्विनियोजनाचे विनियमन करणाऱ्या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार करण्यात आले आहे,

(चार) खर्च केलेला पैसा हा, अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक नाही किंवा प्रकरणातील तथ्ये परिस्थिती या अनुसार तो समर्थनीय आहे.

(३) वित्त समितीस, या कलमाखालील तिच्या कार्यात सहाय्य करण्यासाठी मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, यास किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीस आपल्या बैठकीच्यावेळी बोलावणे आवश्यक वाटल्यास तिला तसे करता येईल.

(४) वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज किंवा सुधारित किंवा पूरक अर्थसंकल्पीय अंदाज यांच्या वित्त समितीकडून करण्यात येणाऱ्या परिनिरीक्षणामुळे जिल्हा परिषदेकडून त्यावर विचार केला जाण्यास किंवा त्यांना मान्यता दिली जाण्यास कोणत्याही रीतीने बाधा पोहचणार नाही किंवा त्या गोष्टी पुढे ढकलल्या जाणार नाही.]

दोन किंवा अधिक जिल्हा परिषदांच्या संयुक्त समित्या

११०. (१) जिल्हा परिषदेस, इतर कोणतीही जिल्हा परिषद किंवा कोणतीही महानगरपालिका, नगरपालिका, कटक प्राधिकरण किंवा अधिसूचित क्षेत्र समिती यांची खालील गोष्टी करतांना, वेळोवेळी सहमती घेता येईल -

(क) ज्यात त्यांचा संयुक्तपणे हितसंबंध आहे, अशा कोणत्याही प्रयोजनासाठी आपापल्या संस्थामधून एक संयुक्त समिती नेमणे व अशा समितीचा सभापती नेमणे; आणि

(ख) संयुक्तपणे कोणतेही बांधकाम करणे व पुढे ते सुस्थितीत ठेवणे याबाबत अशा प्रत्येक संस्थेवर बंधनकारक असतील अशा अटी तयार करण्याचा अधिकार व अशा संस्थापैकी एका संस्थेस किंवा कोणत्याही संस्थेस वापर करता येईल असा कोणताही अधिकार अशा कोणत्याही समितीकडे सोपवणे; आणि

(ग) ज्या प्रयोजनासाठी समिती नेमण्यात आली असेल त्या प्रयोजनासंबंधीचे अशा कोणत्याही समितीचे कामकाज आणि पत्रव्यवहार यांचे विनियमन करण्यासाठी नियम करणे तयार व त्यात फेरबदल करणे.

(२) जिल्हा परिषदेस, इतर कोणतीही जिल्हा परिषद किंवा महानगरपालिका, नगरपालिका, कटक प्राधिकरण किंवा अधिसूचित क्षेत्र समिती किंवा अशा कोणत्याही संस्थाचा गट यांच्याबरोबर भारताच्या संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील सूची दोन मधील नोंद ५८ खाली दुसरा कोणताही कर बसविण्यासाठी

वेळोवेळी करार करता येईल. अशा करारामुळे याप्रमाणे करार करणाऱ्या संस्थांना बसविता येईल असा कर उक्त संस्थांच्या नियंत्रणाच्या अधीन असलेल्या क्षेत्रांच्या हद्दीत स्वतंत्रपणे बसविण्याऐवजी एकत्र बसविता येईल.

(३) जेव्हा जिल्हा परिषदेने एखाद्या बाबतीत पोट-कलम (१) किंवा (२) च्या तरतुदींखाली कोणत्याही इतर स्थानिक प्राधिकरणास सहमती देण्याविषयी विनंती केली असेल आणि अशा इतर स्थानिक प्राधिकरणाने सहमती देण्याचे नाकारले असेल तेव्हा आयुक्तास (कटक प्राधिकरण नसलेल्या) अशा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिक॰ ास, उपरोक्त बाबतीत सहमती देण्यास भाग पाडण्याबाबत त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि असे कोणतेही स्थानिक प्राधिकरण अशा आदेशांचे पालन करील.

(४) या कलमाखाली काम करणाऱ्या स्थानिक संस्थांच्या दरम्यान कोणताही मतभेद निर्माण झाल्यास राज्य शासनाने किंवा याबाबत ते नेमील अशा अधिकाऱ्याने त्यासंबंधी दिलेला निर्णय अंतिम असेल :

परंतु, जेव्हा अशा स्थानिक संस्थांपैकी एक संस्था कटक प्राधिकरण असेल तेव्हा राज्य शासनाचा किंवा अशा अधिकाऱ्याचा निर्णय हा, केंद्रसरकारच्या सहमतीच्या अधीन असेल.

## प्रकरण सात

## कामकाज चालवणे

### जिल्हा परिषदा

१११. (१) जिल्हा परिषदेस, आवश्यक असेल तितक्या वेळा बैठकी घेता येतील, परंतु तिची शेवटची बैठक आणि पुढच्या बैठकीचा दिनांक यामध्ये तीन महिन्यांहून कालांतर असणार नाही. जिल्हा परिषदांच्या बैठकी

[1][(२) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून राज्य शासन, अशा बैठकींची जागा, त्या चालवणे व तहकूब करणे याबाबत आणि सर्वसाधारणपणे अशा बैठकांत कामकाज चालविण्याबाबत या अधिनि ॰ ाशी सुसंगत असतील असे नियम करील.]

(३) अध्यक्ष बैठकींचे दिनांक ठरवील आणि जेव्हा जेव्हा त्यास योग्य वाटेल तेव्हा तेव्हा आणि [2][ज्यांना त्या त्या वेळी जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीत बसण्याचा व मतदानाचा हक्क असेल अशा एकूण परिषद सदस्यांपैकी ] [3]* * * * एक पंचमांशापेक्षा कमी नाहीत इतक्या सभासदांनी लेखी विनंती केली असता, आणि अशी विनंती मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत, तो विशेष बैठक बोलावण्याबाबत नोटीस काढील :

[4][परंतु, [5]* * * * * विशेष बैठक बोलावण्यात येईल तेव्हा बैठकीच्या नोटिशीत, ज्या दिनांकास बैठक घ्यावयाची असेल तो दिनांक नमूद करील, असा दिनांक नोटीस काढल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या नंतरचा असणार नाही.]

(४) सर्वसाधारण बैठकीसंबंधीची पूर्ण पंधरा दिवसांची नोटीस व विशेष बैठकीसंबंधीची पूर्ण दहा दिवसांची नोटीस, तिच्यात अशी बैठक घ्यावयाची वेळ व जागा चालवावयाचे कामकाज विनिर्दिष्ट करून परिषद सदस्यांमध्ये प्रसृत करण्यात येईल व जिल्हा परिषदेच्या कार्यालयात लावण्यात येईल, विशेष बैठकीच्या बाबतीत, अशा बैठकीसाठी केलेली कोणतीही लेखी विनंती कोणताही प्रस्ताव किंवा प्रतिपादन नमूद करण्यात आले असेल तर अशा प्रस्तावाचा किंवा प्रतिपादनाचा अशा नोटिशीत समावेश करण्यात येईल :

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४९ (१) द्वारे पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

२. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३५(अ) द्वारे "सभासदांपैकी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७४(१) "(स्वीकृत सदस्यांशिवाय परिषद सदस्यांव्यतिरिक्त)" हा मजकूर वगळण्यात आला.

४. सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २०(अ) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

५. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ८६ द्वारे "अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांच्याविरुद्ध आणलेल्या अविश्वासाच्या ठरावावर विचार करण्यासाठी" हा मजकूर वगळण्यात आला.

[1] [परंतु, जेव्हा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडून देण्यासाठी या अधिनियमान्वये बोलावली असेल तेव्हा कलम ९, पोट-कलम (१) खंड (ग) च्या कक्षेत येणाऱ्या व्यक्तींना अशा बैठकीची नोटीस, त्यांची नावे कलम ९, पोट-कलम (२) खाली प्रसिध्द करण्यात आल्यावर शक्य तितक्या लवकर देता येईल आणि अशी नोटीस ही त्यांना त्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी पुरेशी नोटीस आहे असे मानण्यात येईल.]

(५) प्रत्येक बैठकीचे अध्यक्षपद अध्यक्ष धारण करील किंवा तो अनुपस्थित असेल तर, उपाध्यक्ष धारण करील आणि अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघेही अनुपस्थित असतील तर अशा बैठकीत उपस्थित असलेल्या परिषद सदस्यांपैकी ज्याची बैठक त्या वेळेसाठी सभापती म्हणून निवड करील असा परिषद सदस्य ते पद धारण करील :

[2] [परंतु, कोणतेही रिकामे झालेले अधिकारपद भरण्यासाठी निवडणूक लढविणारा कोणताही परिषद सदस्य, ते रिकामे अधिकारपद भरण्यासाठी घेतलेल्या कोणत्याही बैठकीचे अध्यक्षपद स्वीकारणार नाही.]

(६) सर्वप्रश्नांचा निर्णय उपस्थित असलेल्या परिषद सदस्यांच्या बहुमतानुसार व मतदानाने करण्यात येईल आणि समसमान मत पडतील अशा सर्व बाबतीत पीठासीन प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल.

(७) बैठकीच्या सुरूवातीपासून अखेरपर्यंत कोणत्याही वेळी बैठकीस [3] [ज्यांना त्या त्या वेळी जिल्हा परिषदेच्या कोणत्याही बैठकीत बसण्याचा, मत देण्याचा किंवा तीत भाग घेण्याचा हक्क असेल अशा [4] [ * * * *] परिषद सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांपेक्षा कमी सदस्य उपस्थित असतील तर पीठासीन प्राधिकारी नंतरच्या किंवा इतर कोणत्याही पुढील दिनाकास तो वाजवी रीतीने निश्चित करील त्या वेळेपर्यंत ती बैठक तहकूब करील अशा तहकुबीची नोटीस जिल्हा परिषदेच्या कार्यालयात लावील, आणि मूळच्या बैठकीत गणपूर्ती झाली असती तर जे कामकाज तिच्यापुढे ठेवण्यात आले असते ते कामकाज अशा तहकूब केलेल्या बैठकीपुढे येईल आणि अशा बैठकीत किंवा तिच्या तहकुबीनंतरच्या पुढील बैठकीत ते कामकाज निकालात काढता येईल मग त्या बैठकीत गणपूर्ती झालेली असो किंवा नसो.

(८) पीठासीन प्राधिकाऱ्याची परवानगी घेण्यात आल्याशिवाय (कोणताही ठराव संमत झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत त्यात फेरबदल करण्यासाठी किंवा रद्द करण्यासाठी आणलेल्या प्रस्तावाच्या किंवा प्रतिपादनाच्या बाबतीत अशी परवानगी देण्यात येणार नाही) कोणतीही सर्वसाधारण बैठक बोलावण्यासाठी दिलेल्या नोटिशीत किंवा बैठकीच्या बाबतीत अशी बैठक बोलावण्यासाठी केलेल्या लेखी विनंतीत नमूद करण्यात आलेले नसेल तर कोणतेही कामकाज अशा बैठकीत चालवले जाणार नाही आणि त्या प्रतिपादनावर चर्चा केली जाणार नाही.

(९) एखाद्या बैठकीत ज्या क्रमाने कोणतेही कामकाज किंवा प्रतिपादन आणावयाचे तो क्रम पीठासीन प्राधिकारी निर्धारित करील आणि अशा कामकाजाच्या कोणत्याही विशिष्ट बाबीस किंवा कोणत्याही विशिष्ट

---

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ७ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

२. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २०(ब) द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३५(ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७४(२) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

प्रतिपादनास प्राथम्य देण्याविषयी कोणत्याही परिषद सदस्याने प्रस्तावित केले असता असा प्राधिकारी तो प्रस्ताव बैठकीपुढे मांडील आणि त्या प्रस्तावाच्या बाजूने किंवा विरुद्ध जे बहुमत पडेल त्याप्रमाणे वागेल.

(१०) कोणतीही सर्वसाधारण बैठक उपस्थित असलेल्या परिषद सदस्यांपैकी बहुसंख्य परिषद सदस्यांच्या संमतीने वेळोवेळी तहकूब करता येईल ; परंतु तहकूब करण्यात आलेल्या बैठकीत जे कामकाज निकालात न काढता राहिले असेल त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही कामकाज, तहकुबीनंतरच्या कोणत्याही बैठकीत चालवता येणार नाही.

(११) उपस्थित असलेल्या [1][ परिषद सदस्यांच्या संख्येच्या ] एकद्वितीयांशापेक्षा कमी नाही इतक्या परिषद सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सर्वसाधारण बैठकीत संमत केलेल्या ठरावाखेरीज इतर कोणत्याही रीतीने जिल्हा परिषदेच्या कोणत्याही ठरावात तो संमत झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत कोणताही फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र पोट-कलम (४) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, अशा बैठकीची नोटीस देण्यात येईल आणि अशा बैठकीत ज्या ठरावात फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे प्रस्तावित किंवा प्रतिपादन त्या नोटिशीत संपूर्णपणे नमूद करण्यात येईल.

(१२) जिल्हा परिषदेपुढे प्रलंबित असलेली कोणतीही चौकशी किंवा बोलणी खाजगी रित्या व्हावी असे पीठासीन प्राधिकाऱ्यास वाटत नसेल तर, जिल्हा परिषदेची प्रत्येक बैठक जनतेस खुली असेल. परंतु उक्त प्राधिकाऱ्यास, कामकाजात व्यत्यय आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वेळी, काढून टाकण्याची तजवीज करता येईल.

(१३) जिल्हा परिषदेच्या बैठकींना उपस्थित असलेले परिषद सदस्य व या अधिनियमाच्या तरतुदींखाली हजर राहणाऱ्या इतर व्यक्ती यांच्या नावांची आणि जिल्हा परिषदेच्या प्रत्येक बैठकीतील कामकाजाची ( आणि बैठकीच्या वेळी उपस्थित असलेल्या कोणत्याही परिषद सदस्याची तशी इच्छा असेल तर कोणत्याही ठरावाच्या बाजूने आणि विरुध्द मत देणाऱ्या परिषद सदस्यांच्या नावाची ) या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात यावयाच्या कार्यवृत्त पुस्तकात नोंद करण्यात येईल. [2][ बैठकीनंतर, व्यवहारी असेल तितक्या लवकर, कार्यवृत्त अभिलिखित करण्यात येईल आणि असे कार्यवृत्त जिल्हा परिषदेच्या पुढील बैठकीपुढे कायम करण्यासाठी ठेवण्यात येईल आणि त्या बैठकीत ते कायम करण्यात आल्यानंतर अशा बैठकीचा पीठासीन प्राधिकारी त्यावर सही करील. कार्यवृत्त जिल्हा परिषदेच्या कोणत्याही परिषद सदस्याला किंवा कोणत्याही मतदाराला निरीक्षण करण्यासाठी सर्व वेळी खुले राहील :

परंतु, बैठकीत संमत झालेल्या प्रत्येक ठरावाची एक प्रत त्या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात यावयाच्या स्वतंत्र पुस्तकात ठेवण्यात येईल आणि ती त्याच बैठकीत वाचून कायम करण्यात येईल आणि तीवर, अशा बैठकीचा पीठासीन प्राधिकारी, बैठकीच्या शेवटी ताबडतोब सही करील. असा प्रत्येक ठराव हा कार्यवृत्त पुस्तकाचा एक भाग असेल.]

(१४) परिषदेचे कामकाज किंवा जिल्ह्याचा विकास या संबंधीच्या कोणत्याही बाबीवर जिल्हा परिषदेशी चर्चा करण्याची एखाद्या मंत्र्याची इच्छा असल्यास अशा मंत्र्यास, अध्यक्षास पत्र पाठवून मंत्री त्या पत्रात नमूद करील अशा दिनांकास व अशा वेळी जिल्हा परिषदेची बैठक बोलावण्याची विनंती करता येईल. [3][ आणि पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी अध्यक्ष, ] असे पत्र मिळाल्यानंतर त्याप्रमाणे परिषदेच्या कार्यालयात बैठक बोलावील.

---

१ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १५ द्वारे "सभासदांच्या एकूण संख्येच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३५ (क) द्वारे "आणि हा अभिलेख" या मजकुराने सुरु होणाऱ्या व "तो खुला राहील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ४९ (३) द्वारे "आणि असे पत्र मिळाल्यानंतर अध्यक्षाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अधिकारपद रिकामे झाले असताना परिषद सदस्यांना काम करता येणे.

**११२.** (१) जिल्हा परिषदेमध्ये कोणतेही अधिकारपद रिकामे झाले असता त्या काळात पुढे चालू राहणाऱ्या परिषद सदस्यांना कोणतेही अधिकारपद रिकामे झाले नाही असे समजून काम करता येईल.

जिल्हा परिषदांच्या कृती वगैरे अनौपचारिकतेमुळे विधिअग्राह्य न होणे.

(२) परिषद सदस्याचे कोणतेही अधिकारपद रिकामे झाले असेल, किंवा जिल्हा परिषदेच्या रचनेत कोणताही दोष असला तरी जिल्हा परिषदेला काम करण्याचा अधिकार असेल आणि परिषदेच्या बैठकीत बसण्याचा किंवा मतदान करण्याचा किंवा अन्यथा तिच्या कामकाजात भाग घेण्याचा हक्क नसताना एखाद्या व्यक्तीने तसे केल्याचे नंतर उघडकीस आले तरीही असे कामकाज विधिग्राह्य असेल.

[1][(३) एखाद्या प्रकरणाच्या गुणवत्तेस ज्यामुळे बाधा येत नसेल अशा, कोणत्याही कृतीतील किंवा कामकाजातील एखाद्या दोषामुळे किंवा नियमबाह्यतेमुळे किंवा कोणत्याही परिषद सदस्यावर कायदेशीर नोटीस बजावताना झालेल्या कोणत्याही नियमबाह्यतेमुळे किंवा केवळ अनौपचारिकतेमुळे जिल्हा परिषदेची कोणतीही कृती किंवा कामकाज विधिअग्राह्य आहे असे मानले जाणार नाही.]

प्रतिष्ठित व्यक्तींनी बैठकीमध्ये भाषण करणे.

**११३.** (१) कलम १११ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अध्यक्षास, राज्य शासन, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, याबाबत विनिर्दिष्ट करील अशा प्रतिष्ठित व्यक्तींना, परिषद सदस्यांपुढे भाषण करता यावे म्हणून जिल्हा परिषदेची बैठक बोलाविता येईल.

(२) अध्यक्ष, व्यवहार्य असेल तेथवर, अशा बैठकीविषयी आणि तिची वेळ व ठिकाण यांविषयी, अशा बैठकीच्या कमीतकमी दोन दिवस आधी परिषद सदस्यांना कळवील.

अध्यक्षाने विवक्षित शासकीय अधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्या बैठकीस उपस्थित राहण्यास फर्मावणे.

**११४.** विभागाहून कमी असलेल्या एखाद्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या आणि कोणत्याही जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली काम करीत नसलेल्या राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याची हजेरी जिल्हा परिषदेच्या बैठकीत इष्ट आहे असे जिल्हा परिषदेस वाटले तर अध्यक्ष, नियोजित बैठकीच्या पंधरा दिवसापेक्षा कमी नाहीत ; तितके दिवस अगोदर अशा अधिकाऱ्याच्या नावे पत्र लिहून त्यास बैठकीस उपस्थित राहण्याविषयी कळवील ; आणि असा अधिकारी, त्यास आजारामुळे किंवा इतर वाजवी कारणांमुळे प्रतिबंध झालेला नसेल तर त्या बैठकीस उपस्थित राहील :

परंतु, असे पत्र मिळाल्यावर, त्या अधिकाऱ्यास उपरोक्त कारणांपैकी कोणत्याही कारणासाठी स्वत: बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसल्यास, त्यास आपल्या उप अधिकाऱ्यास किंवा सहायक अधिकाऱ्यास किंवा इतर सक्षम दुय्यम अधिकाऱ्यास आपला प्रतिनिधी म्हणून बैठकीस हजर राहण्याबाबत निदेश देता येईल.

अध्यक्षाने लेखी प्रतिपादने प्रसृत करणे.

**११५.** (१) ज्या बाबींसाठी बैठक बोलावणे अनावश्यक आहे असे परिषदेचे मत असेल अशा परिषदेने केलेल्या विनियमांद्वारे विहित केलेल्या बाबींच्या संबंधात, अध्यक्षास आपले स्वत:चे किंवा इतर कोणत्याही परिषद सदस्यांचे किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कार्यकारी अधिकाऱ्याचे लेखी प्रतिपादन परिषद सदस्यांच्या अभिप्रायासाठी आणि त्यांची मते घेण्यासाठी प्रसृत करता येईल.

(२) याप्रमाणे प्रसृत केलेल्या कोणत्याही प्रतिपादनावरील निर्णय, त्यावर नोंदविलेल्या बहुमतानुसार असेल.

(३) या कलमाखाली जिल्हा परिषदेने घेतलेला प्रत्येक निर्णय, कलम १११, पोट-कलम (१३) खाली ठेवलेल्या कार्यवृत्त पुस्तकात नोंदण्यात येईल.

संविदा करण्याची पद्धती.

[2][**११६.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्यावतीने किंवा पंचायत समितीच्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेच्यावतीने अशा रीतीने व अशा स्वरुपाची कोणतीही संविदा किंवा करार करता येईल की, जी त्याने स्वत:च्या वतीने केली असती तर ती त्यावेळी अंमलात असलेल्या कायद्यानुसार त्यास बंधनकारक झाली असती.

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५० द्वारे पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

२ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ द्वारे कलम ११६ दाखल करण्यात आले.

(२) अशी प्रत्येक संविदा किंवा करार लेखी असेल आणि त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी सही करील आणि ज्या संविदेची किंवा कराराची विषयभूत रक्कम पाच हजार रुपयांहून अधिक असेल ती संविदा किंवा करार जिल्हा परिषदेच्या सामान्य मुद्रेने मोहरबंद करण्यात येईल.

(३) या कलमान्वये मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर जिल्हा परिषदेच्या ज्या विभाग प्रमुखास किंवा गटविकास अधिकाऱ्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने लेखी आदेशाद्वारे सर्वसाधारणपणे किंवा विशेषरीत्या अधिकार दिला असेल अशा कोणत्याही विभाग प्रमुखास किंवा गटविकास अधिकाऱ्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या नियंत्रणाला अधीन राहून आणि या अधिनियमाच्या तरतुदींच्या व त्यास विहित करणे योग्य वाटेल अशा, कोणत्याही शर्ती व मर्यादा असल्यास त्या शर्तींना व मर्यादांना अधीन राहून करता येईल. अशा दिलेल्या प्रत्येक आदेशाची एक प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी अध्यक्षाकडे व स्थायी समितीकडे किंवा संबंधितविषय समितीकडे किंवा पंचायत समितीकडे माहितीसाठी तावडतोब पाठवील.

(४) या कलमात तरतूद के.याप्रमाणे न केलेली कोणतीही संविदा अथवा करार जिल्हा परिषदेवर बंधनकारक असणार नाही.]

## पंचायत समित्या

**११७.** पंचायत समितीस आवश्यक असेल तितक्या वेळा बैठका घेता येईल परंतु तिची शेवटची बैठक व तिच्या पुढच्या बैठकीचा दिनांक यामध्ये एक महिन्याचा कालावधी असणार नाही. पंचायत समित्यांच्या बैठकी

**११८.** कलम १११ आणि कलम ११२ याच्या तरतुदी ज्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या बैठकींच्या संबंधात लागू होतात आणि कलम ११५ च्या तरतुदी ज्याप्रमाणे लेखी प्रतिपादन प्रसृत करण्याच्या संबंधात लागू होतात त्याचप्रमाणे त्या तरतुदी पुढील फेरबदलांसह, पंचायत समित्यांच्या बैठकीच्या संबंधात किंवा लेखी प्रतिपादन प्रसृत करण्याच्या संबंधात लागू होतील. ते फेरबदल असे. — पंचायत समित्यांच्या बैठकींना कलमे १११,११२ व ११५ लागू असणे.

[१][ (१) कलम १११ चे पोट-कलम (१) वगळण्यात येईल.]

(क) " जिल्हा परिषद " या शब्दाऐवजी किंवा " परिषद " या शब्दाऐवजी " पंचायत समिती " हे शब्द.

(ख) " अध्यक्ष " या शब्दाऐवजी " पंचायत समितीचा सभापती " हे शब्द

(ग) [२][ कलम १११, पोट-कलम (४) व्यतिरिक्त " उपाध्यक्ष " हा शब्द जेथे जेथे येईल तेथे तेथे] त्या शब्दाऐवजी " पंचायत समितीचा उपसभापती " हे शब्द, [३]* * *

(घ) " परिषद सदस्य " या शब्दाऐवजी " सदस्य " हा शब्द.

[४][ (घ-१) कलम १११ पोट-कलम (४) मध्ये " पंधरा " या शब्दाऐवजी " दहा " हा शब्द व " दहा " या शब्दाऐवजी " सात " हा शब्द,] दाखल करण्यात येईल.

[५][ (ङ) कलम १११, चे पोट-कलम (४) चे परंतुक वगळण्यात येईल.]

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५१ (१) द्वारे खंड (१क) समाविष्ट करण्यात आला

२ वरील अधिनियमाच्या कलम ५१ (२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ८ अन्वये " आणि " हा शब्द वगळण्यात आला

४ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५१ (३) अन्वये खंड (घ-१) समाविष्ट करण्यात आला

५ सन [illegible] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम ३५ अन्वये मूळ खंड (ङ-१) व (ङ) यांच्याऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

## स्थायी आणि विषय समित्या

स्थायी समित्यांच्या आणि विषय समित्यांच्या बैठकी

**११९.** [1][(१)] प्रत्येक स्थायी समितीस आणि विषय समितीस, आवश्यक असेल तितक्या वेळा बैठकी घेता येतील. परंतु तिची शेवटची बैठक आणि तिच्या पुढच्या बैठकीचा दिनांक यामध्ये एक महिन्याचा कालावधी असणार नाही आणि ती तिच्या बैठकीच्या कामकाजाच्या संबंधात [2][ राज्य शासन नियमांद्वारे याबाबतीत विहित करील] अशा कार्यपध्दतीचे पालन करील.

[1][(२) कलम ११२ ची पोट-कलमे (१) व (२) च्या तरतुदी जिल्हा परिषदेच्या बैठकींच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे, पुढील फेरबदलांसह स्थायी किंवा विषय समितीच्या बैठकींच्या संबंधात लागू होतील, ते फेरबदल असे -

(क) " जिल्हा परिषद " या शब्दांऐवजी " स्थायी समिती किंवा विषय समिती, " हे शब्द दाखल करण्यात येतील. आणि

(ख) " परिषद सदस्य " या शब्दांऐवजी " सदस्य " हा शब्द दाखल करण्यात येईल;

(ग) " परिषद सदस्याचे कोणतेही अधिकारपद, " या शब्दांऐवजी, " सदस्याचे कोणतेही अधिकारपद, " हे शब्द दाखल करण्यात येतील.

(घ) " परिषद " या शब्दांऐवजी, " अशी कोणतीही समिती, " हे शब्द दाखल करण्यात येतील. ].

सभापतीने यथास्थित स्थायी समितीच्या किंवा विषय समित्यांच्या बैठकीस हजर राहण्यास शासकीय अधिकाऱ्यास फर्मावणे.

**१२०.** विभागाहून कमी असलेल्या एखाद्या क्षेत्रावर अधिकारिता असणाऱ्या आणि कोणत्याही जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली काम करीत नसलेल्या, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याची हजेरी यथास्थिति, स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या बैठकीत इष्ट आहे असे स्थायी समितीस किंवा विषय समितीस वाटल्यास, यथास्थिति, स्थायी समितीचा किंवा विषय समितीचा सभापती नियोजित बैठकीच्या पंधरा दिवसांपेक्षा कमी नाहीत इतके दिवस अगोदर अशा अधिकाऱ्याच्या नावे पत्र लिहून त्यास बैठकीस हजर राहण्याविषयी फर्मावील, आणि असा अधिकारी आजारामुळे किंवा इतर वाजवी कारणामुळे प्रतिबंध झालेला नसेल तर त्या बैठकीस हजर राहील -

परंतु असे पत्र मिळाल्यावर, त्या अधिकाऱ्यास उपरोक्त कारणांपैकी कोणत्याही कारणास्तव स्वतः बैठकीस उपस्थित राहणे शक्य नसल्यास, त्यास आपल्या उप अधिकाऱ्यास किंवा सहायक अधिकाऱ्यास किंवा इतर सक्षम दुय्यम अधिकाऱ्यास, आपला प्रतिनिधी म्हणून बैठकीस हजर राहण्याबाबत निदेश देता येईल.

स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या सभापतीने लेखी प्रतिपादने प्रसृत करणे

**१२१.** (१) बैठक बोलाविणे आवश्यक आहे असे ज्या ज्या वेळी स्थायी समितीच्या किंवा विषय समितीच्या सभापतीस वाटेल तेव्हा, त्यास आपले स्वतःचे किंवा समितीच्या इतर कोणत्याही सदस्याचे किंवा जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कार्यकारी अधिकाऱ्याचे लेखी प्रतिपादन समितीच्या सदस्यांच्या अभिप्रायासाठी व त्यांची मते घेण्यासाठी, प्रसृत करता येईल.

(२) अशा रीतीने प्रसृत केलेल्या कोणत्याही प्रतिपादनावरील निर्णय त्यावर नोंदविलेल्या बहुमतानुसार असेल.

---

१ सन १९६१ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ६ द्वारे कलम ११९ यास उक्त कलमाचे पोट-कलम (१) असा त्यांन क्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

२ सन १९६३ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५२ द्वारे जिल्हा "परिषदा विनियमांद्वारे वेळोवेळी तरतूद करील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१२२. स्थायी समितीस किंवा कोणत्याही विषय समितीस नेमून दिलेल्या किंवा त्या समित्यांकडून हाताळण्यात येणाऱ्या विषयांपैकी कोणत्याही विषयांसंबंधीच्या कोणत्याही बाबतीत स्थायी समितीशी किंवा अशा विषय समितीशी विचारविनिमय करण्याची एखाद्या मंत्र्याची इच्छा असेल तेव्हा, अशा मंत्र्यास, अध्यक्षांच्या नावे पत्र लिहून मंत्री त्यात नमूद करील अशा दिनांकाला व अशा वेळी समितीची बैठक बोलावण्याची व्यवस्था करण्याबद्दल विनंती करता येईल. [1][आणि कलम ११९ खाली केलेल्या कोणत्याही नियमांत काहीही अंतर्भूत असले तरी अध्यक्ष] असे पत्र मिळाल्यावर तदनुसार समितीच्या कार्यालयात अशी बैठक बोलावण्यासाठी सर्व उपाययोजना करील. विवक्षित बाबतीत समित्यांची बैठक बोलावणे

प्रकरण आठ

## बांधकामे आणि विकास परियोजना पार पाडणे व त्या सुस्थितीत ठेवणे

१२३. (१) राज्य शासनास, त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तींना व निर्बंधांना अधीन राहून, त्यास योग्य वाटतील अशा बांधकामाची किंवा विकास परियोजनांची ( मग अशी बांधकामे किंवा परियोजना त्या जिल्ह्यातील असोत किंवा जिल्ह्याबाहेरील असोत, आणि जिल्हा यादीतील कोणत्याही विषयासंबंधीच्या असोत वा नसोत ) अंमलबजावणी करणे किंवा ती सुस्थितीत ठेवणे, या गोष्टी राजपत्रातील आदेशाद्वारे, कोणत्याही जिल्हा परिषदेकडे किंवा पंचायत समितीकडे किंवा दोहोंकडे सोपविता येईल, आणि तदनुसार ती बांधकामे किंवा त्या विकास परियोजना पार पाडणे किंवा त्या सुस्थितीत ठेवणे हे जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे किंवा यथास्थिति, दोहोंचे कर्तव्य असेल. विकास परियोजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदेकडे सोपवणे

(२) या कलमाखाली बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडताना किंवा त्या सुस्थितीत ठेवताना जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती किंवा त्या दोन्ही राज्य शासनाचा अभिकर्ता किंवा अभिकर्ते म्हणून काम करतील; आणि त्यांना राज्य शासनाकडून निर्धारित करण्यात येईल अशी रक्कम ( बांधकामे व विकास परियोजना पार पाडताना केलेला प्रशासनविषयक कोणताही अतिरिक्त खर्च धरुन) राज्य शासन देईल.

(३) या कलमाखाली काम करीत असताना जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती राज्य शासनाच्या सर्वसाधारण नियंत्रणाखाली असेल व ती राज्य शासनाकडून या बाबतीत वेळोवेळी देण्यात येतील अशा विशिष्ट निदेशांचे (तसे निदेश असल्यास) अनुपालन करील.

(४) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी जिल्हा परिषदेकडे किंवा पंचायत समितीकडे त्या पोट-कलमाखाली सोपवलेले कोणतेही बांधकाम किंवा विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा त्या सुस्थितीत ठेवण्याचे काम राज्य शासनास, आदेशाद्वारे त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून काढून घेता येईल.

१२४. (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींत काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु राज्य शासनाने याबाबत विहित केलेल्या, नियमांना अधीन राहून, जिल्हा परिषद जी बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा सुस्थितीत ठेवण्याचे ठरवील अशी कोणतीही बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा त्या सुस्थितीत ठेवण्याचे काम जिल्ह्यामध्ये पंचायत समितीच्या एजन्सीमार्फत करण्यात येईल. जिल्हा परिषदेने पंचायत समितीमार्फत बांधकामे आणि विकास परियोजना पार पाडणे.

१९५९ चा मुंबई ३ (२) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ किंवा हा अधिनियम यात काहीही अंतर्भूत असले तरी जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती ज्या बांधकामाची किंवा विकास परियोजनांची अमलबजावणी करण्याचे किंवा ती सुस्थितीत ठेवण्याचे ठरवील अशी कोणतीही बांधकामे किंवा कोणत्याही विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा त्या सुस्थितीत ठेवण्याचे काम जिल्ह्यामध्ये पंचायत समितीच्या

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३९, कलम १३ अन्वये "आणि असे पत्र मिळाल्यानंतर अध्यक्षाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

एजन्सीमार्फत करता येईल आणि राज्य शासन विहित करील अशी बांधकामे किंवा विकास परियोजना जिल्ह्यामध्ये पंचायत समितीच्या एजन्सीमार्फत पार पाडण्यात येतील किंवा सुस्थितीत ठेवण्यात येतील.

(३) कोणतीही बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा त्या सुस्थितीत ठेवण्याचे काम पंचायत समितीकडून किंवा यथास्थिति, पंचायतीकडून केले गेल्यास, जिल्हा परिषदेकडून किंवा ; यथास्थिति, पंचायत समितीकडून निर्धारित करण्यात येतील अशा रकमा ( बांधकामे किंवा परियोजना पार पाडताना केलेल्या प्रशासनविषयक कोणत्याही अतिरिक्त खर्चासह ) जिल्हा परिषद पंचायत समितीस आणि पंचायत समिती पंचायतीस देईल.

बांधकामे किंवा विकास परियोजना हाती घेण्यास मंजुरी

१[१२५. (१) ज्यांच्या संबंधात जिल्हा निधीमधून किंवा गट अनुदानातुन खर्च करावा लागेल अशी कोणतीही बांधकामे आणि विकास परियोजना या नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा प्राधिकाऱ्यांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीवाचून कार्यान्वित करता येणार नाहीत.

(२) या प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या नियमांद्वारे अशा प्रत्येक प्राधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला ज्या मर्यादापर्यंत मंजुरी देता येईल अशा अनावर्ती व आवर्ती खर्चाच्या मर्यादासुध्दा विहित करण्यात येतील.

(३) राज्य शासन, विहित केलेल्या मर्यादांमध्ये राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी बदल करण्यास सक्षम असेल, परंतु अशा प्रकारे मर्यादा वाढवण्यात आलेल्या असतील त्या बाबतीत, वाढवण्यात आलेल्या मर्यादा, नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या मर्यादांच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाहीत.

बांधकामे किंवा विकास परियोजना यांसाठी संविदा

१२६. (१) जिल्हा निधीतून किंवा गट अनुदानातुन, हाती घेण्याकरिता रीतसर मंजूर करण्यात आलेली कोणतीही बांधकामे किंवा विकास परियोजना पार पाडयासाठी नियमांद्वारे विहित करण्यात येतील अशा प्राधिकाऱ्यांच्या किंवा अधिकाऱ्यांच्या पूर्वमंजुरीवाचून कोण्त्याही निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत किंवा संविदा केल्या जाणार नाहीत.

(२) या प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या नियमांद्वारे अशा प्रत्येक प्राधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला ज्या मर्यादापर्यंत मंजुरी देता येईल अशा अनावर्ती खर्चाच्या मर्यादासुध्दा विहित करण्यात येतील.

(३) राज्य शासन, विहित केलेल्या मर्यादांमध्ये राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी बदल करण्यास सक्षम असेल, परंतु अशा प्रकारे मर्यादा वाढवण्यात आलेल्या असतील त्या बाबतीत, वाढवण्यात आलेल्या मर्यादा या नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या मर्यादांच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाहीत.]

निरीक्षण करण्याचा व तांत्रिक मार्गदर्शन वगैरे देण्याचा राज्य शासनाचा किंवा अधिकाऱ्याचा अधिकार

१२७. जिल्हा परिषदेने किंवा पंचायत समितीने हाती घेतलेले कोणतेही बांधकाम किंवा विकास परियोजना कार्यक्षम रीतीने किंवा काटकसरीने पार पाडण्याच्या किंवा त्या सुस्थितीत ठेवण्याच्या प्रयोजनासाठी, राज्य शासनाच्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस असे वाटले की, जिल्हा परिषदेच्या किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेल्या ज्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे असे कोणतेही बांधकाम किंवा विकास परियोजना पार पाडण्याचे किंवा ती सुस्थितीत ठेवण्याचे काम सोपविले असेल त्यास त्या प्रयोजनासाठी तांत्रिक मार्गदर्शन किंवा सहाय्य देणे आवश्यक आहे तर अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस अशा बांधकामाचे किंवा विकास परियोजनेचे नियतकालाने निरीक्षण करता येईल आणि अशा बांधकामाच्या किंवा विकास परियोजनाच्या संबंधात त्यास आवश्यक वाटेल असे मार्गदर्शन करता येईल किंवा सहाय्य अथवा सल्ला देता येईल आणि तो, आपण केलेल्या निरीक्षणाचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे सादर करील व त्यात, अशा निरीक्षणात आढळून आलेल्या नियमबाह्यता आणि सुधारणेसाठी आपल्या सूचना नमूद करील.

---

१ सन [illegible] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible] कलम [illegible] आली.

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, तिची मालमत्ता, निधि व खर्च

[1][१२८. (१) जिल्हा परिषदेस, आपल्या कार्यांपैकी कोणत्याही कार्याच्या प्रयोजनासाठी – मालमत्ता संपादन करण्याचा व ती भाडेपट्ट्याने देण्याचा, विकण्याचा किंवा हस्तांतरित करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार

(क) स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करता येईल, मग ती जिल्ह्याच्या हद्दीतील असो किंवा हद्दीबाहेरील असो किंवा

(ख) तिच्यामध्ये निहित असलेली, किंवा निहित करता येईल अशी, किंवा ती संपादन करील अशी कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल, विकता येईल किंवा अन्यथा ती हस्तांतरित करता येईल:

परंतु, अशा कोणत्याही मालमत्तांचे कोणतेही संपादन, भाडेपट्टा, विक्री किंवा अन्यथा हस्तांतरण हे, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याच्या किंवा अधिकाऱ्याच्या पूर्वमंजूरीवाचून विधिग्राह्य असणार नाही.

(२) या प्रयोजनासाठी करण्यात आलेल्या नियमांद्वारे, अशा प्रत्येक प्राधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यास ज्या मर्यादापर्यंत मंजुरी देता येईल त्या मूल्याच्या किंवा प्रतिफलाच्या मर्यादा आणि ज्या विषयांच्या संबंधात मंजुरी देता येईल ते विषय या बाबीसुध्दा विहित करण्यात येतील.

(३) राज्य, शासन विहित केलेल्या मर्यादामध्ये राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी बदल करण्यास सक्षम असेल, परंतु अशा प्रकारे मर्यादा वाढवण्यात आलेल्या असतील त्या बाबतीत, वाढवण्यात आलेल्या मर्यादा या, नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या मर्यादांच्या दुपटीपेक्षा अधिक असणार नाहीत.]

१२९. (१) जिल्हा निधीतून जिल्हा परिषदेने किंवा गट-अनुदानातून पंचायत समितीने किंवा शासनाच्या सहाय्याने किंवा जनतेच्या सहभागाने केलेले प्रत्येक बांधकाम जिल्हा परिषदेमध्ये निहित असेल. जिल्हा परिषदेची मालमत्ता.

[2][(२) पोट-कलम ३ च्या तरतुदींना अधीन राहून, राज्या शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तिच्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी ( राज्य शासनामध्ये निहित असलेली ) स्थावर किंवा जंगम मालमत्ता कोणत्याही जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करता येईल, जर राज्य शासनास कोणत्याही प्रयोजनासाठी मालमत्तेची आवश्यकता असेल तर त्यास, जिल्हा परिषदेवर आदेश बजावून, तसा निर्णय घेता येईल; आणि त्यानंतर उक्त मालमत्ता राज्य शासनामध्ये पुन्हा निहित होईल.

(३) असे हस्तांतरण झाले असता ती मालमत्ता, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अटींना, शर्तींना व निर्बंधांना ( ज्यात वेळोवेळी फेरबदल करता येईल ) अधीन राहून, जिल्हा परिषदेमध्ये निहित होईल;

परंतु, कोणत्याही अटींचा, शर्तींचा व निर्बंधाचा भंग झाल्यास किंवा राज्य शासनास मालमत्तेची आवश्यकता असल्यास जिल्हा परिषदेमध्ये निहित असणारी मालमत्ता राज्य शासनामध्ये पुन्हा निहित होईल आणि राज्य शासनास तिचा परत कब्जा घेता येईल.]

---

१ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३ द्वारे मूळ कलम १२८ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

२ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ७ द्वारे पोट-कलम (२) ऐवजी पोट-कलमे (२) व (३) दाखल करण्यात आली.

जिल्हा निधी, त्याची अभिरक्षा व गुंतवणूक.

**१३०.** (१) प्रत्येक जिल्ह्यात 'जिल्हा' निधी या नावाचा एक स्थानिक निधी असेल.

(२) पुढील रकमा जिल्हा निधीत भरण्यात येतील आणि त्या, त्याचा एक भाग म्हणून असतील -

(क) जिल्ह्याच्या किंवा संबध्द जिल्हा मंडळ अधिनियमाखाली स्थापन केलेल्या जनपद क्षेत्राच्या स्थानिक निधीत असलेली शिल्लक ;

(ख) संबध्द जिल्हा मंडळ अधिनियमाखाली जिल्ह्यात भरावयाच्या करांच्या किंवा उपकरांच्या कोणत्याही उर्वरित रकमांचे ( निर्धारणाचा व वसुलीचा खर्च वजा जाता ) निव्वळ उत्पन्न;

(ग) जिल्ह्यातील कलमे, १४४,१४६,१५१ किंवा १५२ खाली प्राधिकृत केलेल्या उपकरापासून मिळणारे ( विहित करण्यात येईल अशा रकमा वजा जाता) उत्पन्न

(घ) पेशा, उदीम, उपजीविका आणि नोकऱ्या यांवरील कराच्या रकमेतून कलम १६३, खंड (ख) खाली पंचायतीस जेवढी टक्केवारी नेमून द्यावयाची असेल तेवढी वजा करुन राहिलेली शिल्लक;

[1][(घ-१) वित्त आयोगाच्या शिफारशीवरुन राज्य शासनाने निर्धारित केल्या नुसार वितरित व नियत वाटप केलेला, राज्याकडून बसविण्यात आलेला कर, शुल्क, पथकर व फी यांच्या निव्वळ उत्पन्नातील जिल्हा परिषदेचा हिस्सा दर्शविणारी रक्कम ;]

(ङ) जिल्हा परिषदेमध्ये निहित असलेल्या मालमत्तेपासून ( तिच्यासह ) मिळणारी सर्व भाडी व नफे;

(च) जिल्हा परिषदेमध्ये निहित असलेले रस्ते व पूल यांवर, रस्ते व पूल यांवरील पथकर अधिनियम, १८७५ खाली किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याखाली जिल्ह्यात बसविलेले सर्व पथकर व पथकराचे पट्टे यापासूनचे उत्पन्न; १८७५ चा मुंबई ३

(छ) या अधिनियमाची [2][अंमलबजावणी करताना] किंवा या अधिनियमाखालील कर आकारणीपासून जिल्हा परिषदेस मिळालेल्या सर्व रकमा;

(ज) जिल्हा परिषदेने धारण केलेल्या कोणत्याही रोख्यावरील व्याज आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न ; [3][आणि शेअर असल्यास, त्यांच्या संबंधात देय होणारे लाभांश आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न.]

(झ) खाजगी व्यक्तींनी अंशदान म्हणून दिलेल्या सर्व रकमा,

(ञ) जिल्हा परिषदेच्या व्यवस्थापनाखाली ठेवलेले धर्मादाय व विश्वस्तव्यवस्था यांच्यामुळे मिळालेल्या रकमा,

(ट) राज्य शासनाने दिलेली सर्व अनुदाने, कर्जे अभिहस्तांकित रकमा व अंशदाने,

(ठ) पंचायत समित्या किंवा कोणत्याही परिसंस्था किंवा व्यक्ती यांच्यासाठी असलेली आणि जिल्हा परिषदेमार्फत शासनाने द्यावयाची सर्व अनुदाने, कर्जे आणि अंशदाने,

(ड) हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याखाली जिल्हा परिषदेस किंवा तिच्या वतीने मिळालेल्या [4][या अधिनियमाखाली कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमांसह] इतर सर्व रकमा,

(ढ) एजन्सीची कोणतीही कामे पार पाडण्यासाठी झालेला खर्च भागविण्याकरिता राज्य शासनाने जिल्हा परिषदेस दिलेल्या सर्व रकमा,

(ण) फौजदारी खटल्यातील दंडाव्यतिरिक्त इतर रीतीने शास्तीदेखील वसूल केलेल्या सर्व रकमा, आणि

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७५ द्वारे खंड (घ-१) समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १८ द्वारे "अंमलबजावणी करुन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३२(अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५४ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(त) सेवा, सुविधा, लाभ किंवा सुखसोयी पुरवण्याबद्दल किंवा त्यांची तरतूद करण्याबद्दल व्यक्तींकडून मिळालेल्या सर्व रकमा,

परंतु, जेव्हा एका जिल्हा परिषदेमध्ये किंवा एकाहून अधिक जिल्हा परिषदांमध्ये निहित असलेली एखादी सार्वजनिक तर, रस्ता किंवा पूल ही अंशत: एका जिल्ह्यात व अंशत: दुसऱ्या जिल्ह्यात असतील तेव्हा, असे जिल्हे एकाच विभागात असतील तर आयुक्ताला व ते निरनिराळ्या विभागात असतील तर राज्य शासनाला, अशी तर किंवा असा रस्ता किंवा पूल यावर बसविलेल्या पथकरांच्या किंवा पथकरांच्या पट्ट्याच्या निव्वळ उत्पन्नाचा, आयुक्ताला किंवा राज्य शासनाला योग्य वाटेल असा भाग, प्रत्येक जिल्हा परिषदेच्या स्थानिक निधीस नेमून देता येईल.

१९७५ चा महा ६ [1][(२-क) (क) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती ( चौथी सुधारणा ) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एखाद्या जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांकडून, तिने स्थापन केलेल्या कोणत्याही भविष्यनिर्वाह निधीत भरण्यात आलेल्या वर्गण्यांच्या सर्व रकमा किंवा अशा कर्मचाऱ्यांच्या लाभासाठी अशा वर्गण्यांवर जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेली कोणतीही अंशदाने असल्यास ती अंशदाने मुख्य कार्यकारी अधिकारी राज्याच्या लोकलेख्यात भरील. ज्या रीतीने अशा रकमा राज्याच्या लोकलेख्यात भरण्यात येतील आणि ज्या रीतीने अशा लोकलेख्यामधून पैसे काढण्यात येतील ती रीत आणि पूर्वोक्त बाबींशी संबंधित आणि सहाय्यभूत असतील अशा इतर सर्व बाबी यांचे, राज्य शासनाने केलेल्या नियमान्वये, विनियमन करण्यात येईल.

(ख) त्याचप्रमाणे, अशा प्रारंभाच्या लगतपूर्वी, सर्व वर्गणीदारांच्या वैयक्तिक लेख्यांमध्ये असलेल्या भविष्यनिर्वाह निधीतील सर्व संचित रकमा ( त्यांच्या कोणत्याही गुंतवणुका धरुन), राज्याच्या लोकलेख्यात तशाच रीतीने भरण्यात येतील आणि राज्य शासन निदेश देईल त्या दिनांकापूर्वी त्यांचा व्यवहार करण्यात येईल.]

[2][(२-ख) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुख्य कार्यकारी अधिकारी दिनांक ३१ मार्च १९७४ हा दिवस धरुन त्या दिनांकापर्यंतच्या मुदतीकरिता जिल्हा परिषद निवृत्तीवेतन निधीमध्ये प्रदेय असलेल्या व त्यामध्ये जमा करण्यात यावयाच्या निवृत्तीवेतन अंशदानाच्या संबंधातील सर्व रकमा, तसेच त्या निधीतील रक्कम रोख्यांमध्ये किंवा शेअरमध्ये गुंतविली असल्यास त्यासह त्या निधीतील शिल्लक रक्कम दर्शवणाऱ्या सर्व रकमा यांचा राज्याच्या एकत्रित निधीत भरणा करील. अशा रकमा व असे कोणतेही रोखे किंवा शेअर असल्यास ते, यांचा राज्याच्या एकत्रित निधीत भरणा करण्याची रीत व उपरोक्त बाबींशी संबंधित व त्यांच्याशी आनुषंगिक अशा इतर सर्व बाबींचे राज्य शासन वेळोवेळी काढील अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनियमन करण्यात येईल.]

(३) जिल्हा निधि —

(क) सरकारी कोषागारात किंवा सरकारी कोषागारांचे कामकाज ज्या बँकेकडे सोपवले असेल त्या बँकेत ; किंवा

(ख) राज्य शासन याबाबत विनिर्दिष्ट करील त्या शर्तींना अधीनराहून राज्य शासन मान्य करील अशा सहकारी संस्थेत

ठेवण्यात येईल :

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३९ (ब) द्वारे पोट-कलम (२क) दाखल करण्यात आले.

२ सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ द्वारे पोट-कलम (२ख) दाखल करण्यात आले.

३ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३९(क) द्वारे हे परंतुक वगळण्यात आले

[1][(४) जिल्हा परिषदेस, वेळोवेळी, राज्य शासनांच्या पूर्वमान्यतेने, जिल्हा निधीचा कोणताही भाग —

(क) राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या रोख्यांमध्ये किंवा राज्य शासन याबाबतीत मान्य करील अशा इतर रोख्यांमध्ये गुंतवता येईल.

(ख) सहकारी संस्थांच्या शेअरांची किंवा राज्य शासन याबाबतीत सर्वसाधारण किंवा विशेष आदेश काढून मान्य करील अशा, राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्याने नियंत्रित केलेल्या कोणत्याही महामंडळाच्या (कंपनीसह) शेअरांची किंवा ऋणपत्रांची खरेदी करण्यात गुंतवता येईल.

आणि त्याच स्वरुपाच्या इतर गुंतवणुकासाठी अशा गुंतवणुका कमी-अधिक करता येतील आणि रोखे, शेअर किंवा ऋणपत्रे यांच्यापासून होणारी प्राप्ती आणि त्यांच्या विक्रीचे उत्पन्न, जिल्हा निधीमध्ये जमा करण्यात येईल.]

पैसे कर्जाऊ घेणे.

[2][**१३०क.** जिल्हा परिषदेस, या अधिनियमाखाली आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी जिल्हा निधीच्या जमा खात्यांकडील पैसा ज्या कोणत्याही बँकेत किंवा सहकारी संस्थेत ठेवण्यात आला असेल त्या बँकेकडून किंवा सहकारी संस्थेकडून [3][किंवा राज्य शासन याबाबतीत मान्यता देईल अशा कायद्याने संस्थापित असलेल्या किंवा नसलेल्या संस्थेकडून अथवा संघाकडून] पैसे कर्जाऊ घेता येतील.]

विशेष निधी निर्माण करणे

**१३१.** (१) कोणत्याही विनिर्दिष्ट प्रयोजनाच्या संबंधातील खर्च भागवण्याकरिता निधी राखून ठेवण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाला, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, जिल्हा परिषदेस, —

(क) आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल असा जिल्हा निधीचा भाग, किंवा

(ख) त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राप्तीच्या मार्गापासून मिळालेल्या उत्पन्नाच्या रकमा, याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाचा खर्च भागवण्याकरिता जिल्हा परिषदेच्या लेख्यांतील वेगळ्या शीर्षाखाली जमा करण्याविषयी निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये कोणताही निधी निर्माण करण्यात येईल तेव्हा, आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनाशी स्पष्टपणे संबंधित असेल, केवळ असाच खर्च अशा निधीच्या खर्चखाती टाकण्यात येईल.

जिल्हा निधी कोठे खर्च करावा.

**१३२.** जिल्हा निधीतून जिल्हा परिषदेने [4][ कोणतेही अनुदान धरुन करावयाचा खर्च ], या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, फक्त तिच्या प्राधिकाराखाली क्षेत्रातच करण्यात येईल, पण असा खर्च आयुक्ताच्या मंजुरीने, या अधिनियमांच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी त्या क्षेत्राच्या बाहेर करता येईल, मात्र त्या क्षेत्राबाहेरील आपली मालमत्ता सुस्थितीत राखण्याच्या प्रयोजनासाठी [5][किंवा कलम ४६, पोट-कलम (२), कलम ६९, पोट-कलम (२) किंवा, यथास्थिती, कलम ८४, पोट-कलम (२) खाली पीठासीन प्राधिकाऱ्यांसाठी निवासव्यवस्थेची किंवा त्याऐवजी

---

१ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३९ (ड) द्वारे पोट-कलम (४) हे जादा दाखल करण्यात आले.

२ सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम १७ द्वारे कलम १३०क समाविष्ट करण्यात आले.

३ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५९ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ९ द्वारे "खर्च" या शब्दाऐवजी हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

५ सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम ४९ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

घरभाडे भत्त्याची तरतूद करण्यासाठी [1][किंवा अशा क्षेत्राबाहेर [2][पण महसुली जिल्ह्यातच,] परिषदा, स्वागतसमारंभ, समारंभ, प्रदर्शने किंवा सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी] अशी मंजुरी आवश्यक असणार नाही.

**१३३.** प्रत्येक जिल्हा परिषद तिच्या स्वाधीन असलेल्या जिल्हा निधीतून पुढील रकमा देईल— सर्वसाधारण खर्च भागवणे.

(क) कलमे ४६, ६९ किंवा ८४ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे पीठासीन प्राधिकाऱ्यांना मासिक मानधन [3][आणि कलम ४६क अनुसार अध्यक्षांच्या स्वाधीन केलेली आतिथ्य भत्त्याची रक्कम];

(ख) परिषद-सदस्य, कोणत्याही पंचायत समितीचे किंवा समितीचे सदस्य आणि जिल्हा परिषदेच्या अखत्यारातील अधिकारपदे धारण करणारे अधिकारी व तिचे कर्मचारी यांना प्रवासभत्ता व इतर भत्ते ;

(ग) जिल्हा परिषदेच्या अखत्याराखाली काम करणारे अधिकारी आणि तृतीय व चतुर्थ वर्गाच्या सेवेतील कर्मचारी यांची वेतन व भत्ते ;

(घ) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली तरतूद करण्यात आल्याप्रमाणे, अधिकारी व कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबीय यांना निवृत्तिवेतने ( निवृत्तिवेतनाकरिता द्यावयाच्या अंशदानांसह), आणि इतर सेवानिवृत्ति भत्ते, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते;

(ङ) भूमि संपादन करण्याचा व बाजार स्थापन करण्याचा परिव्यय, [4]* * *

(च) तिच्याकडे सोपविण्यात आलेली एजन्सीच्या स्वरुपाची कार्ये पार पाडण्याचा परिव्यय ;

[5][(छ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली जिल्हा परिषदेकडे सोपवण्यात आलेली कर्तव्ये व कार्ये पार पाडण्याचा परिव्यय.]

**१३४.** (१) कलमे २५८, २५९, २६० व २६८ च्या तरतुदींना अधीन राहून, [6][मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने] [7][किंवा याबाबतीत त्याने विशेष रीत्या प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने] सही केलेले धनादेश किंवा पतपत्र हजर केल्याशिवाय जिल्हा निधीतील कोणतही पैसा सरकारी कोषागारातून किंवा बँकेकडून किंवा सहकारी संस्थेकडून देण्यात येणार नाही. जिल्हा निधीतून रकमा कशा काढाव्यात.

(२) [8][एक हजार रुपयांहून] अधिक असणाऱ्या कोणत्याही रकमेचे प्रदान पूर्वोक्तप्रमाणे सही केलेल्या धनादेशाच्या किंवा पतपत्राच्या द्वारे करण्यात येईल, इतर कोणत्याही मार्गाने ते करण्यात येणार नाही.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४० द्वारे ''जिल्ह्यातच'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ४१ (अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४१ (ब) द्वारे ''आणि'' हा शब्द वगळण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ४१ (क) द्वारे खंड (छ) जादा दाखल करण्यात आला.

[6] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५८ द्वारे ''जिल्हा परिषदेने योग्य रीत्या अधिकृत केलेल्या व जिल्हा परिषदेत पद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याने'' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[7] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १२(अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) द्वारे ''दोनशे रुपयांहून'' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

राज्य शासनाने विहित केलेल्या नमुन्यात लेखे ठेवणे.

**१३५.** प्रत्येक जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे जमा व खर्च यांचे लेखे राज्य शासन याबाबतीत केलेल्या नियमान्वये वेळोवेळी विहित करील अशा नमुन्यात ठेवण्यात येतील; आणि त्यांचा राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे, दरवर्षी, प्रत्येक वित्तीय किंवा महसुली वर्षाच्या शेवटच्या दिवशी मेळ बसवण्यात येईल.

लेख्याचे विवरण तयार करणे व लेख्यांच्या विवरणाचा गोषवारा प्रसिद्ध करणे.

[1]**१३६.** (१) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा निधीमधून काढण्यात आलेली रक्कम, आस्थापनेवरील खर्च व इतर सर्व खर्च, हाती घेण्यात आलेली बांधकामे व विकास परियोजना आणि हातची शिल्लक कोणतीही असल्यास, दर्शविणारे, जिल्हा परिषदेच्या जमा व खर्च यांच्या लेख्यांचे विवरणपत्र राज्य शासन दरवर्षी नियमांद्वारे विहित करील अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी आणि अशा नुमन्यात तयार करील, आणि त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा अन्य दिनांकास किंवा त्यापूर्वी अंतिम सुधारित अनुदानातील खर्चाच्या तफावतींचे विवरणपत्रही त्या तफावतींवरील त्याचा शेरा व स्पष्टीकरणे यांसह तयार करील.

(२) गटविकास अधिकारी, गट अनुदानामधून काढण्यात आलेली रक्कम, हाती घेण्यास आलेली बांधकामे व विकास परियोजना आणि हातची शिल्लक, कोणतीही असल्यास, दर्शविणारे, पंचायत समितीच्या जमा व खर्च यांच्या लेख्यांचे विवरणपत्र राज्य शासन दरवर्षी विहित करील अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी आणि अशा नमुन्यात तयार करील आणि त्याबाबतीत विहित करण्यात येईल अशा अन्य दिनांकास किंवा त्यापूर्वी अंतिम सुधारित अनुदानातील खर्चाच्या तफावतीचे विवरणपत्रही, त्या तफावतींवरील त्याचा शेरा व स्पष्टीकरणे यांसह तयार करील, आणि तफावतींच्या विवरणपत्रासह, लेखा विवरणपत्र या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवील.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी पोट-कलम (१) आणि (२) खाली तयार करण्यात आलेली लेखा विवरणपत्रे व तफावतीची विवरणपत्रे वित्त समितीपुढे ठेवील. वित्त समिती कलम १०९ क अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्या विवरणपत्राचे परिनिरीक्षण करील आणि त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी, आपला अहवाल तयार करील. मुख्य कार्यकारी अधिकारी त्यानंतर ताबडतोब जिल्हा परिषदेपुढे किंवा यथास्थिति, पंचायत समितीपुढे अहवाल मांडण्याची तजवीज करील.

(४) जिल्हा परिषद, या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यानंतर, पोट-कलम (१) खाली तयार करण्यात आलेले लेखे आणि त्या संबंधात पोट-कलम (३) खाली तयार करण्यात आलेला वित्त समितीचा अहवाल यांवर विचार करील आणि या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी त्यास मान्यता देईल.

(५) प्रत्येक पंचायत समिती, त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यानंतर, पोट-कलम (२) खाली तयार करण्यात आलेले लेखे आणि त्यासंबंधात पोट-कलम (३) खाली तयार करण्यात आलेला वित्त समितीचा अहवाल यावर विचार करील आणि त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी त्यास मान्यता देईल आणि तिला योग्य वाटेल अशा शेऱ्यांसह ते जिल्हा परिषदेकडे पाठवील.

(६) जिल्हा परिषदेने, त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी लेख्यांस मान्यता देण्यात कसूर केल्यास, मुख्य कार्यकारी अधिकारी पोट-कलम (१) खाली तयार करण्यात आलेले लेखे व वित्त समितीचा पोट-कलम (३) खालील त्यावरील अहवाल, राज्य शासनाकडे पाठवील आणि शासन फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय त्यास मान्यता देईल. राज्य शासनाकडून अशा रीतीने मान्यता देण्यात आलेले लेखे हे जिल्हा परिषदेकडून रीतसर मान्य करण्यात आलेले लेखे असल्याचे मानण्यात येईल.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ कलम ४४ द्वारे मूळ कलमाऐवजी कलम १३६ दाखल करण्यात आले

(७) पंचायत समितीने, त्या बाबतीत, पोट-कलम (५) खाली विहित करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी लेख्यांस मान्यता देण्यात आणि ते जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात कसूर केल्यास गट विकास अधिकारी पोट-कलम (२) अन्वये तयार करण्यात आलेले लेखे व वित्त समितीचा पोट-कलम (३) खालील त्यावरील अहवाल जिल्हा परिषदेकडे पाठवील आणि जिल्हा परिषद फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय त्यास मान्यता देईल जिल्हा परिषदेने, त्या बाबतीत विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी कोणत्याही पंचायत समितीच्या लेख्यांस मान्यता देण्यात कसूर केल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी ते राज्य शासनाकडे पाठवील आणि राज्य शासन फेरबदलांसह किंवा फेरबदलांशिवाय त्यांस मान्यता देईल आणि राज्य शासनाकडून अशा रीतीने मान्यता देण्यात आलेले लेखे पंचायत समितीकडून रीतसर मान्यता देण्यात आलेले लेखे असल्याचे मानण्यात येईल.

(८) गट विकास अधिकारी, विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी आणि अशा नमुन्यात पंचायत समितीकडून पोट-कलम (५) खाली मान्यता देण्यात आलेल्या किंवा पोट-कलम (७) खाली मान्यता देण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या लेख्यांच्या विवरणपत्राचा गोषवारा तयार करील आणि तो मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे पाठवील. प्रत्येक गटविकास अधिकाऱ्याने अशा रीतीने पाठविलेले लेखे जिल्हा परिषदेच्या लेख्यांचा भाग बनतील.

(९) मुख्य कार्यकारी अधिकारी, विहित करण्यात येईल अशा दिनांकास किंवा त्यापूर्वी जिल्हा परिषदेकडून पोट-कलम (४) खाली मान्यता देण्यात आलेल्या किंवा पोट-कलम (६) खाली मान्यता देण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या लेख्यांचा विवरणपत्राचा गोषवारा तयार करील आणि राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा दिनांकापूर्वी आणि अशा नमुन्यात आणि अशा रीतीने गट विकास अधिकाऱ्याकडून, पोट-कलम (८) खाली पाठविण्यात आलेल्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या लेखा विवरणपत्रांसह तो गोषवारा प्रसिद्ध करील.]

**१३७.** (१) प्रत्येक जिल्हा परिषद, पुढील वित्तीय वर्षासाठी परिषदेच्या प्राप्तीचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज, राज्य शासन, या बाबतीत केलेल्या नियमान्वये वेळोवेळी विहित करील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी व विहित नमुन्यात दरवर्षी तयार करील.

प्राप्तीचे व खर्चाचे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

(२) प्रत्येक पंचायत समिती, पुढील वित्तीय वर्षासाठी, गट अनुदानातून हाती घ्यावयाची, चालू ठेवलेली व पार पाडण्यात आलेली बांधकामे व विकास परियोजना यासंबंधीच्या प्राप्तीचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज राज्य शासन, या बाबतीत केलेल्या नियमान्वये वेळोवेळी विहित करील त्या दिनांकास किंवा त्यापूर्वी व विहित नमुन्यात दरवर्षी तयार करील.

(३) प्रत्येक पंचायत समिती, याप्रमाणे तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर उक्त दिनांकानंतर शक्यतितक्या लवकर विचार करील आणि त्यात फेरबदल करून, किंवा न करता त्यास मान्यता देईल आणि ते जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजात समाविष्ट करण्यासाठी, राज्य शासन या बाबतीत केलेल्या नियमान्वये विहित करील त्या दिनांकापूर्वी जिल्हा परिषदेकडे पाठवील.

(४) जिल्हा परिषद, पोट-कलम (१) खाली तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजावर (पंचायत समितीने पाठविलेले अर्थसंकल्पीय अंदाज वगळून) पोट-कलम (१) मध्ये विहित केलेल्या दिनांकास किंवा त्यानंतर विचार करील आणि त्यात फेरबदल करून किंवा न करता [1][राज्य शासन या बाबतीत विहित करील त्या दिनांकास किंवा त्या दिनांकापूर्वी ] त्यास मान्यता देईल. जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीने पाठविलेले अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजाचा भाग बनतील.

(५) पूर्वोक्तप्रमाणे विहित केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी जिल्हा परिषदेने अर्थसंकल्पीय अंदाज मान्य करण्यात कसूर केल्यास, पोट-कलम (१) खाली तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज मुख्य कार्यकारी अधिकारी राज्य शासनाकडे पाठवील व ते शासन त्यात फेरबदल करून किंवा न करता त्यास मान्यता देईल, राज्य शासनाने याप्रमाणे मान्यता दिलेले अर्थसंकल्पीय अंदाज शासनाकडून प्रमाणित करण्यात येईल आणि त्यानंतर त्यांना जिल्हा परिषदेकडून रीतसर मान्यता देण्यात आली आहे, असे मानण्यात येईल.

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ कलम ५७ द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(६) पंचायत समितीने, अर्थसंकल्पीय अंदाजास मान्यता देण्यात आणि पोट-कलम (३) खाली या बाबतीत विहित केलेल्या दिनांकापूर्वी ते जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात कसूर केल्यास, गट विकास अधिकारी [1][पोट-कलम (२) खाली तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेकडे पाठवील; आणि परिषद त्यात फेरबदल करून किंवा न करता त्यांना मान्यता देईल], जिल्हा परिषदेने [2][ * * *] याप्रमाणे मान्यता दिलेले अर्थसंकल्पीय अंदाज ती परिषद प्रमाणित करील आणि त्यानंतर त्यांना पंचायत समितीने रीतसर मान्यता दिलेली आहे, असे मानण्यात येईल.

आवश्यक असेल तेव्हा सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज करणे. अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे पुनर्विनियोजन मान्यतेच्या अधीन असणे.

**१३८.** (१) ज्या वर्षासाठी अशा कोणत्याही अर्थसंकल्पीय अंदाजास मान्यता देण्यात आली असेल त्या वर्षात कोणत्याही वेळी, प्रत्येक जिल्हा परिषदेस सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याची तजवीज करता येईल. असे प्रत्येक सुधारित किंवा पुरवणी अंदाज, जणू काही ते मूळ अर्थसंकल्पीय अंदाज आहेत असे समजून त्याच रितीने त्यावर जिल्हा परिषद विचार करील व त्यांना मान्यता देईल.

(२) अशाच मान्यतेच्या अधीन अर्थसंकल्पीय अंदाजातील निधीचे वेळोवेळी पुनर्विनियोजन करता येईल :

[3][ परंतु, राज्य शासनाने दिलेल्या अनुदानामधील निधीचे वेळोवेळी पुनर्विनियोजन हे विहित करण्यात येईल अशा अटींना व शर्तींना अधीन असेल.]

(३) पोट-कलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,-

(क) स्थायी समितीस, [4][एकूण एक लाख रुपये या मर्यादेला अधीन राहून, कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये एकावेळी,] वीस हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेच्या प्रधान लेखा शीर्षामधील निधीचे पुनर्विनियोजन करण्यास मान्यता देता येईल ;

(ख) विषय समितीस, तिला नेमून दिलेल्या विषयांच्या संबंधात, त्याच प्रधान लेखा शीर्षामधील गौणशीर्षांमध्ये [5][एकूण एक लाख पंचवीस हजार रुपयांच्या मर्यादेला अधीन राहून कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये एकावेळी] पंचवीस हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यास मान्यता देता येईल; आणि

(ग) जिल्हा यादीत नमूद केलेल्या सर्व विषयांच्या संबंधात, स्थायी समितीस त्याच प्रधान लेखा शीर्षामधील गौण शीर्षांमध्ये [6][एकूण एक लाख पन्नास हजार रुपयांच्या मर्यादेला अधीन राहून कोणत्याही वित्तीय वर्षामध्ये एकावेळी] पंचवीस हजार रुपयांहून अधिक परंतु पन्नास हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेचे पुनर्विनियोजन करण्यास मान्यता देता येईल.

[7][(४) जिल्हा परिषदेने, सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्यासंबंधीच्या व त्यातील निधीचे पुनर्विनियोजन करण्यासंबंधीच्या पोट-कलमे (१) व (२) च्या तरतुदी पंचायत समित्यांनी

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १२ (अ) द्वारे "पोट-कलम (२) अन्वये तयार केलेले अंदाजपत्रक जिल्हा परिषदेकडे पाठविले पाहिजे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) द्वारे "फेरफार करून किंवा फेरफार न करता" हा मजकूर वगळण्यात आला.

[3] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १० द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४३ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ४३ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ४३ (क) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[7] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५८ द्वारे पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

सुधारित किंवा पुरवणी अर्थसंकल्पीय अंदाज तयार करण्याच्या व त्यातील निधींचे पुनर्विनियोजन करण्याच्या संबंधात योग्य त्या फेरफारासह लागू होतील.]

अर्थसंकल्पीय अंदाज व पुनर्विनियोजने यांना केव्हा मान्यता द्यावी.

**१३९.** जिल्हा परिषदेचे कोणतेही अर्थसंकल्पीय अंदाज व अर्थसंकल्पातील कोणत्याही बाबीचे पुनर्विनियोजन यांना, त्यामध्ये अशा परिषदेच्या जमाखाती वित्तीय वर्षाच्या अखेरीस पाच हजार रुपयांहून कमी नसेल इतक्या रकमेची किंवा राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा अधिक रकमेची [1][ मुक्त महसुली शिल्लक] असेल अशी तरतूद करण्यात आलेली पूर्वोक्तप्रमाणे असल्याखेरीज मान्यता देण्यात येणार नाही.

अर्थसंकल्पीय अंदाजात तरतूद न केलेली कोणतीही रक्कम अत्यंत निकडीचे प्रसंग खेरीज करून एरव्ही खर्च न करणे.

**१४०.** अत्यंत निकडीच्या प्रसंगाखेरीज [2][ किंवा या अधिनियमान्वये अशा प्रकारे स्पष्टपणे तरतूद केलेली असेल त्याखेरीज] कोणतीही रक्कम, पूर्वोक्तप्रमाणे मान्यता दिलेल्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही अर्थसंकल्पीय अंदाजात अंतर्भूत असल्याखेरीज, कोणत्याही जिल्हा परिषदेकडून किंवा तिच्या वतीने खर्च करण्यात येणार नाही.

जिल्हा परिषदेच्या प्राधिकाऱ्यांनी कर्जे अथवा आकस्मिक खर्च मंजूर करणे किंवा येणे असलेल्या रकमा निर्लेखित करणे, अशा अधिकाऱ्यांच्या मर्यादा.

**१४१.** (१) जेव्हा कोणत्याही जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजात कोणत्याही विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी कर्जे मंजूर करण्याची तरतूद केलेली असेल तेव्हा, जिल्हा परिषदेचे प्राधिकारी, राज्य शासन विहित करील अशा मर्यादेपर्यंत आणि विहित करील अशा विषयांसंबंधात अशा रकमेतून कर्जे मंजूर करू शकतील :

परंतु, कलम १०० मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही जिल्हा परिषदेस, "कृषि" आणि "पाटबंधारे" या क्षेत्रामध्ये मोडणाऱ्या बाबींच्या संबंधात आणि राज्य शासन या बाबतीत आदेशाद्वारे निदेश देईल अशा इतर कोणत्याही बाबींच्या संबंधात कर्जे मंजूर करण्याचा अधिकार असणार नाही.

(२) राज्य शासन विहित करील अशा जिल्हा परिषदेच्या प्राधिकाऱ्यांना, जिल्हा परिषदेच्या अर्थसंकल्पीय अंदाजात तरतूद करण्यात आलेल्या रकमेतून, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्या विषयांच्या संबंधात आणि त्या विहित मर्यादेपर्यंत आवर्ती किंवा अनावर्ती स्वरूपाचा आकस्मिक खर्च करता येईल.

(३) राज्य शासन विहित करील असे जिल्हा परिषदेचे प्राधिकारी, विहित करण्यात येतील अशा विषयांच्या संबंधात, या अधिनियमाखाली किंवा अन्यथा [3](वसूल होण्याजोगी नसेल अशा विहित केलेल्या कोणत्याही रकमेसह) जिल्हा परिषदेस येणे असलेल्या कोणत्याही कराची किंवा फीची किंवा इतर कोणत्याही रकमेची थकबाकी राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत निर्लेखित करू शकतील.

---

[1] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १३ द्वारे "शिल्लक" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८, कलम ८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

जिल्हा परिषदेस येणे असलेली रक्कम जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे

[1][१४१क. (१) कोणत्याही स्पष्ट किंवा गर्भित करारान्वये जिल्हा परिषदेस येणे असलेली कोणतीही रक्कम ही ज्या रीतीने जमीन महसुलाची थकबाकी वसूल करण्यात येते त्याच रीतीने वसूल करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या अर्थांतर्गत एखादी रक्कम जिल्हा परिषदेस येणे आहे किंवा कसे याबद्दल प्रश्न उद्भवल्यास, तो प्रश्न राज्य शासनाने घटित केलेल्या न्यायाधिकरणाकडे निर्दिष्ट करण्यात येईल. (अशा न्यायाधिकरणात जिल्हा परिषद, किंवा तिच्या अधीन असलेल्या कोणत्याही प्राधिकारी किंवा जिच्याकडून रक्कम येणे असल्याचे अभिकथित करण्यात आले आहे अशी व्यक्ती यांच्याशी संबंध नसलेल्या एका किंवा अनेक व्यक्तींचा समावेश असेल.) असे न्यायाधिकरण, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि जिच्याकडून रक्कम येणे असल्याचे अभिकथित करण्यत आले असेल अशा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर या प्रश्नावर निर्णय देईल; आणि न्यायाधिकरणाने त्यावर दिलेला निर्णय अंतिम असेल आणि कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही इतर प्राधिकरणासमोर त्यावर आक्षेप घेण्यात येणार नाही. [2][ मात्र अशा निर्णयाच्या पुनरीक्षणासाठी करावयाचा अर्ज, अशा निर्णयाच्या दिनांकापासून साठ दिवसाच्या आत उच्च न्यायालयाकडे करता येईल ].

(३) पोट-कलम (२) अन्वये न्यायाधिकरणाकडे निर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रश्नांचा निर्णय करताना न्यायाधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती ही राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.]

प्रशासन अहवाल

१४२. (१) या कलमाच्या तरतुदींना अधीन राहून, प्रत्येक जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती आपला प्रशासन अहवाल तयार करील.

(२) प्रत्येक पंचायत समिती आपल्या प्रशासन अहवालात लेखापरीक्षा टिप्पण्या, त्यास दिलेल्या उत्तरासह समाविष्ट करील आणि तो अहवाल जिल्हा परिषदेच्या प्रशासन अहवालात समाविष्ट करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे पाठवील.

(३) प्रत्येक जिल्हा परिषद, आपल्या प्रशासन अहवालात लेखापरीक्षा टिप्पण्या व त्यास दिलेली उत्तरे तसेच तिला मिळालेले पंचायत समितीचे अहवाल समाविष्ट करील.

(४) प्रत्येक जिल्हा परिषद, राज्य शासन विहित करील अशा नमुन्यात आणि अशा रीतीने प्रशासन अहवाल प्रसिद्ध करील आणि तो प्रसिद्ध झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

परिषदांचे व समितींचे हिशेब तपासण्याचा महा-लेखाकाराचा अधिकार.

[3][१४२क. (१) कोणत्याही जिल्हा परिषदेचे किंवा पंचायत समितीचे लेखे, महालेखाकार, महाराष्ट्र राज्य राज्य शासन वेळोवेळी देईल अशा निदेशानुसार, महालेखाकार निर्धारित करील अशा कोणत्याही वेळी तपासता येईल.

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम २० द्वारे कलम १४१क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १४ द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[3] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५९, कलम ३ द्वारे कलम १४२क समाविष्ट करण्यात आले.

# प्रकरण दहा

## कराधान

**१४३.** हा अधिनियम राज्याच्या ज्या क्षेत्रांना लागू केला असेल त्या क्षेत्रांस या प्रकरणाच्या तरतुदी लागू असतील. मात्र— प्रकरण लागू असणे.

(क) कलमे १४४ ते १५० (दोन्ही कलमे धरुन) यांच्या तरतुदी, राज्याच्या केवळ मुंबई क्षेत्रासच लागू होतात ;

(ख) कलम १५१ [1][ [2][***] ] च्या तरतुदी राज्याच्या केवळ विदर्भ क्षेत्रासच लागू होतात, आणि

(ग) कलम १५२ [3][ [4][***] ] च्या तरतुदी राज्याच्या केवळ हैदराबाद क्षेत्रासच लागू होतात.

**१४४.** राज्य शासन यापुढे वर्णन केलेल्या शर्तीवर व तशा रीतीने खालील रकमांच्या प्रत्येक रुपयावर [5][दोनशे पैसे] या दराने किंवा कलम १५५ खालील संबंधित विभागीय आयुक्त निर्धारित करील]. त्याप्रमाणे [6][सातशे पैशाहून] अधिक नसेल अशा वाढीव दराने [7][जिल्ह्यामध्ये उपकर] बसवील— जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर [8] * * * उपकर बसविणे.

(क) चौथ्या अनुसूचित नमूद केलेल्या कोणत्याही आकाराबद्दल देय असलेल्या रकमा वगळून आणि राज्य शासन याबाबत जो कोणताही आकार अधिसूचित करील त्या आकाराबद्दल देय असलेल्या रकमा वगळून सर्वसाधारण जमीन महसूल म्हणून राज्य शासनास देय असलेली प्रत्येक रक्कम ; आणि

(ख) जमीन महसुलाचे अन्यसंक्रमण झाले नसते तर कोणत्याही जमिनीवर जमीन महसूल म्हणून जी रक्कम आकारता आली असती अशी रक्कम :

परंतु, पंचवीस [9][ पैशांखालील ] कोणत्याही रकमेवर या कलमाखाली कोणताही उपकर बसविता येणार नाही.

[1] * * *

१८७९ चा मुंबई ५ **१४५.** *मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, यात व्याख्या केल्याप्रमाणे जर गावांवरील उक्त उपकराची आकारणी करताना— आकारणीसाठी नियम.

(क) उक्त संहिता व त्याखाली केलेले नियम यात घालून दिलेल्या रीतीप्रमाणे जर गावाचे भूमापन करुन आकारणी करण्यात आली असेल तर, उक्त संहिता किंवा त्याखाली केलेले नियम, यात निश्चित केल्याप्रमाणे त्या गावाच्या आकारणीच्या एकूण रकमेवरुन उपकर निश्चित करण्यात येईल ;

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ४ (एक) द्वारे ३१ जानेवारी १९६९ पासून हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम ३ (क) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[3] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ४ (दोन) द्वारे ३१ जानेवारी १९६९ पासून हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[5] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ५ (१) द्वारे " वीस पैसे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम २ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला. वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) द्वारे " एकशे पन्नास पैशाहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ५ (अ) द्वारे " उपकर " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ५ (३) द्वारे " वीस पैसे " या मजकूर वगळण्यात आला.

[9] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ५ (क) द्वारे " नव्वद पैशाखालील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[10] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ चे पोट कलम (१) द्वारे जादा दाखल करण्यात आलेले स्पष्टीकरण सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम २ द्वारे १३ जुलै १९७३ पासून वगळण्यात आले.

* आता जमीन महसूल संहिता, १९६६ ( १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) पहा.

(ख) जमीन महसुलात सूट देण्याबाबत अधिनियम (क्रमांक १), १८८३, किंवा जमीन महसुलात सूट देण्याबाबत अधिनियम (क्रमांक २), १८६३ या अन्वये एखाद्या गा[illegible] संक्षिप्त जमाबंदी लागू असेल आणि या कलमाचा खंड (क) लागू नसेल तर, संक्षिप्त जमबंदीच्या प्रयोजनासाठी ठरवलेल्या एकूण वार्षिक आकारणीवरून उपकार निश्चित करण्यात येईल ; आणि १८८३ चा मुंबई २.

(ग) या कलमाचे खंड (क) किंवा (ख) यापैकी कोणताही खंड ज्या गावास लागू होत नसेल त्या गावात जिल्हाधिकाऱ्याच्या दप्तरात नमूद केलेल्या जुन्या अथवा कमाल दरावरून उपकर निश्चित करण्यात येईल ; आणि असा कोणताही दर नमूद केलेला नसेल किंवा अशा रीतीने नमूद केलेल्या दराविरुद्ध असे दुमाला गाव धारण करणाऱ्या व्यक्तीने किंवा अशा गावच्या मालकाने आक्षेप घेतला तर याबाबत विशेष ठराव करून जिल्हा परिषदेने दिलेल्या संमतीने आणि असा गाव धारण करणारी व्यक्ती किंवा त्या गावाचा मालक यांची संमती घेऊन जिल्हाधिकाऱ्याला उपकर संमत करता येईल किंवा एकमत न झाल्यास राज्य शासनाने करावयाच्या स्थूल भूमापनावरुन व आकारणीवरुन उपकर निश्चित करता येईल. अशा स्थूल भूमापनाचा अर्धा खर्च जिल्हा परिषदेकडून व अर्धा खर्च असे गाव धारण करणाऱ्या व्यक्तीकडून किंवा अशा गावाच्या मालकाकडून सोसला जाईल. १८८३ चा मुंबई ७.

पाणीपट्टीवर उपकर बसवणे

[१]{१४६. राज्य शासनास किंवा स्थापन झाल्याच्या दिनांकापासून [illegible]धित पाटबंधारे विकास महामंडळास, पाण्याच्या अधिकृत वापराचे निर्धारण केल्यावर, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ च्या किंवा संबंधित पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियमाच्या तरतुदीखाली आकारणीयोग्य पाणी पट्टीच्या प्रत्येक रुपयावर, वीस पैशांहू अधिक नाही इतका उपकर बसविता येईल.} १९७६ चा महा ३८.

कलम १४४ मध्ये वर्णन केलेला उपकर बसवण्याची रीत

**१४७.** कलम १४४ मध्ये वर्णन कलेला उपकर, शक्य तेथवर जमीन महसुलाप्रमाणे त्याच रीतीने व कायद्याच्या त्याच तरतुदींखाली बसवण्यात येईल :

परंतु, कोणतीही जमीन कुळाच्या कब्जात असेल तर त्या बाबतीत जर असे कुळ मुंबई कुळ-वहीवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या तरतुदींखाली अशा जमीनीच्या संबंधात उपकर देण्यास दायी असेल तर असे कुळ अशा जमिनीच्या बाबतीत उपकर देण्यास प्रथम दायी असेल. १९४८ चा मुंबई ६७

कलम १४६ मध्ये वर्णन केलेला उपकर बसवण्याची रीत

[२]{**१४८.** कलम १४६ मध्ये वर्णन केलेला उपकर हा, शक्य होईल तेथवर, महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ किंवा संबंधित पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियम, याखाली राज्य शासनाला किंवा सबंधित पाटबधारे विकास महामंडळाला देय असलेल्या पाणीपट्टीप्रमाणे, त्याच रीतीने व कायद्याच्या त्याच तरतूदींनुसार बसवण्यात येईल.} १९७६ चा महा ३८.

वरिष्ठ धारकांस सहाय्य.

**१४९.** वरिष्ठ धारक व जलप्रवाहांचे मालक यांना, त्यांची कुळे व भोगवटादार यांच्याकडून किंवा त्यांच्या जलप्रवाहांचा वापर करण्याचा प्राधिकार असलेल्या व्यक्तींकडून देय असलेल्या रकमा वसूल करण्यासाठी द्यावयाच्या सहाय्यासंबंधीच्या कायद्याच्या तरतूदी, दुमाला जमिनीच्या किंवा बिनदुमाला जमिनीच्या सर्व वरिष्ठ धारकांस आणि जलप्रवाहांच्या सर्व मालकांस, त्यांनी त्यांची कुळे, भोगवटादार किंवा त्यांच्या जलप्रवाहांचा वापर करण्याचा प्राधिकार असेलेली व्यक्ती यांच्याकडून उक्त उपकराची वसुली करण्याच्या संबधात लागू असतील, आणि तसेच त्या मुंबई जमीन महसूल संहिता *१८७९ याखाली जे जमिनीचे भोगवटादार असतील त्यांना त्यांची कुळे किंवा संयुक्त भोगवटादार यांच्याकडून उक्त उपकरांची वसुली करण्याच्या बाबतीत लागू असतील. १८७९ चा मुंबई ५.

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ४ द्वारे कलम १४६ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम ५ द्वारे कलम १४८ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

* आता महाराष्ट्रजमीन महसूल संहिता, १९६६ ( १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक ४१) पहा.

१५०. (१) पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, जमिनीच्या बाबतीत कलम १४६ खाली पाणीपट्टीवर आकारावयाचा स्थानिक उपकर, राज्य शासन, [1][किंवा संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाच्या स्थापनेच्या दिनांकापासून कोणतेही पाटबंधारे विकास महामंडळ ] ते नियमाद्वारे विहित करील त्या प्रमाणाएवढी स्थानिक उपकराची रक्कम, तो गोळा करण्याचा परिव्यय म्हणून वजा करून, त्या जमिनी ज्या जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत असतील तिला देईल. पाणीपट्टीवरील स्थानिक उपकर गोळा करणे व तो जमा करणे.

(२) कोणतीही महानगरपालिका, नगरपालिका किंवा कटक प्राधिकरण यांच्या क्षेत्रात अंतर्भूत असलेल्या जमिनींच्या संबंधात कलम १४६ खाली पाणीपट्टीवर बसवण्याजोगा स्थानिक उपकर हा राज्य शासन [2][किंवा संबंधित पाटबंधारे विकास महामंडळाच्या स्थापनेच्या दिनांकापासून कोणतेही पाटबंधारे विकास महामंडळ ] पोट-कलम (१) उल्लेखिलेला परिव्यय वजा केल्यानंतर, संबंधित महानगरपालिकेला, नगरपालिकेला किंवा कटक प्राधिकरणाला देईल.

(३) जिल्हा परिषद व इतर कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांच्यातील या कलमाखालील कोणत्याही बाबींच्या संबंधातील कोणत्याही विवादाचा निर्णय राज्य शासन करील :

परंतु, अशा स्थानिक प्राधिकरणांपैकी एखादे कटक प्राधिकरण असेल तेव्हा, राज्य शासनाचा निर्णय हा केंद्र सरकारच्या सहमतीच्या अधीन असेल.

१५१. महाराष्ट्र राज्याच्या विदर्भ क्षेत्रात प्रत्येक मालिक-मकबुझा, रयत-मालक आणि भोगवटादार आणि प्रत्येक रयत, पोट-कुळाव्यतिरिक्त इतर कूळ आणि [4][संबंधित विभागीय आयुक्ताकडील] पट्टेदार हे त्यांनी जिल्ह्यात धारण केलेल्या जमिनीबाबत, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, अशा जमिनीवर आकारलेल्या किंवा निश्चित केलेल्या जमीन महसुलाच्या किंवा खंडाच्या किंवा अशा जमिनीबाबत देय असलेल्या पट्ट्याच्या रकमेच्या प्रत्येक रुपयावर [3][दोनशे पैसे] या दराने किंवा राज्य शासन कलम १५५ खाली निर्धारित करील त्याप्रमाणे [5][सातशे पैशांहून] अधिक नसेल, इतक्या वाढीव दराने उपकर देण्यास दायी ठरतील, मग असा जमीन महसूल किंवा खंड किंवा पट्ट्याची रक्कम किंवा तिचा कोणताही भागांश भरण्यात आलेला असो किंवा नसो, याबाबत आपसात मिटवणूक करण्यात आलेली असो किंवा नसो किंवा तो विमोचित करण्यात आलेला असो किंवा नसो. विदर्भ क्षेत्रात जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर [6]* * * उपकर बसवणे.

(२) उपकर हा होईल तेथवर जमीन महसुलाप्रमाणे त्याच रीतीने व कायद्याच्या त्याच तरतुदींखाली बसवण्यात व गोळा करण्यात येईल.

[7]* * * * * * *

[8][* * *]

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, याच्या कलम ६ (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६ (१) द्वारे " वीस पैसे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, यांच्या कलम ३ द्वारे हा मजकूर दाखल केला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ६ (२) द्वारे " दोनशे पैशाहून " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ६ (३) द्वारे " वीस पैसे " हा शब्द वगळण्यात आला..

[7] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ चे पोट-कलम (१) द्वारे जादा दाखल करण्यात आलेले हे स्पष्टीकरण सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम २ द्वारे दिनांक १३ जुलै १९८१ पासून वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[8] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ७ द्वारे कलम १५१क वगळण्यात आले.

[9] आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ( १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) पहा.

हैदराबाद क्षेत्रात जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर [1]* * * उपकर बसवणे.

**१५२.** महाराष्ट्र राज्याच्या हैदराबाद क्षेत्रात राज्य शासन, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीनराहून, राज्य शासनास देय असलेलया जमीन महसुलाच्या प्रत्येक रुपयावर [1][दोनशे पैसे] या दराने किंवा [2][संबंधित विभागीय आयुक्त] कलम १५५ खाली निर्धारित करील त्याप्रमाणे [3][सातशे पैशांहून] अधिक नसेल अशा वाढीव दराने [4][जिल्ह्यामध्ये स्थानिक उपकर बसवील :]

परंतु, इजारा गावात इजारा कालावधीत ज्या रकमेवर आणि तो कालावधी संपल्यानंतर मागणी केलेल्या वार्षिक जमीन महसुलावर स्थानिक उपकर बसवील :

परंतु आणखी असे की, कोणत्याही इनाम जमिनीवर, अशा जमिनीच्या जमीन महसुलाच्या पूर्ण आकारणीवर स्थानिक उपकर बसवण्यात येईल.

(२) महसुलाच्या पुढील बाबींवर स्थानिक उपकर आकारता येणार नाही. या बाबी पुढीलप्रमाणे आहेत:—

(क) चराईची फी ;

(ख) झाडांच्या फलोपभोगाच्या विक्रीचे उत्पन्न ;

(ग) हैदराबाद जमीन महसूल अधिनियम या अन्वये कसुरीच्या प्रकरणात शास्ती किंवा व्याज म्हणून लादलेल्या शास्ती, दंड किंवा कोणतेही आकार : १३१७ फसलीचा हैदराबाद ९.

परंतु, अनाधिकृत लागवड केल्याबद्दल लादलेल्या दंडाच्या आणि दंडात्मक आकारणीच्या बाबतीत स्थानिक उपकर हा सरळ आकारणीवर बसवण्यात येईल

[6]* * * * *

[7][* * *]

---

[1] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ७ (१) द्वारे "वीस पैसे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, याच्या कलम ४ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ५ (१) द्वारे "उपकर बसवील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ७ (३) द्वारे "वीस नये पैसे" हा शब्द वगळण्यात आला.

[6] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ पोट-कलम (१) द्वारे जादा दाखल करण्यात आलेले हे स्पष्टीकरण सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम २ अन्वये ३ जुलै १९६३ पासून वगळण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[7] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ५ द्वारे कलम १५२क वगळण्यात आले.

[8] आता जमीन महसूल संहिता, १९६६ ( १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) पहा. पाटबंधारे अधिनियम

[9] आता महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६, ( १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८) पहा.

**१५३.** (१) कलम १४४, १५१ किंवा १५२ खाली जमिनीच्या संबंधात बसवण्याजोगा [१][स्थानिक उपकर] हा [२][जिल्हाधिकारी] ते नियमाद्वारे विहित करील त्या प्रमाणाएवढी स्थानिक उपकराची रक्कम गोळा करण्याचा परिव्यय म्हणून वजा करून जमिनी ज्या जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत असतील तिला [३][कलम १५५ ची पोट-कलमे (५) व (६) याच्या तरतुदींना अधीन राहून देईल.] जमीन महसुलावरील स्थानिक उपकार गोळा करणे व तो जमा करणे

[४]* * * * * *

**१५४.** ज्या जिल्हा परिषदेस उपकाराची रक्कम देय असेल त्या जिल्हा परिषदेने अर्ज केल्यावर, अशा जिल्हा परिषदेच्या अधिकारितेला अधीन राहून, कोणत्याही क्षेत्रात कोणत्याही वर्षी उपकार किंवा त्याचा कोणताही भागांश गोळा करण्याचे राज्य शासन निलंबित करू शकेल किंवा त्यास सूट देऊ शकेल. स्थानिक उपकार निलंबित करणे किंवा त्यात सूट देणे.

**१५५.** (१) ज्या जिल्हा परिषदेस जमीन महसुलावरील उपकार देय असेल त्या जिल्हा परिषदेस, संबंध जिल्ह्यात [५][किंवा ठरावात विनिर्दिष्ट करण्यात येईल किंवा येतील अशा एखाद्या गटात किंवा अनेक गटांत] बसवण्याजोग्या उपकाराच्या दरात [६][संबंधित विभागीय आयुक्ताने] वाढ करावी अशा अर्थाचा ठराव या प्रयोजनासाठी बोलावलेल्या विशेष बैठकीत संमत करता येईल आणि तो विचारासाठी [६][संबंधित विभागीय आयुक्ताकडे] पाठवता येईल. उपकाराच्या दरात वाढ सुचवण्याचा जिल्हा परिषदेचा [१][किंवा पंचायत समितीचा] अधिकार.

[७][(२) पंचायत समितीस, संबंध गटात असलेल्या जमिनीच्या संबंधात बसवावयाच्या जमीन महसुलावरील उपकाराच्या दरात वाढ करण्याच्या प्रयोजनासाठी बोलाविलेल्या विशेष बैठकीत अशा अर्थाचा ठराव संमत करता येईल की, ठरावात विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत अशी वाढ करण्यात यावी, तथापि अशी वाढ, कलमे १४४, १५१ किंवा यथास्थिति, १५२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये ; आणि तो ठराव जिल्हा परिषदेकडे विचारार्थ पाठवता येईल ; आणि जिल्हा परिषद, तो ठराव मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत त्यावरील आपल्या अभिप्रायासह [८][संबंधित विभागीय आयुक्ताकडे] पाठवील.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) खाली ठरावात ज्या कारणांकरिता अशी वाढ सूचवण्यात आली असेल ती कारणे आणि दरात वाढ केल्यामुळे मिळालेल्या उत्पन्नाचा विनियोग ज्या विशेष प्रयोजनासाठी करण्यात यावयाचा असेल ते विशेष प्रयोजन, आणि अशी वाढ ज्या कालावधीसाठी चालू राहील तो कालावधी नमूद करण्यात येईल.

[१०][(३क) पहिली व दुसरी अनुसूची यामधील कामांवर आणि नमूद केलेल्या कार्यक्रमांच्या विषयांच्या संबंधातील विकास योजनांवर वसूल केलेल्या उपकाराच्या वापराला संबंधित विभागीय आयुक्ताकडून मान्यता देण्यात येईल आणि पहिली व दुसरी अनुसूची यामध्ये नमूद केलेली कामे आणि विकास योजना वगळता अन्य कामांवर वसूल केलेल्या उपकाराच्या वापराला राज्य शासनाकडून मान्यता देण्यात येईल.];

(४) पोट-कलम (१) खाली पाठविलेला ठराव, किंवा पोट-कलम (२) खाली पाठवलेला ठराव व जिल्हा परिषदेचे अभिप्राय मिळाल्यानंतर संबध्द संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी, [११][संबंधित विभागीय आयुक्ताला, जिल्हा स्थानिक प्रसिध्दी प्रसार माध्यमातून] यथास्थिति, जिल्ह्यात किंवा गटात असलेल्या जमिनींच्या संबंधात जमीन महसुलावरील उपकाराच्या दरातील वाढ निर्धारित करता येईल ; तथापि, असा दर, प्रत्येक रुपयावर

---

१ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १५, कलम ८(१) द्वारे "पोट-कलम (४) च्या उपबंधात अधीन राहून" हा मजकूर वगळण्यात आला व त्याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९, कलम ५ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम १९ द्वारे "देण्यात येईल" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १५, कलम ८(२) द्वारे कलम १५३ ची पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात आली.

५ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १, कलम ८(१) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ६(क) द्वारे "राज्य शासन" हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे तेथे हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

७ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ६०(२) द्वारे मूळ पोट-कलमे (२) व (३) ऐवजी पोट-कलमे (२) ते (६) दाखल करण्यात आली.

८ वरील अधिनियमाच्या कलम ६०(३) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

९ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ६(ख) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

१० सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ६(ग) द्वारे पोट-कलम (३) नंतर हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

११ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ६(घ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][सातशे पैशांहून] अधिक असणार नाही आणि राज्य शासनाला ज्या दिनांकापासून दरातील अशी वाढ अमलात येईल तो दिनांक आणि ज्या कालावधीत ती चालू राहील तो कालावधी [2]* * * विनिर्दिष्ट करता येईल :

[3][परंतु, जिल्ह्यातील किंवा गटातील जी व्यक्ती पाच रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेचा जमीन महसूल भरण्यास दायी असेल अशा प्रत्येक व्यक्तीस अशी वाढलेली उपकाराची रक्कम भरण्यातून सूट देण्यात येईल.]

(५) [4][संबंधित विभागीय आयुक्ताने] पोट-कलम (४) खाली दरातील कोणतीही वाढ निर्धारित केली असल्यास, अशी वाढ संबध्द संहितेच्या तरतुदीखाली राज्य शासनाकडून बसवण्यात व गोळा करण्यात येईल आणि ती राज्य शासन, याबाबतीत दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट करील त्या प्रमाणाएवढी वाढीची रक्कम, वाढ गोळा करण्याचा परिव्यय म्हणून वजा करून पोट-कलम (६) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने [5][जिल्हाधिकाऱ्याकडून जिल्हा परिषदेला देण्यात येईल.]

[6][(६) ज्या बाबतीत पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या ठरावानुसार दरातील कोणतीही वाढ वसूल करण्यात आली असेल त्याबाबतीत त्यातील चाळीस टक्के रक्कम जिल्हा परिषदेला आणि उरलेली साठ टक्के रक्कम अनुदान म्हणून जिल्ह्यातील, सर्व पंचायत समित्यांना देण्यात येईल ; आणि ज्या बाबतीत दरातील अशी कोणतीही वाढ पोट-कलम (२) अन्वयेच्या ठरावानुसार वसूल करण्यात आली असेल त्याबाबतीत, त्यातील चाळीस टक्के रक्कम जिल्हा परिषदेला आणि उरलेली साठ टक्के रक्कम संबंधित पंचायत समितीस, संबंधित ठरावामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनासाठी तिने वापर करण्यासाठी देण्यात येईल.]

एखाद्या जमिनीतील खनिजे शासनाच्या मालकीची असतील आणि शासनाला स्वामित्वधन देय असेल तर अशा जमिनीवर उपकर बसवण्याचा अधिकार.

[7][**१५६.** (१) कलमे १४४, १५१ आणि १५२ यांच्या तरतुदीस बाध न आणता, कोणत्याही जमिनीतील खनिजांच्या संबंधात (ती खनिजे शासनाच्या मालकीची असल्यास) राज्य शासनाला स्वामित्वधन देय असेल अशा बाबतीत, राज्याच्या कोणत्याही जिल्ह्यातील, किंवा भागातील अशा कोणत्याही जमिनीवर, अशा प्रकारे देय असलेल्या स्वामित्वधनाच्या आधारावर, उपकर बसवण्यास आणि तो गोळा करण्यास राज्य शासन सक्षम असेल आणि ते नेहमीकरिता तसे सक्षम असल्याचे मानण्यात येईल.

(२) १३ जुलै १९७३ पासून अशा कोणत्याही जमिनीतील खनिजांच्या संबंधात, स्वामित्वधन म्हणून राज्य शासनाला देय असलेल्या प्रत्येक रकमेतील प्रत्येक रुपयामागे मुख्य खनिजांच्या बाबतीत दहा पैसे आणि गौण खनिजांच्या बाबतीत पाच पैसे या दराने असा कर बसवण्यात आणि गोळा करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.–** या कलमाच्या प्रयोजनासाठी, "गौण खनिजे" म्हणजे, इमारती दगड, बारीक खडी, साधी माती, खाण आणि खनिज (विनियमन व विकास) अधिनियम, १९५७ या खाली विहित करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठी वापरलेल्या वाळूखेरीज इतर साधी वाळू आणि केंद्र शासनाने किंवा राज्य शासनाने १९५७ चा ६७

१ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १, कलम ८(२) द्वारे "दोनशे पैशांहून" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

२ सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३ द्वारे "(दहा वर्षांपेक्षा अधिक नसेल अशी)" हा मजकूर वगळण्यात आला.

३ सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १, कलम ८(३) द्वारे मूळ परंतुका ऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

४ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २१ याच्या कलम ६(ड(एक)) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६(ड(दोन)) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ८(४) द्वारे पोट कलम (६) दाखल करण्यात आले.

७ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३ द्वारे कलम १५६ हे १३ जुलै १९७३ रोजी समाविष्ट केल्याचे मानण्यात आले. (स्वामित्वधनावर उपकर आकारणे, बसवणे, गोळा करणे आणि विधिग्राह्य करणे यासंबंधीच्या तरतुदीसाठी सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ ची कलमे ४ व ५ पहा).

त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे किंवा आदेशाद्वारे "गौण खनिजे" म्हणून जाहीर केलेली, असतील अशी इतर खनिजे ; आणि "मुख्य खनिजे" म्हणजे, गौण खनिजाखेरीज इतर खनिजे; मात्र त्यामध्ये खनिज तेले, नैसर्गिक गॅस किंवा पेट्रोलियम यांचा समावेश होत नाही.

(३) उपकर, शक्य असेल तेथवर, कलमे १४४, १५१ किंवा यथास्थिति, १५२ खाली वसूल करण्यात आलेला उपकर ज्या रीतीने गोळा करण्यात येतो त्याच रीतीने गोळा करण्यात येईल.

(४) गोळा केलेली उपकराची रक्कम ही, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, गोळा करण्याच्या परिव्ययाची रक्कम वजा करण्यात आल्यानंतर, त्या जमिनी [illegible] अशा [जिल्हा परिषदेला जिल्हाधिकाऱ्याकडून] देण्यात येईल.]

१५७. [(१)] राज्य शासन याबाबत [illegible] किंवा विशेष आदेश देईल त्यांना अधीन राहून [illegible] परिषदेस, कलम [illegible] असलेल्या [illegible] कार्यपध्दतीचे पालन करून, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी [illegible] आणि [illegible] येतील :-

* * * * * *

(ख) [illegible] सार्वजनिक पाण्याचे नळ किंवा [illegible] उपयोगासाठी [illegible] असतील तर, सर्वसाधारण पाणीपट्टी;

* * * * *

(च) यात्रेकरूंवरील कर ;

(ड) जमिनींवरील व इमारतींवरील विशेष कर;

[(च) परिषदेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही पाटबंधाऱ्याच्या कामापासून जमिनींना किंवा इमारतींना पुरवण्यात येणाऱ्या पाण्याच्या संबंधातील पाणीपट्टी ;

(चक) कलम १०७ किंवा कलम १२३ अनुसार परिषदेने हाती घेतलेल्या पाटबंधाऱ्याच्या बांधकामापासून किंवा विकास परियोजनांपासून लाभ मिळणाऱ्या जमिनींवरील (प्रत्येक प्रकरणाची परिस्थिती लक्षात घेऊन परिषदेकडून रीतसर प्राधिकृत करण्यात आलेला अधिकारी निर्धारित करील त्याप्रमाणे अशी बांधकामे किंवा परियोजना यातून पाझरामुळे किंवा गळतीमुळे ज्यांना पाणी मिळत असेल अशा बांधकामांपासून किंवा परियोजनांपासून निर्धारित अंतराच्या आत येतील अशा जमिनींसह) कर ;]

(छ) कोणत्याही सार्वजनिक बाजारात पुढीलपैकी कोणत्याही एका या अनेक प्रकारच्या फी म्हणजे,-

(एक) तेथे आपली आजीविका करणारे दलाल, अडत्ये, तोलारी किंवा मापारी यांच्यावरील लायसन फी ;

(दोन) बाजारात विक्रीसाठी माल ठेवण्याच्या हक्कासाठी किंवा तेथील कोणतीही इमारत किंवा संरचना यांच्या वापरासाठी बाजार फी ;

(तीन) बाजारात विकलेल्या जनावराची नोंदणीकरण्यासाठी फी ;

---

१ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ७ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला

२ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ५६, कलम ३ द्वारे कलम १५७ ला त्या कलमाचे पोट कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला

३ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक १६, अनुसूची दोन द्वारे हा खंड वगळण्यात आला

४ सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ११, कलम १०(अ) द्वारे हा खंड वगळण्यात आला

५ वरील अधिनियमाच्या कलम १०(ब) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला

[1][परंतु,—

(एक) विशेष स्वच्छता उपकर आणि पाणीपट्टी याव्यतिरिक्त पूर्वोक्तप्रमाणे लादण्यात आलेला कोणताही कर, संबंधित शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय, शासनाच्या मालकीच्या आणि कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनांसाठीच केवळ वापरण्यात येणाऱ्या आणि नफ्याच्या प्रयोजनासाठी म्हणून वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा उद्देश नसलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा कोणत्याही इमारतीच्या किंवा कोणत्याही इमारतीच्या भागाच्या किंवा इतर मालमत्तेच्या संबंधात बसवण्यात येणार नाही ;

(दोन) ज्या जमिनीवर स्थानिक उपकर वसूल करण्यात येत असेल अशा कोणत्याही जमिनीच्या संबंधात मालमत्तेवरील कोणताही कर लादता येणार नाही.]

[2][(२) पोट-कलम (१), खंड (ख) यात काहीही अंतर्भूत असले तरी, एखादी जिल्हा परिषद तिच्या व्यवस्थेखालील नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या संयुक्त किंवा प्रादेशिक परियोजनेमधून पाणीपुरवठा करीत असेल त्या बाबतीत, राज्य शासन याबाबत देईल अशा कोणत्याही किंवा विशेष आदेशांना अधीन राहून, जिल्हा परिषद, कलम १५९ अन्वये आवश्यक असलेल्या प्रारंभिक कार्यपध्दतीचे पालन करून, पोट-कलम (१), खंड (ख) खाली लादला येईल अशा कराऐवजी,-

(एक) असा पाणीपुरवठा जनतेच्या उपयोगासाठी बसवलेल्या सार्वजनिक नळाद्वारे किंवा नळखांबाद्वारे केला जात असेल त्याबाबतीत पंचायतीच्या हद्दीत सर्वसाधारण पाणीपट्टी ;

(दोन) असा पाणीपुरवठा प्रत्येक घरात बसविलेल्या नळाद्वारे केला जात असेल त्या बाबतीत पंचायतीच्या हद्दीत विशेष पाणीपट्टी

लादील :

परंतु, पूर्वोक्त दोन कर किंवा त्यापैकी कोणताही एक कर, जमिनीवरील किंवा इमारतींवरील जादा कर म्हणून किंवा विहित करण्यात येईल अशा इतर स्वरूपात व अशा रीतीने बसवता येईल पंचायतीमध्ये ज्या कमाल व किमान दरांनी उक्त कर लादण्यात येईल ते दर आणि ते कर लादण्याशी, ते गोळा करण्याशी व त्यातून सूट देण्याशी संबंधित अशा इतर बाबी या विहित करण्यात येतील तशा असतील.]

स्थावर मालमत्तेच्या विवक्षित हस्तांतरणावर मुद्रांक शुल्क.

**१५८.** (१) स्थावर मालमत्तेची विक्री, दान आणि फलापभोग गहाण यासंबंधीच्या संलेखावर मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ अन्वये लादण्यात आलेले मुद्रांक शुल्क, कोणत्याही जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत असलेल्या स्थावर मालमत्तेवर परिणाम करणाऱ्या आणि राज्य शासन याबाबतीत राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे जो दिनांक विनिर्दिष्ट करील त्या दिनांकास किंवा त्या दिनांकानंतर करून देण्यात आलेल्या, संलेखांच्या बाबतीत, अशा प्रकारच्या असलेल्या मालमत्तेच्या मुल्यावर आणि फलापभोग गहाणाच्या बाबतीत, संलेखांत नमूद केल्याप्रमाणे संलेखाद्वारे [3][एक टक्कयाने] वाढवण्यात येईल. (१९५८ चा मुंबई ६०.)

(२) या कलमाच्या प्रयोजनासाठी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे कलम २८ याचा अर्थ अशा रीतीने लावण्यात येईल की, जणू काही त्यात निर्दिष्ट करण्यात आलेला तपशील मालमत्तेच्या बाबतीत पृथक्‌पणे नमूद करणे आवश्यक आहे,— (१९५८ चा मुंबई ६०.)

(क) कोणत्याही जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत असलेली मालमत्ता; आणि

(ख) कोणत्याही जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत नसलेली मालमत्ता.

[4][(३) सह जिल्हा निबंधक आणि जिल्ह्याचा मुद्रांक जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत स्थित असलेल्या मालमत्तांच्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये वसूल केलेल्या जादा शुल्काच्या एकमेएवढी रक्कम याबाबतीत काढलेल्या आदेशात राज्य शासन विनिर्दिष्ट करील असा त्याचा भाग वसुलीचा खर्च म्हणून त्यामधून वजा केल्यानंतर जिल्हा परिषदेला देईल.]

---

१. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९१, कलम ४०(क) द्वारे मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.
२. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ३ द्वारे पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.
३. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक [illegible] कलम ४ द्वारे "[illegible] टक्कयाने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
४. सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ४४ याच्या कलम ८(क) द्वारे पोट-कलम (३) ऐवजी पोट-कलम दाखल करण्यात आले.

(४) प्रत्येक जिल्हा परिषद, तिला पोट-कलम (३) खाली मिळालेल्या [1][* * *] रकमेतून तिच्याअधिकारितेत असलेल्या प्रत्येक पंचायतीच्या ग्रामनिधीस, राज्य शासनाने याबाबत केलेल्या नियमांस अनुसरून, अशा पंचायतीच्या अधिकारितेत असलेल्या मालमत्तेच्या संबंधात जिल्हा परिषदेस मिळालेल्या रकमेच्या अंदाजे पन्नास टक्क्यांइतकी रक्कम अंशदान म्हणून देईल.

(५) [2][* * *]

(६) राज्य शासनाला या कलमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

**१५९.** (१) कोणताही कर किंवा कोणतीही फी लादण्यापूर्वी प्रत्येक जिल्हा परिषद आपल्या बैठकीत एक ठराव संमत करून,— कर लादण्यापूर्वीची जिल्हा परिषदेची कार्यपध्दती.

(क) कलम १५७ खाली लादता येईल असा कर किंवा फी यांची निवड करील ;

(ख) निवडलेला कर किंवा फी यांचे विवरण करणाऱ्या नियमांना मान्यता देईल ;

(ग) अशा ठरावात व अशा नियमात,—

(एक) व्यक्तींच्या किंवा मालमत्तेच्या किंवा या दोहोंच्या ज्या एका किंवा अनेक वर्गास कर देण्यास पात्र ठरविण्याची जिल्हा परिषदेची इच्छा असेल तो एक किंवा ते अनेक वर्ग आणि (ज्या परिस्थितीत व ज्या तत्वांवर सूट देता येईल ती परिस्थिती व ती तत्वे यांसह) जी कोणतीही सूट देण्याची तिची इच्छा असेल ती सूट विनिर्दिष्ट करील ;

(दोन) ज्या रकमेस किंवा दरास असे वर्ग करपात्र ठरविण्याचे इच्छिले असेल ती रक्कम किंवा तो दर विनिर्दिष्ट करील ;

(तीन) राज्य शासन ज्या इतर गोष्टी याप्रमाणे विनिर्दिष्ट करण्यास फर्मावील त्या सर्व गोष्टी विनिर्दिष्ट करील.

(२) असा ठराव संमत करण्यात आल्यानंतर जिल्हा परिषद असे नियम पाचव्या अनुसूचीमध्ये दिलेल्या नमुन्यातील नोटीशीसह प्रसिध्द करील.

(३) उक्त कर किंवा फी बसवण्याला किंवा प्रस्तावित रकमेला किंवा अशा रकमेस किंवा दरास पात्र ठरवावयाच्या व्यक्तींच्या किंवा मालमत्तेच्या वर्गाबाबत किंवा कोणतीही प्रस्तावित सूट देण्याबाबत आक्षेप घेणाऱ्या जिल्ह्यातील कोणत्याही उक्त नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत आपले आक्षेप जिल्हा परिषदेस लेखी कळविता येतील ; आणि अशा सर्व आक्षेपांचा जिल्हा परिषद विचार करील, किंवा त्यांचा विचार करून त्याबाबत प्रतिवृत्त सादर करण्यास एखाद्या समितीस किंवा तिच्या परिषद सदस्यांना प्राधिकृत करील.

(४) जिल्हा परिषद, तिच्याकडे आलेले प्रस्ताव आणि त्यावर घेतलेले सर्व आक्षेप किंवा समितीचे कोणतेही प्रतिवृत्त असल्यास त्यावर बैठकीत विचार करील आणि तिला फेरबदलासह किंवा फेरबदलाशिवाय नियमांस मंजुरी देता येईल.

**१६०.** (१) जिल्हा परिषदेस पूर्वीच लादण्यात आलेला कोणताही कर किंवा फी रद्द करण्याची किंवा त्यांच्या रकमेत किंवा दरात फेरफार करण्याची सूचना करण्यासाठी, एखाद्या विशेष बैठकीत ठराव संमत करता येईल. कर रद्द करण्याची किंवा त्यात फेरफार करण्याची कार्यपध्दती.

(२) अशा कोणत्याही प्रस्तावावर कलम १५९ मध्ये नवीन कर किंवा फी लादण्यासाठी घालून दिलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यात येईल; आणि या कलमाखाली कर किंवा फी रद्द करण्याची किंवा त्यात फेरफार करण्याची राजपत्रातील अधिसूचना ही, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार अशी फी रद्द केल्याचा किंवा त्यात फेरफार केल्याचा निर्णायक पुरावा असेल.

(३) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे कलम १५५ च्या तरतुदीखाली जमीन महसुलावरील उपकाराच्या दरात वाढ करण्यासंबंधी सूचना करण्याच्या जिल्हा परिषदेच्या अधिकारास बाध येणार नाही.

---

१ सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक २९ याच्या कलम ८(ख) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

२ उक्त अधिनियमाच्या कलम ८(ग) द्वारे हा मजकूर वगळण्यात आला.

फी न दिल्याच्या प्रकरणातील कार्यपध्दती

**१६१.** (१) कलम १५७ चा खंड (छ), उप खंड (दोन) खाली लादलेली कोणतीही फी मागणी केली असता देण्यात न आल्यास, ती गोळा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या व्यक्तीकडून बाजार फी वसूल करण्याजोगी असेल त्या व्यक्तीने विक्रीसाठी मांडलेल्या किंवा मांडण्याचा बेत असलेल्या मालाचा जो कोणताही भागांश आकारावयाच्या रकमेची भरपाई होण्यास त्याच्या मते पुरेसा ठरेल असा कोणताही भागांश जप्त करता येईल व तो अटकावून ठेवता येईल.

(२) कलम १५७ चा खंड (छ), उप खंड (तीन) खाली लादलेली कोणतीही फी मागणी केली असता देण्यात आली नाही तर, ती गोळा करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या जनावराच्या संबंधात फी गोळा करावयाची असेल त्या जनावराचे अभिग्रहण करता येईल व ते अटकावून ठेवता येईल.

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खाली अभिग्रहण केलेली सर्व मालमत्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी याबाबतीत ज्यास प्राधिकृत करील त्या अधिकाऱ्याकडे चोवीस तासांच्या आत पाठवण्यात येईल, आणि अशा अधिकाऱ्याने अशा अभिग्रहण केलेल्या मालमत्तेच्या मालकास किंवा जर असा मालक माहीत नसेल, किंवा बाजार ज्या गावात असेल त्या गावाचा रहिवासी नसेल, तर उक्त मालमत्तेचे ज्यावेळी अभिग्रहण करण्यात आले असेल त्यावेळी ती जिच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीस, ताबडतोब नोटीस देऊन, किंवा जर अशी व्यक्ती सापडणे शक्य नसेल, तर दवंडी पिटवून असे जाहीर करील की, अशी नोटीस बजावल्याच्या किंवा जाहीर केल्याच्या दिनांकापासून, दोन दिवस संपल्यानंतर नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या जागी, अशी मालमत्ता लिलाव करून विकण्यात येईल :

परंतु, अभिग्रहण केलेली कोणतीही मालमत्ता त्वरित किंवा नैसर्गिकपणे सडून जाण्यासारखी असेल तर, ती वर निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याकडे ताबडतोब नेण्यात येईल आणि असा अधिकारी तिची ताबडतोब विक्री करण्याची कार्यवाही करील.

(४) जर विक्री सुरू होण्यापूर्वी कोणत्याही वेळी देय रक्कम आणि तिच्यासह अशा मालमत्तेचे अभिग्रहण करताना किंवा ती अटकावून ठेवताना किंवा दवंडी पिटवून जाहीर करताना आलेला सर्व खर्च, पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अधिकाऱ्यास देण्यात आला तर, अभिग्रहण केलेली मालमत्ता ताबडतोब सोडून देण्यात येईल.

(५) जर वरीलप्रमाणे पैसे भरण्यात आले नाहीत तर, मालमत्तेची विक्री करता येईल, आणि विक्री करून आलेल्या उत्पन्नाचे उपयोजन पुढील रकमा भरण्यासाठी करता येईल :—

(क) फी दाखल देय असलेली रक्कम , आणि

(ख) मालमत्तेचे अभिग्रहण करणे, ती अटकावून ठेवणे किंवा दवंडी पिटवून जाहीर करणे व तिची विक्री करणे यासंबंधात आलेल्या खर्चाची रक्कम.

(६) या कलमाच्या प्रयोजनासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणताही अधिकारी किंवा कोणतीही व्यक्ती, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक आहे असे मानण्यात येईल. १८६० चा ४५

मंजूर केलेले नियम नोटिशीसह प्रसिध्द करणे

**१६२.** कलम १५९ खाली मंजूर केलेले सर्व नियम, ज्या जिल्ह्यासाठी ते तयार केले असतील त्या जिल्ह्यात जिल्हा परिषदेकडून प्रसिध्द करण्यात येतील आणि अशा रीतीने प्रसिध्द केलेल्या नियमात वर्णन केलेला कर, त्या कलमाखालील नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून (हा दिनांक अशी नोटीस प्रसिध्द केल्यापासून एक महिन्याहून अगोदरचा असणार नाही.) त्याप्रमाणे लादण्यात येईल :

परंतु,— (क) वर्षभरात बसवावयाचा कर हा,—

(एक) कोणत्याही वर्षी, एप्रिलची पहिली तारीख, जुलैची पहिली तारीख, ऑक्टोबरची पहिली तारीख, किंवा जानेवारीची पहिली तारीख यांपैकी कोणत्याही एका तारखेव्यतिरिक्त इतर कोणत्याही तारखेस अमलात येणार नाही , आणि

(दोन) जर तो एप्रिलच्या तारखे व्यतिरिक्त इतर कोणत्याही तारखेस अमलात आला तर तो लगेच पुढे येणाऱ्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपर्यंत, तिमाहीने आकारण्याजोगा असेल :

(ख) नोटीस काढण्यात येईल त्या दिवशी किंवा त्यापूर्वी, जिल्हा परिषद आवश्यक वाटतील असे आणखी तपशीलवार नियम प्रसिध्द करील आणि त्यात, विनिर्दिष्ट केलेला कर बसवण्याची व तो वसूल करण्याची रीत व ज्या दिनांकास तो कर किंवा त्याचे हप्ते, (तसे असल्यास) देय असतील ते दिनांक विहित करील ; आणि

(ग) एखादा कर किंवा एखाद्या कराचा विशेष भागांश केवळ एखाद्या निश्चित कालावधीपुरताच बसवण्यास मंजुरी देण्यात आली असेल तर ती आकारणी त्या कालावधीत येणे झालेल्या अशा कोणत्याही न भरलेल्या थकबाकीशी संबंधित असेल ते खेरीज करून बंद होईल.

*[१६३. जिल्हा परिषदेने, या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पंचायतीच्या हद्दीतील कोणत्याही क्षेत्रामध्ये कलम १५७, पोट-कलम (२) खाली सर्वसाधारण पाणीपट्टी किंवा विशेष पाणीपट्टी किंवा या दोन्ही पट्ट्या लादल्या असतील त्याबाबतीत कलम १५७, पोट-कलम (२) आणि त्याखाली केलेले नियम याखाली कर देण्यास दायी असतील अशा व्यक्तींकडून मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याची कलमे १२९ व १३० च्या तरतुदींनुसार, संबंधित ग्रामपंचायत, जणू काही ते त्या अधिनियमाच्या तरतुदींखाली पंचायतीने लादलेले कर असावेत त्याप्रमाणे गोळा करील, आणि पंचायत त्यापासून मिळालेले उत्पन्न, एकुण गोळा रकमेची विहित करण्यात येईल इतके टक्के रक्कम ते गोळा करण्याचा खर्च म्हणून वजा केल्यानंतर, जिल्हा परिषद विनिर्दिष्ट करील अशा वेळी व अशा रीतीने प्रत्येक वर्षी, जिल्हा परिषदेला देईल.

(१९५९ चा मुंबई ३.)

(जिल्हा परिषदेने लादलेल्या सक्तीच्या सर्वसाधारण व विशेष पाणीपट्ट्या पंचायतींनी गोळा करणे.)

१६४. (१) कोणत्याही पंचायतीने तिने कलम १६३ खाली गोळा केलेली सर्वसाधारण पाणीपट्टीची किंवा विशेष पाणीपट्टीची कोणतीही रक्कम, जिल्हा परिषदेने विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत, भरण्यात कसूर केल्यास, जिल्हा परिषदेस, अशा पंचायतीमध्ये निहित असलेल्या निधीशी संबंधित कोणताही कायदा असला किंवा त्या त्या वेळी इतर कोणताही कायदा अमलात असला तरी, जिच्याकडे पंचायतीचा कोणताही पैसा ठेवला असेल अशा बँकेस किंवा पंचायतीचा पैसा जेथे ठेवलेला असेल अशा शासकीय कोषागाराच्या किंवा कोणत्याही सुरक्षित जागेच्या प्रभारी व्यक्तीस, आदेशाद्वारे असा निदेश देता येईल की, अशा बँकेत पंचायतीच्या नावे जमा असणाऱ्या रकमेतून किंवा यथास्थिति, अशा व्यक्तींच्या हाती असणाऱ्या पैशातून किंवा अशा बँकेला अथवा व्यक्तीला पंचायतीकडून किंवा तिच्या वतीने जो पैसा वेळोवेळी ठेव म्हणून मिळेल त्यामधून, तिने अशी रक्कम भरावी आणि असा आदेश पाळणे अशा बँकेवर किंवा व्यक्तीवर बंधनकारक असेल.

(पंचायतीने रक्कम भरण्यात कसूर करणे त तिच्या पैशातून ती रक्कम वसूल करणे.)

(२) पोट-कलम (१) खालील आदेशास अनुलक्षून कोणताही पैसा देण्यात आल्यास, अशा बँकेत किंवा व्यक्तीकडे अशा रीतीने ठेवलेल्या पंचायतीच्या पैशातून, बँकेने किंवा व्यक्तीने अशा रीतीने दिलेल्या कोणत्याही रकमेच्या संबंधात, पंचायतीप्रत असलेल्या सर्व दायित्वांतून अशा बँकेची किंवा व्यक्तीची पुरेशी मुक्तता होईल.]

१६५. जिल्हा परिषदेने बसवण्याजोगा कोणताही कर किंवा फी आयोग्य आहे अथवा तो कर किंवा त्याचा कोणताही भाग बसवला जाणे, हे सर्वसाधारण जनतेच्या हितास बाधक आहे किंवा अशा आकारणीमुळे राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही वचनांचा किंवा अभिवचनांचा भंग होतो किंवा जिल्ह्याच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या औद्योगिक विकासावर प्रतिकूल परिणाम होतो असे केलेल्या तक्रारीवरून, किंवा अन्यथा कोणत्याही वेळी राज्य शासनास आढळून आले तर उक्त करास किंवा फीस असलेला जो कोणताही आक्षेप त्यास दिसून येईल, तो राज्य शासन याबाबत निश्चित करील त्या कालावधीत दूर करण्याची उपाययोजना करण्यास राज्य शासन उक्त जिल्हा परिषदेस फर्मावू शकेल ; आणि जर याप्रमाणे निश्चित केलेल्या कालावधीत अशी फर्मावणी राज्य शासनाची खात्री होईल अशा रीतीने अमलात आणली नाही तर, राज्य शासनास, जिल्हा परिषदेला स्पष्टीकरण देण्याची संधी दिल्यानंतर असा कर किंवा अशी फी किंवा त्याचा असा भाग यांची आकारणी अशा करास किंवा फीस असलेला असा आक्षेप दूर करण्यात येईतोपर्यंत, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे तहकूब करता येईल.

(आक्षेपार्ह करांची आकारणी निलंबित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार)

* सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम ६ अन्वये कलमे १६३ व १६४ समाविष्ट करण्यात आली.

## प्रकरण अकरा

## कर किंवा फी गोळा करणे

कराच्या किंवा फीच्या रकमेचे बिल सादर करणे.

**१६६.** (१) जेव्हा जी कोणतीही रक्कम,–

(क) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा तरतुदीखाली या प्रकरणात तरतूद केलेल्या रीतीने वसुलीयोग्य असल्याचे घोषित केले असेल, अथवा

(ख) पथकरा पोटी मागणीदेय होणारी अशी रक्कम नसून जिल्ह्यात लादलेल्या [1][(कलम १६३ मध्ये निर्दिष्ट केलेला कर नसेल अशा)] कोणत्याही कराची किंवा फीची हक्कमागणीयोग्य रक्कम किंवा हप्ता असेल,

तेव्हा अशी रक्कम, येणे होईल त्यावेळी जिल्हा परिषद शक्य होईतो फारसा विलंब न लावता, येणे म्हणून हक्कमागणी केलेल्या रकमेचे बिल, ती रक्कम भरण्यास दायी असलेल्या व्यक्तीला देण्याची तजवीज करील.

(२) अशा प्रत्येक बिलात —

(क) ज्या कालावधीच्या संबंधात, आणि

(ख) ज्या मालमत्तेच्या, व्यवसायाच्या किंवा बाबीच्या संबंधात अशा रकमेची हक्कमागणी केलेली असेल त्यांचा विनिर्देश असेल व तसेच त्यात पुढील गोष्टींबद्दल नोटीस दिलेली असेल,–

(एक) पैसे भरण्यात कसूर केल्यामुळे येणारे दायित्व, आणि

(दोन) अशा हक्कमागणीविरूध्द यापुढे तरतूद केल्याप्रमाणे, ज्या कालावधीत अपील करता येईल तो कालावधी.

(३) पूर्वोक्तप्रमाणे ज्या रकमेबद्दल कोणतेही बिल देण्यात आले असेल ती रक्कम असे बिल दिल्यापासून पंधरा दिवसांच्या आत जिल्हा परिषदेच्या कार्यालयात किंवा अशा प्रदानाच्या रकमा स्वीकारण्यास त्याबाबतच्या कोणत्याही नियमान्वये प्राधिकृत केलेल्या व्यक्तीकडे न भरल्यास किंवा बिलांत अंतर्भूत केलेल्या कोणत्याही हक्क मागणीविरूध्द कलम १७५ खाली कोणतेही अपील करण्यात न आल्यास जिल्हा परिषदेला, उक्त रक्कम भरण्यास दायी असलेल्या व्यक्तीवर, सहाव्या अनुसूचीत दिलेल्या नमुन्यात किंवा तशा अर्थाची मागणीची नोटीस बजावण्याची तजवीज करता येईल.

अधिपत्र काढणे.

**१६७.** जर उक्त रक्कम (कलम १६१ च्या तरतुदी लागू न होणारी रक्कम) भरण्यास दायी असलेल्या व्यक्तीने, अशी मागणीची नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसाच्या आत,–

(क) नोटिशीत मागणी केलेली रक्कम भरली नाही, किंवा

(ख) आपणास ती का भरावी लागू नये याबद्दल जिल्हा परिषदेचे किंवा परिषदेस याबाबत नियमान्वये ज्यास नेमता येईल त्या अधिकाऱ्याचे समाधान होईल असे कारण दाखविले नाही तर,

अशी रक्कम वसुलीच्या सर्व परिव्ययासह सातव्या अनुसूचीत दिलेल्या नमुन्याप्रमाणे किंवा तशा अर्थाचे अधिपत्र काढण्याची तजवीज करून जिल्हा परिषदेस त्या अधिपत्रान्वये कसूरदार व्यक्तीच्या जंगम मालमत्तेची अटकावणी करून व तिची विक्री करून वसूल करता येईल.

अधिपत्रावर सही कोणी करावी.

**१६८.** कलम १६७ खाली काढलेल्या प्रत्येक अधिपत्रावर, ते काढण्याची तजवीज करणारा अध्यक्ष किंवा त्या प्रयोजनासाठी जिल्हा परिषदेने प्राधिकृत केलेला अधिकारी सही करील.

अधिपत्र कोणाच्या नावे काढावे.

**१६९.** (१) जेव्हा मालमत्ता एखाद्या जिल्ह्यात असेल तेव्हा, अधिपत्र जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्याच्या नावे काढण्यात येईल.

(२) जेव्हा मालमत्ता महानगरपालिकेच्या हद्दीत असेल तेव्हा, अधिपत्र पोट-कलम (८) च्या तरतुदींना अधीन राहून, अशा महानगरपालिकेच्या आयुक्ताच्या नावे काढण्यात येईल.

---

१ सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ६१ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) जेव्हा मालमत्ता पौर पालिकेच्या हद्दीत असेल तेव्हा, अधिपत्र पौर पालिकेच्या मुख्य अधिकाऱ्याच्या नावे काढण्यात येईल.

(४) जेव्हा मालमत्ता नगरपालिकेच्या हद्दीत असेल तेव्हा, अधिपत्र त्या नगरपालिकेच्या, अध्यक्षांच्या नावे काढण्यात येईल.

(५) जेव्हा मालमत्ता दुसऱ्या जिल्हा परिषदेच्या अधिकारितेत असेल तेव्हा, अधिपत्र त्या दुसऱ्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या नावे काढण्यात येईल.

(६) जेव्हा मालमत्ता कटक क्षेत्रात असेल तेव्हा, अधिपत्र कटक क्षेत्राच्या कार्यकारी अधिकाऱ्याच्या नावे काढण्यात येईल.

(७) जेव्हा मालमत्ता अशा महानगरपालिकेच्या किंवा पौर पालिकेच्या, नगरपालिकेच्या, कटक क्षेत्राच्या हद्दीत नसेल तेव्हा, अधिपत्र राज्य शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या सरकारी अधिकाऱ्याच्या नावे काढण्यात येईल.

(८) जेव्हा मालमत्ता बृहन्मुंबईत असेल तेव्हा, अधिपत्र मुंबई येथील लघुवाद न्यायालयाच्या प्रबंधकाच्या नावे काढण्यात येईल :

परंतु, अशा महानगरपालिका आयुक्तास, मुख्य अधिकाऱ्यास, कार्यकारी अधिकाऱ्यास, अध्यक्षास, सरकारी अधिकाऱ्यास किंवा प्रबंधकास असे अधिपत्र आपल्या दुय्यम अधिकाऱ्याच्या नावे पृष्ठांकित करता येईल.

**१७०.** पृष्ठांकनाद्वारे किंवा अन्यथा एखादे अधिपत्र ज्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या नावे काढण्यात आलेले असेल त्यास, अशा अधिपत्रात याबाबत त्यास प्राधिकृत करणारा विशेष आदेश अंतर्भूत असेल तरच परंतु अन्यथा नव्हे--अशा अधिपत्रान्वये अभिग्रहण करण्यास दायी असलेली मालमत्ता अशा इमारतीत आहे असे मानण्यास त्यास वाजवी कारणे असतील तर आणि आपला प्राधिकार व प्रयोजन अधिसूचित केल्यानंतर आणि आत प्रवेश करण्याची रीतसर मागणी केल्यानंतर, त्याला अन्य प्रकारे प्रवेश मिळणे शक्य नसल्यास, अधिपत्रात निर्देशित केल्याप्रमाणे अटकावणी करण्यासाठी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या कालावधीत कोणत्याही वेळी इमारतीच्या कोणताही बाहेरील किंवा आतील दरवाजा किंवा खिडकी फोडून उघडता येईल : विशेष आदेशाखाली प्रवेश करण्याचा अधिकार

परंतु, असा अधिकारी स्त्रियांनी वापरण्यासाठी असलेल्या कोणत्याही दालनाचा दरवाजा, तीन तास अगोदर आपल्या उद्देशाची सूचना देऊन स्त्रियांना तेथून बाहेर निघून जाण्याची संधी दिल्याखेरीज फोडून उघडणार नाही किंवा त्यात प्रवेश करणार नाही.

**१७१.** अशा अधिकाऱ्यास, पुढील शर्ती अपवाद व सूट यांना अधीन राहून, कसूरदार म्हणून ज्या व्यक्तीचे नाव अधिपत्रात लिहिलेले असेल त्या कोणत्याही व्यक्तीची जंगम मालमत्ता सापडेल तेथे अटकावून ठेवता येईल :– अधिपत्र कसे बजावले पाहिजे

(क) पुढील मालमत्ता अटकावून ठेवता येणार नाही, जसे. -

(एक) कसूरदार, त्याची पत्नी व मुले यांचे जरूरीचे वापरण्याचे कपडे व अंथरूण-पांघरूण,

(दोन) कारागिरांची हत्यारे, आणि

(तीन) कसूरदार शेतकरी असेल तर, त्याची शेतकीची अवजारे, बी-बीयाणे आणि त्याच्या उपजीविकेसाठी आवश्यक असतील ती गुरेढोरे :

(ख) अटकावणी अत्यधिक असणार नाही, म्हणजे अटकावून ठेवलेल्या मालमत्तेचे मूल्य शक्यतोवर अधिपत्राखाली वसूल करावयाच्या रकमेइतके असेल आणि कलम १६८ अन्वये किंवा त्याखाली, अधिपत्रावर सही करण्यास प्राधिकृत केलेल्या व्यक्तीच्या मते अटकावून ठेवावयास नको होत्या अशा कोणत्याही वस्तू अटकावून ठेवण्यात आल्या असतील तर त्या ताबडतोब परत करण्यात येतील , आणि

(ग) मालमत्तेचे अभिग्रहण केल्यावर, तो अधिकारी तिची ताबडतोब यादी करील आणि ती मालमत्ता तेथून हलवण्यापूर्वी, अभिग्रहणाच्या वेळी अशी मालमत्ता जिच्या कब्जात होती त्या व्यक्तीस, आठव्या अनुसूचीत दिलेल्या नमुन्यामध्ये अशी लेखी नोटीस देईल की, उक्त मालमत्ता अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे विकण्यात येईल :

परंतु, मालमत्ता अटकावून ठेवल्यानंतर व ती हलवण्यापूर्वी कसूरदार व्यक्तीकडून, येणे असलेली रक्कम व तिने नोटीस, अधिपत्र व मालमत्तेची अटकावणी यांच्या आनुषंगिक सर्व परिव्ययाची द्यावयाची रक्कम भरण्यात आली तर, असा अधिकारी त्या मालमत्तेची अटकावणी मागे घेईल.

अटकावून ठेवलेल्या मालाची विक्री, विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग आणि शिल्लक रकमेची व्यवस्था कशी लावावी.

**१७२.** (१) जेव्हा अभिग्रहण केलेली मालमत्ता त्वरित व नैसर्गिकपणे सडून जाण्यासारखी असेल किंवा वसूल करावयाच्या रकमेसह, अशी मालमत्ता ताब्यात ठेवण्याचा खर्च तिच्या मूल्यापेक्षा अधिक होण्याचा संभव असेल तेव्हा अध्यक्ष किंवा अधिपत्रावर सही करणारा अधिकारी अभिग्रहणाच्या वेळी मालमत्ता जिच्या कब्जात होती त्या व्यक्तीस, ती मालमत्ता लगेच विकण्यात येईल, अशा अर्थाची नोटीस लगेच देईल, आणि त्या अधिपत्रात निर्दिष्ट केलेली रक्कम ताबडतोब न भरल्यास, तो त्याप्रमाणे ती मालमत्ता विकील.

(२) पोट कलम (१) खाली लगेच विकण्यात न आल्यास, अभिग्रहण केलेली मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भागांश, अधिपत्रावर सही करणाऱ्या व्यक्तीने ते अधिपत्र निलंबित केले नसल्यास, किंवा कसूरदाराकडून देय असलेली रक्कम, नोटीस, अधिपत्र व मालमत्तेची अटकावणी व ती अटकावून ठेवणे याच्या अनुषंगाने येणाऱ्या सर्व परिव्ययवयासह भरण्यात आली नसल्यास, अधिपत्र काढणाऱ्या अधिकाऱ्याने बजाविलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेला अवधी संपल्यावर, जिल्हा परिषदेच्या आदेशांखाली जाहीर लिलावाने विकता येईल आणि मालमत्ता विकून आलेल्या रकमेचा किंवा आवश्यक असेल त्वढया तिच्या भागाचा विनियोग, देय रक्कम व पूर्वोक्तप्रमाणेचा सर्व आनुषंगिक परिव्यय यांची फेड करण्याकडे केला जाईल.

(३) काही रक्कम शिल्लक राहिल्यास, ती ताबडतोब जिल्हा निधीच्या खाती जमा करण्यात येईल व त्याचवेळी अशा जमेची नोटीस जिच्या कब्जातून ती मालमत्ता घेण्यात आली त्या व्यक्तीस दिली पाहिजे. परंतु नोटिशीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत जिल्हा परिषदेकडे लेखी अर्ज करून अशा शिल्लक रकमेची हक्कमागणी करण्यात आली तर, ती रक्कम अशा व्यक्तीस परत करता येईल. अशा नोटिशीच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत हक्कमागणी करण्यात न आलेली कोणतीही रक्कम जिल्हा परिषदेच्या मालकीची होईल.

जिल्हयाबाहेरील अटकावणी व विक्री.

**१७३.** जेव्हा अधिपत्र जिल्हयाबाहेर पाठवलेले असेल तेव्हा, अधिपत्र काढणाऱ्या प्राधिकाऱ्याला त्यावर पृष्ठांकन करून ज्या नगरपालिका आयुक्तांच्या, अध्यक्षांच्या किंवा अधिकाऱ्याच्या किंवा प्रबंधकाच्या नावे अधिपत्र पाठवले असेल त्या आयुक्तास, अध्यक्षास किंवा अधिकाऱ्यास किंवा प्रबंधकास, अटकावून ठेवलेली मालमत्ता विकण्यास फर्मावता येईल आणि अशा बाबतीत, अशा अध्यक्षाने किंवा अधिकाऱ्याने किंवा प्रबंधकाने ती मालमत्ता विकणे व विक्रीस आनुषंगिक अशा सर्व गोष्टी करणे हे विधिसंमत असेल, आणि पूर्ववर्ती तरतुदींत त्याप्रमाणे फेरबदल करण्यात येतील. असा अध्यक्ष किंवा अधिकारी किंवा प्रबंधक अधिपत्राखाली वसूल केलेली रक्कम, तीमधून वसुलीसाठी त्यास आलेला सर्व परिव्यय वजा करून, असे अधिपत्र काढणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे पाठवील.

आकारावयाची फी व परिव्यय.

**१७४.** (क) कलम १६६, पोट-कलम (३) खाली काढलेल्या प्रत्येक नोटिशीबद्दलची फी,

(ख) कलम १७१ खाली केलेल्या प्रत्येक अटकावणीबद्दलची फी, आणि

(ग) उक्त कलम १७१ खाली अभिग्रहण केलेली कोणतीही गुरेढोरे पोसण्याचा परिव्यय, जिल्हा परिषदेच्या नियमांत याबाबत अनुक्रमे जे दर विनिर्दिष्ट केलेले असतील त्याप्रमाणे आकारण्यायोग्य असेल आणि कलम १६७ खाली वसूल करावयाच्या वसुलीच्या परिव्ययात समाविष्ट करण्यात येईल.

दंडाधिकाऱ्याकडे अपील.

**१७५.** कलम १६६ च्या पोट-कलम (१) खाली सादर केलेल्या बिलातील कोणत्याही हक्कमागणीविरुध्द करावयाचे अपील, अशा प्रकारच्या प्रकरणांची न्यायचौकशी सत्र न्यायधीशाच्या निदेशाखाली ज्या कोणत्याही न्याय दंडाधिकाऱ्याने किंवा अशा दंडाधिकाऱ्यांच्या न्यायमंडळाने करावयाची त्या

न्यायदंडाधिकाऱ्याकडे किंवा दंडाधिकाऱ्यांच्या न्यायमंडळाकडे करता येईल परंतु जर असे कोणतेही अपील,–

(क) तक्रारीचा विषय असलेले बिल सादर केल्यानंतर पुढील पंधरा दिवसांच्या आत दाखल केले नसेल तर ;

(ख) जमिनी किंवा इमारती यावरील पट्टीच्या बाबतीत, त्या पट्टीच्या ज्या आकारणीप्रमाणे किंवा तिच्यातील फेरफाराप्रमाणे बिल तयार केले असेल त्या आकारणीबद्दल किंवा फेरफाराबद्दल दिलेल्या नोटिशीत अधिसूचित करावयाच्या अवधीच्या आत, ज्या कारणावरून जिल्हा परिषदेच्या हक्कमागणीबद्दल विवाद असेल ते कारण नमूद करणारा लेखी अर्ज परिषदेकडे करण्यात आला नसेल तर ; आणि

(ग) अपीलकाराकडून हक्कमागणी केलेली रक्कम त्याने जिल्हा परिषदेच्या कार्यालयात जमा केली नसेल तर ,

अशा अपिलाची सुनावणी केली जाणार नाही व त्याचा निर्णय करण्यात येणार नाही.

**१७६.** जमिनीवर किंवा इमारतीवर किंवा या दोहोंवर पट्टीच्या रूपाने लादलेल्या कोणत्याही कराबद्दल देय असलेल्या सर्व रकमा, त्यासंबंधात देय असलेला कोणताही जमीन महसूल असल्यास तो अगोदर भरण्याच्या अधीनतेने, ज्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत असा कर बसवावयाचा असेल त्या जमिनीवर किंवा इमारतीवर, तसेच अशा इमारतीत व जमिनीत आढळून आलेल्या व असा कर भरण्यास दायी असलेल्या व्यक्तींच्या मालकीची, कोणतीही जंगम मालमत्ता असल्यास त्यावर प्रथम भार म्हणून राहतील : जमिनी, इमारती वगैरे यांवरील पट्टी वसूल करण्याबाबत तरतूद

परंतु, मालक नसलेल्या कोणत्याही भोगवटादाराकडून अशा कोणत्याही कराची कोणतीही थकबाकी, जर ती एक वर्षाहून अधिक कालावधीकरिता किंवा ज्या कालावधीत असा भोगवटादार भोगवटा करीत नसेल अशा कालावधीकरिता देय झाली नसेल तर, वसूल करण्यात येणार नाही.

**१७७.** राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कोणत्याही जिल्ह्यात कोणत्याही वेळी कलमे १६७ ते १७२ (दोन्ही धरुन), यांचे प्रवर्तन निलंबित करता येईल; आणि अशा अधिसूचनेत याबाबत जो दिनांक निश्चित करण्यात येईल त्या दिनांकापासून उक्त कलमाखाली वसूल करावयाच्या पूर्वीच्या कोणत्याही कराची देय असलेली प्रत्येक रक्कम कलम २३४, पोट-कलम (२) यात निर्दिष्ट केलेले दंड वसूल करण्यासाठी त्यात तरतूद केली असेल त्या रीतीने, दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करूनच वसूल करण्याजोगी असेल, अन्य रीतीने ती वसूल करता येणार नाही. अटकावणी करून व विक्री करून वसुली करण्याचा अधिकार निलंबित करणे

**१७८.** (१) जिल्हा परिषदेस, या अधिनियमाखाली लादण्यात येईल असा कोणताही पथकर, किंवा कलम १५७, खंड (छ) चा उपखंड (दोन) किंवा (तीन) याखाली लादण्यात येईल अशी फी वसूल करण्याचा पट्टा जाहीर लिलावाने किंवा खाजगी संविदेद्वारे देता येईल : पथकर किंवा विवक्षित फी यांच्या वसुलीचा पट्टा देणे.

परंतु, पट्टयाच्या शर्तीची योग्य पूर्ती करण्यासाठी पट्टेदार प्रतिभूती देईल.

(२) जेव्हा या कलमाखाली कोणताही पथकर वसूल करण्याचा पट्टा देण्यात आला असेल तेव्हा, असा पथकर गोळा करण्यासाठी पट्टेदाराने सेवानियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, पट्टयाच्या शर्तींना अधीन राहून, ज्या कोणत्याही वाहनावर किंवा जनावरावर पथकर आकारणीयोग्य असेल ते कोणतेही वाहन किंवा जनावर किंवा मागणीची भरपाई होण्याइतपत्या मूल्याचा त्या वाहनातील किंवा जनावरावरील ओझ्याचा कोणताही भाग अधिग्रहण करण्याचा आणि अटकावून ठेवण्याचा अधिकार असेल :

परंतु, अशा अधिग्रहणानंतर व अटकावणीनंतर ती व्यक्ती अधिग्रहण करण्यात आलेली व अटकावून ठेवलेली मालमत्ता जिच्या कब्जात होती त्या व्यक्तीस त्या मालमत्तेची एक यादी देईल व त्या यादीबरोबरच आठव्या अनुसूचीत दिलेल्या नमुन्यात एक लेखी नोटीस देऊन, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त मालमत्ता जिल्हा परिषदेच्या आदेशाखाली विकण्यात येईल असे कळवील .

परंतु, आणखी असे की, जेव्हा अधिग्रहण करण्यात आलेली कोणतीही वस्तू त्वरित व नैसर्गिकपणे सडून जाण्यासारखी असेल किंवा अशी वस्तू ठेवण्याचा खर्च, आकारणीयोग्य पथकराच्या रकमेसह तिच्या मूल्यापेक्षा जास्त होण्याचा संभव असेल तेव्हा, तो, ती वस्तू लगेच विकण्यात येईल असे, ती वस्तू ज्या व्यक्तीच्या कब्जात होती तिला कळवील, आणि मागणी करण्यात आलेली पथकराची रक्कम तावडतोब भरण्यात आली नाही तर तो त्याप्रमाणे ती वस्तू विकील किंवा त्या वस्तुची विक्री करण्याची तजवीज करील.

(३) जेव्हा या कलमाखाली कोणतीही फी वसूल करण्याचा पट्टा देण्यात आला असेल तेव्हा अशी फी गोळा करण्यासाठी पट्टेदाराने सेवानियुक्त केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, पट्टयाच्या शर्तींना अधीन राहून, कलम १६१ मध्ये निर्दिष्ट केलेले अधिकार असतील.

(४) या कलमाखाली पट्टयाने दिलेल्या कोणत्याही पथकराच्या किंवा फीच्या संबंधात जिल्हा परिषदेस पट्टेदाराकडून देय असलेली कोणतीही रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करता येईल.

सर्व प्रदानांची पावती देणे. **१७९.** या अधिनियमाखाली कोणत्याही कराच्या किंवा फीच्या संबंधात भरलेल्या सर्व रकमांबद्दल त्या स्वीकारणारी व्यक्ती पावती देईल. अशा पावतीत रक्कम व ती ज्या कराच्या किंवा फीच्या संबधात भरण्यात आलेली असेल तो कर किंवा ती फी नमूद करील.

प्रकरण बारा

## जिल्हा परिषदांना वित्तीय सहाय्य

**१८०.** [प्रत्येक जिल्हा परिषदेस सरासरी जमीन महसूल इत्यादींच्या ७० टक्के इतकी रक्कम देणे.] सन १९७४ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ११ अन्वये वगळण्यात आले.

**१८१.** [समानीकरण अनुदान] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम १२ अन्वये वगळण्यात आले.

जिल्हा परिषदांना वन महसुलाचे *** अनुदान देणे. [1][**१८१क.** (१) राज्य शासन, याबाबत कायद्याद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर [2][१ एप्रिल १९७२ पासून सुरू होणाऱ्या प्रत्येक पाच वर्षांच्या] कालावधीच्या लगतपूर्वीच्या तीन वित्तीय वर्षात, [2][जिल्ह्याच्या हद्दीतील] वनांपासून वसूल केलेल्या स्थूल महसुलाच्या रकमांच्या सरासरीच्या [3][सात टक्के] इतक्या रकमेचे अनुदान दर वर्षी प्रत्येक जिल्हा परिषदेला देईल :

[5][परंतु, अशा रीतीने निश्चित केलेल्या अनुदानात, जिल्हा परिषदेस अहितकारक ठरेल, अशा रीतीने त्या कालावधीत फेरफार करण्यात येणार नाही.]

**स्पष्टीकरण**.–या कलमाच्या प्रयोजनासाठी जिल्ह्यातील वनांपासून मिळणाऱ्या स्थूल महसुलाच्या संगणनेची रीत राज्य शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असेल.

(२) पोट-कलम (१) खाली दिलेल्या अनुदानाचा वापर जिल्हा परिषद, जिल्ह्याच्या हद्दीतील वन क्षेत्रामधील कामे व विकास परियोजना यावर राज्य शासन, या बाबतीत वेळोवेळी देईल अशा निदेशांनुसार करील.]

---

१. सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ८ द्वारे कलम १८१क समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ४(अ) (२) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम १०(अ) द्वारे "पाच टक्के" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम १०(ब) द्वारे "पाच टक्के" हा मजकूर वगळण्यात आला.

५. सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम ४(अ) (३) द्वारे हे परंतुक बदली दाखल करण्यात आले.

[१][१८२. कलम १००, पोट-कलम (१), खंड (ख) खाली जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केलेली बांधकामे व विकास परियोजना यासाठी राज्य शासनाने याबाबत दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या अटींवर व शर्तींवर, राज्य शासन दरवर्षी जिल्हा परिषदेला अनुदान देईल ; [२][आणि अकराव्या अनुसूचीच्या परिच्छेद २ खाली जिल्हा परिषदेमध्ये निहित असतील अशा बांधकामांच्या किंवा विकास परियोजनांच्या संबंधात राज्य शासनाकडून निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे, जिल्हा परिषदेला अनुदान देण्यात येईल ; तथापि, अनुदानाची रक्कम ही अशा बांधकामांच्या किंवा परियोजनांच्या संबंधात जो खर्च करण्यात येईल त्या खर्चाएवढी असेल.] सप्रयोजन अनुदाने

**स्पष्टीकरण.**--या कलमाच्या प्रयोजनासाठी खर्चाच्या रकमेची परिगणना करण्याची पध्दती राज्य शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असेल.]

[३][१८३. राज्य शासन पुढील पदांच्या बाबतीतील वेतन व भत्ते यांवरील सरासरी परिव्यया इतकी [४][ * * * *] रक्कम आस्थापना अनुदान म्हणून जिल्हा परिषदेला दरवर्षी देईल-- आस्थापना अनुदान.

(क) कलम १०० खाली बांधकामे व विकास परियोजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्याच्या परिणामी राज्य शासनाच्या गरजांपेक्षा वेळोवेळी जादा झालेली पदे ; आणि

१९७० चा महा. २२. (ख) अशी बांधकामे व विकास परियोजना हस्तांतरित केल्याच्या परिणामी राज्य शासनाच्या मान्यतेने, जिल्हा परिषदेसाठी वेळोवेळी मंजूर करण्यात आली असतील अशी पदे मग ती महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर मंजूर करण्यात आलेली असोत ;

[५](ग) या अधिनियमाची कलमे २४३ आणि २४३क याखाली राज्य शासनाकडून निर्धारित करण्यात आलेली किंवा ठरवून देण्यात आलेली, परंतु या कलमाच्या खंड (क) आणि (ख) यामध्ये न मोडणारी पदे :

परंतु, सर्व बाबतीत अशी पदे जिल्हा परिषदांनी निर्माण केलेली असतील आणि ती नियत भरलेली असतील.]

**स्पष्टीकरण.**-- या कलमाच्या प्रयोजनार्थ--

(क) अशा कोणत्याही पदात, ज्यांच्या संबंधातील खर्च अशी बांधकामे व परियोजना यांच्या तरतुदींच्या खाली खर्ची टाकण्यात आला असेल अशा पदांचा अंतर्भाव होत नाही ;

(ख) वेतन व भत्ते यात, राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील त्याप्रमाणे अशा कोणत्याही पदांच्या संबंधात जिल्हा परिषदांनी केलेल्या [६][निवृत्तिवेतनविषयक आणि] इतर खर्चाचा अंतर्भाव होतो.]

१८४. [तूट समायोजन अनुदान.] हे कलम, सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ११ अन्वये दिनांक १ एप्रिल १९६८ पासून वगळण्यात आले.

---

१. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ९ द्वारे कलम १८२ बदली दाखल करण्यात आले.
२. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १२ द्वारे "तथापि अशा अनुदानाची रक्कम" या शब्दांनी सुरु होणाऱ्या व "खर्चाच्या ५० टक्क्यापेक्षा कमी असणार नाही" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
३. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ८ द्वारे कलम १८३ बदली दाखल करण्यात आले.
४. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १३(अ) द्वारे "--च्या पंच्याहत्तर टक्क्याइतकी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
५. वरील अधिनियमाच्या कलम १३(ब) द्वारे मूळ परंतुकाऐवजी खंड (ग) दाखल करण्यात आला.
६. वरील अधिनियमाच्या कलम १३(क) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

स्थानिक उपकराला अनुरूप अनुदान.

**१८५.** जर एखाद्या जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समिती प्रस्तावानुसार राज्य शासनाने संपूर्ण जिल्ह्यात किंवा एखाद्या गटात, या अधिनियमाद्वारे विहित केलेल्या किमान दरापेक्षा अधिक दराने जमीन महसुलावर उपकर बसवला असेल तर, राज्य शासन जिल्हा परिषदेस [1][किंवा यथास्थिति, पंचायत समितीस] राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा प्रमाणात हिशेब करून काढलेल्या रकमेएवढे स्थानिक उपकर अनुरूप अनुदान दरवर्षी देईल. [2][पंचायत समितीला अनुदान देण्यात यावयाचे असेल त्याबाबतीत, ते गट अनुदान असल्याचे समजण्यात येईल आणि ते जिल्हा परिषदेमार्फत पंचायत समितीला देण्यात येईल.]

[3] * * * * *

प्रोत्साहनपर अनुदाने

**१८६.** (१) राज्य शासनास, प्रत्येक जिल्हा परिषदेच्या विकासविषयक कार्याची प्रगती लक्षात घेऊन त्यांच्या मते, ज्यामुळे आणखी जलद विकास करण्यास प्रोत्साहन मिळेल अशा, पोट-कलम (२) अन्वये निर्धारित केलेल्या मर्यादेपर्यंत व तशा रकमेचे प्रत्येक जिल्हा परिषदेस अनुदान देता येईल.

(२) ज्या मानकांनुसार एकेका जिल्हा परिषदेच्या विकासविषयक कार्यांच्या प्रगतीचे निर्धारण करावयाचे व त्यांची इतर जिल्हा परिषदांच्या कार्यांशी तुलना करावयाची ती मानके आणि द्यावयाच्या अनुदानाची मर्यादा व रक्कम राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

योजनांतर्गत परियोजनांसाठी अनुदाने.

**१८७.** जिल्हा यादीत नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही विषयाच्या संबंधातील जी कोणतीही बांधकामे आणि विकास परियोजना राज्याच्या विकास योजनेत अंतर्भूत करण्यात आल्या असतील त्या बांधकामांसाठी आणि विकास परियोजनांसाठी राज्य शासन निर्धारित करील अशा रीतीने आणि त्या मर्यादेपर्यंत राज्य शासन दरवर्षी प्रत्येक जिल्हा परिषदेस अनुदान देईल.

गट अनुदाने

**१८८.** राज्य शासन, दुसऱ्या अनुसूचीमध्ये नमूद केलेला विषय लक्षात घेऊन, याबाबतीत त्यांच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशी बांधकामे व त्या प्रकारच्या विकास परियोजना पार पाडण्यासाठी प्रत्येक पंचायत समितीस, गट ज्या जिल्ह्यात असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेमार्फत प्रत्येकवर्षी अनुदान किंवा अनुदाने देईल.

**१८९.** [जमीन महसूल भरपाई निधी.] हे कलम सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १२ अन्वये वगळण्यात आले.

प्रकरण तेरा

## स्वच्छताविषयक व इतर अधिकार

इमारतीमध्ये प्रवेश करणे व त्याचे निरीक्षण करणे, वगैरे याबाबतचा अधिकार

**१९०.** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत कोणत्याही वेळी वाजवी नोटीस देऊन कोणत्याही इमारतीमध्ये व जमिनीवर प्रवेश करता येईल व त्यांचे निरीक्षण करता येईल आणि स्वच्छताविषयक कारणांसाठी त्या सर्व किंवा त्यांचा कोणताही भाग स्वच्छ करण्याविषयी, साफ करण्याविषयी किंवा इतर रीतीने योग्य स्थितीत ठेवण्याविषयी लेखी नोटिशीद्वारे निदेश देता येईल.

---

१. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १४(अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम १४(ब) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६३ द्वारे "जर अनुदान पंचायत समितीस देणे असेल तर ते जिल्हा परिषदेकडून देण्यात आले पाहिजे" हा मजकूर वगळण्यात आला.

**१९१.** जो कोणी राहण्यालायक किंवा अन्य प्रकारच्या कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार असून अशी इमारत किंवा जमीन घाणेरड्या किंवा अहितकारक अशा स्थितीत राहू देईल किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मते तिच्या शेजारी राहणाऱ्या व्यक्तीस ती उपद्रवकारक ठरेल अशी होऊ देईल किंवा तिच्यावर काटेरान अथवा अपायकारक झाड-झाडोरा माजू देईल आणि ती स्वच्छ करण्याविषयी, साफ करण्याविषयी अथवा इतर रीतीने योग्य स्थितीत ठेवण्याविषयी याबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर वाजवी कालावधीत अशा नोटीशीत फर्माविल्याप्रमाणे वागणार नाही तो, दंडाधिकाऱ्यासमोर सिध्दापराध ठरविण्यात आल्यावर पंचवीस रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडास पात्र होईल आणि जर अपराध तसाच चालू राहील तर अपराध सिध्दीनंतर उक्त अपराध चालू राहील अशा प्रत्येक दिवसाबद्दल पाच रुपयांहून अधिक नसेल इतक्या आणखी दंडास पात्र होईल. घाणेरड्या इमारती वगैरे.

**१९२.** मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही वेळी लेखी नोटीसीद्वारे कोणतीही विहीर, ओढा, पाट, तलाव किंवा पाणीपुरवठ्याचे इतर साधन--मग ते खाजगी मालमत्ता म्हणून असो अगर नसो--याच्या मालकास, किंवा त्यावर नियंत्रण असलेल्या कोणत्याही व्यक्तीस पुढीलप्रमाणे फर्माविता येईल :-- पाणी पुरवठ्याच्या साधनांच्या संबंधातील अधिकार व कर्तव्ये.

(क) जर पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असेल तर--

(एक) ओढा सोडून पाणीपुरवठ्याचे असे इतर कोणतेही साधन चांगल्या दुरूस्त स्थितीत ठेवील व राखील, अथवा

(दोन) नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी अवधीत, असे कोणतेही पाणीपुरवठ्याचे साधन, त्यातील गाळ, कचरा आणि कुजणाऱ्या वनस्पती काढून स्वच्छ करील, अथवा

(तीन) भूपृष्ठावरील गटारांमुळे दूषित होऊ नये म्हणून पाणीपुरवठ्याच्या अशा कोणत्याही साधनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निर्देश देईल त्या रीतीने संरक्षण करील, अथवा

(चार) नैसर्गिक रीतीने वाहणारा ओढा नसलेल्या ज्या कोणत्याही पाणीपुरवठ्याच्या साधनाचे पाणी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मते पिण्यास योग्य नाही अशा कोणत्याही पाणीपुरवठ्याच्या साधनाचा पिण्याच्या प्रयोजनासाठी वापर करण्याचे व इतरास तसा वापर करू देण्याचे बंद करील, अथवा

(पाच) उपखंड (चार) खाली अशी नोटीस दिलेली असली तरीही असा वापर चालू असेल आणि त्यास मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मते अन्य रीतीने प्रतिबंध करणे शक्य नसेल तर अशा वापरास प्रतिबंध करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला पुरेसे वाटेल अशा रीतीने पाणीपुरवठ्याचे असे साधन तात्पुरते किंवा कायमचे बंद करील, बुजवून टाकील किंवा त्यास कुंडण किंवा कुंपण घालील, अथवा

(सहा) अशा कोणत्याही पाणीपुरवठ्याच्या साधनांमधून किंवा त्यास जोडून किंवा त्याच्या लगत असलेल्या कोणत्याही जमिनीतून किंवा परिवास्तुतून किंवा पात्रातून किंवा जलाशयातून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मते आरोग्यास अपायकारक किंवा जवळपासच्या लोकांस उपद्रवकारक असेल असे साचलेले पाणी निचरा करून किंवा अन्य रीतीने काढून टाकील.

(ख) नैसर्गिक रीतीने वाहणाऱ्या ओढ्याव्यतिरिक्त, पाणीपुरवठ्याचे असे इतर कोणतेही साधन मग त्याचे पाणी पिण्यासाठी वापरण्यात येत असो किंवा नसो-पुरेशी दुरूस्ती, संरक्षण किंवा कुंडण यांच्या अभावी, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या मते लोकांच्या किंवा ते वापरण्याचा किंवा त्याच्यामधून किंवा जवळून जाण्याचा प्रसंग येत असेल त्या व्यक्तीच्या आरोग्यास किंवा सुरक्षिततेस अपायकारक असल्यास, अशी नोटीस दिल्यापासून चोवीस तासांच्या आत, मुख्य कार्यकारी अधिकारी निदेश देईल किंवा मान्य करील त्या रीतीने दुरुस्त किंवा संरक्षित करील किंवा त्यास कुंडण घालील.

दिलेल्या निदेशाचे अनुपालन न केल्यास उपाययोजना.

**१९३.** अशा मालकाने किंवा पूर्वोक्तप्रमाणे पाणीपुरवठा जिच्या नियंत्रणाखाली आहे अशा व्यक्तीने कलम १९२ च्या तरतुदीअन्वये किंवा त्याखाली आवश्यक असलेल्या अवधीत अशा कोणत्याही फर्मावणीचे आवश्यक असेलेले काम लगेच पार पाडण्याची कार्यवाही करता येईल आणि त्याच्या मते कोणत्याही व्यक्तीचे आरोग्य किंवा सुरक्षितता राखण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असेल तर तो असे काम लगेच सुरू करील; आणि त्यासाठी आलेला सर्व खर्च अशा पाणीपुरवठयाच्या मालकाकडून, किंवा त्यावर नियंत्रण असलेल्या व्यक्तीकडून देण्यात येईल, आणि तो खर्च कोणत्याही कराची म्हणून हक्कमागणी केलेली रक्कम प्रकरण अकरा अन्वये ज्या रीतीने वसुलीयोग्य असते त्याच रीतीने वसुलीयोग्य असेल.

परंतु, जिचे पाणी जनतेकडून किंवा जनतेच्या कोणत्याही वर्गाकडून हक्काने वापरले जाते अशी कोणतीही विहीर किंवा खाजगी ओढा किंवा कोणताही खाजगी पाट, तलाव किंवा पाणीपुरवठयाचे इतर साधन यांच्याबाबतीत, अशा मालकाने किंवा नियंत्रण असलेल्या व्यक्तीने केलेला खर्च, जिल्हा परिषदेने तसा निदेश दिल्यास, अशा जिल्हा परिषदेच्या स्वाधीन असलेल्या जिल्हा निधीच्या हिश्श्यातून देता येईल.

विवक्षित प्रयोजनाकरिता सार्वजनिक झरे, वगैरे अलग राखून ठेवण्याचा अधिकार.

**१९४.** (१) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, संबंधित झरा, तलाव विहीर किंवा इतर ठिकाण येथे जाहीर नोटीस लावून आणि या अधिनियमांन्वये आवश्यक असल्याप्रमाणे अन्य रीतीने सार्वजनिक झरे, तलाव विहीरी आणि इतर ठिकाणे व सार्वजनिक जलप्रवाहाचे भाग, पिण्याच्या प्रयोजनासाठी किंवा स्नानासाठी किंवा कपडे अगर जनावरे धुण्याकरिता किंवा रहिवाशांचे आरोग्य, स्वच्छता, सुख किंवा सोयी ज्यायोगे वाढतील अशा दुसऱ्या कोणत्याही प्रयोजनाकरिता, अलग राखून ठेवता येतील आणि पूर्वोक्त कोणत्याही प्रयोजनासाठी मालकांच्या संमतीने कोणतेही खाजगी झरे, तलाव विहीरी किंवा इतर ठिकाणे सुध्दा अलग राखून ठेवता येतील.

(२) साथींच्या रोगांचा प्रादुर्भाव झाला असेल तेव्हा, पाण्याच्या ज्या साधनाजवळ लोक जाणेयेणे करतात तेथील पाणी वापरण्यास मनाई करणे इष्ट आहे अशा अर्थाचे, जिल्हा परिषदेच्या किंवा शासनाच्या सेवेत असलेल्या कोणत्याही वैद्यकीय अधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र मिळाल्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास नोटिशीद्वारे तशी कारवाई ताबडतोब करता येईल, अशी नोटीस पाणीपुरवठयाच्या साधनाजवळ तिची एक प्रत लावून किंव दवंडी पिटवुन बजावण्यात येईल व तीत, अशी मनाई किती दिवस चालू राहील तो कालावधी नमूद करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास आणखी प्रमाणपत्र न मिळविता अशा नोटिशीची मुदत वेळोवेळी वाढविता येईल किंवा तीत फेरबदल करता येईल.

इतर प्रयोजनाकरिता अलग राखून ठेवलेल्या जागा वापरण्याबद्दल शास्ती.

**१९५.** जी व्यक्ती -

(क) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने, किंवा खाजगी मालमत्तेच्या बाबतीत तिच्या मालकाने, पिण्यासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही जागेतील पाण्यात स्नान करील किंवा ते खराब करील, अथवा

(ख) पूर्वोक्तप्रमाणे पिण्याच्या प्रयोजनासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही जागेच्या कोरडया पात्रात घाणेरडा किंवा हानिकारक पदार्थ टाकील, अथवा

(ग) पूर्वोक्तप्रमाणे पिण्यासाठी किंवा स्नानासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही जागेत कपडे धुवील, अथवा

(घ) पूर्वोक्तप्रमाणे पिण्याच्या प्रयोजनासाठी किंवा स्नानासाठी किंवा कपडे धुण्यासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही जागेत कोणतेही जनावर किंवा स्वयंपाकाची भांडी किंवा लोकर, कातडी किंवा इतर घाणेरडा किंवा अपायकारक कोरडया पात्रात घाणेरडा किंवा हानिकारक पदार्थ टाकील, अथवा

(ङ) पूर्वोक्तप्रमाणे पिण्याच्या प्रयोजनासाठी किंवा स्नानासाठी किंवा कपडे धुण्यासाठी अलग राखून ठेवलेल्या कोणत्याही जागेत, त्याच्या मालकीची मोरी (सिंक), मलप्रणाल, नाली, इंजिन किंवा बाष्पक यांमधील पाणी किंवा त्याच्या मालकीच्या किंवा भोगवटयात असलेल्या इमारतीतून किंवा जागेतून इतर कोणताही अपायकारक पदार्थ वाहू देईल.

ती दंडाधिकाऱ्यासमोर सिध्दापराध ठरल्यावर पन्नास रूपयाहून अधिक नाही इतक्या दंडास पात्र होईल आणि अपराध तसाच चालू राहिला तर, अपराधसिध्दीनंतर, उक्त अपराध चालू राहील अशा प्रत्येक दिवसाबद्दल दहा रूपयांहून अधिक नाही इतक्या आणखी दंडास पात्र होईल.

दूषित पाण्यापासून होणारा उपद्रव कमी करणे.

१९६. जेव्हा कोणतेही डबके, खंदक, तलाव, तळे, विहीर, खळगा किंवा कोणतेही निरूपयोगी किंवा साचलेले पाणी किंवा दूषित पाण्याच्या किंवा घृणास्पद किंवा अपायकारक अशा इतर पदार्थांचा कोणताही पाट किंवा पात्र-मग ते कोणत्याही खाजगी आवारात असो किंवा अन्य ठिकाणी असो-रहिवाशांच्या आरोग्यास अपायकारक किंवा जवळपासच्या लोकांस उपद्रवकारक होण्याचा संभव आहे, असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास वाटेल तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास लेखी नोटिशीद्वारे त्यांच्या मालकास ते स्वच्छ करण्याविषयी, भरून काढण्याविषयी, त्याचा निचरा करण्याविषयी किंवा ते काढून टाकण्याविषयी किंवा उपद्रव कमी करण्यासाठी किंवा नाहीसा करण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असतील त्या उपाययोजना करण्याविषयी फर्मावता येईल.

प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या जागा बंद करणे.

१९७. (१) प्रेतांची विल्हेवाट लावण्याकरिता वापरली जाणारी कोणतीही जागा आरोग्यास अपायकारक होण्याच्या स्थितीत किंवा होण्याचा संभव असेल अशा स्थितीत आहे असे जिल्हा परिषदेचे मत असेल तर, तिला आपले मत त्याबद्दलची कारणे देऊन, आयुक्तास कळवता येईल. लागोलाग आयुक्तास, त्याला योग्य वाटेल अशी आणखी कोणतीही चौकशी केल्यानंतर अधिसूचनेद्वारे अशा अधिसूचनेत त्याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून अशा जागेचा वरीलप्रमाणे वापर करण्याचे बंद करण्यात यावे असा निदेश देता येईल.

(२) उक्त अधिसूचनेची एक प्रत, तिच्या मराठी अनुवादासह, स्थानिक वृत्तपत्रे असल्यास, त्यात प्रसिध्द करण्यात येईल आणि ती जिल्हा परिषदेच्या कार्यालयात व ज्या जागेसंबंधी ती असेल त्या जागेत किंवा जागेजवळ एका किंवा अधिक ठळक ठिकाणी लावण्यात येईल.

(३) अशी कोणतीही जागा बंद करण्याबद्दलच्या उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर, जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही प्रेताचे अशा जागेत दफन करील किंवा इतर रीतीने त्याची विल्हेवाट लावील किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीखाली किंवा प्रस्थापित परिपाठानुसार प्रेताचे दफन करण्यासाठी अलग राखून न ठेवलेल्या कोणत्याही विनवहिवाटी सरकारी जमिनीत प्रेताचे दफन करील ती अपराधसिध्दीनंतर शंभर रूपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

जेथे संक्रामक रोग आहे अशा इमारती वगैरे यांना तपासणीसाठी प्रवेश करण्याचा मुख्य कार्यकारी अधिकारी वगैरे यास अधिकार असणे : इमारती, वगैरे जंतुविरहित करणे.

१९८. (१) ज्या इमारतीत किंवा परिवास्तूत कोणताही घातक आणि संक्रामक रोग असल्याबद्दल कळविण्यात आले असेल किंवा संशय असेल अशा कोणत्याही इमारतीत किंवा परिवास्तूत, ती तपासण्यासाठी, वाजवी नोटीस दिल्यानंतर कोणत्याही वेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येईल.

(२) सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतच्या वेळेव्यतिरिक्त इतर कोणत्याही वेळी अशी तपासणी करण्यात येणार नाही.

(३) एखादी इमारत किंवा परिवास्तू अगर तिचा कोणताही भाग किंवा त्यातील संसर्गदूषित राहण्याचा संभव असलेल्या कोणत्याही वस्तू स्वच्छ केल्याने किंवा जंतुविरहित केल्याने कोणत्याही घातक संक्रामक रोगाच्या प्रसारास प्रतिबंध होईल किंवा आळा बसेल असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे किंवा त्याने अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीचे मत असेल, तिला मालकास किंवा भोगवटादारास नोटीस देऊन अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या वेळेच्या आत अशी इमारत, परिवास्तू, भाग किंवा वस्तू स्वच्छ करण्यास किंवा जंतुविरहित करण्यास भाग पाडता येईल :

परंतु, जर तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे किंवा मालक किंवा भोगवटादार, गरिबीमुळे किंवा अन्यथा आपल्या फर्मावणीचे परिणामकारक अनुपालन करण्यास असमर्थ आहे असे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास किंवा त्याने अशा रीतीने प्राधिकृत केलेल्या व्यक्तीस वाटत असेल तर, तिला स्वतःला अशी इमारत किंवा जागा किंवा वस्तू स्वच्छ किंवा जंतुविरहित करण्याची तजवीज करता येईल आणि या प्रयोजनासाठी अशा इमारतीतून किंवा जागेतून अशा वस्तू हलविण्याची तजवीज करता येईल ; आणि या

पोट-कलमाखाली त्याला आलेला खर्च त्याने उक्त मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून, जर तो गरिबीमुळे त्याच्या फर्मावणीचे परिणामकारकपणे पालन करण्यास असमर्थ नसेल तर वसूल करण्यायोग्य असेल.

जिल्हा परिषदेने, संसर्गदूषित वस्तू जेथे धुता येतील व जंतुविरहित करता येतील त्या जागा अधिसूचित करणे. संसर्गदूषित वस्तूंचा नाश करता येणे. शास्ती.

**१९९.** (१) कोणत्याही घातक व संक्रामक रोगामुळे संसर्गदूषित झालेले कोणतेही कपडे किंवा बिछाने किंवा इतर वस्तू ज्या जागेत धुता येतील किंवा जंतुविरहित करता येतील अशा जागा जिल्हा परिषद वेळोवेळी अधिसूचित करील.

(२) अशा प्रकारे संसर्गदूषित राहण्याचा संभव असलेले कपडे, बिछाने किंवा इतर वस्तू नष्ट करण्याचा जिल्हा परिषदेस निदेश देता येईल आणि नष्ट केलेल्या वस्तुबद्दल भरपाईची मागणी करण्यात आली असता जिल्हा परिषद ती देईल.

(३) जी व्यक्ती पोट-कलम (१) खाली धुण्याच्या प्रयोजनासाठी अलग राखून ठेवलेल्या जागेव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी असे कपडे किंवा बिछाने किंवा इतर वस्तु धुवील ती अपराधसिध्दीनंतर पन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडास पात्र होईल.

सार्वजनिक रस्ते, जमीन किंवा इमारत यांवरील अडथळे व अतिक्रमणे.

**२००.** (१) एखाद्या सार्वजनिक रस्ता, जमीन किंवा इमारत जिल्हा परिषदेमध्ये निहित झाल्यावर किंवा या सर्व गोष्टी तिची मालमत्ता झाल्यावर, जी व्यक्ती अशा रस्त्याच्या, जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही भागावर, कोणतीही भिंत अगर कोणतेही कुंपण, कठडा, खांब, दुकान, व्हरांडा, ओटा, जोते, पायरी किंवा कोणतीही पुढे येणारी संरचना किंवा वस्तू किंवा योगे अतिक्रमण अथवा अडथळा होईल असे इतर काही बांधील किंवा उभारील किंवा अशा कोणत्याही रस्त्याच्या, जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही भागावर किंवा अशा रस्त्यातील, जागेतील किंवा इमारतीतील कोणतीही उघडी नाली, गटार, मलप्रणाल किंवा रोधप्रणाल यात किंवा यांच्यावर किंवा यांवर कोणतीही पेटी, गासडी, गठ्ठा किंवा कोणताही व्यापारी माल किंवा इतर वस्तू रचून ठेवील किंवा ठेवण्याची किंवा रचून ठेवण्याची तजवीज करील तिला अपराधसिध्दीनंतर पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.

(२) जिल्हा परिषदेस असा कोणताही अडथळा किंवा अतिक्रमण काढून टाकण्याचा अधिकार असेल आणि ज्या व्यक्तीने असा अडथळा किंवा अतिक्रमण केले असेल ती व्यक्ती ते काढून टाकण्याचा खर्च देईल आणि असा खर्च कोणत्याही कराची म्हणून मागणी केलेली रक्कम प्रकरण अकरा अन्वये ज्या रीतीने वसूल करण्याजोगी असते त्याच रीतीने वसूल करण्याजोगा असेल :

परंतु, असा कोणताही अडथळा किंवा अतिक्रमण काढून टाकण्याच्या कामास लागण्यापूर्वी, ज्या व्यक्तीने असा अडथळा किंवा अतिक्रमण केले असेल तिला, लेखी नोटीस देऊन अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करावयाच्या वाजवी अवधीच्या आत, ते काढून टाकण्यास किंवा ते काढून का टाकण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखविण्यास जिल्हा परिषद फर्मावील.

(३) जिल्हा परिषदेमध्ये निहित झालेल्या किंवा तिची मालमत्ता असलेल्या कोणत्याही सार्वजनिक रस्त्याचा उत्सवाच्या आणि समारंभाच्या प्रसंगी तात्पुरता भोगवटा करण्याची किंवा त्यावर इमला उभारण्याची किंवा पंधरा दिवसांहून अधिक नसेल इतक्या दिवसांपर्यंत आणि लोकांची किंवा कोणत्याही व्यक्तीची गैरसोय होणार नाही अशा रीतीने अशा रस्त्याच्या एखाद्या भागावर सरपण रचून ठेवण्याची परवानगी देण्यास या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे जिल्हा परिषदेस प्रतिबंध होणार नाही.

(४) जिल्हा परिषदेच्या मते जेव्हा सार्वजनिक रस्त्याचा भाग असलेल्या एखाद्या जमिनीची सार्वजनिक रस्त्यासाठी किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता आवश्यकता नसेल तेव्हा सात वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत ती जमीन पट्ट्याने देण्यास किंवा तिचा तात्पुरता उपयोग करण्याची परवानगी देण्यास जिल्हा परिषद सक्षम असेल.

२०१. जेथे उदिमाच्या प्रयोजनासाठी वजने किंवा मापे किंवा वजन करण्याची किंवा मापण्याची साधने यांचा उपयोग करण्यात येतो किंवा ती ठेवण्यात येतात अशा जागेत (मुंबई वजने व मापे अधिनियम १९३२ याखाली केलेल्या नियमान्वये विहित केलेल्या जागेखेरीज इतर) किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याखाली कोणत्याही जागेत अध्यक्ष, उपाध्यक्ष यास किंवा यासाठी जिल्हा परिषदेने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही सदस्यास किंवा अधिकाऱ्यास सर्व वाजवी वेळी प्रवेश करता येईल व अशी वजने किंवा मापे अगर वजन करण्याची किंवा मापण्याची साधने यांचे निरीक्षण करता येईल. वजने व मापे, इत्यादींची निरीक्षणे करण्याचे अधिकार

१९३२ चा मुंबई १५

२०२. (१) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास वेळोवेळी लेखी नोटिशीद्वारे कोणत्याही परिवास्तूच्या किंवा तिच्या भागाच्या मालकास अशा जागेवर किंवा तिच्या भागावर अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या ठिकाणी व त्या रीतीने धातूच्या पट्टयाचे क्रमांक किंवा पोट क्रमांक लावण्याविषयी फर्मावता येईल किंवा असे काम स्वतः त्या अधिकाऱ्याने पार पाडण्यात यावे अशी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची इच्छा असल्यास त्याला तसे लेखी सूचित करता येईल. [illegible]

(२) जी कोणतीही व्यक्ती, अशा कोणत्याही क्रमांक किंवा पोट क्रमांक नष्ट करील, काढून टाकील किंवा तो विरूपित करील अथवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या आदेशानुसार लावण्यात आलेल्या क्रमांकाहून किंवा पोटक्रमांकाहून वेगळा असा कोणताही क्रमांक किंवा पोटक्रमांक लावील त्या व्यक्तीस, आणि कोणत्याही परिवास्तूच्या किंवा तिच्या भागाच्या ज्या कोणत्याही मालकाने अशा परिवास्तूवर किंवा तिच्या भागावर असा क्रमांक किंवा पोटक्रमांक लावण्यात आल्यानंतर तो क्रमांक किंवा पोटक्रमांक चांगल्या स्थितीत ठेवला नाही त्या मालकास, अपराधसिध्दीनंतर वीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) जेव्हा पोट-कलम (१) अनुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या आदेशान्वये कोणत्याही परिवास्तुवर किंवा तिच्या भागावर एखादा क्रमांक किंवा पोटक्रमांक लावला असेल तेव्हा, अशा कामाचा खर्च यथास्थिती अशा परिवास्तूच्या किंवा तिच्या भागाच्या मालकाकडून देय होईल :

परंतु, अशा कामाबद्दलच्या आकाराचा कमाल दर मुख्य कार्यकारी अधिकारी निश्चित करील.

**स्पष्टीकरण.**-या कलमात 'परिवास्तु' या संज्ञेचा अर्थ, मानवी वसतिस्थान म्हणून किंवा अन्यथा वापरले जाणारे दगडाचे, विटाचे, लाकडाचे, मातीचे, धातूचे किंवा इतर कोणत्याही साहित्याचे एखादे घर, उपगृह, तबेला, छपरी, झोपडी किंवा इतर संरचना, असा आहे.

## सार्वजनिक बाजार

२०३. (१) जिल्हा परिषदेने केलेल्या अभिवेदनावरुन, राज्य शासनाला राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, आणि राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा अन्य रीतीने, जिल्ह्यातील कोणतेही ठिकाण हे सार्वजनिक बाजार आहे असे घोषित करता येईल. बाजार स्थापन ... [illegible]

(२) अशा प्रत्येक अधिसूचनेत, अशा रीतीने स्थापन झालेल्या सार्वजनिक बाजाराच्या सीमा निश्चित करुन देण्यात येतील आणि अशा अधिसूचनेद्वारे राज्य शासन निदेश देईल अशा स्थानिक क्षेत्राचा या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी अशा सीमांत समावेश करता येईल.

(३) जेव्हा जेव्हा राज्य शासन पोट-कलम (१) खाली एखादे ठिकाण हे सार्वजनिक बाजार म्हणून जाहीर करील तेव्हा तेव्हा, कोणतीही व्यक्ती, त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, अशा सार्वजनिक बाजाराच्या सीमांत किंवा राज्य शासन या बाबतीत अधिसूचनेद्वारे प्रत्येक बाबतीत विनिर्दिष्ट करील अशा बाजारापासूनच्या अंतराच्या मर्यादेत इतर कोणताही बाजार उभारणार नाही, स्थापन करणार नाही किंवा चालू ठेवणार नाही किंवा तो चालू ठेवण्यास मुभा देणार नाही.

(४) जो कोणी या कलमाचे उल्लंघन करुन कोणताही बाजार उभारील, स्थापन करील किंवा चालू ठेवील किंवा चालू ठेवण्यास मुभा देईल त्यास अपराधसिध्दीनंतर पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल आणि असे उल्लंघन चालू राहिल्यास पहिल्या अपराधसिध्दीनंतर ज्या कालावधीत असे उल्लंघन चालू राहील त्या कालावधीच्या प्रत्येक दिवसाबद्दल शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.

(५) एखाद्या व्यक्तीच्या मालकीच्या जमिनीवर एखादा बाजार भरविण्यात आला असेल तर या कलमाच्या प्रयोजनांसाठी त्या व्यक्तीने असा बाजार उभारला, स्थापन केला, चालू ठेवला किंवा चालू ठेवण्यास मुभा दिली असे मानण्यात येईल; आणि अशा जमिनीवर तो बाजार आपल्या नकळत भरवण्यात आला होता हे सिध्द करण्याचा भार अशा व्यक्तीवर राहील.

(६) [1]मुंबईचा शेतीच्या उत्पन्नाच्या बाजाराबाबत अधिनियम, १९३९ अन्वये किंवा याखाली किंवा राज्याच्या कोणत्याही भागात अमलात असलेल्या इतर कोणत्याही तत्सम कायद्याखाली ज्या कृषि उत्पन्नाच्या खरेदीचे किंवा विक्रीचे विनियमन करण्यात येते अशा कृषि उत्पन्नाच्या खरेदीसाठी किंवा विक्रीसाठी कोणतेही ठिकाण सार्वजनिक बाजार म्हणून घोषित करण्याचा अधिकार राज्य शासनाला प्राप्त होतो असे या कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीवरुन मानले जाणार नाही.

१९३९ चा मुंबई २२

## खाजगी बाजार

या तरतुदी गावांना लागू करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२०४. (१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, असा निदेश देता येईल की, यातील खाजगी बाजारासंबंधीच्या तरतुदी, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या गावांना लागू होतील आणि त्यानंतर, राज्य शासनाचे समाधान होईल अशा रीतीने त्याविरुध्द वाजवी कारण दाखविण्यात आले नाही तर अशा तरतुदी अधिसूचनेच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा अवधी संपल्यानंतर उपरोक्त गावांना लागू होतील.

(२) ज्या कोणत्याही गावांना पूर्वोक्तप्रमाणे तरतुदी लागू होतील त्या गावांच्या संबंधात बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ लागू होण्याचे बंद होईल. मात्र, अशा प्रकारे बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ ची अंमलबजावणी बंद होण्यापूर्वी केलेल्या किंवा करावयाच्या, राहून गेलेल्या गोष्टींच्या संबंधात पूर्वोक्त अधिनियम लागू होईल आणि बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ हा जणू काही त्यावेळी महाराष्ट्र अधिनियमांन्वये निरसित करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, याच्या कलम ७ च्या तरतुदी अशा रीतीने त्या अधिनियमाची अंमलबजावणी बंद होण्याबाबत लागू होतील.

१८६२ चा मुंबई ४. १८५४ चा मुंबई ५ १८६२ चा मुंबई ४. १९०४ चा मुंबई १.

खाजगी बाजारासाठी आवश्यक असलेल्या लायसना-संबंधीच्या तरतुदी

२०५. (१) जिल्हा परिषदेने दिलेल्या लायसनाखेरीज कोणतीही व्यक्ती खाजगी बाजार स्थापन करणार नाही किंवा तो चालू ठेवणार नाही.

(२) खाजगी बाजारासंबंधीच्या यातील तरतुदी एखाद्या गावाला ज्या दिनांकास लागू होतात त्या दिनांकास अशा कोणत्याही गावात विधितः अस्तित्वात असलेल्या बाजाराच्या संबंधात, जिल्हा परिषद, पोट-कलम (१) अन्वये लायसन देईल आणि इतर बाजारांच्या संबंधात तिला असे लायसन देता येईल. मात्र अशा बाजारातील स्वच्छता, जलनिःसारण पाणीपुरवठा, रस्त्याची व मार्गाची रूंदी, वापरावयाची वजने व मापे आणि अशा बाजारात आकारावयाची भाडी व फी यासंबंधी जिल्हा परिषदेस योग्य वाटतील अशा शर्तींना अधीन राहून असे लायसन देता येईल

फी बसवण्याची हक्क मागणी करण्यास अनुसरावयाची कार्यपध्दती.

२०६. कलम १५७ चा खंड (७) यात निर्दिष्ट केलेल्या स्वरुपाची फी बसवण्याची हक्कमागणी करणारी कोणतीही व्यक्ती प्रथम जिल्हा परिषद यासाठी नेमिल अशा अधिकाऱ्याकडे अर्ज करील आणि या बाबतीतील तिचा अधिकार मान्य करणारे प्रमाणपत्र असा अधिकारी त्या व्यक्तीस देऊ शकेल आणि असे प्रमाणपत्र जिल्हा परिषदेकडे सादर करण्यात आल्यानंतर, जिल्हा परिषद त्या व्यक्तीला कलम २०५, पोट-कलम (२) खाली लायसन देताना लायसनधारकास अशी फी बसवण्याबाबत मुभा देईल.

फी बसवण्याच्या हक्क मागणीबाबत द्यावयाच्या निर्णयाची कारणे

२०७. प्रमाणपत्र द्यावे किंवा नाही याबाबत निर्णय देताना कलम २०६ खाली प्राधिकृत केलेला अधिकारी, अशा हक्कमागणीविरुध्द त्याच्याकडे लेखी किंवा अन्यथा जी कोणतीही अभिवेदने केलेली असतील त्या विचार करील. तसेच तो पुढील परिस्थितीचासुध्दा विचार करील म्हणजे –

(क) प्रदीर्घ काळापासून चालत आलेल्या वहिवाटीनुसार अशी फी बसवण्याचा हक्क अर्जदारास प्राप्त होतो किंवा कसे ;

---

[1]आता महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) पहा.

(ख) राज्य शासनाच्या विशेष मंजुरीखाली किंवा ज्या गावास या तरतुदी लागू होतात त्या गावात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदीनुसार अशी फी वसवण्याचा हक्क त्यास प्राप्त होतो किंवा करो.

२०८. कलम २०६ खाली प्रमाणपत्र देण्यास नकार देणाऱ्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, ती ज्या हक्काची मागणी करीत असेल तो हक्क प्रस्थापित करण्यासाठी अशा आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत न्यायालयात दावा दाखल करता येईल आणि अशा दाव्याच्या निकालाना अधीन राहून, असा आदेश अंतिम असेल. फी बसवण्याचा हक्क प्रस्तापित करण्यासाठी दावा

२०९. कलम २०५ च्या पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या लायसन अन्वये कोणतीही फी आकारण्याबाबत परवानगी नसेल तेव्हा असे लायसन विनामूल्य देण्यात येईल, पण जेव्हा अशी परवानगी देण्यात आली असेल तेव्हा, अशा लायसनबद्दल त्याबाबत उप-विधीद्वारे निश्चित करण्यात येईल त्या रकमेहून अधिक नसेल अशी फी आकारता येईल. लायसनबद्दल फी

२१०. कलम २०५ खालील लायसन हे, त्यात अन्यथा निदेश दिलेला नसेल तर, ज्या वित्तीय वर्षात देण्यात आले असेल ते त्या वित्तीय वर्षासाठी अंमलात राहील, पण त्याच्या शर्तींपैकी कोणत्याही शर्तीच्या भंगाबद्दल, किंवा अनधिकृतपणे कोणतीही फी आकारल्याबद्दल ते जिल्हा परिषदेस कोणत्याही वेळी निलंबित करता येईल किंवा रद्द करता येईल. लायसन निलंबित करणे किंवा रद्द करणे.

२११. कलमे २०५, २०६, २०९ किंवा २१० अन्वये जिल्हा परिषदेमध्ये निहित केलेल्या अधिकारांन्वये जिल्हा परिषदेने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, त्या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, आयुक्ताकडे अपील करता येईल आणि आयुक्ताचा निर्णय अंतिम असेल. जिल्हा परिषदेच्या आदेशाविरुद्ध अपील.

२१२. कलम २०५ च्या पोट-कलम (२) खाली द्यावयाच्या लायसनसाठी केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालावधीत असे लायसन देण्यात जिल्हा परिषदेने कसूर केल्यास अशा कसुरीमुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस आयुक्ताकडे अर्ज करता येईल आणि आयुक्तांस असा अर्ज नाकारता येईल किंवा असे लायसन देण्याविषयी जिल्हा परिषदेस निदेश देता येईल किंवा असे लायसन स्वत: देता येईल व त्याचा निर्णय अंतिम असेल. लायसन देण्यात कसूर करणे आणि अशा आदेशाविरुद्ध अर्ज.

२१३. जी कोणतीही व्यक्ती,— लायसन नसलेल्या बाजाराबाबत शास्ती.

(क) कलम २०५, पोट-कलम (२) खाली ज्यासाठी लायसन देण्यात आलेले नाही असा एखादा बाजार स्थापन करील किंवा चालू ठेवील ; अथवा

(ख) एखाद्या बाजारासाठी दिलेले लायसन कलम २१० खाली रद्द करण्यात आल्यावर तो बाजार उघडील किंवा उघडा ठेवील ; अथवा

(ग) कलम २१० खालील, लायसनच्या तहकुबीच्या कालावधीत एखादा बाजार उघडील किंवा उघडा ठेवील ;

ती व्यक्ती, शंभर रुपयांपर्यंत असू शकेल अशा दंडाच्या शिक्षेस पात्र होईल आणि तिने अशा प्रकारे भंग करणे चालू ठेवले असेल तर त्याबाबतीत, पहिल्या अपराधसिद्धीनंतर ज्या कालावधीत असा भंग चालू राहिल्याचे सिद्ध होईल त्या कालावधीत प्रत्येक दिवसाबद्दल आणखी दहा रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

## जत्रा

२१४. त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली राज्य शासनाने जत्रांच्या संबंधात केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, कलम १५७ च्या खंड (छ) मधील सार्वजनिक बाजारासंबंधीच्या तरतुदी या, राज्य शासनातर्फे भरविण्यात येणाऱ्या जत्रा, शेतकी प्रदर्शने किंवा औद्योगिक प्रदर्शने वगळून इतर जत्रा, शेतकी प्रदर्शने किंवा औद्योगिक प्रदर्शने यांना लागू असतील. सार्वजनिक बाजारांच्या संबंधातील तरतुदी, जत्रा वगैरे यांना लागू होणे.

## सार्वजनिक गाडीतळ

या तरतुदी स्थानिक क्षेत्रांना लागू करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**२१५.** (१) राज्य शासनास, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, यातील सार्वजनिक गाडीतळांच्या संबंधातील तरतुदी या, अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील त्या स्थानिक क्षेत्रांना लागू होतील असा निदेश देता येईल; आणि त्यानंतर, राज्य शासनाचे समाधान होईल अशा रीतीने तद्विरूध्द कोणतेही योग्य कारण दर्शविण्यात आले नसेल तर, पूर्वोक्त तरतुदी अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून अशा स्थानिक क्षेत्रांना त्याप्रमाणे लागू होतील.

(२) मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० च्या तरतुदीची अंमलबजावणी अशा रीतीने बंद होण्यापूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहून गेलेल्या गोष्टींच्या संबंधात असेल ते खेरीज करून ज्या कोणत्याही स्थानिक क्षेत्रात पूर्वोक्त तरतुदी लागू होतात त्या स्थानिक क्षेत्राला मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० याच्या सार्वजनिक गाडीतळासबंधातील तरतुदी लागू होण्याचे बंद होईल; आणि मुंबई सार्वजनिक वाहने अधिनियम, १९२० हा जणू काही त्यावेळी महाराष्ट्र अधिनियमान्वये निरसित करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याच्या कलम ७ च्या तरतुदी अशा रीतीने तरतुदींची अंमलबजावणी बंद झाल्यानंतर लागू राहतील.

१९२० चा मुंबई ७. १९२० चा मुंबई ७. १९२० चा मुंबई ७. १९०४ चा मुंबई १.

सार्वजनिक तळाची तरतूद करणे.

**२१६.** (१) जिल्हा परिषदेस विरामस्थाने व गाडीतळ बांधता येतील किंवा त्यांची तरतूद करून ते सुस्थितीत ठेवता येतील आणि त्यांच्या वापराबद्दल भाडे व फी आकारता येईल.

(२) अशा कोणत्याही जागेच्या वापराबाबत जिल्हा परिषदेने केलेल्या उप-विधींद्वारे विहित करण्यात आलेल्या कोणत्याही भाड्यांचे व फींचे एक विवरणपत्र मराठी भाषेत त्या जागेच्या ठळक भागावर लावण्यात येईल.

सार्वजनिक ठिकाणाचा किंवा सार्वजनिक रस्त्याच्या बाजूचा गाडीतळ वगैरे म्हणून उपयोग करण्यास मनाई.

**२१७.** जेथे जिल्हा परिषदेने विरामस्थानाची किंवा गाडीतळाची तरतूद केली असेल, अशा बाबतीत जिल्हा परिषदेच्या मान्यतेने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, कोणत्याही इतर सार्वजनिक ठिकाणाचा किंवा कोणत्याही सार्वजनिक रस्त्याच्या बाजूचा त्या ठिकाणापासून किंवा रस्त्यापासून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने निश्चित केलेल्या अंतराच्या आत त्याच प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने उपयोग करण्यास मनाई करता येईल.

या तरतुदींच्या प्रारंभाच्या वेळी अस्तित्वात असलेल्या खाजगी गाडीतळासाठी लायसन मिळवणे.

**२१८.** (१) पूर्वोक्त तरतुदींच्या प्रारंभाच्या वेळी, कोणत्याही स्थानिक क्षेत्रात विधितः स्थापन केलेला खाजगी गाडीतळ खुला ठेवण्यासाठी किंवा नवीन गाडीतळ उघडण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून दरवर्षी लायसन मिळविल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला तो तळ खुला ठेवता येणार नाही किंवा नवीन गाडीतळ उघडता येणार नाही.

(२) जिल्हा परिषद याबाबतीत उप विधीद्वारे विहित करील अशा, देखरेख व निरीक्षण यासंबंधीच्या विनियमाच्या आणि साफसफाईच्या संबंधातील शर्तीच्या अधीनतेने, मुख्य कार्यकारी अधिकारी लायसन देईल.

(३) या कलमाखाली देण्यात आलेल्या प्रत्येक लायसनवर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास दरवर्षी शंभर रुपयाहून अधिक नसेल इतकी फीसुध्दा आकारता येईल.

## राज्याच्या हैदराबाद प्रदेशातील नगररचनेसंबंधी विशेष तरतुदी

**२१९—२२६क.** [महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७), कलम १६५ (१) अन्वये निरसित]

## नोटिसा, इत्यादींबाबत तरतुदी

**२२७.** या अधिनियमाखाली कोणत्याही व्यक्तीच्या नावाने काढलेली प्रत्येक नोटीस आणि केलेले प्रत्येक बिल तिच्यावर बजावण्याचे किंवा तिला देण्याचे काम हे, या अधिनियमात ज्याच्या संबंधी अन्यथा विशेष तरतूद केलेली नसेल अशा सर्व बाबतीत, जिल्हा परिषद किंवा जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी किंवा याबाबत जिल्हा परिषदेने प्राधिकृत केलेली इतर व्यक्ती किंवा कबूल केलेल्या अटींवर शासनाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी पुढीलप्रमाणे पार पाडील :— व्यक्तीच्या नावाने काढलेल्या नोटिसा, यांचे बजावणे.

(क) ज्या व्यक्तीच्या नावाने नोटीस काढलेली असेल किंवा बिल केलेले असेल तिला नोटीस किंवा ते बिल देऊन किंवा देऊ करून ; अथवा

(ख) जर अशी व्यक्ती सापडत नसेल तर, तिचे माहीत असलेले शेवटचे राहण्याचे ठिकाण त्या जिल्ह्यात असल्यास, अशा ठिकाणी ती नोटीस किंवा ते बिल ठेवून जाऊन किंवा तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ पुरुषास किंवा नोकरास ही नोटीस ते बिल देऊन किंवा देऊ करून ; अथवा

(ग) जर अशी व्यक्ती त्या जिल्ह्यात राहात नसेल आणि इतर ठिकाणचा तिचा पत्ता अध्यक्षास, किंवा ती नोटीस किंवा ते बिल देण्याविषयी निदेश देणाऱ्या अन्य व्यक्तीस माहीत असेल तर, ती नोटीस किंवा ते बिल उक्त पत्ता असलेल्या पाकिटातून नोंदणीकृत डाकेने पाठवून ; अथवा

(घ) जर उपरोक्त मार्गांपैकी कोणताही मार्ग उपलब्ध नसेल तर ज्या इमारतीशी किंवा जमिनीशी ते बिल किंवा ती नोटीस संबंधित असेल अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या एखाद्या ठळक भागावर लावण्याची तजवीज करून.

**२२८.** जेव्हा या अधिनियमाखाली द्यावयाची कोणतीही नोटीस या अधिनियमान्वये किंवा त्या खाली कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर बजावणे आवश्यक असेल किंवा बजावण्याची परवानगी असेल तेव्हा, त्या नोटिशीत त्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे नाव लिहिणे आवश्यक असणार नाही, आणि या अधिनियमात ज्याच्यासंबंधी अन्यथा विशेष तरतूद केलेली नसेल त्या बाबतीत, नोटिसा बजावण्याचे काम पुढीलपैकी कोणत्याही एका रीतीने पार पाडण्यात येईल :— जमिनीच्या व इमारतीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर नोटिसा बजावणे.

(क) ती नोटीस, त्या मालकास किंवा भोगवटादारास अथवा मालक किंवा भोगवटादार एकाहून अधिक असतील तर, त्यांच्यापैकी कोणाही एकास देऊन किंवा देऊ करून ; अथवा

(ख) जर असा कोणताही मालक किंवा भोगवटादार सापडत नसेल तर, पूर्वोक्तप्रमाणे मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ पुरुषास किंवा नोकरास ती नोटीस देऊन किंवा देऊ करून ; अथवा

(ग) जर उपरोक्त मार्गांपैकी कोणताही मार्ग उपलब्ध नसेल तर, ज्या जमिनीशी किंवा इमारतीशी ती नोटीस संबंधित असेल त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक भागावर लावण्याची तजवीज करून.

**२२९.** या अधिनियमान्वये, जी प्रत्येक नोटीस जाहीर नोटीस म्हणून किंवा सर्वसाधारण नोटीस म्हणून जिल्हा परिषदेने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने देणे किंवा बजावणे आवश्यक असेल किंवा जी देण्याचा किंवा बजावण्याचा त्याला अधिकार प्रदान केलेला असेल किंवा जी नोटीस तीत विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींना दिली पाहिजे अशी ज्या नोटिशींच्या बाबतीत स्पष्ट तरतूद करण्यात आलेली नसेल अशा प्रत्येक नोटिशीची एक प्रत ही जिल्हा परिषद उप-विधीद्वारे याबाबत निदेश देईल त्याप्रमाणे जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील अशा ठळक जागी, अशा कालावधीत, तसेच इतर सार्वजनिक इमारतींमध्ये व जागांमध्ये लावून ठेवली असता किंवा स्थानिक वृत्तपत्रांमध्ये किंवा इतर रीतीने प्रसिध्द केली असता, ती नोटीस पुरेशा रीतीने देण्यात किंवा बजावण्यात आली आहे असे मानण्यात येईल. जाहीर व सर्वसाधारण नोटिसा कशा प्रसिद्ध करावयाच्या.

*सदोष नमुन्यामुळे नोटीस किंवा बिल विधि-अग्राह्य न ठरणे*

**२३०.** (१) सदोष नमुन्यामुळे कोणतीही नोटीस किंवा बिल विधिअग्राह्य ठरणार नाही.

(२) जेव्हा या प्रकरणाखालील कोणत्याही नोटिशीअन्वये एखादी कृती करणे आवश्यक असेल व त्यासाठी या अधिनियमान्वये कोणताही अवधी ठरविण्यात आलेला नसेल तेव्हा ती कृती करण्यासाठी नोटिशीमध्ये वाजवी अवधी ठरवून देण्यात येईल.

(३) नोटिशीच्या अटींचे अनुपालन झाले नाही तर जिल्हा परिषदेस किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास त्या नोटिशीअन्वये आवश्यक असलेली कोणतीही कृती करण्यासाठी आवश्यक अशी कारवाई किंवा उपाययोजना करता येईल आणि त्यामुळे जिल्हा परिषद किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आलेला सर्व खर्च, ज्या व्यक्तींवर किंवा व्यक्तींवर नोटीस बजावली असेल ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती देतील व तो खर्च कलम २३३ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने वसूल करण्यायोग्य असेल.

*आदेश व नोटिसा यांची अवज्ञा केल्याबद्दल कोणत्याही इतर कलमान्वये शिक्षायोग्य नसलेल्या अपराधाबद्दल द्यावयाची शिक्षा.*

**२३१.** जी कोणतीही व्यक्ती, या प्रकरणान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांखाली जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने काढण्यात आलेल्या कोणत्याही लेखी नोटिशीच्या द्वारे दिलेल्या कोणत्याही कायदेशीर निदेशाची अवज्ञा करील किंवा त्याचे अनुपालन करण्यात कसूर करील किंवा अशा रीतीने प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराखाली जिल्हा परिषदेने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा त्याच्या वतीने ज्या शर्तींना अधीन राहून तिला कोणतीही परवानगी दिली असेल त्या शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर करील त्या व्यक्तीला, अशी अवज्ञा किंवा कसूर करणे हे कृत्य दुसऱ्या कोणत्याही कलमाखाली शिक्षापात्र अपराध ठरत नसेल तर, दंडाधिकाऱ्यांसमोर सिध्दापराध ठरल्यावर तिला पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल आणि अवज्ञा किंवा कसूर करणे चालू राहिले तर पहिल्या अपराधसिध्दीच्या दिनांकानंतर ज्या दिवसांपर्यंत अशी अवज्ञा किंवा कसूर करणे चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल आणखी पाच रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, जेव्हा नोटिशीत कोणतीही विवक्षित कृती करण्यासाठी अवधी ठरवून देण्यात आला असेल व या अधिनियमात कोणताही अवधी विनिर्दिष्ट केलेला नसेल तेव्हा अशा प्रकारे निश्चित केलेला अवधी हा, या अधिनियमाच्या अर्थांतर्गत वाजवी अवधी आहे किंवा कसे हे निर्धारित करणे दंडाधिकाऱ्याच्या अधिकारात असेल.

*मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केली असता, जिल्हा परिषदेने कामे पार पाडणे व त्याचा खर्च वसूल करणे.*

**२३२.** (१) जेव्हा जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदींखाली कोणत्याही इमारतींच्या किंवा जमिनीच्या मालकाने अगर भोगवटादाराने एखादे काम करणे आवश्यक असेल आणि असे काम करण्यात मालकाने किंवा भोगवटादाराने कसूर केलेली असेल तेव्हा तेव्हा, ते काम जिल्हा परिषदेस किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास करून घेण्याची तजवीज करता येईल—मग अशा कसुरीबद्दल कोणतीही शास्ती विहित केलेली असो वा नसो आणि अशा कामाच्या संबंधात झालेला खर्च, या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली नसेल तर, ज्या व्यक्तीने असे काम करावयास पाहिजे होते ती व्यक्ती परिषदेस देईल आणि तो खर्च, प्रकरण अकराखाली कोणताही वसुलीयोग्य कर म्हणून हक्कमागणी केलेली रक्कम ज्या रीतीने वसूल करण्यात येते त्या रीतीने जिल्हा परिषदेस योग्य वाटेल त्याप्रमाणे, एका ठोक रकमेत किंवा हप्तेबंदीने वसूल करण्याजोगा असेल.

(२) जर कसूरदार इमारतींचा किंवा जमिनीचा मालक असेल तर, जिल्हा परिषदेस किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास,—मग अशा मालकाविरुध्द दावा किंवा कार्यवाही दाखल केलेली असो वा नसो,—एक अतिरिक्त उपाय म्हणून पोट-कलम (३) च्या तरतुदींना अधीन राहून त्या त्या वेळी मालकाने द्यावयाचा सर्व खर्च किंवा त्याचा कोणताही भाग अशा मालकाच्या वतीने त्यावेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, जो अशा इमारतींचा किंवा जमिनीचा भोगवटा करील त्याने द्यावा असे फर्मावता येईल; आणि मागणी केल्यानंतर अशा भोगवटादाराकडून अशी रक्कम भरण्यात कसूर झाल्यास, ती रक्कम अशा भोगवटादाराकडून वसूल करता येईल ; आणि याप्रमाणे वसवण्याजोगी प्रत्येक रक्कम ही, कर म्हणून हक्कमागणी केलेली रक्कम, प्रकरण अकराखाली ज्या रीतीने वसूल करण्यात येईल त्याच रीतीने वसूल करण्यात येईल, अशा कोणत्याही खर्चाच्या संबंधात अशा भोगवटादाराने जेवढी रक्कम दिलेली असेल किंवा त्याच्याकडून ती वसूल करण्यात आली असेल तेवढी रक्कम त्यास आपल्या घराच्या किंवा जमिनीच्या मालकास देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून वजा करण्याचा हक्क असेल.

(३) या अधिनियमान्वये ज्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधात तिच्या मालकावर आकारलेला कोणताही खर्च हा अशा कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या भोगवटादारावर आकारला जातो त्यावेळी अशा मागणीच्या वेळी अशा इमारतीची किंवा जमिनीची जी भाड्याची रक्कम अशा भोगवटादाराकडून देय असेल त्यापेक्षा अधिक रक्कम देण्यास भोगवटादार दायी असणार नाही किंवा भोगवटादाराकडे अशी मागणी केल्यानंतर व अशा मालकास भाडे न देण्याविषयी नोटीस दिल्यानंतर कोणत्याही वेळी भाड्याची जी रक्कम असेल किंवा अशा भोगवटादाराने जी रक्कम द्यावयाची असेल त्यापेक्षा अधिक रक्कम देण्यास तो दायी असणार नाही. मात्र त्या कारणासाठी जिल्हा परिषदेने किंवा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने विनंती केली असता भाड्याची रक्कम ज्या व्यक्तीस देणे आहे तिचे नाव व पत्ता देण्याविषयी भोगवटादाराने हयगय केल्यास किंवा अशी माहिती देण्याचे नाकारल्यास ती गोष्ट वेगळी; पण अशा कोणत्याही भोगवटादाराकडे मागणी केलेली रक्कम ही अशा मागणीच्या वेळी भोगवटादाराने देणे असलेल्या किंवा त्यानंतर प्रोद्भूत झालेल्या भाड्याच्या रकमेहून जास्त आहे हे शाबित करण्याचा भार अशा भोगवटादारावर राहील :

परंतु, पूर्वोक्त अशा कोणत्याही कामाचा खर्च देण्यासंबंधी असा कोणताही भोगवटादार व मालक यांच्या दरम्यान झालेल्या कोणत्याही विशेष संविदेस यातील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येतो असे समजले जाणार नाही.

२३३. या अधिनियमान्वये जो कोणताही खर्च किंवा परिव्यय देण्याविषयी निदेश देण्यात आला असेल त्याबाबत वाद उत्पन्न झाल्यास, त्याची रक्कम आणि आवश्यक असल्यास तिची वाटणी, या अधिनियमात याबाबत अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त, जिल्हा परिषद निश्चित व निर्धारित करून ठरवील आणि कर म्हणून हक्कमागणी केलेली रक्कम प्रकरण आकराखाली ज्या रीतीने वसुलीयोग्य असेल त्या रीतीने ती वसुलीयोग्य असेल. खर्चाची किंवा त्याची रक्कम कशी ठरवावी व कशी वसूल करावी.

२३४. (१) मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास, कोणत्याही प्रकारच्या सार्वजनिक उपद्रवाबद्दल कोणताही खटला भरण्याविषयी निदेश देता येईल आणि कोणत्याही शास्तीची रक्कम वसूल करण्यासाठी आणि या अधिनियमाच्या किंवा त्याखालील कोणत्याही उपविधीच्या तरतुदींचे उल्लंघन करण्याच्या अपराधाबद्दल, कोणत्याही व्यक्तीस शिक्षा देण्यासाठी कार्यवाह्या दाखल करण्याबाबत आदेश देता येईल, आणि त्याला, अशा खटल्याचा किंवा कार्यवाह्यांचा खर्च जिल्हा निधीतून देण्याविषयी निदेश देता येईल : मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा खटला भरण्याचा अधिकार.

परंतु, हा अधिनियम किंवा त्याखाली केलेल्या कोणताही उपविधी याखालील अपराधाबद्दलचा कोणताही खटला, असा अपराध घडल्यानंतर लगतनंतरच्या सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत असेल ते खेरीज करून दाखल करता येणार नाही.

(२) या अधिनियमाखाली किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये भरलेला कोणताही खटला, या अधिनियमात किंवा उपविधीत अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, कोणत्याही दंडाधिकाऱ्यासमोर दाखल करता येईल ; आणि हा अधिनियम किंवा तदनुसार केलेला कोणताही उपविधी या अन्वये किंवा त्याच्या सामर्थ्याने लादलेला प्रत्येक दंड किंवा शास्ती, तसेच ज्याच्या वसुलीसाठी या अधिनियमात अन्यथा विशेष तरतूद केलेली नाही अशा भरपाईसाठी केलेल्या सर्व हक्कमागण्यांची किंवा इतर खर्चाची सर्व रक्कम, अशा दंडाधिकाऱ्याकडे अर्ज करून, ज्या व्यक्तीकडून अशा भरपाईची किंवा खर्चाची हक्कमागणी केली असेल त्या व्यक्तीच्या मालकीच्या, अशा दंडाधिकाऱ्याच्या अधिकारितेच्या मर्यादेत असलेल्या कोणत्याही जंगम मालमत्तेची अटकावणी करून व ती विकून वसूल करता येईल.

२३५. ज्या कृतीमुळे, हयगयीमुळे, किंवा कसुरीमुळे या अधिनियमान्वये किंवा त्याखाली कोणतीही शास्ती कोणत्याही व्यक्तीवर लादण्यात आली असती अशी कोणतीही कृती, हयगय किंवा कसूर एखाद्या व्यक्तीने केली असेल आणि त्यामुळे कोणत्याही जिल्हा परिषदेच्या मालमत्तेस कोणतेही नुकसान पोचले असेल तर ती व्यक्ती असे नुकसान भरून देण्यास तसेच अशी शास्तीची रक्कम देण्यास पात्र असेल, आणि नुकसानीच्या मूल्यासंबंधी विवाद असल्यास ती रक्कम, शास्ती ओढवून घेणाऱ्या व्यक्तीस ज्या दंडाधिकाऱ्याने जिल्हा परिषदेच्या मालमत्तेचे नुकसान करणे भरून काढावे.

सिध्दपराध ठरवले असले तो दंडाधिकारी निर्धारित करील आणि मागणी केल्यावर असे मूल्य देण्यात न आल्यास ते, अटकावणी करून बसवण्यात येईल, आणि असा दंडाधिकारी त्यानुसार आपले अधिपत्र काढील.

दावा दाखल करण्याची पर्यायी पध्दती.

**२३६.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली मुभा असलेल्या वसुलीच्या कोणत्याही कार्यपध्दतीऐवजी किंवा प्रकरण अकराच्या तरतुदींखाली वसूल करता येण्याजोगी कोणतीही रक्कम किंवा या अधिनियमाखाली दिलेली कोणतीही भरपाई, खर्च आकार किंवा नुकसानभरपाई ही, पूर्णतः किंवा अंशतः अशा रीतीने वसूल करता आली नाही तर, ती देण्यास पात्र असलेल्या व्यक्तींवर तसेच ज्या कोणत्याही इतर व्यक्तींने जिल्हा परिषदेच्या कोणत्याही मालमत्तेला, हक्काला किंवा विशेषाधिकारांना हानी पोचवली असेल त्या व्यक्तींवर, सक्षम क्षेत्राधिकार असलेल्या कोणत्याही न्यायालयात जिल्हा परिषदेस दावा दाखल करता येईल.

पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार

**२३७.** (१) एखाद्या पोलीस अधिकाऱ्याच्या मते एखाद्या व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदीविरुध्द कोणताही अपराध केलेला असेल आणि अशा व्यक्तींचे नाव व पत्ता त्या पोलीस अधिकाऱ्यास माहीत नसेल व अशी व्यक्ती आपले नाव व पत्ता सांगण्यास नकार देईल किंवा तिने आपले नाव व पत्ता दिल्यास त्याच्या अचूकपणाबद्दल त्या पोलीस अधिकाऱ्यास संशय घेण्यास कारण असेल तर अशा कोणत्याही व्यक्तीस तिचे नाव व पत्ता याबाबतीत बरोबर खात्री करून घेईपर्यंत पोलीस ठाण्यात अटकावून ठेवता येईल.

परंतु, अटक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस दंडाधिकाऱ्याच्या आदेशावाचून, दंडाधिकाऱ्यासमोर त्यास हजर करण्यासाठी जेवढा वेळ आवश्यक असेल त्याहून किंवा जास्तीत जास्त चोवीस तासांहून अधिक वेळेपर्यंत, अटकावून ठेवण्यात येणार नाही.

(२) या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही उपविधीच्या तरतुदींविरुध्द केलेल्या कोणत्याही अपराधाच्या कृतीची माहिती जिल्हा परिषदेच्या अध्यक्षास किंवा एखाद्या अधिकाऱ्यास ताबडतोब देणे, आणि जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली काम करणारे सर्व जिल्हा परिषद अधिकारी व कर्मचारी यांना आपले कायदेशीर प्राधिकार बजावण्याच्या कामी मदत करणे हेसुध्दा पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल.

प्रकरण चौदा

## सेवांसंबंधी तरतुदी

अर्थ लावणे.

**२३८.** संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसल्यास या प्रकरणात, –

(क) "नेमलेला दिवस" या संज्ञेचा अर्थ ज्या दिवशी हा अधिनियम अंमलात येईल तो दिवस असा आहे ;

(ख) "विद्यमान मंडळ" या संज्ञेचा अर्थ, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ खाली स्थापन केलेले जिल्हा स्थानिक मंडळ, हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ खाली स्थापन केलेले जिल्हा मंडळ, मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ खाली स्थापन केलेली जनपदसभा, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ खाली स्थापन केलेले जिल्हा शाळा मंडळ आणि या बाबतीत राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे जी कोणतीही इतर संस्था विनिर्दिष्ट करील अशी इतर संस्था असा आहे.

१९२३ चा मुंबई ६. १९५५ चा हैदराबाद ९. १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ३८. १९४७ चा मुंबई ६१

राज्य अधिकाऱ्यांचे [महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अभियंत्यांचे] पदस्थापन व सेवांची रचना.

**२३९.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली जिल्हा परिषदेस तिच्यावर लादलेली कर्तव्ये आणि कार्ये पार पाडणे शक्य व्हावे या प्रयोजनाकरिता –

(क) राज्य शासन राज्याच्या वर्ग एक व वर्ग दोन या सेवांतील आणि सर्वसाधारण राज्य सेवेतील (यात विद्यमान मंडळाने कामावर लावलेल्या व्यक्तींमधून अशा सेवेत नेमणूक करण्यात आलेल्या कोणत्याही

---

१ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम (२) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अधिकाऱ्यांचा समावेश होतो) आवश्यक त्या संख्येइतका अधिकाऱ्यांचे आणि राज्य शासनास आवश्यक वाटतील अशा राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली सेवा करण्यासाठी वाटप केलेल्या अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांचे [1][ * * * * *] वेळोवेळी प्रत्येक जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली सेवा करण्यासाठी पदस्थापन करील, आणि

(ख) राज्य शासन, प्रत्येक जिल्हा परिषदेसाठी नेमलेल्या दिवसापासून पुढील सेवांची रचना करील. या सेवा पुढीलप्रमाणे :–

(एक) जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन),

(दोन) जिल्हा सेवा (वर्ग तीन),

(तीन) जिल्हा सेवा (वर्ग चार).

[2][(ग) (एक) जिल्हा परिषदेने, जिल्हा परिषदेतील सेवांच्या निकडीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (यात यापुढे ज्याचा निर्देश "प्राधिकरण" असा करण्यात आला आहे) आणि संबंधित जिल्हा परिषदा ठरवतील अशा संख्येने व अशा कालावधीकरिता आणि अशा अटी व शर्तीस अधीन राहून आपल्या आस्थापनेमध्ये प्राधिकरणातील अभियंत्याच्या संवर्गातून उप अभियंते (वर्ग-दोन) किंवा कार्यकारी अभियंते (वर्ग-एक) यांची नियुक्ती करणे कायदेशीर असेल :

परंतु, अशा व्यक्तींच्या सेवेच्या अटी व शर्ती, त्यांच्या अशा पदस्थापनेच्या निकटपूर्वी त्यांना लागू असलेल्या अटी व शर्तींपेक्षा कमी फायदेशीर नसतील.

(दोन) उप-खंड (१) अन्वये जिल्हा परिषदेमध्ये पदस्थापना करण्यात आलेल्या अशा अभियंत्यांची वेतने व भत्ते जिल्हा निधीतून देण्यात येतील.]

अशा सेवांपैकी प्रत्येक सेवेकरिता तयार करावयाचे संवर्ग प्रथमतः राज्य शासन निर्धारित करील.

२४०. याबाबत विहित केलेल्या नियमांना अधीन राहून, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी विद्यमान मंडळाने कामावर लावलेल्या व्यक्तींपैकी ज्यांनी राज्याच्या सेवेतील व सर्वसाधारण राज्य सेवेतील वर्ग एक व वर्ग दोन या सेवेतील पदे व वेतनमान यांना सर्वसाधारणपणे समान असणारी पदे धारण केली असतील अशा व्यक्तींची, नेमलेल्या दिवसापासून, राज्य शासन, राज्याच्या सेवेतील व सर्वसाधारण राज्य सेवेतील वर्ग एक व वर्ग दोन या सेवांतील योग्य त्या संवर्गात नेमणूक करील आणि वेतन, भत्ते, रजा, बदली, निवृत्ती, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी आणि सेवेच्या इतर शर्ती यांच्या बाबतीत त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांचे नियमन, ज्या नियमाद्वारे व आदेशाद्वारे राज्य सेवेतील समुचित संवर्गातील व्यक्तींच्या सेवेच्या शर्तींचे नियमन करण्यात येते, अशा नियमाद्वारे व आदेशाद्वारे करण्यात येईल : *विद्यमान मंडळाचे विवक्षित अधिकारी राज्य शासनाचे अधिकारी होणे*

परंतु, राज्य सेवेत नेमणूक केलेल्या कोणत्याही वर्गाच्या किंवा संवर्गाच्या व्यक्तींना नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी लागू असलेल्या नोकरीविषयक अटी व शर्ती राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल ते खेरीज करून त्यास अहितकारक होतील अशा प्रकारे बदलण्यात येणार नाहीत :

परंतु, आणखी असे की, अशा कोणत्याही व्यक्तीने विद्यमान मंडळाच्या नियंत्रणाखाली केलेली कोणतीही सेवा ही राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

२४१. या प्रकरणाच्या तरतुदींना अधीन राहून, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी विद्यमान मंडळाने कामावर लावलेल्या प्रत्येक व्यक्तीची, त्या दिवसापासून जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा यथास्थिती, जिल्हा सेवा (वर्ग चार) यांमधील कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यात येईल आणि ती जिल्हा परिषदेची अधिकारी किंवा कर्मचारी होईल, व जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली अधिकारपद धारण करील : *विद्यमान मंडळाच्या ताब्यात असलेल्या विवक्षित व्यक्तींची जिल्हा परिषदाकडे बदली*

---

१. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३, अन्वये (केंद्र सरकारची सहमती मिळून) हा मजकूर व कंस गाळण्यात आला.

२. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम (२) (ब) द्वारे तो खंड दाखल करण्यात आला.

परंतु, पूर्वोक्त सेवांपैकी कोणत्याही सेवेत नेमणूक केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेसह असेल ते खेरीजकरून, तिला अहितकारक होतील अशा प्रकारे बदलण्यात येणार नाहीत :

परंतु, आणखी असे की, कोणत्याही अशा व्यक्तीने विद्यमान मंडळाच्या नियंत्रणाखाली केलेली कोणतीही सेवा ही जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय कर्मचाऱ्यांचे जिल्हा परिषदांकडे अंतिम रीत्या वाटप करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[१][२४२. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली, वेळोवेळी, राज्य शासनाचे अधिकार व कामे यांचे जिल्हापरिषदांकडे किंवा पंचायत समित्यांकडे हस्तांतरण किंवा सोपवणूक करण्यात आल्यानंतर राज्य शासनाच्या सेवेतील वर्ग तीन किंवा वर्ग चारच्या एखाद्या संवर्गातील सर्व पदे, राज्य शासनाच्या गरजांपेक्षा अधिक होत असतील व म्हणून, ती नाहीशी करणे आवश्यक असेल त्या बाबतीत, राज्य शासनास किंवा त्याने त्यासंबंधात रीतसर प्राधिकृत केलेल्या राज्य शासनाच्या विभाग प्रमुखास (ज्याचा या प्रकरणात यापुढे "प्राधिकृत अधिकारी" असा उल्लेख करण्यात आला आहे), या प्रकरणाच्या तरतुदींना अधीन राहून, त्या संवर्गातील पदे धारण करीत असतील (आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील त्या संवर्गाबाहेरील कोणत्याही कायम पदावर ज्यांचा धारणाधिकार नसेल) अशा व्यक्तींचे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा यथास्थिती, जिल्हा सेवा (वर्ग चार) यामध्ये अंतिम रीत्या वाटप करता येईल. [२][कमीत कमी सहा महिने अगोदर काढावयाच्या] आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून (ज्याचा यात यापुढे "वाटपाचा दिनांक" असा निर्देश करण्यात आला आहे) असे वाटप, राज्य शासन यासंबंधात विहित करील अशा अटींवर व शर्तींवर, अंमलात येईल. अशा अटी व शर्ती या, असे वाटप होण्याच्या लगतपूर्वी त्यांना लागू असलेल्या अटींपेक्षा व शर्तींपेक्षा शक्य असेल तेथवर, अहितकारक असणार नाहीत. अशा वाटपानंतर अशा प्रकारे नेमून दिलेल्या व्यक्तींना जिल्हा परिषद स्वतःकडे घेईल :

परंतु, नेमलेल्या दिवसापासून सुरू होणारा [३][बारा वर्षांचा] कालावधी संपल्यानंतर, कोणत्याही व्यक्तीचे वाटप करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, पूर्वोक्तपैकी कोणत्याही जिल्हा सेवेमध्ये अशा रीतीने वाटप करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीस लागू होणाऱ्या सेवाविषयक अटी व शर्ती, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल ते खेरीज करून, तिला अहितकारक ठरतील अशा प्रकारे बदलण्यात येणार नाहीत :

परंतु तसेच, कोणत्याही व्यक्तीने राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली केलेली कोणतीही सेवा ही, जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, विभाग प्रमुख म्हणजे, मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ याच्या अर्थांतर्गत विभाग प्रमुख.]

विवक्षित जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची राज्य शासनाच्या सेवेत बदली करणे.

[४][२४२क. कलम १०० च्या पोटकलम (१) खालील जिल्हा यादीत नमूद केलेल्या कोणत्याही विषयाच्या संबंधातील कोणतीही बांधकामे किंवा विकास परियोजना राज्य शासनामध्ये पुन्हा निहित झाल्यामुळे किंवा कोणतेही बांधकाम किंवा विकास परियोजना यांची अंमलबजावणी किंवा परिरक्षण कलम १२३ च्या पोट-कलम (४) खाली राज्य शासनाने काढून घेतल्यामुळे कोणत्याही जिल्हा परिषदेच्या जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन) किंवा जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा जिल्हा सेवा (वर्ग चार) या संवर्गातील कोणतीही पदे जिल्हा परिषदेच्या गरजांपेक्षा अधिक होत असतील व म्हणून ती नाहीशी करणे आवश्यक असेल त्या बाबतीत, राज्य शासन,

१. सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३ द्वारे मूळ कलम २४२ व २४२क याऐवजी कलम २४२ दाखल करण्यात आले.

२. सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ५ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २ द्वारे "सहा वर्षांचा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४४ द्वारे कलम २४२क समाविष्ट करण्यात आले.

जिल्हा परिषदेशी विचारविनिमय करून, लेखी आदेशाद्वारे असा निदेश देईल की, अतिरिक्त पदांच्या संख्येपेक्षा अधिक नसतील अशी त्या संवर्गातील पदे धारण करणाऱ्या अशा व्यक्तींची (शक्य तेथवर, असे कोणतेही बांधकाम किंवा विकास परियोजना यांची अंमलबजावणी, व्यवस्थापन किंवा परिरक्षण, यांच्या संबंधातील कर्तव्ये, त्या त्या वेळी ज्यांच्याकडे सोपविण्यात आली असतील अशा त्या व्यक्ती असाव्यात) राज्य शासनाच्या सेवांतील समुचित संवर्गाकडे बदली करण्यात यावी, आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून आणि सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे राज्य शासन निदेश देईल अशा अटींवर व शर्तीवर सेवाबदल करण्यात येईल. अशा अटी व शर्ती या, अशा बदलीच्या लगतपूर्वी त्यांना लागू असलेल्या अटींहून व शर्तीहून शक्य असेल तेथवर कमी हितकारक असणार नाहीत. अशा बदलीनंतर, अशा प्रकारे बदली करण्यात आलेल्या व्यक्तीला जिल्हा परिषद आपल्या सेवेतून मुक्त करील आणि त्यांना राज्य शासन स्वतःकडे घेईल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीची कोणत्याही जिल्हा सेवेतून बदली झाल्यानंतर, तिला लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती यांत, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल ते खेरीज करून, तिला अहितकारक ठरेल असा बदल करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा व्यक्तीने जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली केलेली कोणतीही सेवा ही शासनाच्या नियंत्रणाखालील सेवा असल्याचे मानण्यात येईल.]

विवक्षित जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांची वर्ग एकमध्ये किंवा दोनमध्ये आणि सर्वसाधारण राज्य सेवांमध्ये नेमणूक.

[1][**२४२ख.** (१) राज्याच्या कोणत्याही वर्ग एक किंवा दोनच्या सेवेसाठीच्या किंवा सर्वसाधारण राज्य सेवेसाठीच्या सेवाप्रवेश नियमांखाली जिल्हा परिषदेच्या कोणत्याही वर्गामधील किंवा वर्गांमधील त्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना अशा कोणत्याही राज्य सेवेत नेमले जाण्यास पात्र समजण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासनास किंवा त्या बाबतीत राज्य शासन प्राधिकृत करील अशा कोणत्याही अधिकाऱ्यास, जिल्हा परिषदेशी व संबंधित कर्मचाऱ्याशी विचारविनिमय करून आणि जिल्हा परिषदेतील तसेच राज्य सेवेतील कामाची निकड योग्यपणे लक्षात घेऊन, अशा कोणत्याही कर्मचाऱ्याची किंवा कर्मचाऱ्यांची अशा कोणत्याही राज्य सेवेत लेखी आदेशाद्वारे वेळोवेळी नेमणूक करता येईल.

(२) राज्य शासनास, पोट-कलम (१) खाली कोणत्याही राज्य सेवेत नेमण्यात येणाऱ्या कोणत्याही जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीचे व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतील किंवा आदेश देता येतील :

परंतु, अशा कोणत्याही राज्य सेवेत कोणत्याही जिल्हा परिषद कर्मचाऱ्याची अशी नेमणूक करण्यात आल्यानंतर त्यासंबंधात लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती यांमध्ये, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेने असेल ते खेरीजकरून, त्याला अहितकारक होईल अशा रीतीने फरक करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली असलेल्या अशा कोणत्याही कर्मचाऱ्याने केलेली कोणतीही सेवा ही, राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली केलेली सेवा असल्याचे मानण्यात येईल.]

जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) च्या विवक्षित कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये नेमणुकीसाठी पात्रता.

[2][**२४२खख.** (१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अभियंते (वर्ग-दोन) च्या सेवा प्रवेश विनियमान्वये, जिल्हा तंत्र सेवा (वर्ग-तीन) च्या कर्मचाऱ्यांना उक्त अभियंता संवर्ग दोनच्या सेवेत नेमले जाण्यास पात्र करण्यात येईल. त्याबाबतीत, जिल्हा परिषदेस, आपल्या सेवांची निकड लक्षात घेऊन आणि राज्य शासन आणि संबंधित कर्मचारी यांच्याशी विचारविनिमय केल्यावर राज्य शासनाने, अशा नेमणुकीच्या दिनांकापासून एका वर्षापेक्षा आधी तयार केली नसेल अशा, जिल्हा तंत्र (वर्ग-तीन) च्या कर्मचाऱ्यांच्या निवडसूचीतून प्राधिकरणाच्या आस्थापनेवर अशा कर्मचाऱ्यांची लेखी आदेशाद्वारे नेमणूक करण्यास मान्यता देता येईल :

---

१. सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम ८ द्वारे कलम २४२ ख हे १ मार्च १९७९ रोजी समाविष्ट करण्यात आले.

२. सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ३ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

परंतु, अशा कोणत्याही कर्मचाऱ्याने संबंधित जिल्हा परिषदेकडे केलेली कोणतीही सेवा ही, प्राधिकरणाकडे केलेली सेवा आहे असे समजण्यात येईल.

(२) या बाबतीत राज्य शासनाने जारी केलेल्या निदेशांचे अनुपालन करणे हे प्राधिकरण व जिल्हा परिषदांचे कर्तव्य असेल.]

विवक्षित कर्मचाऱ्यांची जिल्हा परिषदांकडे बदली करणे.

[१][२४२ग. (१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, १९९२ याच्या प्रारंभी आणि त्यानंतर, राज्य शासन, महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिस्सारण मंडळ (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "मंडळ" असा करण्यात आला आहे) किंवा, यथास्थिती, जिल्हा ग्रामीण विकास अभिकरण (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "विकास अभिकरण" असा करण्यात आला आहे) यांचे अधिकार व कर्तव्ये, या अधिनियमांद्वारे किंवा तदन्वये, वेळोवेळी, जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्यांकडे हस्तांतरित होतील किंवा त्यांच्याकडे सोपविण्यात येतील त्या बाबतीत या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन, राज्य शासनाच्या, मंडळाच्या, किंवा, यथास्थिति, विकास अभिकरणाच्या ज्या विद्यमान अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा त्यांच्या मते, राज्य शासनाच्या, मंडळाच्या किंवा विकास अभिकरणाच्या आवश्यकतेपेक्षा अधिक होतील अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा राज्य शासनाकडून भविष्यलक्षी, किंवा भूतलक्षी प्रभावाने विनिर्दिष्ट करण्यात येईल त्या दिनांकापासून (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "विनिर्दिष्ट दिनांक" असा करण्यात आला आहे) समाप्त होतील व त्यांची पदे रद्द होतील आणि त्या दिनांकापासून (निरनिराळ्या अधिकाऱ्यांसाठी व कर्मचाऱ्यांसाठी हा दिनांक वेगवेगळा असू शकेल) ते जिल्हा परिषदेचे अधिकारी किंवा कर्मचारी होतील असा निदेश वेळोवेळी देऊ शकेल.

(२) राज्य शासनाच्या किंवा मंडळाच्या किंवा विकास अभिकरणाच्या ज्या स्थायी किंवा अस्थायी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पोट-कलम (१) अन्वये निदेश देण्यात आला असेल असा प्रत्येक स्थायी किंवा अस्थायी कर्मचारी, हा विनिर्दिष्ट दिनांकापासून स्थायी किंवा अस्थायी पदावर जिल्हा परिषदेचा यथास्थिती, स्थायी किंवा अस्थायी कर्मचारी होईल. हे पद विनिर्दिष्ट दिनांकापासून जिल्हा परिषदेच्या आस्थापनेमध्ये निर्माण होईल.

(३) अशा प्रकारे बदली झालेला कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, हे कलम अमलात आले नसते तर विनिर्दिष्ट दिनांकाला त्याने जेवढ्या मुदतीकरिता, ज्या पारिश्रमिकावर व सेवेच्या ज्या इतर शर्तीवर पद धारण केले असते आणि निवृत्तिवेतन, उपदान, भविष्यनिर्वाह निधि व इतर बाबींच्या संबंधातील जे अधिकार व विशेषाधिकार त्यास मिळाले असते तेवढ्याच मुदतीकरिता, त्याच पारिश्रमिकावर व सेवेच्या त्याच इतर शर्तीवर पद धारण करील व त्याला तेच अधिकार व विशेषाधिकार असतील. राज्य शासन, मंडळ किंवा यथास्थिती, विकास अभिकरण यांच्याकडे झालेली त्याची कोणतीही सेवा ही, जिल्हा परिषदेकडे झालेली सेवा असल्याचे मानण्यात येईल. त्याची जिल्हा परिषदेमधील सेवा यथोचितरीत्या समाप्त होईतोपर्यंत किंवा त्या त्या वेळी त्याच्या सेवेच्या शर्तीबाबत जो कायदा लागू असेल त्या कायद्यानुसार जिल्हा परिषद त्याच्या पारिश्रमिकामध्ये किंवा सेवेच्या इतर शर्तीमध्ये यथोचितरीत्या सुधारणा करीपर्यंत किंवा फेरफार करीपर्यंत तो जिल्हा परिषदेच्या सेवेत असण्याचे चालू राहील :

परंतु, अशा कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला विनिर्दिष्ट दिनांकाच्या लगतपूर्वी लागू असणाऱ्या सेवाशर्तीमध्ये, राज्य शासनाच्या पूर्वमान्यतेखेरीज, त्याचे नुकसान होईल अशा तऱ्हेने फेरबदल करण्यात येणार नाहीत.

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ११ द्वारे कलम २४२ग समाविष्ट करण्यात आले.

(४) कोणतेही निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी, उपदान यामध्ये किंवा कर्मचाऱ्यांसाठी स्थापन करण्यात आलेल्या तशाच अन्य निधीमध्ये, पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेल्या कर्मचाऱ्यांच्या जमाखाती असलेल्या रकमा विनिर्दिष्ट दिनांकापर्यंत त्यावर देय असलेल्या कोणत्याही संचित व्याजासह आणि अशा निधींच्या संबंधातील लेख्यांसह राज्य शासनाकडून किंवा यथास्थिती, मंडळाकडून किंवा विकास अभिकरणाकडून जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात येतील. विनिर्दिष्ट दिनांकास आणि त्यानंतर राज्य शासन, मंडळ किंवा यथास्थिति, विकास अभिकरण वगळता जिल्हा परिषद अशा कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवाशर्तीनुसार, निवृत्तीवेतन, भविष्यनिर्वाह निधी, उपदान किंवा अशा कर्मचाऱ्यांना देय असलेल्या अन्य तत्सम रकमा योग्य त्या वेळी देण्यास जबाबदार असेल.

१९४७ चा १४ (५) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये जिल्हा परिषदेकडे कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवा बदली करण्यात आल्यामुळे अशा कर्मचाऱ्याला त्या अधिनियमान्वये किंवा अशा अन्य कायद्यान्वये कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही आणि कोणत्याही न्यायालयाकडून, न्यायाधिकरणाकडून अथवा प्राधिकरणाकडून अशी कोणतीही हक्कमागणी दाखल करून घेतली जाणार नाही.

(६) जो कर्मचारी विनिर्दिष्ट दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत किंवा राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा वाढीव मुदतीच्या आत राज्य शासनास, मंडळास किंवा यथास्थिती, विकास अभिकरणास लेखी नोटीस देऊन जिल्हा परिषदेचा कर्मचारी न होण्याबद्दल किंवा असा कर्मचारी म्हणून असण्याचे चालू न ठेवण्याबद्दलचा आपला हेतू कळवील त्या कोणत्याही कर्मचाऱ्यास पोट-कलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट लागू होणार नाही. कोणत्याही कर्मचाऱ्याकडून अशी नोटीस मिळाली असेल तर—

(क) स्थायी कर्मचारी असल्यास त्या बाबतीत त्याला विनिर्दिष्ट दिनांकाला तो शासकीय सेवेतून किंवा मंडळाच्या किंवा यथास्थिति, विकास अभिकरणाच्या सेवेतून निवृत्त झाला असता तर त्याला उपार्जित झाले असते असे निवृत्तिवेतन, उपदान, भविष्यनिर्वाह निधी यांचा लाभ आणि इतर फायदे यांचा लाभ देऊन, सेवानिवृत्त होण्याची परवानगी देण्यात येईल ;

(ख) अस्थायी कर्मचारी असल्यास त्या बाबतीत राज्य शासनाच्या, मंडळाच्या किंवा यथास्थिती, विकास अभिकरणाच्या विद्यमान सेवाशर्तीनुसार त्याला नोटीस दिल्यानंतर किंवा नोटिशीऐवजी परिश्रमिक दिल्यानंतर त्याची सेवा समाप्त होईल.

(७) पूर्वगामी पोट-कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनाच्या, मंडळाच्या किंवा विकास अभिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्याची सेवा पोट-कलम (१) अन्वये जिल्हा परिषदेकडे बदली करण्यात आली असेल तर अशा बदलीनंतर जिल्हा परिषद, अशा कर्मचाऱ्याची तो राज्य शासनाच्या, मंडळाच्या किंवा यथास्थिती, विकास अभिकरणाच्या सेवेत असतानाची कोणतीही कृती किंवा अकृती किंवा वर्तणूक अथवा अभिलेख विचारात घेऊन अशा कर्मचाऱ्याविरुद्ध किंवा त्याच्याबाबतीत जिल्हा परिषदेस योग्य वाटेल त्याप्रमाणे शिस्तभंगाची किंवा अन्य कार्यवाही करण्यास सक्षम असेल.]

२४३. जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली नेमणूक केलेल्या अधिकाऱ्यांची आणि कलम २३९ मध्ये निर्देश केलेल्या सेवेच्या प्रत्येक वर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची प्रारंभिक संख्या (त्यांची पदनामे, प्रवर्ग किंवा श्रेणी यांसह) आणि घडण राज्य शासन [1][वेळोवेळी (मात्र, या अधिनियमाच्या प्रारंभापासून सहा महिन्यांच्या नंतर नसेल अशा अवधीत) काढलेल्या आदेशाद्वारे निर्धारित करील त्याप्रमाणे असेल ]. प्रत्येक सेवेतील प्रारंभिक कर्मचारी संख्या व घडण कशी असावी हे निर्धारित करणे.

* * * * * *

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ११ अन्वये "आदेशा द्वारे ठरवून देईल त्याप्रमाणे असेल" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १० अन्वये दोन परंतुके वगळण्यात आली.

कर्मचारी नेमून देण्याची पद्धती इ. ठरवून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[1][२४३क. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९६७ याच्या प्रारंभानंतर, कलम १८३ खाली जिल्हा परिषदांना देण्यात आलेल्या आस्थापना अनुदानाचा योग्यरीत्या वापर केल्याची खात्री करून घेण्यासाठी राज्य शासनाला, आदेशाद्वारे कलम २३९ चा खंड (ख) यामध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या सेवेच्या प्रत्येक वर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची संख्या (त्यांची पदनामे, प्रवर्ग किंवा श्रेणी यांसह) व घडण दर्शविणारी, कर्मचारीवर्ग रचना पद्धती घालून देता येईल : १९६७ चा महा. ४३.

[2]* * * * *

परंतु, त्यानंतर जिल्हा परिषदेस कलम २५२ खाली, अशा सेवेच्या प्रत्येक वर्गातील अधिकारी व कर्मचारी यांची संख्या व घडण यामध्ये फेरफार करता येतील. तथापि, अशा फेरफारांमुळे राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय सेवेच्या त्या वर्गातील कोणत्याही अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर प्रतिकूल परिणाम होता कामा नये. [3]* * * * * *].

अधिकारी व कर्मचारी यांची प्रारंभिक नेमणूक.

[4][२४४. कलम [5][२४१] खाली जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी होणाऱ्या किंवा कलम [5][२४२ किंवा कलम १५३-ग] खाली तिला वाटून देण्यात आलेल्या व्यक्ती यांची मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा सेवांत प्रारंभिक नेमणूक करील.]

जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली नेमणूक केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांचे [6][वेतन] व भत्ते राज्याच्या एकत्रीकृत निधीतून [9][***] काढणे.

२४५. कलम २३९, खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेले व जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली काम करण्यासाठी नेमणूक करण्यात आलेले अधिकारी आपले [6][वेतन] आणि भत्ते [7][(प्रवासभत्त्यासह)] राज्याच्या एकत्रीकृत निधीतून घेतील.[8]* * * *

अधिकाऱ्याचा व कर्मचाऱ्याचा जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी होण्याबाबतच्या विकल्पाचा वापर करण्या-संबंधीचा अधिकार.

२४६. ज्यास जिल्हा परिषदेने आपल्याकडे घेतले असेल किंवा घेण्याचे योजिले असेल किंवा ज्यास जिल्हा परिषदेकडे नेमून दिले असेल किंवा नेमून देण्याचे योजिले असेल अशा, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने किंवा विद्यमान मंडळाने कामावर लावलेल्या व्यक्तीने, यथास्थिति, जिल्हा परिषदेचा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून राहण्याची किंवा पुढे चालू राहण्याची किंवा यथास्थिति, राज्य शासनाचा अधिकारी म्हणून राहण्याची किंवा असा अधिकारी म्हणून पुढे चालू राहण्याची आपली इच्छा नाही असा आपला विकल्प, नेमलेल्या दिवसापूर्वी [10][किंवा यथास्थिति, [11][वाटपाच्या दिनांकापूर्वी तीन महीने] किंवा शासनाकडून या बाबतीत विहित करण्यात येईल अशा नंतरच्या दिनांकापूर्वी, राज्य शासनास लेखी दिलेल्या नोटिशीद्वारे कळविला असेल तर, अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचा-यास किंवा व्यक्तीस पूर्वगामी तरतुदींतील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

---

[1] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ११ द्वारे कलम २४३ क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १५ (अ) द्वारे "आणि तसेच त्यास वेळोवेळी" या शब्दानी सुरू होणारा आणि "आदेशाद्वारे निश्चित करता येईल" या शब्दानी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १५ (ब) द्वारे या परतुकातील "किंवा वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे" या शब्दांनी सुरू होणारा आणि "संख्येत फेरबदल करता येईल" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[4] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ४ द्वारे हे कलम बदली दाखल करण्यात आले.

[5] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ५ द्वारे "पगार" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[7] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १६ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) द्वारे "मात्र प्रवासभत्ता यात बदलीवर किंवा राज्य सरकारच्या कामासाठी" या शब्दानी सुरू होणारा व "हा जिल्हा निधीतून काढण्यात येईल" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) द्वारे "व जिल्हा निधीतून" हे शब्द वगळण्यात आले.

[10] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ४३ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[11] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३० (अ) द्वारे "नियत वाटपाच्या तारखेस किंवा त्यापूर्वी" या शब्दाऐवजी, हे शब्द दाखल करण्यात आले.

आणि त्यानंतर त्यास शासकीय सेवेतून किंवा विद्यमान मंडळातील [1][किंवा जिल्हा परिषदेतील] त्याच्या नोकरीतून निवृत्त होण्याची परवानगी देण्यात येईल, आणि त्यास राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भरपाई, निवृत्तिवेतन, उपदान किंवा त्यासारखे सेवांत लाभ मिळण्याचा हक्क असेल. त्यात सेवांत लाभ हे [2][वाटपाच्या दिनांकास राज्य शासनाच्या [3][किंवा जिल्हा परिषदेच्या] सेवेत राहणे किंवा नेमलेल्या दिवशी विद्यमान मंडळाच्या सेवेत राहणे बंद झाले असते तर] त्यास जे लाभ मिळण्याचा हक्क असता त्या लाभापेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

सेवाबदल केल्याबद्दल कोणत्याही भरपाई देय असणार नाही.

**२४७.** राज्य शासनाने किंवा विद्यमान मंडळाने कामावर लावलेल्या कोणत्याही कामगाराच्या सेवा जिल्हा परिषदेकडे बदली करण्यात आल्या असतील किंवा अशा कामगारास जिल्हा परिषदेने पुन्हा कामावर घेतला
१९४७ असेल तर, त्याबाबतीत, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ याचे कलम २५ च यात काहीही असले तरी
चा १४. अशा प्रकारे सेवाबदल करण्यात आल्यामुळे किंवा त्यास कामावर पुन्हा घेतल्यामुळे त्या कलमाखाली त्यास कोणतीही भरपाई मिळण्याचा हक्क असणार नाही ;

परंतु, अशा रीतीने कामगाराच्या बदलीनंतर किंवा त्यास पुन्हा नोकरीवर घेतल्यानंतर अशा कामगाराच्या बाबतीत ज्या अटी व शर्ती लागू करण्यात येतील त्या अटी व शर्ती अशा रीतीने सेवेत बदली करण्यापूर्वी किंवा पुन्हा कामावर घेण्यापूर्वी त्यास लागू असलेल्या अटींपेक्षा व शर्तीपेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

जिल्हा परिषदेत सेवा करण्यासाठी व्यक्तींची भरती व त्यांच्या सेवेच्या शर्ती

**२४८.** या प्रकरणाच्या तरतुदींना अधीनराहून, राज्य शासनास पुढील बाबींचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतील. त्या बाबी अशा:—

(क) जिल्हा तंत्र सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) आणि जिल्हा सेवा (वर्ग चार) या सेवांत व्यक्तींची भरती करणे (यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व मागासवर्ग यांच्यासाठी जागा राखून ठेवण्याचा समावेश होईल) आणि या सेवांत नेमणूक केलेल्या व्यक्तींची कार्ये व त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती (यात महागाई भत्त्याचे प्रदान, वर्तणूक व शिस्त यासंबंधीच्या सर्व गोष्टी यांचा समावेश होतो), आणि

(ख) कोणत्याही विद्यमान मंडळात काम करीत असलेल्या आणि जे राज्य शासनाचे कर्मचारी झाले असतील अशा अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या संबंधात त्यांना निवृत्तिवेतन, उपदान किंवा इतर लाभ उपलब्ध करून देण्याकरिता जिल्हा परिषदेने द्यावयाच्या रकमा किंवा राज्य शासनाचे जे कर्मचारी जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील सेवेतील व्यक्ती बनल्या असतील त्यांच्या बाबतीत राज्य शासनाला अशा बाबींच्या संबंधात द्यावयाच्या रकमा :

[4][परंतु, राज्य शासनास तसे करणे इष्ट वाटेल तर त्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेतनश्रेणी, महागाई आणि इतर भत्ते, रजा, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी यांच्या संबंधातील सेवेच्या शर्तींचे किंवा सेवेच्या शर्तींच्या संबंधातील इतर कोणत्याही बाबींचेसुद्धा विनियमन करता येईल.]

---

[1] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १० (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ६ (२) द्वारे हा मजकूर बदली दाखल करण्यात आला

[3] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १० (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम १७ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

विवक्षित नेमणूकांचे विधिग्राह्यीकरण

¹[२४९. हा अधिनियम किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, १८ जून १९८३ पासून सुरु होणाऱ्या व १७ फेब्रुवारी १९८८ रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेले आणि जे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, १९९० याचा प्रारंभ झाल्यानंतर अखंड सेवेत राहिलेले आहेत— मग त्यांची सेवा खंडीत करण्यात आलेली असो किंवा नसो—सर्व अधिकारी व जिल्हा तांत्रिक सेवा ( वर्ग-तीन ), जिल्हा सेवा (वर्ग तीन) व जिल्हा सेवा (वर्ग चार) यांमधील कर्मचारी यांची सर्व उद्दिष्टे व प्रयोजने यांसाठी, वैध रीतीने व नियमितपणे नेमणूक करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल, आणि या नेमणूका या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार असेल त्याव्यतिरिक्त अन्यथा करण्यात आल्या होत्या केवळ याच कारणावरून किंवा जिल्हा निवड मंडळ किंवा विभागीय निवड मंडळ अथवा इतर कोणतीही निवड मंडळे योग्यरीत्या स्थापन करण्यात आलेली नव्हती किंवा कार्यरत नव्हती केवळ याच कारणावरून अशा कोणत्याही नेमणुकीला कोणत्याही न्यायालयात आव्हाण देता येणार नाही : १९९० चा महा. ३.

परंतु अशी प्रत्येक नेमणूक ही, महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ व राज्य शासनाकडून वेळोवेळी त्याबाबतीत काढण्यात आलेले आणि अशा नेमणुकीच्या वेळी अमलात असलेले कोणतेही आदेश यानुसार करण्यात आलेली असेल ;

परंतु आणखी असे की, वेतन भत्ते व अधिलाभांश यांच्या थकबाकीचे प्रदान, राज्य शासनाकडून याबाबतीत कोणतेही आदेश काढण्यात आले असतील तर त्या आदेशांना अधीन असेल :

परंतु, तसेच पूर्वोक्तप्रमाणे नेमणुकांचे विधिग्राह्यीकरण केल्यामुळे, हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अमलात असलेला इतर कोणताही कायदा याअन्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार उक्त कालावधीत नेमणूक करण्यात आलेले असे कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांचे कोणत्याही प्रकारे कोणतेही अहित होणार नाही.]

**२५०.** [ विभागीय व जिल्हा निवड मंडळाची रचना ] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ५ अन्वये वगळण्यात आले.

**२५१.** [ निवड मंडळाची कार्ये ] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ५ अन्वये वगळण्यात आले.

जिल्हा परिषदेने कर्मचारीवर्गाची अनुसूची तयार करणे व ती मंजूर करणे.

**२५२.** (१) कलम २४३ मध्ये अन्य प्रकारची तरतूद केलेली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही प्रत्येक जिल्हा परिषद, राज्य शासन वेळोवेळी विहित करील त्या पद्धतीने, या अधिनियमान्वये किंवा त्याखालील आपली कर्तव्ये व कार्ये कार्यक्षमतेने बजावता येण्यासाठी ²[ जिल्हा तांत्रिक सेवा ] (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) आणि जिल्हा सेवा (वर्ग चार) या पदांची अनुसूची आणि पंचायत समित्यांच्या नियंत्रणाखालील कर्मचारीवर्गाची एक यादी तयार करून ती मंजूर करील. अशा यादीत तिने ठेवावयाच्या निरनिराळ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदनामे व श्रेणी आणि उक्त अधिकारी व कर्मचारी यांपैकी कोणास कायम ठेवावयाचे व कोणास तात्पुरते ठेवावयाचे हे मांडण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खाली मंजूर करण्यात आलेल्या पदांची अनुसूची कळवण्यात येईल.

---

¹ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ द्वारे मूळ कलम २४९ ऐवजी हे दाखल करण्यात आले.

² सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १२ द्वारे "विभागीय तांत्रिक सेवा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२५३**. जिल्हा परिषदेस, राज्य शासनाने या बाबतीत विहित केलेल्या नियमानुसार कोणत्याही सेवेत नसलेल्या कोणत्याही व्यक्तीची विशेष प्रयोजनाकरिता संविदेखाली नेमणूक करता येईल. अशा व्यक्तींना जिल्हा निधीतून त्यांचे वेतन, भत्ते व इतर वित्तलब्धी देण्यात येतील. संविदा करून व्यक्तींची नेमणूक करण्याचा जिल्हा परिषदेचा अधिकार.

[1] [सेवासंबंधी संक्रमणकालीन तरतुदी

**२५३क**. (१) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात त्याविरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, नेमलेल्या दिवसापासून कोणत्याही वेळी, परंतु महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, १९६४ याच्या प्रारंभापासून एक वर्षानंतरचा नसेल अशा कालावधीत किंवा (राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या बाबतीत [2][वेळोवेळी] विनिर्दिष्ट करील अशा [3][आणखी दोन वर्षापेक्षा अधिक नसेल अशा वाढविलेल्या एका किंवा अनेक कालावधीमध्ये] )— शासकीय कर्मचारी इत्यादींना मर्यादित कालावधीसाठी वाटून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

१९६४ चा महा. अध्या. ४

(क) राज्य शासनाने किंवा याबाबतीत प्राधिकृत केलेल्या किंवा प्राधिकृत करावयाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने, आदेशाद्वारे, राज्य शासनाने किंवा जिल्हा परिषदेने जी पदे तात्पुरती मंजूर केली असतील व त्या आदेशात विनिर्दिष्ट केली असतील अशा पदावर राज्य शासनाच्या सेवेतील व्यक्तींना तात्पुरते वाटून देणे हे कायदेशीर असेल (आणि ते नेहमीच कायदेशीर असल्याचे मानले जाईल.) : आणि राज्य शासनाच्या सेवेतील अशा व्यक्तींना ज्या जिल्हा परिषदांकडे वाटून देण्यात आले असेल किंवा वाटून दिले आहे अशा प्रत्येक जिल्हा परिषदेने उपरोक्त कालावधी किंवा या प्रकरणाच्या पूर्वगामी तरतुदीखाली त्यांना अंतिम रीत्या रीतसर वाटून देण्यात येईपर्यंतचा कालावधी यांपैकी जो आधीचा असेल त्या कालावधीत, त्या व्यक्तींना आपल्याकडे परत घेतले असल्याचे मानण्यात येईल;

(ख) कलम २४३ खाली निर्धारित केलेल्या पदांवर तात्पुरत्या बढत्या देण्यास राज्य शासनाने परवानगी देणे हे कायदेशीर असेल (आणि ते नेहमीच कायदेशीर असल्याचे मानले जाईल).

(ग) ज्यांना अशा रीतीने वाटून देण्यात आले असेल किंवा वाटून दिलेले आहे अशा व्यक्तींच्या सेवेच्या अटींसाठी व शर्तींसाठी आदेशाद्वारे तरतूद करणे हे कायदेशीर असेल (आणि ते नेहमीच कायदेशीर असल्याचे मानले जाईल).

परंतु, अशा सेवेच्या अटी व शर्ती या, त्या अशा रितीने वाटून देण्याच्या निकटपूर्वी शासकीय कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या अटींपेक्षा व शर्तींपेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

(२) कोणत्याही इतर कायद्यात काहीही असले तरी, ज्यांना वाटून देण्यात आले असेल किंवा वाटून दिले आहे अशा राज्य शासनाच्या सेवेतील कोणत्याही व्यक्तीस, राज्य शासनाच्या मान्यतेशिवाय

---

[1] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २३ द्वारे हे शिर्षक व कलम २५३ क समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ (ब) द्वारे हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम २ (अ) द्वारे "आणखी एका वर्षापेक्षा अधिक नसेल अशा वाढविलेल्या मुदतीत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उपरोक्त संक्रमण कालावधीत राज्य शासनाच्या सेवेत परत घेण्याचा हक्क असणार नाही. अशी मान्यता जिल्हा परिषदेतील आणि त्याचप्रमाणे राज्य शासनातील सेवेच्या गरजा लक्षात घेऊन देण्यात येईल किंवा नाकारण्यात येईल.

(३) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, १९६४ याच्या प्रारंभापूर्वी, कलम २८९ खाली काढलेल्या किंवा काढल्याचे दिसून येणाऱ्या आदेशानुसार किंवा अन्यथा कोणत्याही तऱ्हेने जिल्हा परिषदेमधील पदांवर ज्यांना तात्पुरते वाटून देण्यात आले असेल किंवा ज्यांना अशा रीतीने वाटून देण्यात आले होते आणि अशा प्रारंभाच्या वेळी ज्यांनी जिल्हा परिषदांच्या नियंत्रणाखाली काम करण्याचे चालू ठेवले होते किंवा ज्यांना तात्पुरती बढती देण्यात आली असेल अशा राज्य शासनाच्या सेवेतील सर्व व्यक्ती या तात्पुरत्या पदांवर नेहमीच विधिग्राह्यपणे नेमून देण्यात आल्या होत्या आणि त्यांनी त्या पदावर असण्याचे योग्य रीतीने चालू ठेवले होते आणि त्यांना विधिग्राह्यपणे बढती देण्यात आली होती, असे मानले जाईल आणि अशा व्यक्तींना अशा पदांवर नेमून देण्याबाबत वेळोवेळी विधिग्राह्यपणे करण्यात आलेल्या किंवा विधिग्राह्यपणे केल्याचे दिसून येणाऱ्या अटी व शर्ती, या, जणू काही या कलमाच्या पोट-कलम (१) च्या तरतुदी त्यावेळी अमलात होत्या असे समजून विधिग्राह्यपणे निर्धारित करण्यात आल्याचे मानण्यात येईल. १९६४ चा महा. अध्या. ४.

(४) या कलमाखाली जिल्हा परिषदांच्या नियंत्रणाखालील पदांवर ज्यांना वाटून दिलेले असेल किंवा वाटून दिले आहे किंवा वाटून दिले असल्याचे मानण्यात येत असेल किंवा ज्यांना तात्पुरती बढती देण्यात आली असेल अशा राज्य शासनाच्या सेवेतील सर्व व्यक्तींची वेतने व भत्ते जिल्हा निधीतून देण्यात येतील.

(५) पोट-कलम (१) खाली संक्रमण कालावधीत वाढ करण्याबाबत राज्य शासनाने काढलेली अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल.]

शासकीय कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवेत प्रतिनियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार

[1][२५३ ख. (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली राज्य शासनाचे अधिकार आणि कार्ये यांचे जिल्हा परिषदांकडे किंवा पंचायत समित्यांकडे हस्तांतरण किंवा सोपवणूक करण्यात आल्यानंतर, राज्य शासनाच्या सेवेतील वर्ग तीन किंवा वर्ग चार च्या एखाद्या संवर्गातील कोणतीही पदे (कलम २४२ खाली येत नसतील अशी पदे) ही, राज्य शासनाच्या गरजांपेक्षा अधिक होत असतील किंवा अधिक झालेली असतील तर, राज्य शासन किंवा प्राधिकृत अधिकारी यास, जिल्हा परिषदेतील तसेच राज्य शासनातील सेवेची निकड लक्षात घेऊन, राज्य शासनाच्या सेवेतील, वर्ग तीन किंवा वर्ग चारमधील अशा संवर्गातील पदे धारण करणाऱ्या व्यक्तींची, वेळोवेळी जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्ती करता येईल, आणि जिल्हा परिषदा यांना प्रतिनियुक्तीवर घेतील ;

परंतु,—

(क) प्रतिनियुक्तीचा कालावधी ( या अधिनियमाखाली तात्पुरते नेमून देण्यात आल्यामुळे त्याने प्रतिनियुक्तीवर केली असेल अशी कोणतीही सेवा असल्यास, ती धरून ) हा, ( कोणत्याही व्यक्तीने

---

[1] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ७ द्वारे कलम २५३ख समाविष्ट करण्यात आले.

प्रतिनियुक्तीवर अधिक काळ राहणे पसंत न केल्यास) एकूण [1] [अकरा वर्षापेक्षा] अधिक असणार नाही, आणि कोणत्याही बाबतीत असा कालावधी, नेमलेल्या दिवसापासून [2] [एकवीस वर्षापेक्षा] अधिक असणार नाही, आणि अशी व्यक्ती, संबंधित कालावधी संपल्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत प्रत्यावर्तित केली जाईल.

(ख) अशा रीतीने प्रतिनियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिच्या प्रतिनियुक्तीच्या काळात, प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्याचा किंवा राज्य शासनाच्या सेवेत प्रत्यावर्तित केले जाण्याचा हक्क असणार नाही.

(ग) पूर्वोक्तप्रमाणे असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही सेवेच्या अटी व शर्ती या, अशा प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी अशा व्यक्तींना लागू असलेल्या अटी व शर्तीपेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

(२) कलम २४२ खाली येणाऱ्या राज्य शासनाच्या वर्ग तीन किंवा वर्ग चार च्या सेवेतील पद धारण करणाऱ्या व्यक्तीची ती एखाद्या जिल्हा परिषदेकडे अंतिम रीत्या नेमून दिली जाईपर्यंत, राज्य शासनाकडून किंवा प्राधिकृत अधिकाऱ्याकडून कोणत्याही जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्ती करता येईल आणि ती जिल्हा परिषद तिला प्रतिनियुक्तीवर घेईल :

परंतु,—

(क) अशा व्यक्तीस कोणताही प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्याचा किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेमध्ये प्रत्यावर्तित होण्याचा हक्क असणार नाही.

(ख) खंड (क) मध्ये असेल त्याच्या व्यतिरिक्त एरव्ही, सेवेच्या अटी व शर्ती या, अशा प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी अशा व्यक्तीस लागू असलेल्या अटी व शर्तीपेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

(३) राज्य शासनाच्या वर्ग तीन व वर्ग चारच्या सेवेतील पदे धारण करणाऱ्या ज्या व्यक्ती विधिग्राह्यपणे नेमून देण्यात किंवा योग्य रीतीने चालू ठेवण्यात आल्या असतील किंवा विधिग्राह्यपणे नेमून देण्यात किंवा योग्य रीतीने चालू ठेवण्याचे मानण्यात येत असेल किंवा महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिति (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६७ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी या अधिनियमाच्या तरतुदींनुसार जिल्हा परिषदांच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावर ज्याचा विधिग्राह्यपणे बढती देण्यात आल्याचे मानण्यात येत असेल त्यांना राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेत प्रत्यावर्तित करण्यात येईपर्यंत किंवा यथास्थिति, जिल्हा परिषदांच्या जिल्हा सेवांमध्ये अंतिम रीत्या नेमून देण्यात येईपर्यंत जिल्हा परिषदांकडे रीतसर प्रतिनियुक्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि पोट-कलम (१) किंवा यथास्थिति, पोट-कलम (२) च्या तरतुदी याप्रमाणे प्रतिनियुक्त केलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू होतील.

१९६७ चा महा १३.

(४) या कलमाखाली जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्त केलेल्या किंवा प्रतिनियुक्त करण्यात आल्याचे मानण्यात येईल अशा व्यक्तींचे वेतन व भत्ते जिल्हा निधितून देण्यात येतील.]

---

[1] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम ३ द्वारे "नऊ वर्षापेक्षा" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ द्वारे "वीस वर्षापेक्षा" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

संविधानाच्या अनुच्छेद २४३-छ याचा महादेश अंमलात आणण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवांवर प्रतिनियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[1][**२५३ खख.** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-छ आणि अकरावी अनुसूची अंमलात आणण्यासाठी राज्य शासनाचे अधिकार आणि कार्ये यांचे या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये जिल्हा परिषदांकडे किंवा पंचायत समित्यांकडे हस्तांतरण किंवा सोपवणूक करण्यात आल्यानंतर, राज्य शासनाच्या सेवेतील वर्ग तीन किंवा वर्ग चारच्या संवर्गातील कोणतेही पद, राज्य शासनाच्या आवश्यकतेपेक्षा अधिक झाले असेल किंवा अधिक ठरले तर, राज्य शासन किंवा प्राधिकृत अधिकारी यास, राज्य शासनाच्या सेवेतील, वर्ग तीन किंवा वर्ग चार मधील अशा संवर्गातील पदे धारण करणाऱ्या व्यक्तींना वेळोवेळी जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीच्या आदेशाच्या तारखेपासून सुरुवातीला तीन वर्षांच्या कालावधीकरिता प्रतिनियुक्तीवर पाठविता येईल, असा कालावधी आवश्यकता वाटल्यास शासनास वाढविता येईल आणि जिल्हा परिषदा त्यांना प्रतिनियुक्तीवर घेतील :

परंतु,

(क) अशा रीतीने प्रतिनियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्यास हक्कदार असणार नाही किंवा तिच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तिला राज्य शासनाच्या सेवेमध्ये प्रत्यावर्तित करण्यात येणार नाही ;

(ख) पूर्वोक्तप्रमाणे असेल त्याव्यतिरिक्त, अशा व्यक्तींना अशा प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती प्रतिनियुक्तीनंतर त्यापेक्षा कमी लाभदायक असणार नाहीत.

(२) योजनांबरोबर, जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर पाठवलेल्या वर्ग तीन आणि वर्ग चार मधील कर्मचाऱ्यांचा संवर्ग स्वतंत्रपणे ठेवण्यात येईल.

(३) अशा वर्ग तीन आणि चार मधील कर्मचाऱ्यांमध्ये राजीनामा, मृत्यू, सेवानिवृत्ती इत्यादींमुळे कोणतेही रिक्त पद निर्माण झाल्यास, असे रिक्त पद संबंधित जिल्हा परिषदेकडून, प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासनाच्या पुरविलेल्या संवर्गामधूनच भरण्यात येईल :

परंतु असे की, पदोन्नतीसाठी किंवा रिक्त पद भरण्यासाठी, पुरविलेल्या संवर्गामधून असा कोणताही शासकीय कर्मचारी उपलब्ध नसल्यास, संबंधित जिल्हा परिषदेस, आपल्या कर्मचाऱ्यांमधून असे रिक्त पद भरता येईल.]

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना जिल्हा सेवांवर प्रतिनियुक्त करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[2][**२५३ खखख.** (१) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-छ आणि अकरावी अनुसूची अंमलात आणण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविलेले अधिकार व कार्ये यांचे या अधिनियमाद्वारे किंवा त्या अन्वये जिल्हा परिषदांकडे किंवा पंचायत समित्यांकडे हस्तांतरण किंवा सोपवणूक करण्यात आल्यानंतर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतील वर्ग-तीन किंवा वर्ग-चारच्या संवर्गातील कोणतेही पद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गरजेपेक्षा अधिक होत असेल किंवा अधिक झाले असेल तर, राज्य शासन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण किंवा प्राधिकृत अधिकारी यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतील, वर्ग तीन किंवा वर्ग-चारमधील अशा संवर्गातील पदे धारण करणाऱ्या व्यक्तींना वेळोवेळी जिल्हा परिषदांकडे प्रतिनियुक्तीच्या आदेशाच्या तारखेपासून सुरुवातीला तीन वर्षांच्या कालावधीकरिता प्रतिनियुक्तीवर पाठविण्याचा निदेश देऊ शकेल, असा कालावधी आवश्यकता वाटल्यास शासनाच्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वाढविता येईल आणि जिल्हा परिषदा यांना प्रतिनियुक्तीवर घेतील :

---

[1] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३ याच्या कलम २ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ८ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

परंतु,—

(क) अशा रीतीने प्रतिनियुक्त करण्यात आलेली कोणतीही व्यक्ती, प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्यास हक्कदार असणार नाही किंवा तिच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीत तिला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये प्रत्यावर्तित करण्यात येणार नाही ;

(ख) पूर्वोक्तप्रमाणे असेल त्याव्यतिरिक्त, अशा व्यक्तींना अशा प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी लागू असलेल्या सेवेच्या अटी व शर्ती प्रतिनियुक्तीनंतर त्यापेक्षा कमी लाभदायक असणार नाहीत.

(२) पाणीपुरवठा योजनांची कार्ये व कार्यक्रम यांच्या हस्तांतरणासह जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर पाठवलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अशा वर्ग-तीन आणि वर्ग-चार मधील कर्मचाऱ्यांचे संवर्ग स्वतंत्रपणे ठेवण्यात येईल.

(३) अशा वर्ग-तीन आणि वर्ग-चार मधील कर्मचाऱ्यांमध्ये राजीनामा, मृत्यू, सेवानिवृत्ती इत्यादींमुळे कोणतेही रिक्त पद निर्माण झाल्यास, असे रिक्त पद संबंधित जिल्हा परिषदेकडून, प्रतिनियुक्तीवर असेलेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संवर्गामधूनच भरण्यात येईल :

परंतु असे की, पदोन्नतीसाठी किंवा रिक्त पद भरण्यासाठी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या पुरविलेल्या संवर्गामधून कर्मचारी उपलब्ध नसल्यास, संबंधित जिल्हा परिषदेस, आपल्या कर्मचाऱ्यांमधून असे रिक्त पद भरता येईल.]

कलम २५३ग (१) खाली येणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने नेमून देण्याकरिता किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्तीकरिता तरतूद.

[1][**२५३ ग.** (१) कलम २५३ख च्या पोट-कलम (१) खाली येणारी राज्य शासनाच्या सेवेतील वर्ग तीन किंवा वर्ग चारच्या संवर्गातील कोणतीही पदे राज्य शासनाच्या गरजेपेक्षा अधिक होत असतील किंवा अधिक झालेली असतील आणि म्हणून ती काढून टाकणे आवश्यक असेल तर, या प्रकरणाच्या तरतुदींना अधीन राहून आणि जिल्हा परिषदांतील तसेच राज्य शासनातील सेवेची निकड यथोचितपणे लक्षात घेऊन, राज्य शासन किंवा प्राधिकृत अधिकारी यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्या संवर्गातील पदे धारण करणाऱ्या ज्या व्यक्ती जिल्हा परिषदांच्या जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा यथास्थिति, जिल्हा सेवा (वर्ग चार) यामध्ये वाटून दिले जाण्याचे निवडतील अशा व्यक्तींना अंतिम रीत्या वाटून देता येईल किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून (असा दिनांक नेमलेल्या दिवसापासून [2][तेवीस वर्षापेक्षा] नंतरचा नसेल) त्यांना राज्य शासनाच्या सेवेमधून मुदतपूर्व सेवानिवृत्त होण्याची परवानगी देता येईल. अशी निवड, राज्य शासनाकडून **राजपत्रातील** आदेशाद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल, अशा कालावधीत आणि अशा रीतीने, राज्य शासनास किंवा प्राधिकृत अधिकाऱ्यास कळविण्यात येईल. अशा व्यक्तींना ज्या जिल्हा परिषदांकडे वाटून देण्यात आले असेल ती प्रत्येक जिल्हा परिषद उक्त दिनांकापासून त्यांना स्वीकारील; पण ज्यांना स्वीकारण्यात आले आहे अशा व्यक्तींना कलम २४६ च्या तरतुदींखालील लाभ मिळण्याचा किंवा राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेत प्रत्यावर्तित होण्याचा हक्क असणार नाही; आणि त्यानंतर कलम २४२ च्या तरतुदी त्या कलमाखाली अंतिम रीत्या वाटून दिलेल्या व्यक्तींच्या संबंधात ज्याप्रमाणे लागू होतात त्याचप्रमाणे त्या अशा रीतीने स्वीकारलेल्या व्यक्तींच्या संबंधात लागू होतील :

---

[1] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम ४ द्वारे कलम २५३ग समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ३ (१) द्वारे "एकवीस वर्षापेक्षा" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. यापूर्वीच त्यास नेमून दिले असल्यास किंवा तो सेवानिवृत्त झाला असल्यास त्यावर याचा परिणाम होणार नाही.
[सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ यांचे कलम ३ (२) पहा.]

परंतु, एखाद्या संवर्गामधून एक किंवा अधिक जिल्हा परिषदांकडे अंतिम रीत्या वाटून दिलेल्या व्यक्तींची संख्या आणि मुदतपूर्व सेवानिवृत्त होण्यास परवानगी दिलेल्या व्यक्तींची संख्या ही, राज्य शासनाचे अधिकार व कार्ये यांचे जिल्हा परिषदेकडे किंवा परिषदांकडे हस्तांतरण किंवा सोपवणूक केल्यानंतर त्या संवर्गामध्ये जी पदे अधिक झालेली असतील त्या पदांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली एखाद्या व्यक्तीस सेवानिवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीला निवृत्तीवेतन, उपदाने यांसारखे किंवा तत्सम सेवांत लाभ (परंतु भरपाई नव्हे) मिळण्याचा हक्क असेल आणि असे सेवांत लाभ हे, पोट-कलम (१) खाली दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास, शासनाच्या नियंत्रणाखालील तिची सेवा समाप्त झाली असती तर जे लाभ मिळण्याचा तिला हक्क मिळाला असता त्या लाभांपेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

(३) ज्या व्यक्तींच्या अंतिम वाटपाला किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्तीला पोट-कलम (१) खाली रीतसर मान्यता देण्यात आली असेल त्या व्यक्तीस, कलम २५३ख मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशी अंतिम नेमणूक किंवा सेवानिवृत्ती होईपर्यंत, राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवेत किंवा जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर ठेवता येईल.]

कलम २५३ खखख खाली येणाऱ्या कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने नेमून देण्याकरिता किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्तीकरिता तरतूद.

[१][२५३ गग. (१) कलम २५३खखख च्या खाली येणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेतील वर्ग-तीन किंवा वर्ग-चार त्या संवर्गातील कोणतेही पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गरजेपेक्षा अधिक होत असतील किंवा अधिक झाली असतील आणि म्हणून ती काढून टाकणे आवश्यक असेल तर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण राज्य शासनाशी विचारविनिमय केल्यानंतर, आणि जिल्हा परिषदांतील तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील सेवेची निकड यथोचितपणे लक्षात घेऊन, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, त्या संवर्गातील पदे धारण करणाऱ्या ज्या व्यक्ती जिल्हा परिषदांच्या जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) किंवा यथास्थिती, जिल्हा सेवा (वर्ग चार) यामध्ये वाटून दिले जाण्याचे निवडतील किंवा तसा विकल्प देतील अशा व्यक्तींना अंतिमरित्या वाटून देता येईल किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेमधून मुदतपूर्व सेवानिवृत्त होण्याची परवानगी देता येईल. अशी निवड किंवा विकल्प राज्य शासनाकडून राजपत्रातील आदेशाद्वारे या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा कालावधीत आणि अशा रीतीने, अशी निवड किंवा विकल्प देणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्याकडून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास कळविण्यात येईल, अशा व्यक्तींना ज्या जिल्हा परिषदांकडे वाटून देण्यात आले असेल ती प्रत्येक जिल्हा परिषद उक्त दिनांकापासून त्यांना स्वीकारील; परंतु, ज्यांना स्वीकरण्यात आले आहे अशा व्यक्तींना भरपाई निवृत्तिवेतन किंवा उपदान किंवा यासारखे राज्य शासनाने विहित केले असतील असे सेवासमाप्ती लाभ मिळण्याचा किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत प्रत्यावर्तित होण्याचा हक्क असणार नाही;

परंतु, एखाद्या संवर्गामधून एक किंवा अधिक जिल्हा परिषदांकडे अंतिमरित्या वाटून दिलेल्या व्यक्तींची संख्या आणि मुदतपूर्व सेवानिवृत्त होण्यास परवानगी दिलेल्या व्यक्तींची संख्या ही, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकार व कार्ये यांचे जिल्हा परिषदेकडे हस्तांतरण किंवा सोपवणूक केल्यानंतर त्या संवर्गामध्ये जी पदे अधिक झालेली असतील त्या पदांच्या संख्येपेक्षा अधिक असणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली एखाद्या व्यक्तीस सेवानिवृत्त होण्याची परवानगी देण्यात आली असेल त्या बाबतीत, त्या व्यक्तीला निवृत्तीवेतन, उपदाने यांसारखे किंवा त्यास लागू असतील त्याप्रमाणे तत्सम सेवासमाप्ती लाभ (परंतु भरपाई नव्हे) मिळण्याचा हक्क असेल आणि असे सेवासमाप्ती लाभ हे, पोट-कलम (१) खाली दिलेल्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील तिची सेवा समाप्त झाली असती तर जे लाभ मिळण्याचा तिला हक्क मिळाला असता त्या लाभांपेक्षा कमी हितकारक असणार नाहीत.

(३) ज्या व्यक्तींच्या पोट-कलम (१) खालील अंतिम वाटपाला किंवा मुदतपूर्व सेवानिवृत्तीला रीतसर मान्यता देण्यात आली असेल त्या व्यक्तीस, कलम २५३खखख मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, असे अंतिम वाटप किंवा सेवानिवृत्ती होईपर्यंत, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील सेवेत किंवा जिल्हा परिषदेकडे प्रतिनियुक्तीवर ठेवता येईल.]

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ९ द्वारे कलम "२५३गग" हे कलम समाविष्ट करण्यात आले.

## प्रकरण पंधरा

## जिल्हे आणि गट यांच्या हद्दीत फेरफार करणे

२५४. (१) राज्य शासनाला एखाद्या जिल्हा परिषदेच्या शिफारशीवरून किंवा स्वतः होऊन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे कोणत्याही वेळी,— जिल्ह्याच्या हद्दीत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

(क) एखाद्या जिल्ह्यात कोणतेही स्थानिक क्षेत्र समाविष्ट करता येईल किंवा एखाद्या जिल्ह्यातून कोणतेही स्थानिक क्षेत्र वगळता येईल अथवा [1][दोन अथवा अधिक जिल्ह्यांचे एका जिल्ह्यात एकत्रीकरण करता येईल अथवा कोणताही जिल्हा किंवा जिल्हे दोन किंवा अधिक जिल्ह्यात विभागता येतील] किंवा अन्यथा कोणत्याही जिल्ह्याच्या हद्दीत फेरफार करता येतील ; अथवा

(ख) जिल्हा म्हणून असलेले कोणतेही स्थानिक क्षेत्र हे जिल्हा म्हणून असण्याचे बंद होईल असे घोषित करता येईल, आणि त्यानंतर ते स्थानिक क्षेत्र त्याप्रमाणे समाविष्ट करण्यात येईल किंवा वगळण्यात येईल [2][किंवा जिल्ह्याचे त्याप्रमाणे एकत्रीकरण किंवा विभागणी करण्यात येईल] किंवा त्या जिल्ह्याच्या हद्दींमध्ये त्याप्रमाणे फेरफार करण्यात येईल किंवा यथास्थिती, असे स्थानिक क्षेत्र हे जिल्हा म्हणून असण्याचे बंद होईल.

(२) उपरोक्तप्रमाणे, राज्य शासनाने काढलेली अधिसूचना, ती काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवली पाहिजे.

[3][२५५. (१) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या कलमात,— जिल्ह्यांत फेरफार करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे यथोचित तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

(क) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "विद्यमान स्थानिक प्राधिकरण" या संज्ञेचा अर्थ, नगरपालिका किंवा जेथे नगरपालिका नसेल तेथे विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेली जिल्हा परिषद असा आहे ;

(ख) "नगरपालिका या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याखाली रचना केलेली किंवा रचना केल्याचे मानण्यात आलेली नगरपालिका असा आहे; १९६५ चा महा. ४०.

(ग) "विनिर्दिष्ट दिवस" या संज्ञेचा अर्थ, ज्या दिवसापासून कलम २५४ खाली एखाद्या जिल्ह्याच्या हद्दीमध्ये फेरफार करण्यात आला असेल तो दिवस असा आहे;

(घ) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरण" या संज्ञेचा अर्थ, नगरपालिका किंवा जेथे नगरपालिका नसेल तेथे विनिर्दिष्ट दिवसापासून अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेली जिल्हा परिषद असा आहे.

(२) कोणत्याही जिल्हा परिषदेच्या परिषद-सदस्यांच्या पदावधीत.--

(क) कोणतेही स्थानिक क्षेत्र एखाद्या जिल्ह्यात समाविष्ट केलेले असेल;

(ख) कोणतेही स्थानिक क्षेत्र एखाद्या जिल्ह्यातून वगळले असेल ;

(ग) दोन किंवा अधिक जिल्ह्यांचे एका जिल्ह्यात एकत्रीकरण केलेले असेल ; किंवा

(घ) एखाद्या जिल्ह्याची दोन किंवा अधिक जिल्ह्यांत विभागणी केलेली असेल.

---

[1] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ७ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ७ (ब) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ कलम ५ द्वारे कलम २५५ ऐवजी कलम २५५ व २५५क ही कलमे दाखल करण्यात आली.

त्या बाबतीत राज्य शासनास या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशान्वये पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(एक) खंड (क) खाली येणाऱ्या बाबीच्या संबंधात, विद्यमान परिषद-सदस्यांच्या नेहमीच्या पदावधी संपेपर्यंत राज्य शासनाने जादा परिषद सदस्यांची नेमणूक करून परिषद सदस्यांच्या संख्येत अंतरिम वाढ करणे ;

(दोन) खंड (ख) खाली येणाऱ्या बाबीच्या संबंधात, राज्य शासनाच्या मते जे परिषद-सदस्य जिल्ह्यातून वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करीत असतील त्या परिषद-सदस्यांना काढून टाकणे आणि राहिलेल्या परिषद-सदस्यांचा नेहमीचा पदावधी संपेपर्यंत त्यांना परिषद-सदस्य म्हणून पदावर ठेवणे ;

(तीन) खंड (ग) खाली येणाऱ्या बाबीच्या संबंधात, या अधिनियमाखाली उत्तराधिकारी जिल्हा परिषदेची यथावकाश रचना करण्यात येईपर्यंत राज्य शासन निर्धारित करील अशा संख्येइतक्या, राज्य शासनाने नेमणूक केलेल्या परिषद-सदस्यांनी मिळून बनलेल्या एका अंतरिम जिल्हा परिषदेची रचना करणे;

[1][(चार) खंड (घ) खाली येणाऱ्या बाबींच्या संबंधात, या अधिनियमाखाली जिल्हा परिषदांची यथावकाश रचना करण्यात येईपर्यंत उत्तराधिकारी जिल्हा परिषदा-पंचायत समित्या, स्थायी समित्या किंवा विषय समित्या किंवा नेमणूक करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही समित्या असल्यास त्यासुद्धा यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्यांची कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी प्रशासकांची नेमणूक करणे ;

(पाच) खंड (तीन) खाली नेमणूक केलेले परिषद-सदस्य किंवा खंड (चार) खाली नेमणूक केलेले प्रशासक ज्या कालावधीकरिता अधिकारपद धारण करतील तो कालावधी आणि, ज्या रितीने निवडणूक घेण्यात येईल आणि नैमित्तिक रिकामी अधिकारपदे भरण्यात येतील ती रीत ;

(सहा) विद्यमान स्थानिक प्राधिकरणाची मत्ता, हक्क आणि दायित्वे (त्याने केलेला कोणताही करार किंवा संविदा याखालील हक्क व दायित्वे धरून) कोणत्याही उत्तराधिकारी स्थानिक प्राधिकरणाकडे किंवा राज्य शासनाकडे पूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरित करणे, आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्ती ;

(सात) ज्या कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीत विद्यमान स्थानिक प्राधिकरण पक्षकार असेल त्या कार्यवाहीत पक्षकार म्हणून, विद्यमान स्थानिक प्राधिकरणाऐवजी अशा कोणत्याही हस्तांतरितीला दाखल करणे किंवा अशा कोणत्याही हस्तांतरितीची भर घालणे ; आणि विद्यमान स्थानिक प्राधिकरणापुढे किंवा त्याला दुय्यम असलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेली कोणतीही कार्यवाही अशा कोणत्याही हस्तांतरितीकडे किंवा त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे किंवा अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे;

(आठ) [2] * * * * *

(नऊ) एखाद्या विद्यमान स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या संबंधात केलेल्या, आणि विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी त्याच्या क्षेत्रात अमलात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही नेमणूका, काढलेल्या अधिसूचना, नोटिसा, बसविलेले कर, काढलेले आदेश, केलेल्या परियोजना, दिलेली लायसने, परवानगी, केलेले नियम, उप विधी, विनियम किंवा केलेले नमुने, हे सर्व या अधिनियमाखाली अधिक्रांत करण्यात येईपर्यंत किंवा त्यात फेरबदल करण्यात येईपर्यंत, अशा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्रात चालू ठेवणे ;

---

[1] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३ अन्वये मूळ उपखंडाऐवजी उपखंड (चार) दाखल करण्यात आला.

[2] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ (अ) अन्वये खंड (आठ) वगळण्यात आला

(दहा) या अधिनियमाखाली कोणत्याही विद्यमान जिल्हा परिषदेने किंवा तिच्या संबंधात केलेल्या, आणि विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी तिच्या क्षेत्रात अमलात असलेल्या सर्व किंवा कोणत्याही नेमणूका, काढलेल्या अधिसूचना, नोटिसा, बसविलेले कर, काढलेले आदेश, केलेल्या परियोजना, दिलेली लायसने, परवानगी, केलेले नियम, उप विधी, विनियम किंवा नमुने या बाबी विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी उत्तराधिकारी जिल्हा परिषदेच्या सर्व किंवा कोणत्याही इतर क्षेत्रांमध्ये अमलात असतील अशा तत्सम नेमणूका, अधिसूचना, नोटिसा, कर, आदेश परियोजना, लायसने, परवानगी, नियम, उप विधी, विनियम किंवा नमुने, (कोणतेही असल्यास) यांचे अधिक्रमण करुन, अशा इतर क्षेत्रांमध्ये किंवा त्यांना, अशा रीतीने लागू केलेल्या व अमलात आणलेल्या बाबींचे या अधिनियमाखाली आणखी अधिक्रमण करण्यात किंवा फेरबदल करण्यात येईपर्यंत लागू करणे व त्यांची सुरवात करणे ;

(अकरा) विद्यमान स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या संबंधात केलेले किंवा अधिप्रमाणित केलेले आणि विनिर्दिष्ट दिवसाच्या लगतपूर्वी त्याच्या क्षेत्रात अमलात असलेले सर्व किंवा कोणतेही अर्थसंकल्पीय अंदाज, आकारण्या, आकारणी सूच्या, मूल्यनिर्धारणे, मोजण्या किंवा विभागण्या, संबद्ध कायद्याखाली त्या अधिक्रांत करण्यात किंवा त्यांत फेरफार करण्यात येईपर्यंत, अशा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्रात चालू ठेवणे ;

(बारा) खंड (क) ते (च) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बदलामुळे उद्‌भवेल अशी कोणतीही अडचण दूर करणे.

[1][(२क) (क) या कलमाखाली आदेश करण्यात येईल त्या बाबतीत, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, एखाद्या विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची अशा कोणत्याही हस्तांतरितीकडे किंवा अशा हस्तांतरितीने बदली करण्याबाबत किंवा त्यांची फेरनेमणूक करण्याबाबत अथवा विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्याबाबत आणि अशी बदली किंवा फेरनेमणूक किंवा सेवासमाप्ती करण्यात आल्यावर अशा कर्मचाऱ्यांना लागू होतील त्या अटी व शर्ती यांची, तरतूद करता येईल.

(ख) कोणत्याही कर्मचाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यांना अनुचित अथवा मोठ्या प्रमाणात हालअपेष्टा सोसाव्या लागत आहेत किंवा त्या सोसाव्या लागण्याचा संभव आहे या किंवा प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने अधिभावी
१९८२ कारणावरुन, राज्य शासनाला तसे करणे आवश्यक वाटले तर त्यास, अर्ज करण्यात आल्यावर किंवा
चा महा. स्वतः होऊन किंवा या कलमाखाली याबाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशात अथवा अशा
२६. आदेशाच्या कोणत्याही भागात, मग तो महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९८२ यांच्या प्रारंभापूर्वी किंवा तदनंतर करण्यात आलेला असला तरीही सुधारणा करता येईल, त्यात भर घालता येईल, किंवा तो विखंडित करता येईल.

(ग) या कलमाखाली या बाबतीत करण्यात आलेल्या कोणत्याही आदेशात, उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी कोणत्याही वेळी, राज्य शासनाकडून सुधारणा करण्यात आल्यास, त्यात भर घालण्यात आल्यास किंवा तो विखंडीत करण्यात आल्यास यथास्थिति, उक्त सुधारणा, भर किंवा विखंडन हे, या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, विधिग्राह्यपणे करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही इतर प्राधिकरणासमोर त्याबाबत आक्षेप घेता येणार नाही.]

(३) विद्यमान स्थानिक प्राधिकरणांची मत्ता, हक्क व दायित्वे यांचे हस्तांतरण करणारा आदेश या कलमाखाली देण्यात आला असेल त्या बाबतीत, त्या आदेशाच्या सामर्थ्याने, विद्यमान स्थानिक प्राधिकरणाच्या अशा मत्ता, हक्क व दायित्वे हस्तांतरितीमध्ये विहित होतील व ती त्याची मत्ता, हक्क व दायित्वे होतील ;

---

[1] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६, कलम २ (ब) द्वारे हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

(४) (क) या कलमाखाली आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत, राज्य शासन, पोट-कलम (२), परिच्छेद (तीन) किंवा (चार) खाली नेमण्यात आलेले परिषद-सदस्य किंवा प्रशासक यांचा अवधी संपण्यापूर्वी यथास्थिति,नवीन जिल्हा परिषदांच्या परिषद सदस्यांची संख्या निर्धारित करण्याचा प्रयोजनार्थ आणि त्यांची निवडणूक घेण्यासाठी या अधिनियमाच्या कलम ९ ला अनुसरून उपाययोजना करील ;

(ख) ज्या अंतरिम जिल्हा परिषदेच्या किंवा ज्या जिल्हा परिषदेच्या बाबतीत जिल्हा परिषद-सदस्यांच्या संख्येत अंतरिम वाढ किंवा कपात करण्यात आली असेल अशा जिल्हा परिषदेचे परिषद-सदस्य किंवा, यथास्थिति, अशा आदेशाखाली नेमण्यात आलेला प्रशासक किंवा आलेले प्रशासक हे, ज्या कालावधीसाठी त्यांची नेमणूक करण्यात आली असेल तो कालावधी संपलेला असला तरीही, नवीन जिल्हा परिषदेची किंवा यथास्थिति, परिषदांची पहिली बैठक होईपर्यंत संबंधित क्षेत्रासाठी अधिकारपदावर असण्याचे चालू राहील .

(ग) या कलमान्वये किंवा त्याखाली अन्य प्रकारे तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, या अधिनियमाच्या तरतूदी योग्य त्या फेरफारांसह अशा कोणत्याही परिषदेस तिच्या परिषद-सदस्यांना किंवा प्रशासकाला लागू होतील.

जिल्हे नाहीसे होणे.

२५५क. एखाद्या जिल्ह्यात समाविष्ट असलेले संपूर्ण स्थानिक क्षेत्र जिल्हा असण्याचे बंद होईल तेव्हा असे स्थानिक क्षेत्र ज्या दिवशी जिल्हा असण्याचे बंद होईल त्या दिवसापासून—

(एक) अशा जिल्ह्याकरिता रचना केलेली जिल्हा परिषद अस्तित्वात राहण्याचे किंवा कार्य करण्याचे बंद होईल;

(दोन) जिल्हा परिषदचे परिषद सदस्य अधिकारपद सोडतील ;

(तीन) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनास राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, कलम २५५, पोट-कलम (२) परिच्छेद (सहा) ते (बारा) (दोन्हीसह) यात विनिर्दिष्ट केलेल्या अशा क्षेत्राकरिता किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करता येईल आणि त्या कलमाचे पोट-कलम (३) याच्या तरतूदी अशा आदेशास लागू होतील.]

गटाच्या हद्दीत फेरफार करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२५६. (१) राज्य शासनाला राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे,—

(क) कोणत्याही गटाच्या जवळपास असलेले कोणतेही क्षेत्र, त्या गटात समाविष्ट करता येईल ; किंवा

(ख) कोणत्याही गटात समाविष्ट असलेले कोणतेही क्षेत्र, त्या गटातून वगळता येईल ; किंवा

(ग) दोन किंवा अधिक गटांचे एकत्रीकरण करून त्यांच्या ऐवजी एका गटाची रचना करता येईल ; किंवा

(घ) गटाची किंवा गटांची विभागणी करून त्या गटाच्या किंवा गटांच्या ऐवजी दोन किंवा अधिक गटांची रचना करता येईल ; किंवा

(ङ) अन्यथा एखाद्या गटाच्या हद्दीत फेरबदल किंवा पुनरीक्षण करता येईल.

(२) एखाद्या गटात जे कोणतेही स्थानिक क्षेत्र समाविष्ट करण्याचा किंवा यथास्थिती, अशा गटातून जे कोणतेही स्थानिक क्षेत्र वगळण्याचा उद्देश असेल या स्थानिक क्षेत्राची किंवा एका गटात एकत्रीकरण करण्याचा उद्देश असेलेल्या गटाच्या क्षेत्राची, किंवा अस्तित्वात असलेल्या गटाची विभागणी केल्यानंतर ज्या कोणत्याही गटांची रचना करण्याचा उद्देश असेल त्या गटांपैकी प्रत्येक गटाच्या क्षेत्राची सीमा अशा प्रत्येक अधिसूचनेत सीमांकित करण्यात येईल.]

[१](३) राज्य शासनाने, यथापूर्वोक्त काढलेली अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहातपुढे ठेवण्यात येईल.]

[१] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ९ द्वारे मूळ पोट कलमा ऐवजी पोट-कलम (३) दाखल करण्यात आले.

[1] [ २५७. कोणत्याही पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीत, एखाद्या गटाच्या हद्दींमध्ये कोणत्याही रीतीने फेरबदल करणारी अधिसूचना कलम २५६, पोट-कलम (१) खाली काढण्यात आल्यास राज्य शासन, राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी तरतूद करील,- *गटामध्ये फेरबदल करण्यात येईल तेव्हा आदेशाद्वारे यथोचित तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.*

(एक) कोणतेही क्षेत्र एखाद्या गटात समाविष्ट करण्यात आले असेल त्याबाबतीत, विद्यमान सदस्यांचा नेहमीचा पदावधी संपेपर्यंत राज्य शासनाने जादा सदस्यांची नेमणूक करून सदस्यांच्या संख्येत अंतरीम वाढ करणे;

(दोन) कोणतेही क्षेत्र एखाद्या गटातून वगळण्यात आले असेल त्या बाबतीत, राज्य शासनाच्या मते जे सदस्य गटातून वगळलेल्या क्षेत्राचे प्रतिनिधित्व करीत असतील त्या सदस्यांना काढून टाकणे;

(तीन) दोन किंवा अधिक गटांचे एका गटात एकत्रीकरण करण्यात आले असेल त्या बाबतीत, या अधिनियमाखाली उत्तराधिकारी पंचायत समितीची यथावकाश रचना करण्यात येईपर्यंत, राज्य शासन निर्धारित करील अशा संख्येइतक्या, राज्य शासनाने नेमणूक केलेल्या सदस्यांची मिळून बनलेल्या एका अंतरिम पंचायत समितीची रचना करणे;

(चार) एखाद्या गटाची किंवा गटांची दोन किंवा अधिक गटांमध्ये विभागणी केली असेल त्या बाबतीत, या अधिनियमाखाली उत्तराधिकारी पंचायत समित्यांची यथावकाश रचना करण्यात येईपर्यंत अशा पंचायत समित्यांच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि कर्तव्ये व कार्ये पार पाडण्यासाठी प्रशासकाची किंवा प्रशासकांची नेमणूक करणे;

(पाच) ज्या क्षेत्राच्या संबंधात पुनर्रचित पंचायत समिती कार्य करील व व्यवहार करील ते क्षेत्र;

(सहा) विद्यमान पंचायत समितीचे हक्क व दायित्वे कोणत्याही उत्तराधिकारी पंचायत समित्यांकडे किंवा राज्य शासनाकडे पूर्णतः किंवा अंशतः हस्तांतरित करणे व अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्ती ;

(सात) कलम २५६ खाली काढलेली कोणतीही अधिसूचना अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा आनुषंगिक, परिणामरूप व पूरक बाबी.]

[2] [ २५७ क. (१) कोणत्याही विद्यमान पंचायत समितीच्या सदस्यांच्या पदावधीमध्ये, राज्य शासनाने, कलम २५६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) व कलम ५ अन्वये, एखाद्या किंवा अनेक गटांची विभागणी करून त्या गटाच्या किंवा गटांच्या जागी दोन किंवा अधिक गटांची रचना करणारी अधिसूचना काढली असेल आणि अशा नवीन गटाची किंवा यथास्थिति गटांची रचना केल्याच्या परिणामी, कलम २५७ च्या खंड (दोन) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, वगळलेल्या क्षेत्राचे वा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या, विद्यमान पंचायत समितीच्या अथवा समित्यांच्या सदस्यांना काढून टाकणे आवश्यक असेल आणि कलम ५६ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, यथास्थिती, नवीन पंचायत समिती अथवा समित्या स्थापन करणे आवश्यक असेल त्या बाबतीत, या अधिनियमाच्या कलम २५७ मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी,– *गटाची किंवा गटांची विभागणी आणि तिचे परिणाम.*

(क) कलम २५६ च्या पोट-कलम (१) च्या खंड (घ) अन्वये काढलेल्या अधिसूचनेद्वारे यथास्थिती, विद्यमान गटातून किंवा गटांतून अशाप्रकारे वगळलेले वा वगळलेली आणि नवीन गटाची किंवा गटांची रचना करीत असल्याचे अधिसूचित केलेले वा केलेली, क्षेत्र वा क्षेत्रे, कलम ५६ अन्वये, अशा गटासाठी किंवा गटांसाठी नवीन पंचायत समिती किंवा समित्या म्हणून स्थापन केल्याचे मानण्यात येईल;

(ख) विद्यमान गटातून किंवा गटांतून वगळलेल्या क्षेत्राचे वा क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणारे आणि कलम २५७ च्या खंड (दोन) अन्वये अशाप्रकारे काढून टाकलेले सदस्य हे, अशा नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीचे किंवा यथास्थिती समित्यांचे निर्वाचित सदस्य असल्याचे मानण्यात येईल आणि हे सदस्य, या अधिनियमाच्या अनुक्रमे कलम ६७ व कलम ६८ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, आपल्यामधूनच आपला सभापती आणि उपसभापती निवडतील;

(ग) खंड (क) अन्वये नवीन पंचायत समिती किंवा समित्या स्थापन झाल्यावर, राज्य शासन, **राजपत्रात** आदेश प्रसिध्द करून, विद्यमान पंचायत समितीच्या किंवा समित्यांच्या हक्कांचे व दायित्वांचे, नव्याने स्थापन झालेल्या उत्तराधिकारी पंचायत समितीकडे किंवा, यथास्थिती समित्यांकडे पूर्णतः वा अंशतः हस्तांतरण करण्याची आणि अशा हस्तांतरणाच्या अटी व शर्तीची, तसेच कलम २५६ अन्वये काढलेली अधिसूचना अंमलात आणण्यासाठी आवश्यक असतील अशा इतर आनुषंगिक, परिणामरूप व पूरक बाबींची तरतुद करील ;आणि

(घ) पंचायत समित्यांच्या बाबतीतील, या अधिनिमाच्या सर्व संबध्द तरतुदी, अशा नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीला किंवा समित्यांना लागू असतील.

(२) नव्याने स्थापन केलेल्या पंचायत समितीचा आणि तिच्या सदस्याचा पदावधी हा, ज्या पंचायत समितीची विभागणी करून नवीन पंचायत समिती स्थापन केली असेल त्या विद्यमान पंचायत समितीबरोबर एकाच वेळी समाप्त होईल.]

## प्रकरण सोळा

## नियंत्रण

जिल्हा परिषदेच्या कारभारासंबंधी चौकशी.

२५८. (१) राज्य शासनाला, कोणत्याही जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या बाबींविषयी किंवा या अधिनियमान्वये ज्यांच्या संबंधात राज्य शासनाची मंजुरी, मान्यता, संमती किंवा आदेश आवश्यक असेल अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जाचे नसतील अशा आपल्या अधिकाऱ्यापैकी कोणत्याही अधिकाऱ्याकडून कोणत्याही वेळी चौकशी करवून घेण्याची तजवीज करता येईल.

(२) अशी चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यास चौकशीच्या प्रयोजनासाठी साक्षीपुरावा घेणे, तसेच साक्षीदारास हजर राहण्यास व दस्तऐवज सादर करण्यास भाग पाडणे याबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली न्यायालयास असलेले अधिकार असतील. १९०८ चा ५.

(३) पोट-कलम (१) खाली केलेल्या चौकशीच्या खर्चासंबंधात व ज्या पक्षकारांनी व ज्या निधींतून तो देण्यात येईल ते पक्षकार व तो निधी यासंबंधात, राज्य शासनास आदेश देता येतील आणि राज्य शासनाकडून किंवा अशा आदेशात नामनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून अर्ज आला असता, अशा आदेशाची अंमलबजावणी, जणू तो दिवाणी न्यायालयाचा हुकुमनामा आहे असे समजून, करता येईल.

---

१. सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम ६ द्वारे कलम २५७ दाखल करण्यात आले.

२. सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, याच्या कलम २ द्वारे २५७ क समाविष्ट करण्यात आले.

**२५९.** (१) या अधिनियमान्वये किंवा त्याखाली, किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमिती अन्वये किंवा त्याखाली जिल्हा परिषदेवर लादलेले कोणतेही कर्तव्य बजावण्यात जिल्हा परिषदेने कसूर केली आहे असे राज्य शासनास, त्याच्याकडे केलेल्या तक्रारीवरून किंवा अन्यथा कळविण्यात येईल तेव्हा, जिल्हा परिषदेने असे कर्तव्य बजाविण्यात कसूर केली आहे अशी राज्य शासनाची योग्य चौकशीअंती खात्री झाल्यास, राज्य शासनाला, ते कर्तव्य पार पाडण्यासाठी कालावधी निश्चित करता येईल:

जिल्हा परिषदेने कर्तव्य बजाविण्यात कसूर केली असता ती पार पाडण्याबाबत तरतूद करण्याचा राज्य शासनाचा अधिकार

परंतु असा आदेश का देण्यात येऊ नये याचे कारण दाखविण्यास जिल्हा परिषदेस संधी दिल्यावाचून असा कोणताही कालावधी निश्चित करता येणार नाही.

[१] [ **स्पष्टीकरण**.– या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरीता जिल्हा परिषद या संज्ञेत, पंचायत समितीचा किंवा परिषदेच्या कोणत्याही समितीचा समावेश होतो.]

(२) अशा रीतीने निश्चित केलेल्या कालावधीत जर ते कर्तव्य पार पाडण्यात आले नाही तर ते पार पाडण्यासाठी राज्य शासनाला एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि ते पार पाडण्यासाठी येणारा खर्च तसेच ते पार पाडण्यासाठी नेमलेल्या व्यक्तीस द्यावयाचे वाजवी पारिश्रमिक जिल्हा परिषदेने ताबडतोब दिले पाहिजे असा निदेश देता येईल.

**२६०.** (१) जिल्हा परिषद तिच्या अधिकारांचे अतिक्रमण करते किंवा दुरूपयोग करते किंवा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही, इतर कायद्याखाली तिच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडण्यास ती सक्षम नाही किंवा पाडण्यात सतत कसूर करते किंवा [२] [कलम २६१, पोट-कलम (१) खाली राज्य शासनाने दिलेल्या अनुदेशांचे किंवा निदेशांचे किंवा] [३][मुंबई
१९३० चा स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० खालील लेखापरीक्षा किंवा] कार्यालयाची तपासणी व त्यासंबंधीचे
मुंबई काम यातून उद्‌भवलेल्या गोष्टींच्या संबंधात सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही अनुदेशांचे [२][जाणूनबुजून
२५. पालन करीत नाही] असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनाला जिल्हा परिषदेस त्याबाबत स्पष्टीकरण देण्याची संधी दिल्यावर, राजपत्रातील आदेशाद्वारे त्यासंबंधीची कारणे प्रसिध्द करून,–

जिल्हा परिषद विसर्जित करण्याचा [६] * * राज्य शासनाचा अधिकार व परिणामरूप तरतुदी.

(एक) अशी जिल्हा परिषद विसर्जित करता येईल. [४] [* * *]

[५] * * * * * *

(२) एखादी जिल्हा परिषद याप्रमाणे विसर्जित [७] * * * करण्यात आल्यास पुढील परिणाम घडून येतील,–

**(क) पंचायत समिती, स्थायी समिती, विषय समित्या किंवा इतर समित्या, कोणत्याही असल्यास, त्यांचे सर्व परिषद-सदस्य व सदस्य, परिषद विसर्जित करण्यात आली असेल तर विसर्जनाच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून [८] [* * * *] असे परिषद-सदस्य किंवा सदस्य म्हणून असलेली आपली अधिकारपदे सोडतील;**

---

१ सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१, कलम १६ द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

२ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६७(अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला

3 वरील अधिनियमाच्या कलम ६७ (ब) द्वारे "परिषदेच्या लेखा परीक्षत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७६ (१) (अ) द्वारे "किंवा " हा मजकूर वगळण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ७६ (१) (ब) द्वारे खंड (दोन) वगळण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ७६ (५) द्वारे" किंवा निष्प्रभावित " हा मजकूर वगळण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम ७६ (२)(अ) द्वारे "किंवा निष्प्रभावित करण्याचा " हा मजकूर वगळण्यात आला.

८ वरील अधिनियमाच्या कलम ७६ (२)(ब) द्वारे "आणि परिषद निष्प्रभावित करण्यात आली असेल तर निष्प्रभावन आदेशाच्या तारखेपासून " हा मजकूर वगळण्यात येईल.

(ख) जिल्हा परिषद पंचायत समिती, स्थायी समिती किंवा विषय समित्या किंवा इतर समित्या यांचे सर्व अधिकार व कर्तव्ये यांचा, ती विसर्जित [१]* * * केल्याच्या कालावधीत, याबाबत राज्य शासन वेळोवेळी ज्या व्यक्तीची किंवा व्यक्तींची नेमणूक करील अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती वापर करतील व ती पार पाडतील;

(ग) जिल्हा परिषदेमध्ये निहित असलेली सर्व मालमत्ता जिल्हा परिषद ज्या कालावधीसाठी विसर्जित [२]* * * करण्यात आली असेल त्या कालावधीत, राज्य शासनामध्ये निहित होईल;

(घ) खंड (ख) खाली नेमणूक केलेली किंवा केलेल्या व्यक्ती, तिचे किंवा त्यांचे अधिकार व कर्तव्ये एखाद्या व्यक्तीकडे किंवा समितीकडे किंवा उप समितीकडे प्रत्यायोजित करतील;

(ङ) जेव्हा खंड (ख) खाली एकापेक्षा अधिक व्यक्ती नेमण्यात येतील तेव्हा त्यांच्यामधून जी कोणतीही व्यक्ती इतरांच्या वतीने दावा दाखल करण्यासाठी किंवा एखाद्या दाव्यात प्रतिवादी होण्यासाठी, याबाबत रीतसर संमत केलेल्या ठरावाद्वारे रीतसर प्राधिकृत केलेली असेल तिला, दावा दाखल करता येईल व एखाद्या दाव्यात प्रतिवादी होता येईल.

(३) पोट-कलम (१) खाली विसर्जनाचा आदेश काढल्यावर, परिषद-सदस्यांच्या [[३]* * *] निवडणुका या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार [४]* * * घेतल्या जातील. [४]* * *

[५]* * * * * *

(६) पोट-कलम (१) खाली काढलेला प्रत्येक आदेश हा, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर, तीस दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७६(२) (क) द्वारे "किंवा निष्प्रभावित" हा मजकूर वगळण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ७६(२) (ड) अन्वये "किंवा निष्प्रभावित" हा मजकूर वगळण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७६(३) (अ) अन्वये "आणि पंचायत समितीच्या" हा मजकूर वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७६(३) (ब) अन्वये "राज्य शासनाने आदेशामध्ये विनिर्दिष्ट करावयाच्या तारखेला किंवा त्यापूर्वी" "हा मजकूर व" "आणि पुर्वोक्त" "या शब्दांनी सुरू होऊन "पुन्हा स्थापन करण्यात येतील" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ७६ (४) अन्वये पोट-कलम (४) व (५) वगळण्यात आली.

**२६१.** (१) राज्य शासनाला, जिल्हा परिषदांची कर्तव्ये व कार्ये या बाबतीत अनुसरावयाच्या धोरणासंबंधी कोणत्याही जिल्हा परिषदेस सर्वसाधारण अनुदेश देता येतील आणि विशेषकरून बांधकामे व विकासाविषयक परियोजना पार पाडणे व त्या सुस्थितीत ठेवणे याबाबत राष्ट्रीय व राज्य विकास योजनांच्या हिताच्या दृष्टीने निदेश देता येतील. [1] [असे अनुदेश किंवा निदेश] दिल्यानंतर [1] [अशा अनुदेशांची किंवा निदेशांची] अंमलबजावणी करणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल. बांधकामे व विकासविषयक परियोजना यांच्या संबंधात निदेश देण्याचे राज्य शासनाचे अधिकार

[2] [ **स्पष्टीकरण**.– या पोट-कलमाच्या प्रयोजनासाठी "जिल्हा परिषद" या संज्ञेत, पंचायत समितीचा किंवा परिषदेच्या कोणत्याही समितीचा समावेश होतो.]

(२) (क) या अधिनिमात काहीही अंतर्भुत असले तरी, राज्य शासनाच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर, अशी कामे पार पाडण्यासाठी व अशा कर्तव्यांचे पालन करण्यासाठी (मग अशी कामे किंवा कर्तव्ये जिल्हा यादीतील विषयांपैकी एखाद्या विषयाशी संबंधित असोत किंवा नसोत) शासनाच्या मते आवश्यक असतील तेवढे परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांची सेवा राज्य शासनाच्या स्वाधीन करण्यास फर्माविता येईल आणि त्यानंतर अशा रीतीने जिल्हा परिषदेकडे मागणी केलेली अधिकारी व कर्मचारी वर्ग यांची सेवा जिल्हा परिषद राज्य शासनाच्या स्वाधीन करील.

(ख) जेव्हा जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचारीवर्गाच्या सेवा पूर्वी सांगितल्याप्रमाणे राज्य शासनाच्या स्वाधीन करण्यात येतील तेव्हा ते जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखालील सेवाच्या समुचित संवर्गावर असण्याचे चालू राहतील आणि या बाबतीत राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा नियमांनुसार जिल्हा परिषदेकडून राज्य शासनाला देण्यात येणारे त्यांचे परिश्रमिक व इतर भत्ते त्यांना मिळण्याचे चालू राहील.

[3] [**२६१ क** कलम १००, पोट-कल (१), खंड (ग-क१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे नळाने पाणीपुरवठा करण्याची परियोजना विनिर्दिष्ट कालावधीत आपल्याकडे घेण्यात जिल्हा परिषदेने कसूर केली आहे असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास या प्रकरणाखाली किंवा या अधिनियमाच्या इतर तरतुदींखाली त्यास करता येईल अशा इतर कोणत्याही कारवाईस बाध येऊ न देता आपल्या स्वतःच्या अभिकरणामार्फत अशा परियोजनेचे कार्यान्वयन व तिची देखभाल यांसाठी व्यवस्था करता येईल आणि कोणत्याही संविधीखाली किंवा अन्यथा जिल्हा परिषदेला देणे असलेल्या व देण्यात यावयाच्या कोणत्याही अनुदानात किंवा इतर पैशात आवश्यक ते समायोजन करून तो खर्च वसूल करता येईल.] नळाने पाणीपुरवठा करण्याची परियोजना आपल्याकडे घेण्यात जिल्हा परिषदेने कसूर केली असता ती परियोजना कार्यान्वित ठेवण्यासाठी अनुदान इत्यादीमधून खर्च वसूल करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६८(अ) द्वारे "असे निदेश" व "अशा निदेशांची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ६८ (ब) द्वारे हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

३. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५६, कलम ५ द्वारे कलम २६१ क समाविष्ट करण्यात आले.

आयुक्ताने जिल्हा परिषदेची तिच्या समितीची किंवा पंचायत समितीची बैठक बोलावणे.

**२६२.** या अधिनियमान्वये किंवा त्याखाली विहित केलेल्या कालावधीत जिल्हा परिषदेची किंवा तिच्या कोणत्याही समितीची किंवा पंचायत समितीची एकही बैठक घेण्यात आली नाही हे आयुक्तांच्या निदर्शनास आणून देण्यात आले तर याबाबत राज्य शासनाने विहित केलेल्या नियमांनुसार त्याला स्वतःला अशा परिषदेची किंवा तिच्या समितीची किंवा पंचायत समितीची बैठक बोलवता येईल.

निरीक्षण व पर्यवेक्षण करण्याचा अधिकार

**२६३.** आयुक्तास किंवा याबाबत राज्य शासनाने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास,–

(क) कोणत्याही जिल्हा परिषदेच्या भोगवटयात असलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेवर किंवा तिच्या नियंत्रणाखाली किंवा व्यवस्थापनाखाली असलेल्या कोणत्याही परिसंस्थेत किंवा तिच्या नियंत्रणाखाली अथवा तिच्या निदेशानुसार चालू असलेले कोणतेही बांधकाम किंवा विकास परियोजना यांच्या ठिकाणी प्रवेश करता येईल आणि त्यांचे निरीक्षण करता येईल किंवा याबाबत त्याने लेखी प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीने अशी स्थावर मालमत्ता, परिसंस्था किंवा बांधकाम अथवा विकास परियोजना यांच्या ठिकाणी प्रवेश करण्याबाबत व त्याचे निरीक्षण करण्याची तजवीज करता येईल;

(ख) कोणत्याही जिल्हा परिषदेच्या किंवा तिच्या कोणत्याही समितीच्या किंवा कोणत्याही पंचायत समितीच्या कामकाजामधील कोणताही उतारा मागवता येईल आणि जिल्हा परिषदेच्या कब्जात किंवा नियंत्रणाखाली असलेले कोणतेही पुस्तक किंवा कोणताही दस्तऐवज मागवता येईल किंवा त्याचे निरीक्षण करता येईल; आणि

(ग) त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही जिल्हा परिषदेने किंवा तिच्या कोणत्याही समितीने किंवा पंचायत समितीने देणे आवश्यक असलेले कोणतेही विवरण, विवरणपत्र, हिशेब किंवा प्रतिवृत्त मागवता येईल.

आयुक्ताने जिल्हा परिषदेच्या कार्यालयाचे निरीक्षण करणे

**२६४.** [1] [आयुक्तास किंवा त्याने या बाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या (जिल्हा परिषदेच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या आणि पंचायत समितीच्या बाबतीत परिषदेचा उप जिल्हाधिकारी याच्या दर्जाहून कमी दर्जाचा नसलेल्या) कोणत्याही व्यक्तीस] कोणत्याही जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कार्यालयात प्रवेश करता येईल आणि तेथे ठेवलेले कोणतेही अभिलेख, नोंदवही किंवा इतर दस्तऐवज यांचे निरीक्षण करता येईल; आणि आयुक्तांनी निरीक्षणाच्या संबंधात काही टाचणे केलेली असल्यास जिल्हा परिषद किंवा यथास्थिति, पंचायत समिती त्यांचे अनुपालन करील.

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ६९ द्वारे "आयुक्तास" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२६५.** जर जिल्हा परिषदेच्या कर्मचारीवर्गातील अधिकाऱ्यांची किंवा वर्ग तीनच्या कर्मचाऱ्यांची किंवा वर्ग चारच्या कर्मचाऱ्यांची संख्या, अत्यधिक आहे [1][ किंवा एखाद्या जिल्हा परिषदेने हाती घेतलेल्या किंवा हाती घ्यावयाचे योजलेल्या कोणत्याही बांधकामावरील किंवा विकास परियोजनेवरील कोणताही खर्च निरर्थक आहे किंवा तो सार्वजनिक हिताचा नाही] असे आयुक्ताचे मत झाले तर उक्त जिल्हा परिषद, आयुक्ताने फर्मावल्यावर [2][ कलम २४३ कमी च्या तरतुदींना अधीन राहून, आयुक्त निदेश देईल] अशा मर्यादेपर्यंत उक्त अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची संख्या कमी करील. [3][ किंवा यथास्थिति, आयुक्त आदेशाद्वारे निदेश देईल अशा टप्प्यानंतर अशा बांधकामाचा किंवा विकास परियोजनेचा परित्याग करील :]

कर्मचारी वर्गावरील अपव्ययास [4][किंवा निरर्थक खर्चास] प्रतिबंध करण्याचा आयुक्ताचा अधिकार

परंतु जिल्हा परिषदेस, अशा कोणत्याही फर्मावणीविरुध्द राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

**२६६.** राज्य शासनाने जिल्हा परिषदेच्या कामाविषयी अहवाल सादर करण्यास जिल्हाधिकाऱ्याला फर्मावल्यास जिल्हाधिकाऱ्याला, जिल्हा परिषदेकडून त्यास आवश्यक वाटेल अशी तिच्या कामकाजसंबंधीची कोणतीही माहिती किंवा आकडेवारी मागवता येईल आणि जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या फर्मावणीचे अनुपालन करणे हे जिल्हा परिषदेचे कर्तव्य असेल.

जिल्हा परिषदेच्या कामकाजासंबंधीची माहिती मागवण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.

**२६७.** (१) जिल्हा परिषदेचा [5][ किंवा तिच्या समित्यांपैकी कोणत्याही समितीच्या किंवा पंचायत समितीचा] कोणताही आदेश किंवा ठराव अमलात आणल्याने किंवा जिल्हा परिषदेकडून [5][ किंवा तिच्या समितीकडून] किंवा पंचायत समितीकडून किंवा तिच्या वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात आहे किंवा करण्यात येत आहे, ती केल्याने लोकांस इजा किंवा त्रास होत आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे [6][* * *] असे [7][ जिल्हा दंडाधिकाऱ्याचे] मत असेल तर त्यास आपल्या सहीने लेखी आदेश काढून अशी अंमलबजावणी निलंबित करता येईल किंवा ती गोष्ट करण्यास मनाई करता येईल.

जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती इत्यादींचे आदेश, वगैरे यांची अंमलबजावणी निलंबित करण्याचा [9][जिल्हा दंडाधिकाऱ्याचा] अधिकार

(२) [8][ जिल्हा दंडाधिकारी] पोट-कलम (१) खालील कोणताही आदेश देईल तेव्हा तो असा आदेश का दिला याबद्दलच्या कारणांच्या निवेदनासह अशा आदेशाची एक प्रत आयुक्ताकडे आणि त्या आदेशाचा परिणाम जिच्यावर होणार असेल अशा जिल्हा परिषदेकडे किंवा पंचायत समितीकडे तात्काळ पाठवील. आणि तो आदेश विखंडीत करणे किंवा आयुक्तास योग्य वाटेल त्या कालावधीपर्यंत तो फेरबदलासह किंवा फेरबदलावाचून अमलात असण्याचे चालू रहावे म्हणून निदेश देणे हे आयुक्ताच्या विवेकाधिकाराधीन असेल.

---

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४५ (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम १३ (१) द्वारे "आयुक्त निदेश देईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४५ (ब) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ४५ (क) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

५ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७० (१) (अ) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ७० (१) (क) द्वारे "किंवा तसे करणे विधिविरुध्द आहे" हा मजकूर वगळण्यात आला.

७ वरील अधिनियमाच्या कलम ७० (१) (अ) द्वारे "कलेक्टरचे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

८ वरील अधिनियमाच्या कलम ७० (२) द्वारे "कलेक्टर" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

९ वरील अधिनियमाच्या कलम ७० (३) द्वारे "कलेक्टरचा" या मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(३) या कलमाखाली घडून येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाचे प्रतिवृत्त आयुक्त राज्य शासनाकडे तात्काळ सादर करील आणि राज्य शासनास, त्याबाबतीत त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती इत्यादींचा विधिसंमत नसलेला आदेश किंवा ठराव यांची अंमलबजावणी निलंबित करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

१ [२६७ क. (१) सार्वजनिक हिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे अशी आयुक्ताची खात्री झाल्यास, त्यास आपल्या सहीच्या लेखी आदेशाद्वारे, एखाद्या जिल्हा परिषदेचा किंवा तिच्या समितीचा अथवा पंचायत समितीचा जो कोणताही आदेश किंवा ठराव किंवा तिने जी कोणतीही कृती करणे त्यांच्या मते विधिसंमत नसेल, त्या आदेशाची किंवा ठरावाची अंमलबजावणी निलंबित करता येईल किंवा अशी कृती करण्यास मनाई करता येईल आणि अशा आदेशाचे अनुपालन करणे हे यथास्थिति, जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या समितीचे अथवा पंचायत समितीचे कर्तव्य असेल.

(२) जर एखाद्या जिल्हा परिषदेच्या किंवा तिच्या समितीच्या किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही आदेशाची किंवा ठरावाची अंमलबजावणी करणे किंवा तिच्या जिल्हा परिषदेने किंवा समितीने किंवा पंचायत समितीने कोणतीही गोष्ट करणे हे कलम २६१, पोट-कलम (१) खाली दिलेल्या अनुदेशांशी किंवा काढलेल्या निदेशांशी विसंगत आहे असे आयुक्ताचे मत झाल्यास, त्यास आपल्या सहीने लेखी आदेश काढून अशी अंमलबजावणी निलंबित करता येईल किंवा ती गोष्ट करण्यास मनाई करता येईल आणि आयुक्ताच्या आदेशाचे अनुपालन करणे हे, यथास्थिती, जिल्हा परिषदेचे किंवा तिच्या समितीचे किंवा पंचायत समितीचे कर्तव्य असेल.]

जिल्हाधिकाऱ्याचे निकडीच्या प्रसंगीचे अधिकार.

२६८. (१) निकडीचे प्रसंग उद्भवतील तेव्हा जे कोणतेही काम पार पाडण्याचे किंवा जी कोणतीही कृती करण्याचे जिल्हा परिषदेस किंवा पंचायत समितीस अधिकार आहेत व जे असाधारण काम तात्काळ पार पाडणे किंवा करणे हे जिल्हाधिकाऱ्याच्या मते लोकांच्या आरोग्याच्या किंवा सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक आहे ते काम पार पाडण्याची किंवा ती कृती करण्याची जिल्हाधिकाऱ्यास तरतूद करता येईल. तसेच ते काम पार पाडण्यास किंवा ती कृती करण्यास लागणारा खर्च, तसेच ते काम पार पाडण्यास किंवा कृती करण्यास नेमलेल्या व्यक्तीस द्यावयाचे वाजवी पारिश्रमिक जिल्हा परिषदेने तात्काळ दिले पाहिजे असा निदेश त्याला देता येईल.

(२) याप्रमाणे तो खर्च किंवा ते पारिश्रमिक न दिल्यास, ज्या कोषागारात किंवा बँकेत किंवा संस्थेत जिल्ह्याचा निधी ठेवण्यात येतो किंवा त्याचा संपूर्ण अथवा काही भाग ठेव म्हणून ठेवण्यात येतो अथवा व्याजाने कर्जाऊ देण्यात येतो तेथील प्रभारी अधिकाऱ्याने अशा निधीपैकी त्याच्या हाती शिल्लक असलेल्या रकमेमधून तो खर्च किंवा पारिश्रमिक किंवा त्यापैकी जेवढी रक्कम देणे शक्य असेल तेवढी रक्कम द्यावी असा निदेश जिल्हाधिकाऱ्याला देता येईल.

(३) या कलमाखाली दिलेल्या प्रत्येक निदेशाबाबत जिल्हाधिकारी आयुक्ताला तात्काळ कळवील आणि आयुक्तास आदेशाद्वारे, त्यास योग्य वाटेल त्या रीतीने असा निदेश कायम करता येईल किंवा त्यात फेरबदल करता येतील.

(४) आयुक्त, पोट-कलम (३) खाली दिलेल्या आदेशाची एक प्रत तात्काळ राज्य शासनाकडे पाठवील आणि राज्य शासन त्याबाबतीत त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल.

---

१ सन १९६[illegible] चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७१ द्वारे कलम २६७ क समाविष्ट करण्यात आले.

**२६९.** (१) पंचायत समिती आपल्या अधिकारांचा अतिक्रम किंवा दुरुपयोग करीत आहे किंवा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली किंवा अन्य कायद्यान्वये तिच्याकडे सोपविलेली कर्तव्ये पार पाडण्यास एखादी पंचायत समिती सक्षम नाही किंवा ती बजावण्यात ती सातत्याने कसूर करीत आहे किंवा [१] [कलम २६१, पोट-कलम(१) खाली राज्य शासनाने दिलेल्या कोणत्याही अनुदेशांचे किंवा काढलेल्या आदेशांचे किंवा] पंचायत समितीच्या लेख्यांची लेखापरीक्षा किंवा तिच्या कार्यालयाचे आणि कामाचे निरीक्षण याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही अनुदेशांकडे [१][बुध्दया दुर्लक्ष करीत आहे] असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनास, पंचायत समितीस खुलासा करण्याची संधी दिल्यानंतर राजपत्रात आदेश प्रसिध्द करून व त्याबाबतची कारणे देऊन त्याद्वारे,– अक्षमता, कसूर किंवा अधिकाराचा दुरुपयोग याबद्दल पंचायत समिती विसर्जित करण्याचा * * राज्य शासनाचा अधिकार

(एक) पंचायत समिती विसर्जित करता येईल [२] * *

[३] * * * * * * * *

(२) जेव्हा एखादी पंचायत समिती अशा रीतीने विसर्जित [४ * * *] करण्यात येईल तेव्हा पुढील परिणाम घडून येतील :–

(क) [५] * * * पंचायत समिती विसर्जित करण्यात येईल तेव्हा विसर्जनाच्या आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून पंचायत समितीचे सर्व सदस्य, सदस्य म्हणून धारण केलेली आपली अधिकारपदे सोडून देतील;

(ख) पंचायत समिती विसर्जित किंवा निष्प्रभावित करण्यात आली असेल त्या कालावधीत, पंचायत समितीचे सर्व अधिकार व कर्तव्ये, ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना राज्य शासन याबाबतीत वेळोवेळी नेमील त्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना बजावता येतील व पार पाडता येतील ;

(ग) पंचायत समितीच्या कब्जात असलेली सर्व मालमत्ता, ज्या कालावधीसाठी पंचायत समिती विसर्जित [६] * * * करण्यात आली असेल त्या कालावधीत, राज्य शासन धारण करील;

(घ) खंड (ख) खाली नेमलेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना, त्याचे किंवा त्यांचे अधिकार आणि कर्तव्ये एखाद्या व्यक्तीकडे किंवा समितीकडे किंवा उप समितीकडे सोपवता येतील.

(३) पोट-कलम (१) खाली विसर्जनाचा आदेश काढल्यानंतर [७ * * *] हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम यांच्या तरतुदींखाली सदस्यांची निवडणूक घेतली जाईल [९ * * *]

[८] * * * * * * * *

---

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७२ द्वारे "त्याचे बुध्दया पालन करीत नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ कलम ७७ (१) (अ) द्वारे "अथवा" हा मजकूर वगळण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (१) (ब) द्वारे खंड (दोन) वगळण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (२) (अ) द्वारे "किंवा निष्प्रभावित" हा मजकूर वगळण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (२) (ब) द्वारे "पंचायत समिती निष्प्रभावित करण्यात येईल तेव्हा अशा निष्प्रभावित करणाऱ्या आदेशाच्या तारखेपासून आणि" हा मजकूर वगळण्यात येईल

६ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (२) (क) द्वारे "किंवा निष्प्रभावित" हा मजकूर वगळण्यात आला

७ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (३) द्वारे "राज्य शासनाकडून आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा तत्पूर्वी" हा मजकूर व आणि उपरोक्त तरतुदींखाली या शब्दांनी सुरू होऊन "स्थापना केली पाहिजे" या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला

८ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (४) द्वारे पोट-कलम (४) व (५) वगळण्यात आले

९ वरील अधिनियमाच्या कलम ७७ (५) द्वारे "किंवा निष्प्रभावित करण्यात आल्या" हा मजकूर वगळण्यात आला

(६) पोट-कलमा (१) खाली काढलेला प्रत्येक आदेश हा, तो काढल्यानंतर शक्य तितक्या लवकर तीस दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या दिवसांच्या कालावधीसाठी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

विवक्षित बाबतीत विशेष नियम करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**२७०**. विवक्षित बाबतीत काटकसर करण्याच्या आणि प्रमाणीकरण करण्याचा दृष्टीने, राज्य शासनास, पुढील सर्व किंवा पुढील बाबींपैकी कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील,--

(क) जिल्हा परिषदेस किंवा पंचायत समितीस आवश्यक असलेली भांडारे, सामग्री, यंत्रसामग्री व इतर वस्तू ज्या रीतीने तिच्याकडून खरेदी करण्यात येतील ती रीत;

(ख) ज्या रीतीने कामे, संविदा व पुरवठा करावयाच्या वस्तुंच्या निविदा मागविण्यात, त्यांचे निरीक्षण करण्यात व त्या स्वीकारण्यात येतील ती रीत; आणि

(ग) ज्या रीतीने बांधकामे व विकास परियोजना यांची अंमलबजावणी व निरीक्षण करण्यात येईल आणि अशी बांधकामे व परियोजना याबाबतच्या रकमा देण्यात येतील ती रीत.

एखद्या जिल्हा परिषदेने सार्वजनिक आरोग्या-संबंधात नोकरीवर ठेवलेल्या कर्मचारी वर्गाची निकडीच्या परिस्थितीत दुसऱ्या जिल्ह्यात बदली करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

**२७१**. कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात कोणत्याही घातक, साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव झाला असेल किंवा [1][टंचाई], पूर किंवा इतर कोणतेही नैसर्गिक संकट यामुळे कोणत्याही जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात मोठया प्रमाणावर आपत्ती उद्‌भवण्याचा भयंकर धोका असेल तर, अशा प्रसंगी राज्य शासनास किंवा राज्य शासनाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांस, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही जिल्हा परिषदेने सार्वजनिक आरोग्याच्या संबंधात नोकरीवर ठेवलेल्या कोणत्याही कर्मचारीवर्गाची, राज्य शासन विहित करील अशा रीतीने व अशा अटींवर आणि यथास्थिती, राज्य शासन किंवा असा अधिकारी त्या बाबतीत वेळोवेळी निश्चित करून देईल, अशा कालावधीपर्यंत अशा जिल्ह्यात किंवा त्याच्या भागात करण्याविषयी त्या जिल्हा परिषदेस फर्माविता येईल आणि तद्‌नुसार अशा जिल्हा परिषदेने उपरोक्त कालावधीसाठी आपल्या कर्मचारीवर्गाची बदली केली पाहिजे, कर्मचारीवर्गाची बदली केल्यामुळे जिल्हा परिषदेस जो कोणताही जादा खर्च येईल त्यासाठी राज्य शासनाला, त्यास योग्य वाटेल असे अनुदान देता येईल.

जिल्हाधिकारी इत्यादींच्या बाबतीत राज्य शासनाचे व आयुक्ताचे अधिकार.

**२७२**. राज्य शासन, आयुक्त व जिल्हाधिकारी यांना सामान्य व महसूल प्रशासनात अनुक्रमे आयुक्त, जिल्हाधिकारी व त्यांच्या हाताखालील कर्मचारी यांच्यावर जो प्राधिकारी व नियंत्रणाधिकारी असेल व ते वापरत असतील तोच प्राधिकार व नियंत्रणाधिकार त्यांना या अधिनियमाशी संबंधित बाबींमध्येही राहील.

---

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७२ द्वारे "दुष्काळ" या मूळ शब्दाऐवजी वरील शब्द दाखल करण्यात आला.

२७३. राज्य शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांना अधीन राहून त्यास, आदेशाद्वारे (कलम २७४ खालील नियम करण्याच्या अधिकारांव्यतिरिक्त) या अधिनियमाखालील आपले सर्व किंवा कोणतेही अधिकार, कार्ये किंवा कर्तव्ये, त्यास दुय्यम असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे सोपवता येतील. राज्य शासनाने अधिकार प्रत्यायोजित करणे.

## प्रकरण सतरा

## नियम, विनियम आणि उप-विधी

२७४. (१) राज्य शासनास, या अधिनियमाच्या तरतुदी अम्मलात आणण्याच्या प्रयोजनाकरिता या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे नियम करता येतील. नियम

(२) राज्य शासनास, विशेषकरून आणि पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी नियम करता येतील,–

(एक) कलम ९, पोट-कलम (२) ज्या वेळी व ज्या रीतीने परिषद-सदस्यांची नावे प्रसिध्द करण्यात येतील ती वेळ व ती रीत विहित करणे ;

[1][(दोन) कलम १२ अन्वये कोणत्याही निवडणूक विभागात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि स्त्रिया यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा आणि अशा आरक्षणाची रीत व त्याचा आळीपाळीक्रम विहित करणे]

[2][(दोन-क) कलम १३ पोट-कलम (१-क) खाली ज्या पध्दतीने मतदारांच्या यादीची सुधारणा करण्यात येईल ती पध्दती आणि तिला पूरक, परिणामरूप व आनुषंगिक असतील अशा सर्व बाबींची तरतूद करण्यासाठी नियम करणे ;]

(तीन) कलम १४, पोट-कलम (२) ज्या रीतीने जिल्हा परिषदेसाठी व्यक्तींची निवडणूक घेण्यात येईल आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या इतर गोष्टी करण्यात येतील ती पध्दती ;

(चार) कलम १६, पोट-कलम (२), खंड (ग) खाली त्या खंडाच्या प्रयोजनासाठी नियम विहित करणे ;

(पाच) कलम १९, पोट-कलम (२), खाली ज्या रीतीने अधिग्रहणाचा आदेश बजाविण्यात येईल ती रीत;

(सहा) कलम २०, पोट-कलम खाली ज्या काळात अर्ज करता येईल तो काळ ;

[3][(सात) कलमे ३८, ४८, ६०, ७१, ८२-क आणि ८६ खाली राजीनाम्याची नोटीस ज्या रीतीने दिली पाहिजे ती रीत विहित करणे ;]

[4][(सात-क) कलम ४२ अन्वये, कोणत्याही जिल्हा परिषदेमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागासवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जिल्हा परिषद अध्यक्षांच्या पदांची संख्या आणि अशा आरक्षणाची रीत व त्यांचा आळीपाळीक्रम विहित करणे ;]

(आठ) कलम ४४ खाली अध्यक्ष [[5]* * *] जी चालू प्रशासनिक कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवू शकेल ती कर्तव्ये विहित करणे;

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० कलम [illegible] द्वारे खंड (दोन) दाखल करण्यात आला.

२ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ कलम [illegible] द्वारे खंड (दोन-क) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम ३६ (४) द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

४ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० कलम ४८ (३) द्वारे खंड (सात-क) दाखल करण्यात आला.

५ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible] कलम ४३ (१) द्वारे "व उपाध्यक्ष" हा मजकूर वगळण्यात आला.

[1] [(आठ-क) कलमे ४६, [2] [४७क] ६९ व ८४ अन्वये ज्या नियमांच्या अधीनतेने, संबंधित पीठासीन प्राधिकाऱ्यांना त्या कलमांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे घरभाडे भत्ता दिला पाहिजे ते नियम.]

[3] [(नऊ) कलम ४६, पोट-कलम (२) खाली आणि कलम ४७क, पोट-कलम (२) खाली अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना द्यावयाचा प्रवास भत्ता आणि इतर भत्ते;]

[4] [(नऊ-क) कलम ४६क खाली अध्यक्षाच्या स्वाधीन करावयाच्या आतिथ्य भत्त्यासंबंधीचे नियम विहित करणे;]

[5] [(दहा) कलम ४९ आणि कलम ७२ यांचे [6] [पोट-कलम (२)] किंवा कलम ८७ खालील मागणीपत्राचा नमुना आणि मागणी करण्याची रीत विहित करणे;]

[(अकरा) कलमे ६१ [7] [७४ व ८९] च्या प्रयोजनांकरिता नियम विहित करणे;]

(बारा) कलम ५७, पोट-कलम (३) खाली, ज्या रीतीने पंचायत समितीच्या निवडून आलेल्या किंवा स्वीकृत सदस्यांची नावे प्रसिद्ध करण्यात येतील ती रीत विहित करणे;

[8] [(तेरा) कलम ५८ अन्वये निर्वाचक गणामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या पंचायत समितीच्या सभापतींच्या पदांची संख्या आणि आरक्षणाची रीत व त्याचा आळीपाळीक्रम विहित करणे;]

[9] * * * * * *

(पंधरा) कलम ६६ खाली पंचायत समितीचा सभापती चालू प्रशासनविषयक जी कर्तव्ये पार पाडण्याचे चालू ठेवू शकेल ती कर्तव्ये विहित करणे;

[10] [(पंधरा-क) कलम ६७ अन्वये, कोणत्याही पंचायत समितीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग आणि स्त्रिया यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या, पंचायत समितीच्या सभापतींच्या पदांची संख्या आणि आरक्षणाची रीत व त्यांचा आळीपाळीक्रम विहित करणे;]

(सोळा) कलम ६९ च्या व कलम ८४ च्या पोट-कलम (२) खाली पंचायत समितीच्या सभापतीस व उप सभापतीस व विषय समितीच्या सभापतीस द्यावयाचा प्रवास भत्ता आणि इतर भत्ते विहित करणे;

---

१. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १९(१) द्वारे खंड (आठ-क) समाविष्ट करण्यात आला.

२. सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६(अ) द्वारे हा आकडा व मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३. वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (नऊ) दाखल करण्यात आला.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४६(२) द्वारे खंड (नऊ-क) समाविष्ट करण्यात आला.

५. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २४(४) द्वारे मूळ खंडाऐवजी हा खंड समाविष्ट करण्यात आला.

६. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४६(३) द्वारे पोट-कलम (१) या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

७. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७४ द्वारे आणि ७७ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७८(३) द्वारे खंड (तेरा) दाखल करण्यात आला.

९. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७४ (३) द्वारे खंड (चौदा) वगळण्यात आला.

१०. सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ७८ (४) द्वारे खंड (पंधरा-क) समाविष्ट करण्यात आला.

[१] [(सोळा-क) कलम ७७क खाली सरपंचाच्या आळीपाळीने करावयाच्या नामनिर्देशनाची रीत आणि नियतकाल विहित करणे;]

(सतरा) कलम ७८, पोट-कलम (२) खाली ज्या नियमांना अधीन राहून परिषद-सदस्य व इतर व्यक्ती यांची जिल्हा परिषदांकडून इतर समित्यांवर नेमणूक करण्यात येईल ते नियम विहित करणे; ]

(अठरा) कलम ९५, पोट-कलम (१) च्या खंड (ख) खाली ज्या नियमांनुसार जिल्हा परिषदांचे अधिकारी आणि कर्मचारी यांची कर्तव्ये ठरवून देण्यात येतील ते नियम आणि त्या कलमाच्या पोट-कलम (२) चा खंड (एक) खाली मुख्य कार्यकारी अधिकारी ज्या अधिकारांचा वापर करील व जी इतर कार्ये पार पाडील ते अधिकार व ती कार्ये विहित करणे;

[२] [(अठरा-क) कलम ९५, पोट-कलम (२), खंड (ख) खाली, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडून, त्याने स्वतः तयार केलेल्या किंवा त्या प्रयोजनासाठी रचना करण्यात आलेल्या निवड मंडळाने किंवा समितीने तयार केलेल्या उमेदवारांच्या याद्यांमधून वर्ग चारच्या सेवेमधील कर्मचाऱ्यांची नेमणूक ज्या रीतीने करण्यात येईल ती रीत आणि अशा मंडळाने किंवा समितीने अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे;]

(एकोणीस) कलम ९९ खाली ज्या नियमांना अधीन राहून विभाग प्रमुखाने ,- -

(क) बांधकामे व विकास परियोजना यांच्या बाबतीत तांत्रिक मंजुरी द्यावयाची असते; किंवा

(ख) त्याच्या विभागात काम करणाऱ्या वर्ग दोनच्या सेवेतील अधिकाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करावयाचे असते ;

ते नियम विहित करणे;

[३] [(एकोणीस-क) कलम १११ खाली, बैठकींची जागा, त्या भरविणे व त्यांची तहकुबी याबाबत आणि सामान्यतः अशा बैठकीत कामकाज चालविण्याबाबत नियम विहित करणे;

(एकोणीस-ख) कलम ११९ खाली, स्थायी समितीच्या व विषय समितीच्या बैठकींचे कामकाज चालविण्याकरिता नियम विहित करणे;

(वीस) कलम १२४ खाली, ज्या नियमांच्या अधीनतेने जिल्हा परिषदेची बांधकामे व विकास परियोजना पंचायत समित्यांच्या अभिकरणाद्वारे पार पाडण्यात येतील व त्या सुस्थितीत ठेवण्यात येतील ते नियम विहित करणे आणि पंचायतींच्या अभिकरणाद्वारे जी बांधकामे व विकास परियोजना पार पाडण्यात येतील व त्या सुस्थितीत ठेवण्यात येतील ती बांधकामे व त्या विकास परियोजना विहित करणे;

[४] [(वीस-क) कलम १२५ खाली, बांधकामे व विकास योजना हाती घेण्यासाठी पूर्वमंजुरी देण्यास सक्षम असतील असे प्राधिकारी व अधिकारी कोणते ते आणि असे प्राधिकारी व अधिकारी यांना ज्या मर्यादांपर्यंत मंजुरी देता येतील त्या खर्चाच्या मर्यादा काय ते विहित करणे;

---

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २६ (५) द्वारे खंड (सोळा-क) समाविष्ट करण्यात आला.

२ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६४, कलम ४, अनुसूचीद्वारे खंड (अठरा क) समाविष्ट करण्यात आला.

३ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७४ (४) द्वारे खंड (एकोणीस-क) आणि (एकोणीस-ख) समाविष्ट करण्यात आले.

४ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ (अ) द्वारे खंड वीस नंतर खंड (वीस-क), (वीस-ख) आणि (वीस ग) समाविष्ट करण्यात आले.

(वीस-ख) कलम १२६ खाली, निविदा स्वीकारण्यासाठी आणि संविदा करण्यासाठी पूर्वमंजुरी देण्यास सक्षम असतील असे प्राधिकारी व अधिकारी कोणते ते आणि खर्चाच्या ज्या मर्यादापर्यंत असे प्राधिकारी व अधिकारी यांना मंजुरी देता येईल त्या खर्चाच्या मर्यादा काय ते विहित करणे;

(वीस-ग) कलम १२८ खाली, मालमत्ता संपादन किंवा हस्तांतरित करण्यासाठी पूर्वमंजुरी देण्यास सक्षम असतील असे प्राधिकारी व अधिकारी कोणते ते आणि असे प्राधिकारी व अधिकारी यांना ज्या मर्यादापर्यंत मंजुरी देता येईल त्या मूल्याच्या किंवा प्रतिफलाच्या मर्यादा आणि ज्याच्या संबंधात मंजुरी देता येईल ते विषय विहित करणे;]

[1] [(वीस-घ) कलम १३०, पोट-कलम (२ क), खंड (क) खाली, ज्या रीतीने त्या खंडात निर्दिष्ट केलेल्या रकमांचा भरणा राज्याच्या लोकलेख्यात करावयाचा, त्यातून रकमा काढावयाच्या ती रीत आणि उपरोक्त बाबींशी संबधित किंवा सहाय्यभूत अशा सर्व बाबी विहित करणे;

(एकवीस) कलम १३५ खाली, ज्या नमुन्यात जिल्हा परिषदांच्या किंवा पंचायत समित्यांच्या जमा व खर्चाचे लेखे ठेवण्यात येतील, तो नमुना विहित करणे आणि ज्या वित्तीय किंवा महसुली वर्षाच्या शेवटच्या दिनांकास असे लेखे संतुलित करण्यात येतील ते वर्ष विहित करणे;]

[2] [(बावीस) कलम १३६ खाली, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या लेख्यांची विवरणे तयार करण्याचा नमुना व दिनांक आणि त्यांचे परिनिरीक्षण आणि त्यास मान्यता देणे याचा दिनांक आणि लेख्यांच्या गोषवाऱ्यांच्या प्रसिद्धीचा नमुना, रीत आणि दिनांक विहित करणे;]

(तेवीस) कलम १३७ ची पोट-कलमे (१) व (२) खाली, ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी आणि ज्या नमुन्यात उत्पन्न आणि खर्च यांचे अर्थसंकल्पीय अंदाज, प्रत्येक जिल्हा परिषदेकडून आणि प्रत्येक पंचायत समितीकडून तयार करण्यात येतील तो दिनांक व तो नमुना विहित करणे [3] [आणि त्या कलमाच्या पोट-कलम (४) खाली, ज्या दिनांकास किंवा ज्या दिनांकापूर्वी असे अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेने मंजूर केले पाहिजे तो दिनांक विहित करणे;]

(चोवीस) कलम १३७, पोट-कलम (३) खाली, ज्या दिनांकापूर्वी प्रत्येक पंचायत समितीने आपले अर्थसंकल्पीय अंदाज जिल्हा परिषदेकडे पाठविले पाहिजेत तो दिनांक विहित करणे;

[4] [(चोवीस-क) कलम १३८, पोट-कलम (२) खाली ज्या अटींना व शर्तींना अधीन राहून राज्य शासनाने तरतुद केलेल्या अनुदानामधून पुनर्विनियोजन करता येईल त्या अटी व शर्ती विहित करणे;]

(पंचवीस) कलम १४१ खाली,--

(क) त्या कलमाच्या पोट-कलम (१) खाली ज्या प्राधिकाऱ्यांकडून, ज्या मर्यादेपर्यंत व ज्या विषयांच्या बाबतीत कर्ज देण्यात येईल ते प्राधिकारी, ती मर्यादा व तो विषय विहित करणे;

(ख) त्या कलमाच्या पोट-कलम (२) खाली ज्या प्राधिकाऱ्यांस, ज्या मर्यादेपर्यंत व ज्या विषयांच्या बाबतीत आवर्ती किंवा अनावर्ती खर्च करता येईल ते प्राधिकारी, ती मर्यादा व तो विषय विहित करणे; आणि

---

१ सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ४(ब) द्वारे कलम (तीस-क) चा (वीस-घ) असा फेरक्रमांक देण्यात आला.

२ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४६ (७) द्वारे मूळ खंडाऐवजी खंड (बावीस) दाखल करण्यात आला.

३ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७४ (५) द्वारे हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

४ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ११ (दोन) द्वारे खंड (चोवीस-क) समाविष्ट करण्यात आला.

(ग) त्या कलमाच्या पोट-कलम (३) खाली ज्या प्राधिकाऱ्यांस, ज्या विषयांच्या बाबतीत व ज्या मर्यादेपर्यंत जिल्हा परिषदांना येणे असलेली कराची कोणतीही थकबाकी किंवा फी किंवा इतर कोणतीही रक्कम निर्लेखित करता येईल ते प्राधिकारी, ते विषय व ती मर्यादा विहित करणे;

[१] [(पंचवीस-क) कलम १४१-क खाली, त्या कलमाच्या पोट-कलम (२) खालील प्रश्नांचा निर्णय करताना न्यायाधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती विहित करणे;]

(सव्वीस) कलम १४२, पोट-कलम (४) खाली ज्या नमुन्यात व ज्या रीतीने प्रशासन अहवाल प्रसिद्ध करण्यात येईल तो नमुना व ती रीत विहित करणे ;

(सत्तावीस) कलम १५३, पोट-कलम (१) खाली उपकर गोळा करण्याचा परिव्यय ज्या प्रमाणात वजा करावयाचा ते प्रमाण विहित करणे ;

[२] [(सत्तावीस-क) कलम १५७-पोटकलम (२) खाली, ज्या इतर नमुन्यात व रीतीने सर्वसाधारण व विशेष पाणीपट्टी बसवता येईल तो नमुना व ती रीत आणि त्यासाठी असलेले कमाल व किमान दर विहित करणे आणि या करांकरिता विहित करावयाच्या सूटविषयक व इतर बाबी;]

(अठ्ठावीस) कलम १५८, ची प्रयोजने अमलात आणण्याकरिता नियम विहित करणे ,

[३] [(एकोणतीस) कलम १६३, खाली पंचायतीसाठी सर्वसाधारण किंवा विशेष पाणीपट्टी गोळा करण्याचा आकार म्हणून सर्वसाधारण व विशेष पाणीपट्टीच्या एकूण रकमेची टक्केवारी विहित करणे;]

[४] [(तीस) कलम १८३, खाली पूर्ववर्ती वित्तीय वर्षात जिल्हा परिषदेने केलेल्या एकूण खर्चाची परिगणना करण्याची रीत विहित करणे;]

[५] * * * * *

(तेतीस) कलम १८५ खाली, स्थानिक उपकाराच्या अनुरूप अनुदानाची रक्कम ज्या प्रमाणात भरली पाहिजे ते प्रमाण विहित करणे ;

(चौतीस) कलम १८६, पोट-कलम (२) खाली, ज्या मानकांवर एकेका परिषदेच्या विकास कार्यात किती प्रगती झाली ते ठरविण्यात आले पाहिजे आणि तीची इतर परिषदांच्या प्रगतीशी तुलना केली पाहिजे ती मानके आणि द्यावयाच्या अनुदानाची मर्यादा व रक्कम निर्धारित करणे ;

* * * * *

(पस्तीस) कलम २०३ खाली, ज्या रीतीने सार्वजनिक बाजाराची जागा घोषित करणारी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल ती रीत विहित करणे ;

* * * * *

१. सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम [illegible] अन्वये खंड (पंचवीस-क) समाविष्ट करण्यात आला.
२. सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९६, कलम [illegible] द्वारे खंड (सत्तावीस-क) समाविष्ट करण्यात आला.
३. वरील अधिनियमाच्या कलम [illegible] द्वारे खंड (एकोणतीस) समाविष्ट करण्यात आला.
४. सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम [illegible] द्वारे हा खंड दाखल करण्यात आला.
५. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम [illegible] द्वारे खंड (एकतीस) आणि (बत्तीस) वगळण्यात आले.
६. सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक [illegible], कलम [illegible] द्वारे खंड (छत्तीस) निरसित करण्यात आला.

(सदतीस) कलम १४२, खाली, जिल्हा परिषद [1]* * ज्या अटींना व शर्तींना अधीन राहून [2][राज्य शासनाच्या वर्ग (तीन) किंवा वर्ग (चार) च्या सेवेतील पदे धारण करणाऱ्या व्यक्ती] आपल्याकडे घेईल त्या अटी व शर्ती विहित करणे;

[3][(सदतीस-क) कलम २४२ ख च्या पोट कलम (२) खाली, राज्य सेवा किंवा सर्वसाधारण राज्य सेवा यातील कोणत्याही वर्ग एकच्या किंवा वर्ग दोनच्या सेवेत नेमण्यात येणाऱ्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीचे किंवा त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करणे;]

[4][(अडतीस) [4]* * * * कलम २४६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या व्यक्तीस त्या कलमाखाली सेवानिवृत्त होण्याचा विकल्पाधिकार बजावल्यानंतर जे मिळण्याचा हक्क असेल ते सेवांत लाभ विहित करणे ;

(एकोणचाळीस) कलम २४८ खाली, जिल्हा परिषदांमध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तींची भरती करणे (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि मागासवर्ग यांच्यासाठी जागा राखून ठेवणे, यांसह) त्यांची कार्ये व सेवेच्या अटी व शर्ती यांचे विनियमन करणे आणि त्यात निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांचे आणि कर्मचाऱ्यांचे निवृत्तिवेतन, उपदान आणि इतर लाभ यांबद्दल जिल्हा परिषदेने द्यावयाच्या रकमेचे विनियमन करणे;

[5]* * * * *

(बेचाळीस) कलम २५२, पोटकलम (१) खाली, ज्या रीतीने जिल्हा परिषदा, जिल्हा तांत्रिक सेवा (वर्ग तीन), जिल्हा सेवा (वर्ग तीन) व जिल्हा सेवा (वर्ग चार) मधील जागांची अनुसूची तयार करतील आणि मंजूर करतील, ती रीत विहित करणे

(त्रेचाळीस) कलम २५३ खाली, जिल्हा परिषदेने एखाद्या संविदेखाली एखाद्या व्यक्तीची नेमणूक ज्या नियमांनुसार करावयाची असते ते नियम विहित करणे;]

(चव्वेचाळीस) कलम २६१ (२) खाली, त्यात निर्दिष्ट केलेले जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारीवर्ग यांना पारिश्रमिक व इतर भत्ते देण्यासाठी नियम विहित करणे;

(पंचेचाळीस ) कलम २६२ खाली आयुक्तांना जिल्हा परिषदेची किंवा तिच्या समितीची किंवा पंचायत समितीची बैठक ज्या नियमांनुसार बोलविता येईल ते नियम विहित करणे,

(सेहेचाळीस) कलम २७० खाली त्यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी नियम करणे ;

(सत्तेचाळीस) कलम २७१ खाली त्यामध्ये वर्णन केलेल्या निकडीच्या प्रसंगी जिल्हा परिषदेने सार्वजनिक आरोग्याच्या संबंधात नोकरीवर ठेवलेल्या कोणत्याही कर्मचारीवर्गाची तिच्याकडून ज्या रीतीने व ज्या शर्तीवर इतर जिल्हयात बदली करण्यात येईल ती रीत व त्या शर्ती विहित करणे;

---

१ सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ८(अ) द्वारे "ज्या मुदतीसाठी" हा मजकूर वगळण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) द्वारे "राज्यातील सेवेतील नोकर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ३ द्वारे खंड (सदतीस-क) हा १ मार्च १९७१ रोजी समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

४ सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ कलम १२ द्वारे "ज्या तारखेपूर्वी एखाद्या इसमाने कलम २४६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या निवड करण्याच्या आपल्या अधिकाराची नोटीस दिली पाहिजे ती तारीख विहित करणे आणि" हा मजकूर वगळण्यात आला.

५ सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ६ द्वारे खंड (चाळीस) व (एकेचाळीस) वगळण्यात आले.

(अठ्ठेचाळीस) कलम २७९, पोटकलम (१) खाली अधिनियमान्वये किंवा त्याखाली जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखास देण्यात आलेले अधिकार किंवा त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये किंवा कार्ये, ज्या नियमांना अधीन राहून, जिल्हा परिषदेत अधिकारपद धारण करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास वापरता येतील, पार पाडता येतील किंवा करता येतील, ते नियम विहित करणे;

(एकोणपन्नास) कलम २८१, खाली ज्या नियमांना अधीन राहून, जिल्हा परिषदेस या अधिनियमाच्या विवक्षित तरतुदींखालील अधिकार किंवा कार्ये आपल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील ते नियम विहित करणे;

(पन्नास) कलम २८२ पोटकलमे (३) आणि (४) खाली ज्या रीतीने स्थानिक प्राधिकरणांची संयुक्त बैठक भरवण्यात येईल ती रीत आणि अशा बैठकीत अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करणे ;

(एकावन्न) या अधिनियमाखाली, ज्या इतर कोणत्याही बाबींसाठी नियम करता येतील अशा बाबी विहित करणे ;

[1] [(३) या कलमाखाली करावयाचे नियम पूर्वप्रसिध्दीच्या शर्तीस अधीन असतील.

[1] [ परंतु, तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास या अधिनियमान्वये निवडणूक घेण्याच्या प्रयोजनांसाठी, त्यास या कलमान्वये करावयाचा कोणताही नियम पूर्व प्रसिध्दीशिवाय करता येईल. ]

(४) या कलमाखाली केलेले सर्व नियम ते केल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येतील आणि अशा रीतीने ते ज्या अधिवेशनात ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरबदल करील त्या फेरबदलांना अधीन राहून ते राजपत्रात प्रसिध्द करण्यात येतील.

**२७५.** जिल्हा परिषदेस वेळोवेळी [2] [या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या विनियम.
तरतुदींशी व राज्य शासनाने केलेल्या नियमांशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील विशेषतः आणि पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता जिल्हा परिषदेस पुढील बाबींपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरिता विनियम करता येतील : — ]

(एक) कलम ९२ खाली स्थायी समिती आणि विषय समिती यांनी, त्यांनी वापरावयाचे अधिकार व पार पाडावयाची कर्तव्ये आणि त्या समित्यांस वाटून द्यावयाचे जिल्हा यादीत देण्यात आलेले विषय विहित करणे [3][ व संयुक्त बैठकींमध्ये अनुसरावयाची कार्यपध्दती विहित करणे. ]

* * * * * *

(तीन) कलम ११५ च्या प्रयोजनासाठी बाबी विहित करणे.

* * * * * *

२७६. (१) जिल्हा परिषदेस या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, या अधिनियमाशी विसंगत उप-विधी.
नसतील असे उप-विधी वेळोवेळी तयार करता येतील, त्यात फेरबदल करता येतील किंवा ते निरसित करता येतील आणि पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा उप-विधीत पुढील बाबींसाठी तरतूद करता येईल :—

(क) सार्वजनिक बाजारात आपला व्यवसाय करणारे दलाल, अडते, तोलारी किंवा मापारी यांना लायसन देणे आणि त्यांनी वसूल करावयाची फी ठरविणे आणि ज्या शर्तीवर लायसन देण्यात येईल किंवा परत घेण्यात येईल त्या शर्ती ठरविणे;

---

सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम १० द्वारे पोट-कलम (३) मध्ये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७५ (१) अन्वये " या अधिनियमाची " या शब्दांनी सुरु होणाऱ्या आणि " विसंगती नसतील " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २५ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७५ (२) अन्वये खंड (दोन) व (चार) वगळण्यात आले.

(ख) सार्वजनिक बाजारातील जनावरांच्या विक्रीची नोंदणी करण्यासाठी माणसे नेमणे आणि त्यांनी आकारावयाची फी निश्चित करणे,

(ग) कोणत्याही सार्वजनिक बाजाराचा वापर व व्यवस्थापन विनियमित करणे, व कोणताही सार्वजनिक बाजार स्वच्छ ठेवणे आणि कोणत्याही सार्वजनिक बाजारात अनधिकृत रकमांची आकारणी करण्यास मनाई करणे ;

(घ) जिल्हा परिषदेच्या प्राधिकारास अधीन असलेल्या क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या मालमत्तेची हानी होण्यापासून किंवा तीत हस्तक्षेप केला जाण्यापासून संरक्षण करणे ;

(ङ) कलम २०३ खाली घोषित केलेला सार्वजनिक बाजार खाजगी जागेवर भरविण्यात आला असेल तर त्या व्यक्तीस द्यावयाची नुकसानभरपाई .

(च) कलमे २०५ व २०९ खाली लायसनसाठी आकारण्यात येणारी फी ;

(छ) कलम २१६ खाली विश्रामस्थाने व गाडीतळ यांचा वापर करण्याबद्दल आकारावयाचे भाडे व फी

(ज) खाजगी गाडीतळावर पर्यवेक्षण व निरीक्षण करण्यासंबंधात विनियम विहित करणे आणि खाजगी गाडीतळासाठी मिळावयाच्या लायसनबरोबर साफसफाईसंबंधी शर्ती विहित करणे

(झ) नुकसान करणाऱ्या आणि पिके नष्ट करणाऱ्या रानटी जनावरांचा नाश करणे,

(ञ) कोणत्याही जमिनीवर भटकणाऱ्या किंवा पिकास नुकसान पोहोचविणाऱ्या डुकरांचा नाश करणे,

(ट) पिसाळलेल्या व भटक्या कुत्र्यांची विल्हेवाट लावणे,

(ठ) सार्वजनिक ठिकाणाला लागून असलेल्या व पडण्याच्या बेतात असलेल्या आणि मानवी जीवितास धोका पोहोचविणाऱ्या कोणत्याही झाडापासून उत्पन्न होणाऱ्या धोक्यास प्रतिबंध करणे,

(ड) मानवी जिवितास धोका होण्यास प्रतिबंध करण्यासाठी खाणीतून दगड काढणे, सुरुंग लावणे, झाडे पाडणे किंवा बांधकाम करणे या गोष्टींबाबत विनियमन करणे,

(ढ) हॉटेल, उपहारगृह, चहाचे दुकान म्हणून किंवा तत्सम प्रयोजनासाठी किंवा कौले अथवा विटा यांच्या उत्पादनासाठी वापरात आणल्या जाणाऱ्या जागांच्या बाबतीत विनियमन करणे,

(ण) राज्य शासनाने त्याबाबतीत कोणत्याही जिल्हा परिषदेस निदेश दिल्यास सक्तीने देवीची लस टोचणे,

(त) राज्य शासनाने, त्याबाबतीत कोणत्याही जिल्हा परिषदेस निदेश दिल्यास, सार्वजनिक रस्त्यात भीक मागण्यास मनाई करणे,

(थ) गुराढोरांच्या रोगास किंवा गुराढोरांच्या कोणत्याही संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव होण्यास किंवा त्याचा प्रारंभ होण्यास प्रतिबंध करणे, त्याचा प्रतिकार करणे, तो कमी करणे किंवा त्याचे उच्चाटन करणे,

(द) माणसांनी खाण्यास अयोग्य अशा अन्न पदार्थांची विल्हेवाट लावणे,

(ध) कारखान्यांच्या स्थापनेकरिता वेगळ्या राखून ठेवलेल्या क्षेत्रात कारखान्यांच्या स्थापनेचे विनियमन करणे किंवा त्या प्रयोजनाकरिता वेगळ्या राखून न ठेवलेल्या क्षेत्रात कारखान्यांची स्थापना करण्यास मनाई करणे,

(न) देवी प्रतिबंधक लस टोचण्यासंबंधी त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अधीन राहून देवी प्रतिबंधक लस टोचण्यासंबंधीच्या सोयींची तरतूद करणे.

(प) सार्वजनिक जागेत असलेली झाडे व रोपटी यांस होणाऱ्या नुकसानीस प्रतिबंध करणे ;

(फ) घातक संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास सार्वजनिक करमणुकीची ठिकाणे बंद करणे ;

(ब) सार्वजनिक रस्त्यांचा वापर आणि त्यावरिल रहदारी यांचे विनियमन करणे आणि त्या रस्त्यांच्या बाबतीत स्वच्छता, सुरक्षितता आणि सुव्यवस्था ठेवणे,

(भ) बाजार, दुग्धालये, मलईचे पदार्थ विकण्याची दुकाने, धान्य साठविण्याच्या जागा, धान्याची दुकाने, कत्तलखाने, दफनाच्या आणि दहनाच्या जागा, उपद्रवकारक व्यापार आणि साफसफाईशी संबंधित असलेल्या सर्व बाबी यांचे सर्वसाधारणपणे किंवा विशेषरित्या विनियमन करणे, नियंत्रण करणे किंवा त्यांचा वापर करण्यास मनाई करणे ;

(२) पोट-कलम (१) खाली केलेल्या कोणत्याही उप-विधीत अशी तरतूद करता येईल की, अशा उप विधीचे उल्लंघन केल्यास त्याबद्दल—

(क) पन्नास रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल,

(ख) असे उल्लंघन करणे चालू ठेवले असेल तर पहिल्या उल्लंघनानंतरच्या अपराधसिध्दीनंतर, ज्या कालावधीत असे उल्लंघन चालू राहील त्या कालावधीत, प्रत्येक दिवसांबद्दल दहा रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(३) कोणताही उप-विधी, आयुक्ताकडून तो त्यास मान्यता दिली जाईपर्यंत प्रभावी होणार नाही.

## प्रकरण अठरा

## संकीर्ण

**२७७.** कोणत्याही परिषद सदस्यांचा किंवा पंचायत समितीच्या कोणत्याही सदस्याचा किंवा जिल्हा परिषदेकडे असलेल्या किंवा तिच्या सेवेत असलेल्या अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा, तो ज्या जिल्हा परिषदेचा परिषद-सदस्य किंवा ज्या पंचायत समितीचा सदस्य असेल किंवा यथास्थिति, जिच्याकडे किंवा तिच्या सेवेत तो असेल अशा जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या आदेशानुसार करण्यात आलेल्या कोणत्याही कामात किंवा पार पाडण्यात आलेल्या विकास परियोजनेत किंवा अशा जिल्हा परिषदेशी किंवा पंचायत समितीशी किंवा अशा जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या आदेशानुसार केलेल्या कोणत्याही संविदेत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही भाग किंवा हितसंबंध असेल तर तो सिध्दापराध ठरविण्यात आला असता एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाच्या किंवा तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या साध्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल, जिल्हा परिषदेशी किंवा पंचायत समितीशी केलेली कोणतीही संविदा, वगैरे यात परिषद सदस्याचा, अधिकाऱ्याचा, किंवा कर्मचाऱ्याचा हितसंबंध असल्यास शास्ती.

परंतु कोणत्याही व्यक्तीस, —

(क) जी कोणतीही संयुक्त भांडवल कंपनी, कोणतीही सहकारी संस्था, जिल्हा परिषदेबरोबर किंवा पंचायत समितीबरोबर संविदा करील किंवा तिच्याकडून किंवा तिच्या वतीने सेवेत ठेवली जाईल त्या कंपनीत तिचा भाग आहे किंवा त्या संस्थेत तिचा भाग किंवा हितसंबध आहे, किंवा

(ख) जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या कामकाजासंबंधीची कोणतीही जाहिरात ज्यात देण्यात येऊ शकते अशा कोणत्याही वृत्तपत्रात तिचा भाग किंवा हितसंबंध आहे, किंवा

(ग) जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने दिलेल्या कोणत्याही कर्जाच्या किंवा अनुदानाच्या व्यवहारात तिचा भाग किंवा हितसंबंध आहे ( असा भाग किंवा हितसंबंध राज्य शासनाने विहित केलेल्या नियमानुसार संपादन केलेला असला पाहिजे ), किंवा

(ध) जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने काढलेले ऋणपत्र, ती धारण करते किंवा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने उभारलेल्या कोणत्याही कर्जात तिचा अन्यप्रकारे संबंध आहे, किंवा

(ङ) जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या वतीने तिला व्यावसायिक दृष्ट्या विधि व्यवसायी या नात्याने सेवेत ठेवले आहे ;

[१][ (च) तिचा, कलम १६, पोटकलम (२) या खंड (ख), उपखंड (पाच), (सहा) किंवा (सात) मध्ये उल्लेखिलेला हिस्सा किंवा हितसंबंध आहे. ]

याच केवळ कारणावरुन या कलमाखाली सिध्दापराध ठरविण्यात येणार नाही.

जिल्हा परिषद वगैरेंच्या परिषद सदस्य इत्यादी. व्यक्ती लोकसेवक असणे.

२७८. जिल्हा परिषदेचा प्रत्येक परिषद सदस्य व पंचायत समितीचा प्रत्येक सदस्य व जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली अधिकारपद धारण करणारा किंवा तिच्या सेवेत असलेला प्रत्येक अधिकारी व कर्मचारी हा भारतीय दंड संहिता, कलम २१ याच्या अर्थानुसार लोकसेवक आहे असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी अधिकार सोपवणे.

२७९. (१) अधिनियमान्वये किंवा त्याखाली जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुखाला प्रदान केलेले कोणतेही अधिकार, किंवा त्याच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये किंवा कार्ये यांपैकी कोणताही अधिकार, कर्तव्य किंवा कार्य याचा कलम २७४ खाली करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने विभागप्रमुख या बाबतीत जिल्हा परिषदेतील अधिकारपद धारण करणाऱ्या ज्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास लेखी आदेशाद्वारे प्राधिकृत करील त्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास वापर करता येईल, पार पाडता येईल, किंवा बजावता येईल.

(२) विभागप्रमुख पोट-कलम (१) खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाची प्रत जिल्हापरिषद, स्थायी समिती आणि संबंधित विषय समिती यांच्याकडे पाठवील.

दावे, इत्यादी दाखल करण्याची मुदत.

२८०. (१) या अधिनियमास अनुसरुन, जिल्हा परिषदेने केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल, कोणत्याही जिल्हा परिषदेवर किंवा जिल्हा परिषदेच्या किंवा तिच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुध्द किंवा कर्मचाऱ्याविरुध्द किंवा जिल्हा परिषदेच्या किंवा पंचायत समितीच्या आदेशाखाली काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरुध्द करावयाचा कोणताही दावा अशा जिल्हा परिषदेस किंवा अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस अशा संकल्पित दाव्याची एक महिन्याची आगाऊ लेखी नोटीस दिल्यावाचून दाखल करता येणार नाही. तसेच, असा दावा तक्रारीचा विषय असलेली कृती घडल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांनंतर दाखल करता येणार नाही. उक्त नोटिशीत वाद कारण, जी दाद मागितली असेल तिचे स्वरुप, मागणी केलेली भरपाईची रक्कम आणि दावा दाखल करण्याची इच्छा असलेल्या व्यक्तीचे नाव आणि राहण्याचे ठिकाण या गोष्टी नमूद करण्यात येतील.

(२) जेव्हा असा दावा नुकसानभरपाईबद्दल असेल तेव्हा दावा दाखल करण्यात येण्यापूर्वी नुकसानभरपाईदाखल पुरेशी रक्कम देऊ करण्यात आल्यास, वादीकडून अशा रीतीने देऊ करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक रक्कम वसूल करणार नाही आणि अशा रीतीने रक्कम देऊ करण्यात आल्यानंतर प्रतिवादीचा खर्च वादी देईल.

१. सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ५६ द्वारे खंड (च) जादा दाखल करण्यात आला.

[1][ **२८०क.** (१) या अधिनियमाची कलमे ४७,५१,७०,७४,८५,८९ व त्यांच्या इतर संबध्द तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, २५ जून १९७५ रोजी काढलेल्या आणि २१ मार्च १९७७ रोजी रद्द करण्यात आलेल्या, आणीबाणीविषयक उद्घोषणेच्या अमलाच्या कालावधीत कोणत्याही वेळी प्रतिबंधक स्थानबध्दताविषयक तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याखाली कोणत्याही व्यक्तीस, अध्यक्ष किंवा पंचायत समितीचा सभापती किंवा उपसभापती किंवा विषय समितीचा, सभापती म्हणून असलेल्या त्याच्या पदावधीत, स्थानबध्द करण्यात आले असेल त्या बाबतीत या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनार्थ, त्याच्या अनुपस्थितीचा कालावधी मोजताना, त्यांच्या स्थानबध्दतेचा संपूर्ण कालावधी दुर्लक्षित करण्यात येईल.

पदाधिकाऱ्यांची अनुपस्थिती मोजताना आणि त्यांना मानधन व इतर सुविधा देताना, जून १९७५ मध्ये घोषित केलेल्या आणीबाणीच्या काळातील स्थानबध्दतेचा कालावधी दुर्लक्षित करणे.

(२) त्यानुसार, अशी कोणतीही व्यक्ती केवळ तिला स्थानबध्द केल्याच्या किंवा ती अनुपस्थित असल्याच्या कारणावरुन, अशा कायद्याखाली तिला स्थानबध्द करण्यात आले होते तेव्हा ती जे अधिकारपद धारण करीत असेल असे अधिकारपद धारण करण्याचे बंद होणार नाही व ते बंद झाल्याचे कधीच मानण्यात येणार नाही व ती अशी अधिकारपदे धारण करीत असल्याच्या सर्व कालावधीत तिला मानधन, निवासव्यवस्था व तिच्यापदाशी संलग्न असलेल्या इतर सवलती मिळण्याचा हक्क असेल व तिला तसा हक्क नेहमीकरिता असल्याचे मानण्यात येईल. ]

**२८१.** जिल्हा परिषदेस, लेखी आदेशाद्वारे कलम १००, १०२ किंवा १०६ खालील आणि राज्य शासनाने केलेल्या नियमांच्या अधीनतेने राज्य शासन याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा या अधिनियमाच्या इतर तरतुदींखाली असलेल्या अधिकारांपैकी व कार्यांपैकी कोणताही अधिकार व कार्य राज्य शासनास योग्य वाटेल अशा, परिषदेच्या प्राधिकाऱ्यांपैकी कोणत्याही प्राधिकाऱ्याकडे सोपविता येईल.

जिल्हा परिषदेचा आपले अधिकार सोपवण्याचा अधिकार.

**२८२.** (१)त्या त्या वेळी अमलात असलेल्या ज्या कोणत्याही कायद्याअन्वये जिल्हा परिषदेची, महानगरपालिकेची, नगरपालिकेची, कटक प्राधिकरणाची किंवा अधिसूचित क्षेत्र समितीची रचना करण्यात आली असेल किंवा स्थापना करण्यात आली असेल त्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, कटक प्राधिकरण किंवा अधिसूचित क्षेत्र समिती यांना, अशा एका किंवा अनेक स्थानिक प्राधिकरणाशी किंवा प्राधिकरणांशी पुढील गोष्टीसंबंधी विचारविनिमय करण्यासाठी संयुक्त बैठक घेण्याबद्दल प्रस्ताव करता येईल, त्या गोष्टी अशा, --

दोन किंवा अधिक स्थानिक प्राधिकरणांची संयुक्त बैठक.

(क) अशा कोणत्याही दोन किंवा त्याहून अधिक स्थानिक प्राधिकरणांची बांधकामे आणि विकास परियोजना यांचा समन्वय साधणे, अथवा

(ख) अशा दोन किंवा त्याहून अधिक स्थानिक प्राधिकरणांनी, संयुक्त जबाबदारीवर हाती घ्यावयाची कामे किंवा उपाययोजना,

(२) जेव्हा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने पोट-कलम (१) खाली संयुक्त बैठकीसाठी प्रस्ताव केला असेल आणि इतर स्थानिक प्राधिकरणाने किंवा प्राधिकरणांनी तो स्वीकारला नसेल तेव्हा आयुक्तास कटक प्राधिकरणाव्यतिरिक्त अशा इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास, उपरोक्त बाबतीत सहमती देण्यास भाग पाडण्याबाबत त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील आणि असे स्थानिक प्राधिकरण किंवा प्राधिकरणे अशा आदेशांचे अनुपालन करतील.

---

१. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४ द्वारे कलम २८०क समाविष्ट करण्यात आले.

(३) पोट-कलम (१) खाली एखाद्या स्थानिक प्राधिकरणाने केलेल्या प्रस्ताव इतर स्थानिक प्राधिकरणाने किंवा प्राधिकरणांनी स्वीकारला तर, राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल अशा रीतीने संयुक्त बैठक घेण्यात येईल.

(४) संयुक्त बैठकीची कार्यपध्दती ती राज्य शासनाकडून विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असेल.

(५) संयुक्त बैठकीसाठीचा खर्च संबंधित स्थानिक प्राधिकरणे, ती आपापसात कबूल होतील त्या प्रमाणात किंवा एकमत न झाल्यास आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे सोसतील.

(६) या कलमाखाली काम करणाऱ्या स्थानिक प्राधिकरणात (कटक प्राधिकरण वगळून) मतभेद झाल्यास त्यावरील आयुक्तांचा निर्णय अंतिम असेल.

(७) या कलमाखाली काम करणारे कोणतेही स्थानिक प्राधिकरण व कटक प्राधिकरण यांच्यात मतभेद झाल्यास राज्य शासन त्या प्रश्नावर केंद्र सरकारच्या सहमतीने निर्णय देईल.

महानगरपालिका, वगैरेंना दिलेल्या महसुलाच्या हिश्श्याचा उपयोग करणे.

२८३. महानगरपालिका, नगरपालिका, कटक प्राधिकरण किंवा अधिसूचित क्षेत्र समिती यांना राज्य शासनाने कलम १५० पोट-कलम (२) [1]* * * खाली दिलेली रक्कम, ती महानगरपालिका, नगरपालिका, कटक प्राधिकरण किंवा यथास्थिती, अधिसूचित क्षेत्र समिती, कलम १०० मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांसाठी किंवा उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी तिने जे अधिकारी व कर्मचारी सेवेत ठेवले असतील त्यांचे पारिश्रमिक देण्यासाठी खर्च करील आणि कलम १५०, पोट-कलम (२) [1]* * * * * यात निर्दिष्ट केलेल्या महसुलाच्या एकतृतीयांशापेक्षा कमी नाही इतका भाग जिल्हा यादीत नमूद असलेल्या शैक्षणिक कार्याच्या कक्षेत येणाऱ्या बाबींसाठीच खर्च करील.

२८४. [पंचायतीचे क्षेत्र नसलेल्या जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात जमीन महसूल वसूल करण्याबाबत आणि ग्राम लेखापालाची कार्ये व कर्तव्ये पार पाडण्याबाबत विशेष तरतुद] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १९ द्वारे वगळण्यात आले.

जमीन संपादन करणे.

२८५. कलमे १९ ते २३ यांत अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, जेव्हा कोणतीही जमीन या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता आवश्यक असेल तेव्हा ज्या जिल्हा परिषदेस अशी जमीन आवश्यक असेल त्या जिल्हा परिषदेने विनंती केल्यावर, भूमि संपादन अधिनियम, १८९४ किंवा तत्सम आणि त्या त्या वेळी अमलात असलेला इतर कायदा याच्या तरतुदींखाली ती जमीन संपादन करण्याचे काम राज्य शासनाला सुरू करता येईल आणि त्या अधिनियमाखाली किंवा अशा कायद्याखाली देवविलेली नुकसानभरपाईची रक्कम व जमीन संपादन करण्यासाठी राज्य शासनाला आलेला इतर सर्व खर्च जिल्हा परिषदेने दिल्यावर, ती जमीन जिल्हा परिषदेमध्ये, [2][राज्य शासनाकडून लादण्यात येतील अशा अटींना, शर्तींना आणि निर्बंधांना अधीन राहून निहित होईल :

१८९४ चा १.

परंतु, अशा अटी, शर्ती आणि निर्बंध यांपैकी कोणत्याही अटीचा, शर्तीचा किंवा निर्बंधाचा भंग करण्यात आल्यास, राज्य शासनास उक्त जमीन परत घेता येईल आणि अशा रीतीने परत घेतल्यानंतर, सर्व भारापासून मुक्त अशी ती जमीन राज्य शासनामध्ये निहित होईल. परंतु, त्या जमिनीच्या संबंधात निवाड्यात दिलेल्या आणि जिल्हा परिषदेने प्रदान केलेल्या नुकसानभरपाईइतकी रक्कम राज्य शासन जिल्हा परिषदेला देईल :]

---

१. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम १८ द्वारे "किंवा कलम १५३, पोट-कलम (२)" हा मजकूर वगळण्यात आला.

२. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४७ द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][२८५क. प्रत्येक जिल्हा परिषदेचे व पंचायत समितीचे मुख्यालय, राज्य शासन संबंधित जिल्हा परिषदेशी किंवा पंचायत समितीशी विचारविनिमय करुन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या बाबतीत जे ठिकाण नेमील अशा ठिकाणी असेल (मग ते ठिकाण जिल्ह्यात असो किंवा जिल्ह्याबाहेर असो)]

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या यांची मुख्यालये नेमून देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

२८६. [विवक्षित अधिनियमांची सुधारणा] हे कलम सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम १७ अन्वये वगळण्यात आले.

२८७. (१) या राज्याच्या प्रदेशात अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदी या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत करण्याकरिता, राज्य शासनास राजपत्रात प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील त्याप्रमाणे असे कायदे निरसित करुन किंवा त्यात सुधारणा करुन त्यात अनुकूलन किंवा फेरबदल करता येतील आणि अशा कायद्यात केलेली अनुकूलने व फेरबदल यांना अधीन राहून असा कायदा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून अमलात येईल आणि असे अनुकूलन किंवा फेरबदल यांवर कोणत्याही न्यायालयात आक्षेप घेता येणार नाही.

कायदा अनुकूल करुन घेण्यासंबंधी राज्य शासनाचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) मधील कोणत्याही गोष्टीमुळे,—

(क) या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर कोणत्याही कायद्यात अनुकूलन किंवा फेरबदल करण्याचा राज्य शासनाला अधिकार आहे असे मानता येणार नाही. किंवा

(ख) या कलमाखाली राज्य शासनाने अनुकूलन करुन घेतलेला किंवा फेरबदल केलेला कोणताही कायदा निरसित करण्यास किंवा त्यात सुधारणा करण्यास राज्य, विधानमंडळास किंवा इतर सक्षम प्राधिकाऱ्यास प्रतिबंध होतो, असे मानता येणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या कलमातील "अमलात असलेला कायदा" या संज्ञेत या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी राज्य विधानमंडळाने पारित केलेल्या किंवा राज्यातील इतर सक्षम प्राधिकरणाने तयार केलेल्या व पूर्वी निरसित न झालेल्या अशा कोणत्याही कायद्याचा समावेश होतो मग असा कायदा संपूर्णपणे किंवा त्याचा एखादा भाग राज्यातील सर्व किंवा एखाद्या विशिष्ट क्षेत्रात पूर्णपणे अमलात असो वा नसो.

२८८. अकराव्या अनुसूचीत अंतर्भूत असलेल्या तरतुदी या, जिल्हा परिषदाच्या रचनेस आणि तीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर बाबींना लागू होतील.

संक्रमी- तरतुदी आणि त्यातली

१ सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ७७ अन्वये कलम २८५क समाविष्ट करण्यात आले.

अडचणी दूर करणे.

**२८९.** हा अधिनियम किंवा कोणतीही अनुसूची यातील तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्भवल्यास, राज्य शासनाला प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, आदेशाद्वारे अशी अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल.

निरसन.

**२९०.** कलम २८८ च्या तरतुदींना अधीन राहून मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ आणि हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ हे अधिनियम याद्वारे निरसित करण्यात येत आहेत.

१९२३ चा मुंबई ६. १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ३८. १९५६ चा हैदराबाद ५.

# पहिली अनुसूची

(कलम १०० पहा)

## कामांचे विषय (विकासविषयक कार्यासह)

### कृषि

[1][१ * * * * * ]

२. पीकस्पर्धा.

३. पीक संरक्षण.

४. पीक मोहिमा (खरीप आणि रब्बी पिकांच्या मोहिमा आणि भाजशेतीची प्रकर्षित लागवड यांसह).

५. मिश्र खते व स्थानिक खते.

६. रासायनिक खते, शेतीची अवजारे आणि शेतीसाठी लागणारे लोखंड, पोलाद आणि सिमेंट यांचे वाटप.

७. सुधारित कृषिपध्दतीचे प्रात्यक्षिक.

८. आदर्श प्रात्यक्षिक किंवा दुय्यम बीज क्षेत्रे.

९. सुधारित बियाण्यांची आयात व वाटप.

१०. गोदामे बांधणे आणि ती सुस्थितीत ठेवणे.

११. शेतीची अभिवृध्दी व सुधारणा.

[2][१२. वायू संपीडके.

१३. खार जमीन विकास]

### [3][पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास]

१४. पशुवैद्यकीय सहाय्य (जिल्हा पशुवैद्यकीय रुग्णालये वगळून, परंतु गुरांचे दवाखाने, पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रे आणि खेड्यातील पशुवैद्यकीय पेट्या यांसह).

१५. गुरांच्या, घोड्यांच्या आणि इतर जनावरांच्या पैदाशीची सुधारणा (त्यात कृत्रिम रेतन उप केंद्रे, आधारभूत ग्रामकेंद्रे, वळूकेंद्रे, वैरण विकासासाठी भूखंड, वैरण मुरघासाचे खड्डे, तालुका आणि जिल्हा पशुधन सुधारणा संघ व इतर तत्सम संस्था स्थापणे आणि मेंढ्याच्या सुधारित पैदाशीचे वाटप यांचा समावेश होतो.)

१६. सुधारित पैदाशीच्या कोंबड्यांचे वितरण करणे.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ८८(अ) (एक) द्वारे नोंद १ वगळण्यात आली.

२. वरील अधिनियमाचे कलम ८८(अ) (दोन) द्वारे मूळ नोंदी १२ व १३ ऐवजी या नोंदी दाखल करण्यात आल्या.

३. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०७७/३१४३/(८२) (एक) /द्वारा, दिनांक १८ जुलै १९८० द्वारे "पशुसंवर्धन" या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

१७. गुरांची प्रदर्शने व मेळावे भरविणे.

[1][१७-क. सघन सूकरालय विकास.

१७-ख. सघन कुक्कटपालन विकास.

१७-ग. सघन पशुविकास.]

[2][१७-घ. दुग्धव्यवसाय विकास.]

**वने**

१८. गायराने व कुरणे (यात कुरणाच्या व जळणाच्या प्रयोजनाकरिता गायरान जमिनीचा विकास करण्याच्या उपाययोजनांचा समावेश होतो).

**समाजकल्याण**

१९. मागासवर्गाचा शैक्षणिक विकास, यात पुढील बाबींसंबंधीच्या उपाययोजनांचा समावेश होतो—

(१) मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या, फी माफी व परीक्षेची फी देणे ; आणि

(२) मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे व शाळा स्थापन करणे व त्या चालविणे, यात वसतिगृहे बांधण्यासाठी व त्यांच्या व्यवस्थेसाठी प्राप्तानुदान वसतिगृहांना अनुदाने देण्याचा आणि अशा वसतिगृहांना आणि शाळांना इतर सहाय्य देण्याचा समावेश होतो. परंतु त्यातून जिल्ह्यापेक्षा मोठ्या क्षेत्रासाठी असलेली वसतिगृहे वगळण्यात येतील.

२०. मागासवर्गाचा आर्थिक विकास, यात पुढील बाबींचा समावेश होतो—

(१) शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यास वैयक्तिक कर्जाच्या व अर्थसहाय्याच्या स्वरुपात वित्तीय सहाय्य देणे ;

[3] * * * *

(३) विमुक्त जातींना चरखे पुरविणे ;

(४) मागास क्षेत्रात दळणवळणाचा विकास करणे ;

[5] * * * *

(६) हस्तव्यवसाय केंद्रे स्थापन करणे ; आणि

(७) गुरांच्या पैदाशीचा आणि कुक्कुटपालनाच्या क्षेत्राचा विकास.

२१. अस्पृश्यता निवारण, यात पुढील गोष्टींचा समावेश होतो—

(१) हरिजन सप्ताह साजरे करणे ;

(२) झुणका-भाकर कार्यक्रम ;

(३) सवर्ण हिंदू आणि हरिजन यांच्यातील आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देणे ; आणि

(४) अस्पृश्यता निवारणासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या गावांना बक्षिसे देणे.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४८(ब) द्वारे या नोंदी समाविष्ट करण्यात आल्या.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए १२७७/४५१३/(८०२) (एक) /बारा, दिनांक १८ जुलै १९८० द्वारे नोंद क्रमांक १७-घ जादा दाखल करण्यात आली.

३ शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०७२/५२१९३(एक)/एन, दिनांक ९ ऑक्टोबर १९७३ द्वारे नोंद २० चे खंड (२) व (५) वगळण्यात आले.

२२. मागासवर्गाच्या कल्याणाचे कार्यक्रम, यात पुढील गोष्टींचा समावेश होतो—

(१) महिलांच्या आणि बालकाच्या कल्याणाचे कार्यक्रम किंवा प्रकल्प ;

(२) बालवाड्यांची स्थापना करणे व त्या चालविणे ;

(३) मागासवर्गाच्या कल्याणासाठी प्रचाराचे व प्रसिध्दीचे काम हाती घेणे ;

(४) मागासवर्गासाठी करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणे ;

(५) सामाजिक मेळे भरवणे ;

(६) मागासवर्गासाठी संस्कार केंद्रे, सामूहिक-नि-करमणुकीची केंद्रे आणि सामूहिक सभागृहे ;

(७) विमुक्त जातींना कपडे पुरविणे ;

(८) औषधी खरेदी करण्यासाठी व्यक्तींना वित्तीय सहाय्य देणे आणि स्वयंसेवी संस्थांना त्यांनी वैद्यकीय मदत देण्यासाठी अनुदाने देणे ;

(९) मागासवर्गातील व्यक्तींसाठी घराची तरतुद करणे ; आणि

(१०) पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणे.

२३. मागासवर्गांना प्रशिक्षण देणे, यात पुढील बाबींचा समावेश होतो

(१) प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणे ; आणि

(२) तांत्रिक प्रशिक्षण आणि परंपरागत व्यवसायाच्या सुधारित पध्दतीचे प्रशिक्षण.

## शिक्षण

२४. प्राप्तानुदान शाळांना अनुदान देणे, यासहित प्राथमिक शाळांची आणि मूलोद्योग शाळांची स्थापना, व्यवस्थापन, त्या चालवणे, त्यांचे निरीक्षण करणे आणि त्यांना भेटी देणे, परंतु पुढील गोष्टीसंबंधीच्या बाबी वगळून—

(एक) पाठ्यक्रम नेमून देणे ;

(दोन) पाठ्यपुस्तके विहित करणे ;

(तीन) शिष्यवृत्त्या देण्यासाठी परीक्षा घेणे ;

(चार) विदर्भात प्राथमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा आणि इयत्ता चौथीच्या परीक्षा घेणे ; आणि

(पाच) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ खाली राज्य शासनामध्ये निहित करण्यात आले आहेत असे इतर अधिकार.

२५. माध्यमिक शाळांची स्थापना, व्यवस्थापन, त्या चालवणे, त्यांचे निरीक्षण करणे आणि त्यांना भेटी देणे ; परंतु पुढील गोष्टींसंबंधीच्या बाबी वगळून.—

(एक) अभ्यासक्रम विहित करणे ;

(दोन) पाठ्यपुस्तके विहित करणे ;

(तीन) परिरक्षण अनुदानाचे दर आणि त्यासाठी असलेल्या शर्ती ;

(चार) माध्यमिक शाळांचे उच्च माध्यमिक शाळांत रुपांतर करण्यासाठी परवानगी देणे ;

(पाच) फी चे दर ;

(सहा) मान्यतेच्या सर्वसाधारण शर्ती नेमून देणे ;

(सात) प्राथमिक आणि माध्यमिक शाळांतील शिष्यवृत्त्यांसाठी परीक्षा घेणे ; आणि

(आठ) सहाय्यक अनुदान संहितेखाली, शिक्षण संचालकांकडे विनिर्देशपूर्वक सोपविण्यात येतील किंवा राज्य शासनाकरिता राखून ठेवण्यात येतील असे इतर अधिकार.

खाजगी माध्यमिक शाळांच्या बाबतीत, अनुदाने व कर्जे याबाबत केवळ शिफारस करणे आणि शिक्षण संचालकांची मंजुरी मिळाल्यानंतर त्याचे संवितरण करणे.

२६. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या संबंधात विद्यार्थ्यांस कर्जे व शिष्यवृत्त्या देणे.

२७. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या इमारती बांधणे आणि त्या सुस्थितीत ठेवणे.

२८. इतर शैक्षणिक उद्दिष्टे.

२९. शाळांसाठी साधनसामग्री व क्रीडांगणे यांची तरतूद करणे.

## वैद्यकीय

३०. तालुका दवाखान्यांच्या दर्जात वाढ करण्यासह तालुका दवाखाने.

३१. जिल्हा व कुटीर रुग्णालये, तसेच जिल्हा रुग्णालयाप्रमाणे असलेली इतर मोठी शासकीय रुग्णालये वगळून इतर रुग्णालये.

३२. वैद्यक व्यवसायींची अर्थसहाय्यित केंद्रे.

३३. ग्रामीण वैद्यकीय सहाय्य केंद्रे आणि सार्वजनिक वैद्यकीय सहाय्य.

३४. कुत्रा चावल्याने होणाऱ्या विषबाधेवर गरीब व्यक्तींवर उपचार करणाऱ्या संस्थांना वित्तीय सहाय्य देणे.

३५. खाजगी धर्मादाय रुग्णालये, दवाखाने, प्रसूतिगृहे आणि अशा इतर परिसंस्था यांना सहाय्यक अनुदाने देणे.

## आयुर्वेद

[1][३६. आयुर्वेदीय, युनानी व समचिकित्सा दवाखाने (यात अशा दवाखान्यांना अनुदाने देण्याचा समावेश होतो.)]

[2][३७ गावातील आयुर्वेदीय, युनानी व समचिकित्सा औषधाच्या पेट्यातील औषधांचा साठा पुन्हा भरुन काढणे.]

## सार्वजनिक आरोग्य

३८. प्राथमिक आरोग्य केंद्रे.

३९. फिरती आरोग्य पथके.

४०. [3][प्राथमिक आरोग्य पथके.]

४१. लस टोचणे.

४२. शालेय आरोग्य सेवा.

४३. वॉज रोगाविरुध्द उपचारांसाठी उपाययोजना.

[4]* * * *

४५. गावात औषधांच्या पेट्या ठेवणे.

---

१. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०६८/३५८५५-एन, दिनांक ११ मार्च १९६९ द्वारे नोंद ३६ दाखल करण्यात आली.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०७०/२२५२ /एन, दिनांक २ जून १९७० द्वारे नोंद ३७ दाखल करण्यात आली.

३. शासकीय अधिसूचना, नगर विकास व आरोग्य विभाग क्रमांक पीएचसी/३१७०/५०३७७ (एस) दिनांक २५ नोव्हेंबर १९७१ द्वारे "संयुक्त वैद्यकीय व सार्वजनिक आरोग्य पथके" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४८(क) द्वारे नोंद ४४ वगळण्यात आली.

४६. आरोग्य शिक्षणासाठी सुविधा.

४७. ग्रामीण स्वच्छता.

४८. सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिने आवश्यक ती उपाययोजना करणे.

४९. अनारोग्यकारक वस्त्यांची पूर्ववत सुधारणा (त्या प्रयोजनासाठी खाजगी व्यक्तींना किंवा संस्थाना कर्जे देण्याचा यात समावेश होतो).

### इमारती व दळणवळण

५०. पुढील रस्त्यांचे व पुलांचे बांधकाम करणे, ते सुस्थितीत राखणे व त्यांची दुरुस्ती करणे :—

(एक) ग्रामीण रस्ते ;

(दोन) इतर जिल्हा रस्ते ;

(तीन) प्रमुख जिल्हा रस्ते ; आणि

(चार) वर उल्लेख केलेल्या रस्त्यांवरील पूल.

५१. ग्रामीण उपवने व उद्याने (राष्ट्रीय उपवने व उद्याने वगळून).

५२. जिल्हा परिषदेच्या गरजांच्या संबंधात प्रशासकीय आणि इतर इमारतींचे बांधकाम.

५३. रस्त्यांव्यतिरिक्त दळणवळणाची इतर साधने.

५४. सार्वजनिक तरी.

५५. रस्त्यांच्या दुतर्फा झाडांची निगा ठेवणे.

[1]* * * *

### [2][सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी]

५८. ग्रामीण पाणीपुरवठा

५९. ग्रामीण विभागातील जत्रांसाठी संरक्षित पाणी पुरवठा.

६०. ग्रामीण जलनिस्सारण

६१. पिण्यासाठी, स्नानासाठी किंवा स्वयंपाकासाठी लागणारे पाणी प्रदूषित होऊ नये म्हणून त्याचे संरक्षण करण्यासाठी बांधकामे.

(एक) प्रत्येकी [3][पाच लाख] रुपयांहून कमी निव्वळ भांडवली परिव्ययाच्या परियोजनांचे बांधकाम, ते सुस्थितीत ठेवणे व त्याची दुरुस्ती

(दोन) राज्य शासन हाती घेण्यास परवानगी देईल अशा कोणत्याही एकेका प्रकरणी [3][पाच लाख रुपयांहून अधिक व दहा लाख रुपयांहून कमी ] इतका निव्वळ भांडवली परिव्यय येणाऱ्या परियोजनांचे बांधकाम.

(तीन) कोणत्याही एकेका प्रकरणी [3][पाच लाख] रुपयांपेक्षा अधिक निव्वळ भांडवली परिव्यय असलेल्या परियोजना सुस्थितीत ठेवणे व त्यांच्या दुरुस्त्या.]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४८(७) द्वारे नोंदी ५६ व ५७ वगळण्यात आल्या.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए १०७०/११५८१-एन, दिनांक ९ डिसेंबर १९७० द्वारे शीर्षक आणि ५८ ते ६१ या नोंदी दाखल करण्यात आल्या.

३. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक जीआरएपीएपीयू-१०९२/सीआर/३७८/३९ए, दिनांक २८ मे १९९२ द्वारे हे शब्द दाखल करण्यात आले.

## पाटबंधारे

[1][६२. लहान पाटबंधाऱ्यांची बांधकामे (प्रत्येकी २५० हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन भिजविणारी पाटबंधाऱ्यांची बांधकामे) [2][आणि १०० हेक्टर पर्यंत जमीन भिजविणारी अशी उध्दरण सिंचन बांधकामे.]]

[3] * * * *

[4] * * * *

## प्रसिध्दी

८४. फिरती प्रसिध्दी याने.

८५. जिल्हा प्रदर्शने आयोजित करणे.

८६. करमणुकीच्या कार्यक्रमांद्वारे प्रसिध्दी.

८७. ग्रामीण ध्वनिक्षेपण.

## सामुहिक विकास

८८. सामूहिक विकास कार्यक्रम.

८९. स्थानिक विकास कामांचा कार्यक्रम.

## समाजशिक्षण

९०. सामूहिक करमणूक केंद्रे.

९१. प्रौढ साक्षरता केंद्रे.

९२. क्रीडा, खेळ, क्रीडांगणे, साधनसामग्री आणि कल्याणकारी संघटना.

९३. किसान मेळे.

[5][९४. राज्यामधील नियोजित सहली आणि राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने, राज्याबाहेरील नियोजित सहली.]

९५. माहिती प्रसृत करणे.

९६. अल्प मुदतीची शिबिरे.

९७. महिला संघटना व महिला कल्याण.

९८. शिशु संघटना व शिशु कल्याण

९९. फिरती चित्रपट याने.

---

१. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए ११९२/सीआर (३६९)/७४, दिनांक २ जून १९९२ अन्वये नोंद ६२ दाखल करण्यात आली.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक झेडपीए-१०९३/सीआर-७१८/०५, दिनांक ४ मे १९९५ अन्वये "आणि प्रत्येकी पाच लाख रुपयांपेक्षाही कमी परिव्यय असलेली उध्दरण सिंचन कामे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०७२/५२१९३ (एक) एन, दिनांक १ ऑक्टोबर १९७३ अन्वये "उद्योग व कुटीर उद्योग" हे शीर्षक व नोंदी "६३ ते ७४" वगळण्यात आल्या.

४. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०७२/५२१९३ (एक) एन, दिनांक १ ऑक्टोबर १९७३ अन्वये "सहकार" हे शीर्षक व नोंदी "७५ ते ८३" वगळण्यात आल्या.

५. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४८(फ) अन्वये मूळ नोंदीऐवजी नोंद ९४ दाखल करण्यात आली.

१००. ग्रंथालये व वाचनालये.

१०१. जत्रा, मेळे व प्रदर्शने.

## ग्रामीण गृहनिर्माण

१०२. ग्रामीण गृहनिर्माण.

## संकीर्ण

१०३. ग्रामोध्दार.

१०४. आदर्श गावे वसविणे (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह).

१०५. गावाचे आर्थिक कल्याण.

१०६. लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, सुविधा किंवा सोयी यांची ज्यामुळे वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरुपाची बांधकामे किंवा उपाययोजना.

१०७. बाजार.

१०८. धर्मशाळा, विश्रांतिगृहे, प्रवाशांसाठी बंगले, सराई आणि तत्सम.

१०९. चावड्या.

११०. इतर सार्वजनिक परिसंस्था.

१११. औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी.

११२. गावठाणांची सुधारणा व विस्तार (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह).

११३. नवीन गावठाणे वसविणे (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह).

११४. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे क्षेमकुशल.

११५. जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांकरिता [१][घरांसाठी जागांची किंवा घरांची] तरतूद.

११६. सार्वजनिक मैदाने व उद्याने यांमध्ये झाडे लावणे व त्यांची जोपासना करणे.

११७. रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसे.

११८. जाहीर स्वागतसमारंभ व समारंभ आणि करमणूक.

११९. स्थानिक तीर्थयात्रांबाबतची व्यवस्था करणे.

१२०. दफन भूमी व दहन भूमी (प्रेतांची विल्हेवाट लावण्याचे काम यांसह).

१२१. ग्रामपंचायतीचे पंच, सरपंच आणि अन्य अशासकीय व्यक्ती यांची संमेलने.

१२२. स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठी सहाय्य.

१२३. गरिबांची घरे सुस्थितीत ठेवणे.

[२][१२४. जिल्ह्यातील ज्या गावांमध्ये प्रायोगिक डाक कार्यालयाच्या सुविधा उपलब्ध करुन देणे ग्रामपंचायतींना उचित व पुरेशा कारणामुळे शक्य झाले नसेल तेथे डाक व तार विभागाला आवश्यक तेथे ना परतावा अंशदान देण्याची तरतूद करून अशा सुविधा उपलब्ध करून देणे [३][किंवा त्या चालू ठेवणे.]]

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४८ (ग) (एक) अन्वये "घरांची" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए/१०६८/६२७०-एन, दिनांक २० फेब्रुवारी १९६९ अन्वये नोंद १२४ नव्याने दाखल करण्यात आली.

३. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक झेडपीए-१०६२/६२७४-एन, दिनांक २४ नोव्हेंबर १९७० अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[1] [१२५. ग्रामदान व भू-दान चळवळींचा प्रचार करणे].

[2] [१२६. पंचायत राज प्रशिक्षण केंद्र, (फक्त प्रशिक्षार्थींची योग्य निवड करुन घेणे आणि त्यांची प्रशिक्षण केंद्रात समाधानकारक उपस्थिती आणि केंद्राच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्यांच्या प्रवास-भत्त्याची आणि दैनिक भत्त्याची तरतूद करणे, यासाठी ). ]

[3] [१२७. संघराज्याच्या सशस्त्र दलातील मृत व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींना द्यावयाची पैशाच्या स्वरुपातील अनुदान.]

**स्पष्टीकरण.**– संघराज्याच्या सशस्त्र दलातील मृत व्यक्तीच्या संबंधात " कुटुंबातील व्यक्ती " म्हणजे, त्या व्यक्तीची विधवा, मुलगा, मुलाचा मुलगा, अविवाहित मुलगी, वडील किंवा आई.]

[4] [१२८. ज्यांना राज्य शासनाकडून कोणतेही वित्तीय सहाय्य मिळालेले नाही अशा ग्रामीण क्षेत्रात राहणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकास किंवा मरण पावलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या कुटुंबातील व्यक्तींना पैशांच्या स्वरुपातील अनुदान.]

[5] [१२९. बँक कंपन्या ( उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण ) अधिनियम, १९७० ( १९७० चा ५ ) व बँक कंपन्या ( उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण ) अधिनियम, १९८० ( १९८० चा ४० ) याखाली राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकेच्या शाखा आणि ग्रामीण भागातील लोकांना विशेषतः शेतीच्या प्रयोजनासाठी पतपुरवठा करुन ग्रामीण विकासाचे संवर्धन करणाऱ्या इतर व्यापारी बँका यांच्यासाठी इमारती बांधणे, त्यांची व्यवस्था ठेवणे व त्या भाड्याने देणे.]

## दुसरी अनुसूची

### कामाचे विषय ( विकासविषयक कार्यासह )

( कलम १०१ पहा )

### कृषि

(१) खरीप व रबी पिकांच्या मोहिमा.

(२) सघन भातशेती.

(३) कृषि अभिवृध्दी व सुधारणा.

(४) सुधारित कृषिपध्दती व प्रथा यांचे प्रात्यक्षिक व त्याबाबत प्रचार करणे आणि आदर्श कृषि क्षेत्रे स्थापन करणे व ती सुस्थितीत ठेवणे.

(५) सुधारित कृषी अवजारांचा प्रचार करणे.

---

१. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०६९/३३१७६-एन, दिनांक १५ जानेवारी १९७१ द्वारे नोंद १२५ जादा दाखल करण्यात आली.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग क्रमांक पीआरटी १९७१/९३१४०-ए (तीन), दिनांक २१ मे १९७३ व महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, दिनांक ४ जून १९७३ यांच्या ( इंग्रजी ) पृष्ठ ८८८ वर प्रसिध्द केलेले शुध्दिपत्र क्रमांक पीआरटी. १९७१/९३१४०/ए-तीन, दिनांक ४ जून १९७३ द्वारे नोंद १२६ जादा दाखल करण्यात आली.

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४८ (ग) (दोन) द्वारे नोंद १२७ जादा दाखल करण्यात आली.

४. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०७७/३८७० (८८०)/बारा, दिनांक ८ जून १९७८ द्वारे नोंद १२८ जादा दाखल करण्यात आली.

५. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक एसीडी. १०८१/२९९५/एकोणतीस, दिनांक २ जानेवारी १९८२ द्वारे नोंद १२९ जादा दाखल करण्यात आली.

(६) फळे व भाजीपाला यांच्या उत्पादनात वाढ करणे.

(७) गोदामे बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे.

(८) रासायनिक खते, शेतीची अवजारे व शेतीसाठी लागणारे लोखंड, पोलाद व सिमेंट यांचे वितरण करणे.

[1] [(८-क) पीक-स्पर्धा.

(८-ख) मिश्र खत व स्थानिक खते.

(८-ग) सुधारित बी-बियाण्याची आयात व त्यांचे वितरण ].

[2] [ पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास ]

(९) गावातील पशुवैद्यकीय पेट्या.

(१०) पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रे.

(११) तालुका पशुधन सुधारणा अधिसंघ आणि तत्सम संस्था बनवणे.

(१२) वैरण विकास भूखंड.

(१३) वैरण पुरवावयाचे खड्डे.

(१४) सुधारित पैदाशीच्या कोंबड्यांचे वितरण करणे.

(१५) सुधारित पैदाशीच्या मेंढयांचे वितरण करणे.

(१६) गुरांची प्रदर्शने व मेळावे भरवणे.

[2] [ (१६-क) दुग्धव्यवसाय विकास ]

वने

(१७) गायराने व कुरणे ( गवत सुधारणेसह ).

(१८) गायरान व जळण यांच्या प्रयोजनांकरिता गाव शिवारांच्या विकासासाठी उपाययोजना.

समाजकल्याण

(१९) मागासवर्गांचा आर्थिक विकास, यात पुढील बाबींचा समावेश होतो :-

(क) शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठी वैयक्तिक शेतकऱ्यांना कर्जाच्या व अर्थसहाय्याच्या रुपाने वित्तीय सहाय्य देणे.

[3] * * * * *

(ग) विमुक्त जातींकरीता चरखे बसवणे.

[3] * * * * *

(२०) अस्पृश्यता निवारण, यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :-

(क) हरिजन सप्ताह साजरे करणे.

(ख) झुणका भाकर कार्यक्रम.

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४९ (क) द्वारे (८-क), (८-ख) व (८-ग) या नोंदी समाविष्ट करण्यात आल्या.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १२७७/४५१३ (८०२) (दोन)-बारा, दिनांक १८ जुलै १९८० द्वारे हे शीर्षक व नोंद (१६-क) जादा दाखल करण्यात आली.

३. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०७२/५२१९३-(दोन)-५१, दिनांक १ ऑक्टोबर १९७३ द्वारे नोंद १९ चे खंड (ख) व (घ) वगळण्यात आले.

## संकीर्ण

(५७) ग्रामोध्दार.

(५८) आदर्श गावे वसविणे (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह).

(५९) गावांचे आर्थिक कल्याण.

(६०) लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, सुविधा किंवा सोयी यांची ज्यामुळे वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाची बांधकामे किंवा उपाययोजना.

(६१) बाजार.

(६२) धर्मशाळा, विश्रांतीगृहे, प्रवाशांसाठी बंगले, सराई आणि तत्सम गोष्टी.

(६३) धावड्या.

(६४) इतर सार्वजनिक परिसंस्था.

(६५) औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी.

(६६) गावठाणाची सुधारणा व विस्तार (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह )

(६७) नवीन गावठाणे वसविणे (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह.)

(६८) सार्वजनिक मैदाने व उद्याने यांमध्ये झाडे लावणे व त्यांची जोपासना करणे.

(६९) रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसे.

(७०) जाहीर स्वागतसमारंभ व समारंभ आणि करमणूक.

(७१) स्थानिक तीर्थयात्रांबाबतची व्यवस्था करणे.

(७२) ग्रामपंचायतीचे पंच, सरपंच व अशासकीय व्यक्ती यांची संमेलने.

(७३) स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठी सहाय्य.

(७४) गरीबांची घरे सुस्थितीत ठेवणे.

[१][ (७५) संघराज्याच्या सशस्त्र दलातील मृत व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींना द्यावयाची पैशाच्या स्वरूपातील अनुदाने.

**स्पष्टीकरण**.- संघराज्याच्या सशस्त्र दलातील मृत व्यक्तींच्या संबंधात "कुटुंबातील व्यक्ती" म्हणजे त्या व्यक्तीची विधवा, मुलगा, मुलाचा मुलगा, अविवाहित मुलगी, वडील किंवा आई.]

## तिसरी अनुसूची

[सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ५ द्वारे वगळण्यात आली.]

## चौथी अनुसूची

[कलम १४४ खंड (क) पहा]

(१) कसूर केल्याच्या बाबतीत शास्ती किंवा व्याज म्हणून *मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, कलम १४८ अन्वये लादलेला कोणताही आकार धरून बसविलेली शास्ती व दंड, परंतु उक्त संहितेच्या कलम ६५ खाली शेतीशी संबंधित नसलेल्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यास परवानगी देताना लादलेला कोणताही दंड वगळून. १८७९ चा मुंबई ५

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४९(ई) द्वारे नोंद (७५) जादा दाखल करण्यात आली.

* आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा ४१) पहा.

(६) फळे व भाजीपाला यांच्या उत्पादनात वाढ करणे.

(७) गोदामे बांधणे व ती सुस्थितीत ठेवणे.

(८) रासायनिक खते, शेतीची अवजारे व शेतीसाठी लागणारे लाकड, पोलाद व सिमेंट यांचे वितरण करणे.

[1] [(८-क) पीक-स्पर्धा.

(८-ख) मिश्र खत व स्थानिक खते.

(८-ग) सुधारित बी-बियाण्यांची आयात व त्यांचे वितरण ].

[2] [ पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास ]

(९) गावातील पशुवैद्यकीय पेट्या.

(१०) पशुवैद्यकीय सहाय्य केंद्रे.

(११) तालुका पशुधन सुधारणा अधिसंघ आणि तत्सम संस्था बनवणे.

(१२) वैरण विकास भूखंड.

(१३) वैरण मुरवावयाचे खड्डे.

(१४) सुधारित पैदाशीच्या कोंबड्यांचे वितरण करणे.

(१५) सुधारित पैदाशीच्या मेंढयांचे वितरण करणे.

(१६) गुरांची प्रदर्शने व मेळावे भरवणे.

[2] [ (१६-क) दुग्धव्यवसाय विकास ]

वने

(१७) गायराने व कुरणे ( गवत सुधारणेसह ).

(१८) गायरान व जळण यांच्या प्रयोजनांकरिता गाव शिवारांच्या विकासासाठी उपाययोजना.

**समाजकल्याण**

(१९) मागासवर्गीयांचा आर्थिक विकास, यात पुढील बाबींचा समावेश होतो :-

(क) शेतीची साधनसामग्री खरेदी करण्यासाठी वैयक्तिक शेतकऱ्यांना कर्जाच्या व अर्थसहाय्याच्या रुपाने वित्तीय सहाय्य देणे.

[3] * * * * *

(ग) विमुक्त जातींकरीता चरखे बसवणे.

[3] * * * * *

(२०) अस्पृश्यता निवारण, यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :-

(क) हरिजन सप्ताह साजरे करणे.

(ख) झुणका भाकर कार्यक्रम.

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४९ (क) द्वारे (८-क),(८-ख) व (८-ग) या नोंदी समाविष्ट करण्यात आल्या.

२ शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १२७७/४५१३ (८०२)-(दोन)-चार, दिनांक १८ जुलै १९८० द्वारे हे शीर्षक व नोंद (१६-क) जादा दाखल करण्यात आली.

३. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०७२/५२१९३-(दोन)-एन, दिनांक १ ऑक्टोबर १९७३ द्वारे नोंद १९ चे खंड (ख) व (घ) वगळण्यात आले.

(ग) सवर्ण हिंदू व हरिजन यांच्यातील आंतरजातीय विवाहांना उत्तेजन देणे.

(२१) मागासवर्गाच्या कल्याणांचे कार्यक्रम यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

(क) महिलांच्या व बालकांच्या कल्याणाचे कार्यक्रम किंवा प्रकल्प.

(ख) बालवाड्यांची स्थापना करणे व त्या चालविणे.

(ग) मागासवर्गांच्या कल्याणासाठी प्रचाराचे व प्रसिध्दीचे काम हाती घेणे.

(घ) मागासवर्गासाठी करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करणे.

(ड) सामाजिक मेळे भरविणे.

(च) मागासवर्गासाठी संस्कार केंद्रे, सामूहिक-नि-करमणुकीची केंद्रे आणि सामूहिक सभागृहे.

(छ) विमुक्त जातींना कपडे पुरवणे.

(ज) औषधे खरेदी करण्यासाठी व्यक्तींना वित्तीय सहाय्य देणे व वैद्यकीय सहाय्य देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना अनुदाने देणे.

(झ) मागासवर्गांच्या व्यक्तींसाठी घरांची तरतूद करणे, आणि

(ञ) पिण्याच्या पाण्याच्या विहिरींची तरतूद करणे.

## शिक्षण

(२२) प्राथमिक शाळांच्या इमारती बांधणे व त्या सुस्थितीत ठेवणे.

(२३) [1]प्राथमिक शाळांसाठी साधनसामग्री व क्रीडांगणे यांची तरतूद करणे.

(२३-क) प्राथमिक शाळांचे व्यवस्थापन.

(२३-ख) इतर शैक्षणिक उद्दिष्टे. ]

## वैद्यकीय

(२४) अर्थसहाय्यित वैद्यक व्यवसायी केंद्रे.

(२५) ग्रामीण वैद्यकीय सहाय्य केंद्रे.

## आयुर्वेद

(२६) गावातील आयुर्वेदीय औषधांच्या पेट्यांतील औषधांचा साठा पुन्हा भरुन काढणे.

## सार्वजनिक आरोग्य

[2] * * * * *

(२८) गावात औषधांच्या पेट्या ठेवणे.

(२९) ग्रामीण स्वच्छता.

(३०) सार्वजनिकआरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करणे.

## इमारती व दळणवळण

(३१) ग्रामीण रस्ते बांधणे, ते सुस्थितीत ठेवणे व त्यांच्या दुरुस्त्या.

(३२) ग्रामीण रस्त्यांवर पूल व नाले बांधणे.

(३३) सार्वजनिक तरी.

---

१ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४९ (ब) द्वारे नोंदी (२३-क) व (२३ ख) समाविष्ट करण्यात आल्या.

२ वरील अधिनियमाच्या कलम ४९(क) द्वारे नोंद (२७) वगळण्यात आली.

(३४) रस्त्यांच्या दुतर्फा असलेल्या झाडांची निगा ठेवणे.

## आरोग्य अभियांत्रिकी

(३५) ग्रामीण पाणी पुरवठा विहिरी.

(३६) गावात भूपृष्ठावरील गटारे बांधणे.

[१] * * * * *

[२] * * * * *

## प्रसिध्दी

(४०) ग्रामीण ध्वनिक्षेपण.

(४१) करमणुकीच्या कार्यक्रमाद्वारे प्रसिध्दी.

## सामूहिक विकास

(४२) सामूहिक विकास कार्यक्रम.

(४३) स्थानिक विकास बांधकामांचा कार्यक्रम.

## समाज शिक्षण

(४४) सामूहिक करमणूक केंद्रे.

(४५) प्रौढ साक्षरता केंद्रे.

(४६) क्रीडा, खेळ, क्रीडांगणे, साधनसामग्री व कल्याणकारी संघटना.

(४७) किसान मेळे.

[३][ (४८) राज्यामधील नियोजित सहली आणि राज्य शासनाच्या पूर्वपरवानगीने राज्याबाहेरील नियोजित सहली. ]

(४९) माहिती प्रसृत करणे.

(५०) अल्प मुदतीची शिबिरे.

(५१) महिला संघटना व महिला कल्याण.

(५२) शिशु संघटना व शिशु कल्याण.

(५३) फिरती चित्रपट याने.

(५४) ग्रंथालये व वाचनालये.

(५५) जत्रा, मेळे व प्रदर्शने.

## ग्रामीण गृहनिर्माण

(५६) ग्रामीण गृहनिर्माण.

---

१. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०७२/१२१९३-(दोन)-एन, दिनांक १ ऑक्टोबर १९७३ द्वारे " कुटिरोद्योग " हे शीर्षक व (३७) व (३८) या नोंदी वगळण्यात आल्या.

२. शासकीय अधिसूचना, ग्रामविकास विभाग, क्रमांक झेडपीए. १०७२/१२१९३-(दोन)-एन, दिनांक १ ऑक्टोबर १९७३ द्वारे " सहकार " हे शीर्षक व नोंद (३९) वगळण्यात आली.

३. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४९ (ड) द्वारे मूळ नोंदीऐवजी नोंद (४८) दाखल करण्यात आली.

संकीर्ण

(५७) ग्रामोध्दार.

(५८) आदर्श गावे वसविणे (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह).

(५९) गावांचे आर्थिक कल्याण.

(६०) लोकांचे आरोग्य, सुरक्षितता, सुविधा किंवा सोयी याची ज्यामुळे वाढ होण्याचा संभव आहे अशी स्थानिक स्वरूपाची बांधकामे किंवा उपाययोजना.

(६१) बाजार.

(६२) धर्मशाळा, विश्रांतीगृहे, प्रवाशासाठी बंगले, सराई आणि तत्सम गोष्टी.

(६३) चावडया.

(६४) इतर सार्वजनिक परिसंस्था.

(६५) औद्योगिक बेकारी वगळून इतर स्थानिक बेकारी.

(६६) गावठाणाची सुधारणा व विस्तार (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह )

(६७) नवीन गावठाणे वसविणे (त्या प्रयोजनासाठी द्यावयाची अनुदाने व कर्जे यांसह.)

(६८) सार्वजनिक मैदाने व उद्याने यांमध्ये झाडे लावणे व त्यांची जोपासना करणे.

(६९) रानटी जनावरांचा नाश करण्याबाबत बक्षिसे.

(७०) जाहीर स्वागतसमारंभ व समारंभ आणि करमणूक.

(७१) स्थानिक तीर्थयात्रांबाबतची व्यवस्था करणे.

(७२) ग्रामपंचायतीचे पंच, सरपंच व अशासकीय व्यक्ती यांची संमेलने.

(७३) स्थानिक भटक्या गरीब लोकांसाठी सहाय्य.

(७४) गरीबांची घरे सुस्थितीत ठेवणे.

१[ (७५) संघराज्याच्या सशस्त्र दलातील मृत व्यक्तींच्या कुटुंबातील व्यक्तींना द्यावयाची पैशाच्या स्वरूपातील अनुदाने.

**स्पष्टीकरण.-** संघराज्याच्या सशस्त्र दलातील मृत व्यक्तींच्या संबंधात "कुटुंबातील व्यक्ती" म्हणजे त्या व्यक्तीची विधवा, मुलगा, मुलाचा मुलगा, अविवाहित मुलगी, वडील किंवा आई.]

## तिसरी अनुसूची

[सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ याच्या कलम ५ द्वारे वगळण्यात आली.]

---

## चौथी अनुसूची

[कलम १४४ खंड (क) पहा]

(१) कसूर केल्याच्या बाबतीत शास्ती किंवा व्याज म्हणून *मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, कलम १४८ अन्वये लादलेला कोणताही आकार धरून बसविलेली शास्ती व दंड, परंतु उक्त संहितेच्या कलम ६५ खाली शेतीशी संबंधित नसलेल्या प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करण्यास परवानगी देताना लादलेला कोणताही दंड वगळून. १८७९ मुंबई

---

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ कलम ४९(ई) द्वारे नोंद (७५) जादा दाखल करण्यात आली.

* आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा ४१) पहा

२. इनामाच्या उत्तराधिकाराच्या संबंधाने किंवा हस्तांतरणासंबंधाने, प्रत्येक उत्तराधिकाराच्या किंवा हस्तांतरणाच्या वेळी, राज्य शासनाच्या सर्व हक्कमागण्यांच्या बदल्यात प्रसंगानुसार द्यावयाच्या निश्चित रकमा.

३. कामावरील अनधिकृत अनुपस्थितीच्या कालावधीबद्दल कनिष्ठ ग्रामसेवकांकडून वसूल केलेला, सेवा इनाम जमिनीवरील जमीन महसूल ; आणि इनामे व वतने यांवरील खंडित कालावधीबद्दल व मागील वर्षाबद्दल आकारणीचे असे इतर सर्व खर्च.

४. प्रत्येक गुरामागे आकारण्यात येईल अशाबाबतीत चराईची फी.

---

## पाचवी अनुसूची

[कलम १५९, पोट - कलम (२) पहा]

### प्रस्तावित कराच्या किंवा फीच्या नोटिशीचा नमुना

........................ जिल्ह्याच्या रहिवाशांस याद्वारे नोटीस देण्यात येते की, (मंजूर केलेल्या नियमांच्या ........................ पृष्ठांवर प्रसिध्द केलेल्या व ........................ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर किंवा फीच्या ऐवजी) + यास जोडलेल्या नियमांत व्याख्या केलेला (यथास्थिती, कर पट्टी, पथकर किंवा उपकर किंवा फी बसविण्याची जिल्हा परिषदेची इच्छा आहे.

प्रस्तावित कर किंवा फी याबाबत जिल्ह्यातील कोणत्याही रहिवाशास आक्षेप घ्यावयाचा असेल त्यास, या नोटिशीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, आपला आक्षेप जिल्हा परिषदेकडे लेखी पाठविता येईल.

### नियम

[जिल्हा परिषदेने कलम १५९, पोट - कलम (१) खाली तयार केलेले नियम येथे जोडावेत.]

---

## सहावी अनुसूची

[कलम १६६, पोट - कलम (३) पहा]

### मागणीच्या नोटिशीचा नमुना

श्री. अ. ब. ........................ राहणार ........................., यास नोटीस देण्यात येत आहे की, ................................ येथील जिल्हा परिषद, दिनांक ........................ १९ पासून सुरू होणाऱ्या व दिनांक ........................ १९ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी .................. (येथे ज्या मालमत्तेवर किंवा ज्या इतर बाबींवर कर किंवा फी आकारावयाची असेल तिचे वर्णन लिहावे) बद्दल नियम क्रमांक ...................... खाली आकारावयाची व ...................... कडून येणे असलेली रक्कम ........................ याची याच्याकडे मागणी

---

+ "तो कर किंवा फी जर कोणत्याही विद्यमान कराच्या किंवा फीच्या ऐवजी बसवावयाची असेल तर" हा मजकूर समाविष्ट करावा.

करीत आहे, आणि जर ही नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत उक्त रक्कम .......................... येथील जिल्हा परिषदेच्या कार्यालयात भरली नाही आणि ती न भरल्याबद्दल जिल्हा परिषदेचे समाधान होईल असे पुरेसे कारण दाखविले नाही तर, ती खर्चासह वसूल करण्याकरिता अटकावणी अधिपत्र काढण्यात येईल.

दिनांक .................... १९

(सही)

...................... जिल्हा परिषदेच्या आदेशानुसार.

---

## सातवी अनुसूची

[कलम १६७ पहा]

### अधिपत्राचा नमुना

(अधिपत्र बजावण्याचे काम ज्या अधिकाऱ्यावर सोपविले असेल त्याचे नाव येथे समाविष्ट करावे)

ज्याअर्थी, श्री. अ. ब. .......................... राहणार ......................, यांनी दिनांक .....१९ पासून सुरु होणाऱ्या व दिनांक .................... १९ रोजी संपणाऱ्या कालावधीबद्दल समासात नमूद केलेल्या कराच्या संबंधात, किंवा फीच्या संबंधात ...ने असलेली व नियम क्रमांक ........... खाली आकारणीयोग्य असलेली रक्कम .................... भरलेली नाही व ती न भरण्याचे समाधानकारक कारण दाखविलेले नाही ; [येथे कराचे किंवा फीचे वर्णन करावे.]

आणि ज्याअर्थी, त्या रकमेच्या मागणीची नोटीस त्याच्यावर बजावल्यापासून पंधरा दिवस होऊन गेलेले आहेत ;

त्याअर्थी, याद्वारे तुम्हाला अशी आज्ञा करण्यात येत आहे की, तुम्ही महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याची कलमे १७० व १७१ च्या तरतुदींना अधीन राहून उक्त श्री. अ. ब. यांच्याकडून पुढे दर्शविल्याप्रमाणे म्हणजे-

उक्त कराबद्दल किंवा फीबद्दल .................... रूपये पैसे.

नोटीस बजावण्याबद्दल ...................." "

याप्रमाणे त्याच्याकडून येणे असलेल्या रकमेपोटी ...................... इतक्या रकमेचा माल व चीजवस्तू अटकावून ठेवावी आणि या अधिपत्राद्वारे तुम्ही जप्त केलेल्या मालाचा सर्व तपशील प्रमाणित करून तो या अधिपत्रासोबत तावडतोब पाठवावा.

दिनांक .................... १९

(सही)

अध्यक्ष

(किंवा यथास्थिती, कलम १६८ अन्वये प्राधिकृत केलेला अधिकारी)

...................... .... जिल्हा परिषद.

## आठवी अनुसूची

[कलम १७१ चा खंड (क) व कलम १७८ चे पोट-कलम (२) पहा].

### वस्तुसूचीचा व नोटिशीचा नमुना

श्री. अ. ब. ........................... राहणार ..................... यांस

नोटीस देण्यात येत आहे की, मी आज रोजी दिनांक ........................... १९ पासून सुरू होणाऱ्या व दिनांक ...................... १९ रोजी संपणाऱ्या कालावधीच्या संबंधात समासात नमूद केलेल्या (येथे कराचे किंवा फीचे वर्णन द्यावे) कराबद्दल किंवा फीबद्दल येणे असलेली रक्कम आणि मागणीची नोटीस बजावण्याबद्दल येणे असलेली रक्कम मिळून होणाऱ्या रकमेइतक्या ............... किंमतीच्या, खाली वस्तुसूचीत विनिर्दिष्ट केलेला माल व चीजवस्तू जप्त केलेली आहे आणि जर या नोटिशीच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत तुम्ही .. ..... .................. येथील जिल्हा परिषदेच्या कार्यालयात वसुलीच्या परिव्ययासह उक्त रक्कम भरली नाही तर उक्त माल व चीजवस्तू विकण्यात येईल.

दिनांक ........................... १९ (अधिपत्र बजावणाऱ्या अधिकाऱ्याची सही)

वस्तुस्थिती

(येथे जप्त केलेला माल व चीजवस्तू यांचा तपशील नमूद करावा.)

---

## नववी अनुसूची

[सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम २० अन्वये वगळण्यात आली.]

---

## दहावी अनुसूची

[सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १७ अन्वये वगळण्यात आली.]

---

## अकरावी अनुसूची

### संक्रामी तरतुदी आणि व्याकृती

(कलम २८८ पहा)

१९२३ चा मुंबई ६. १९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ३८. १९५६ चा हैदराबाद १.

१. संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर, या अनुसूचीत –

(क) "नेमलेला दिवस" म्हणजे ज्या दिवशी हा अधिनियम अमलात येईल तो दिवस ;

(ख) कोणत्याही स्थानिक क्षेत्रांच्या संबंधात, "विद्यमान मंडळ" म्हणजे, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ खाली स्थापन केलेले जिल्हा स्थानिक मंडळ किंवा मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ खाली रचना केलेली जनपद सभा, किंवा यथास्थिती, हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ अन्वये स्थापन केलेले जिल्हा मंडळ व नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेले मंडळ ;

(ग) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, ज्या स्थानिक क्षेत्रासाठी एखादे विद्यमान मंडळ कार्य करीत होते त्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "उत्तराधिकारी जिल्हा परिषद" म्हणजे, त्या दिवशी व त्या दिवसापासून अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेली जिल्हा परिषद.

(झ) [एखाद्या विद्यमान मंडळाने किंवा त्याच्या संबधात संबंध जिल्हा मंडळ अधिनियमाखाली किंवा अशा विद्यमान मंडळाच्या क्षेत्रात अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अमलात असलेल्या पुढील गोष्टी म्हणजे, केलेले सर्व अर्थसंकल्पीय अंदाज केलेल्या सर्व आकारण्या, ठरविलेल्या किंमती, केलेली मोजणी किंवा विभागणी या सर्व गोष्टी जेथवर त्या त्या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील, तेथवर, त्या उत्तराधिकारी जिल्हा परिषदेने केलेल्या किंवा ठरविलेल्या आहेत किंवा त्या जिल्हा परिषदेच्या तत्सम क्षेत्राच्या संबंधात करण्यात किंवा ठरविण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल; ]

(ञ) नेमलेल्या दिवसाच्या पूर्वी एखाद्या विद्यमान मंडळाच्या नोकरीत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांची, प्रकरण चौदाच्या तरतुदींना अधीन राहून उत्तराधिकारी जिल्हा परिषदेच्या सेवेत बदली करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल;

(ट) कोणतेही संबद्ध जिल्हा मंडळ अधिनियमाच्या तरतुदींच्या संबंधात कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संलेखात करण्यात आलेले कोणतेही उल्लेख हे, त्यावरुन निराळा हेतू दिसून येत नसेल तर, ते या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींच्या संबंधात केलेले उल्लेख आहेत असे समजून अशा उल्लेखाचा अर्थ लावण्यात येईल,

[1][(ट-एक) कोणत्याही कायद्यात किंवा संलेखात जिल्हा स्थानिक मंडळ, किंवा जिल्हा मंडळ, स्थानिक मंडळ किंवा जनपद सभा यांच्या संबंधी केलेला कोणताही निर्देश, हा त्यावरुन निराळा उद्देश दिसून येत नसेल तर तो जिल्हा परिषदेच्या संबंधी केलेला निर्देश आहे असे समजून त्या निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल आणि असा कायदा किंवा संलेख या जिल्हा परिषदेस लागू होईल ;]

(ठ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात, विदर्भ प्रदेशात किंवा हैदराबाद प्रदेशात अमलात नसलेल्या कोणत्याही कायद्यासंबंधीचा किंवा अशा प्रदेशात कार्य करीत नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या, संस्थेच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या संबंधीचा, या अधिनियमात करण्यात आलेला कोणताही निर्देश हा त्यावरुन निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, तो महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात, विदर्भ प्रदेशात किंवा यथास्थिती, हैदराबाद प्रदेशात अमलात असलेल्या तत्सम कायद्यासंबंधी किंवा त्यात कार्य करीत असलेल्या तत्सम अधिकाऱ्याच्या, संस्थेच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या संबंधी केलेला निर्देश आहे असे समजून त्या निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल ;

(ड) वरील परिच्छेदात एखाद्या विद्यमान मंडळासंबंधी करण्यात आलेला कोणताही निर्देश हा, असे विद्यमान मंडळ निष्प्रभावित किंवा विसर्जित करण्यात आले असेल तर, अशा विद्यमान मंडळाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्ती संबंधी किंवा व्यक्ती संबंधी करण्यात आलेला निर्देश आहे असे मानण्यात येईल ;

(ढ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी—

(एक) या अधिनियमाखाली पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेची पहिली बैठक घेण्यात येईपर्यंत प्रत्येक जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली जिल्हा परिषद, स्थायी समिती, विषय समित्या आणि पीठासीन अधिकारी यांच्या अधिकारांचा वापर करील व त्यांची कर्तव्ये पार पाडील.

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ७९ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला

## आठवी अनुसूची

[कलम १७१ चा खंड (क) व कलम १७८ चे पोट-कलम (२) पहा].

### वस्तुसूचीचा व नोटिशीचा नमुना

श्री. अ. ब. ............................ राहणार .................... यांस

नोटीस देण्यात येत आहे की, मी आज रोजी, दिनांक ........................ १९ पासून सुरु होणाऱ्या व दिनांक ...................... १९ रोजी संपणाऱ्या कालावधीच्या संबंधात समासाल नमूद केलेल्या (येथे कराचे किंवा फीचे वर्णन द्यावे) कराबद्दल किंवा फीबद्दल येणे असलेली रक्कम आणि मागणीची नोटीस बजावण्याबद्दल येणे असलेली रक्कम मिळून होणाऱ्या रकमेइतक्या ............... किंमतीच्या, खाली वस्तुसूचीत विनिर्दिष्ट केलेला माल व चीजवस्तू जप्त केलेली आहे आणि जर या नोटिशीच्या दिनांकापासून पाच दिवसांच्या आत तुम्ही .. ........................ येथील जिल्हा परिषदेच्या कार्यालयात वसुलीच्या परिव्ययासह उक्त रक्कम भरली नाही तर उक्त माल व चीजवस्तू विकण्यात येईल.

दिनांक ............................ १९ . (अधिपत्र बजावणाऱ्या अधिकाऱ्याची सही)

वस्तुस्थिती

(येथे जप्त केलेला माल व चीजवस्तू यांचा तपशील नमूद करावा.)

---

## नववी अनुसूची

[सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम २० अन्वये वगळण्यात आली.]

---

## दहावी अनुसूची

[सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १७ अन्वये वगळण्यात आली.]

---

## अकरावी अनुसूची

### संक्रामी तरतुदी आणि व्यावृत्ती

(कलम २८८ पहा)

१९२३ चा मुंबई ६. १. संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर, या अनुसूचीत -

(क) "नेमलेला दिवस" म्हणजे ज्या दिवशी हा अधिनियम अमलात येईल तो दिवस ;

१९४८ चा मध्यप्रांत व वऱ्हाड ३८. (ख) कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात, "विद्यमान मंडळ" म्हणजे, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ खाली स्थापन केलेले जिल्हा स्थानिक मंडळ किंवा मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक शासन अधिनियम, १९४८ खाली रचना केलेली जनपद सभा, किंवा यथास्थिती, हैदराबाद जिल्हा मंडळ अधिनियम, १९५५ अन्वये स्थापन केलेले जिल्हा मंडळ व नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेले मंडळ ;

१९५६ चा हैदराबाद १ (ग) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, ज्या स्थानिक क्षेत्रासाठी एखादे विद्यमान मंडळ कार्य करीत होते त्या कोणत्याही स्थानिक क्षेत्राच्या संबंधात "उत्तराधिकारी जिल्हा परिषद" म्हणजे, त्या दिवशी व त्या दिवसांपासून अशा क्षेत्रावर अधिकारिता असलेली जिल्हा परिषद.

२. नेमलेल्या दिवशी व त्या दिवसापासून पुढील परिणाम घडून येतील, ते म्हणजे.—

(क) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी एखाद्या विद्यमान मंडळामध्ये विहित असलेली सर्व जंगम व स्थावर मालमत्ता आणि अशा मालमत्तेत असलेले कोणत्याही स्वरुपाचे व कोणत्याही प्रकारचे सर्व हितसंबंध, हे तत्संबंधी नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अमलात किंवा अस्तित्वात असलेल्या सर्व मर्यादा, व अमलात किंवा अस्तित्वात असलेल्या सर्व शर्ती, तसेच कोणत्याही व्यक्तीचे, मंडळाचे किंवा प्राधिकरणाचे असे अधिकार किंवा हितसंबंध यांना अधीन राहून जिल्हा परिषद (ज्या क्षेत्रात असे विद्यमान मंडळ कार्य करीत होते त्या क्षेत्रासाठी प्रथमतःच रचना करण्यात आलेली) या अधिनियमाखाली आपली पहिली बैठक घेईपर्यंत, राज्य शासनाकडे हस्तांतरित झाले आहे असे मानण्यात येईल, आणि त्यांचे आणखी हस्तांतरण न करता ते राज्य शासनाकडे निहित होतील आणि त्यानंतर अशा रीतीने रचना करण्यात आलेल्या जिल्हा परिषदेमध्ये निहित होतील ;

(ख) विद्यमान मंडळाचे सर्व अधिकार, दायित्वे व आबंधने (यात कोणत्याही कराराखाली किंवा संविदेखाली निर्माण झालेल्या अधिकारांचा, दायित्वांचा व आबंधनांचा समावेश होतो) ही, उत्तराधिकारी जिल्हा परिषदेची रीतसर रचना करण्यात येईपर्यंत, राज्य शासनाचे अधिकार, दायित्वे व आबंधने आहेत असे मानण्यात येईल ;

(ग) एखाद्या विद्यमान मंडळास, कोणत्याही कराच्या संबंधात किंवा अन्यथा येणे असलेल्या सर्व रकमा, या अधिनियमाखाली उत्तराधिकारी जिल्हा परिषदेची प्रथमतः रचना करण्यात येईपर्यंत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने वसूल करण्याजोग्या असतील आणि त्यानंतर अशा रकमा जिल्हा परिषदेने वसूल करण्याजोग्या असतील आणि अशा रकमा वसूल करण्याच्या प्रयोजनांकरिता विद्यमान मंडळास किंवा त्याच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यास नेमलेल्या दिवसापूर्वी जी कोणतीही कारवाई करता आली असती किंवा जी कोणतीही कारवाई दाखल करता आली असती ती कोणतीही उपाययोजना किंवा कारवाई करण्यास किंवा दाखल करण्यास मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा उत्तराधिकारी जिल्हा परिषद सक्षम असेल ;

(घ) संबध्द जिल्हा मंडळ अधिनियमाखाली रचना करण्यात आलेल्या स्थानिक निधीतील, जनपद निधीतील किंवा जिल्हा निधीतील खर्च न झालेली शिल्लक रक्कम आणि एखाद्या विद्यमान मंडळास येणे असलेल्या व उत्तराधिकारी जिल्हा परिषदेने वसूल केलेल्या सर्व रकमा तसेच राज्य शासन निदेश देईल अशा कोणत्याही इतर संस्थेच्या किंवा संस्थांच्या, रकमा ह्या, उत्तराधिकारी जिल्हा परिषदेच्या जिल्हा निधीचा भाग होतील आणि त्या अशा निधीस देण्यात येतील ;

(ङ) एखाद्या विद्यमान मंडळाशी केलेल्या सर्व संविदा, आणि त्याच्या वतीने करून दिलेले सर्व संलेखे हे, उत्तराधिकारी जिल्हा परिषदेची रीतसर रचना करण्यात येईपर्यंत, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याशी केलेल्या संविदा आहेत किंवा त्याने करून दिलेले संलेख आहेत असे मानण्यात येईल आणि त्यानंतर अशा सर्व संविदा व संलेख हे, अशा उत्तराधिकारी जिल्हा परिषदेशी केलेल्या संविदा आहेत किंवा अशा जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने करून दिलेले संलेख आहेत असे मानले जाईल आणि त्यानुसार ते लागू होतील ;

(च) नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी कोणत्याही संबंधित जिल्हा मंडळ अधिनियमाखाली एखाद्या विद्यमान मंडळाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यांकडे प्रलंबित असलेल्या सर्व कार्यवाह्या आणि बाबी या, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याकडे किंवा तो निदेश देईल अशा प्राधिकाऱ्याकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल ;

(छ) नेमलेल्या दिवसापूर्वी प्रलंबित असलेल्या ज्या दाव्यामध्ये आणि कायदेशीर कार्यवाह्यांत किंवा त्यांच्या संबंधात विद्यमान मंडळ पक्षकार म्हणून असेल अशा सर्व दाव्यांमध्ये आणि कायदेशीर कार्यवाहींत किंवा त्यांच्या संबंधात विद्यमान मंडळाऐवजी मुख्य कार्यकारी अधिकारी हा पक्षकार आहे असे मानण्यात येईल ;

(ज) संबध्द जिल्हा मंडळ अधिनियमाखाली स्थापना करण्यात आलेल्या किंवा रचना करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यमान मंडळाने किंवा त्याच्या संबंधात, किंवा अशा विद्यमान मंडळाच्या क्षेत्रात अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली स्थापना करण्यात आलेल्या किंवा रचना करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यमान मंडळाने किंवा त्याच्या संबंधात केलेल्या, काढलेल्या, बसवलेल्या किंवा दिलेल्या अथवा करण्यात आलेल्या, काढण्यात आलेल्या, बसवण्यात आलेल्या किंवा देण्यात आलेल्या आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अमलात असलेल्या पुढील गोष्टी म्हणजे केलेली कोणतीही नेमणूक, काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा नोटीस, बसविलेला कोणताही कर, दिलेला कोणताही आदेश, केलेली कोणतीही परियोजना, दिलेले कोणतेही लायसन, परवानगी, किंवा केलेला कोणताही नियम, उप-विधी, विनियम किंवा नमुना या सर्व गोष्टी जेथवर या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, आणि अशा गोष्टी अधिक्रमित करण्यास सक्षम असलेला प्राधिकारी त्या अधिक्रमित करीपर्यंत जणू त्या उत्तराधिकारी जिल्हा परिषदेच्या तत्सम क्षेत्राच्या संबंधात करण्यात, काढण्यात, बसवण्यात किंवा देण्यात आल्या आहेत असे समजून अमलात असण्याचे चालू राहील ;

[१][परंतु, नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, कोणत्याही संबंधित जिल्हा मंडळ अधिनियमाखाली एखाद्या विद्यमान मंडळाकडून कोणत्याही प्रकारची जकात रीतसर आकारण्यात येत असल्यास, उत्तराधिकारी जिल्हा परिषदेस, [२][नेमलेल्या दिवशी सुरू होणाऱ्या [३][चौदा वर्षांच्या] कालावधीपर्यंत किंवा राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे याबाबतीत विनिर्दिष्ट करील अशा त्यापेक्षा कमी असलेल्या कालवधीपर्यंत] आपल्या अधिकारितेत अशी जकात (म्हणजे स्थानिक क्षेत्रात उपभोगासाठी, वापर करण्यासाठी किंवा त्यात विक्री करण्यासाठी आणलेल्या मालावर लादलेला कर) आकारणे चालू ठेवता येईल ; आणि तदनुसार, संबध्द जिल्हा मंडळ अधिनियमाच्या (आणि त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा काढलेल्या आदेशांच्या अथवा अधिसूचनांच्या) तरतुदी या अधिनियमान्वये निरसित करण्यात आल्या असल्या तरीही, उक्त कर आकारणे, गोळा करणे किंवा त्याची रक्कम परत करणे या प्रयोजनांसाठी किंवा कोणत्याही शास्तीच्या प्रयोजनांसाठी किंवा उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाशी कोणत्याही प्रकारे संबंधित असलेल्या किंवा आनुषंगिक असलेल्या कोणत्याही इतर प्रयोजनासाठी परिणामक्षम असतील ; आणि असा कर आकारणे, तो गोळा करणे किंवा त्याची रक्कम परत करणे यांच्या संबंधात किंवा शास्ती लादण्याच्या प्रयोजनासाठी किंवा त्यांच्यासाठी किंवा त्यांच्याशी संबंधित असलेल्या किंवा आनुषंगिक असलेल्या प्रयोजनासाठी विद्यमान मंडळास किंवा त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यास असलेले सर्व अधिकार या जिल्हा परिषदेस किंवा तिने याबाबतीत योग्य रीत्या प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास वापरता येतील आणि संबध्द जिल्हा मंडळ अधिनियमात एखादा अधिकारी, प्राधिकारी, न्यायाधिकरण किंवा न्यायालय यासंबंधी केलेला कोणताही उल्लेख, हा यात या ठिकाणी अंतर्भूत केलेल्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनाकरिता या अधिनियमान्वये किंवा त्याखाली नेमलेल्या तत्सम अधिकाऱ्यांसंबंधी किंवा तत्सम प्राधिकाऱ्यासंबंधी किंवा रचना केलेल्या तत्सम न्यायाधिकरणासंबंधी किंवा तत्सम न्यायालयासंबंधी उल्लेख आहे असे समजून त्याप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यात येईल, आणि कोणते अधिकारी किंवा प्राधिकारी असे तत्सम अधिकारी किंवा प्राधिकारी म्हणून समजावे किंवा कोणते न्यायाधिकरण किंवा न्यायालय असे तत्सम न्यायाधिकरण किंवा न्यायालय म्हणून समजावे याविषयी कोणताही प्रश्न उद्भवल्यास त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल ;

१. सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम १४ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

२. सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३ द्वारे "नेमलेल्या दिवसापासून सुरू होणाऱ्या दोन वर्षांच्या मुदतीपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३. सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, कलम २ द्वारे "बारा वर्षांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(झ) [एखाद्या विद्यमान मंडळाने किंवा त्याच्या संबंधात संबंध जिल्हा मंडळ अधिनियमाखाली किंवा अशा विद्यमान मंडळाच्या क्षेत्रात अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली नेमलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अमलात असलेल्या पुढील गोष्टी म्हणजे, केलेले सर्व अर्थसंकल्पीय अंदाज केलेल्या सर्व आकारण्या, ठरविलेल्या किंमती, केलेली मोजणी किंवा विभागणी या सर्व गोष्टी जेथवर त्या त्या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील, तेथवर, त्या उत्तराधिकारी जिल्हा परिषदेने केलेल्या किंवा ठरविलेल्या आहेत किंवा त्या जिल्हा परिषदेच्या तत्सम क्षेत्राच्या संबंधात करण्यात किंवा ठरविण्यात आल्या आहेत असे मानण्यात येईल;]

(ञ) नेमलेल्या दिवसाच्या पूर्वी एखाद्या विद्यमान मंडळाच्या नोकरीत असलेले सर्व अधिकारी व कर्मचारी यांची, प्रकरण चौदाच्या तरतुदींना अधीन राहून उत्तराधिकारी जिल्हा परिषदेच्या सेवेत बदली करण्यात आली आहे, असे मानण्यात येईल;

(ट) कोणतेही संबद्ध जिल्हा मंडळ अधिनियमाच्या तरतुदींच्या संबंधात कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संलेखात करण्यात आलेले कोणतेही उल्लेख हे, त्यावरुन निराळा हेतू दिसून येत नसेल तर, ते या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींच्या संबंधात केलेले उल्लेख आहेत असे समजून अशा उल्लेखाचा अर्थ लावण्यात येईल,

[1][(ट-एक) कोणत्याही कायद्यात किंवा संलेखात जिल्हा स्थानिक मंडळ, किंवा जिल्हा मंडळ, स्थानिक मंडळ किंवा जनपद सभा यांच्या संबंधी केलेला कोणताही निर्देश, हा त्यावरुन निराळा उद्देश दिसून येत नसेल तर तो जिल्हा परिषदेच्या संबंधी केलेला निर्देश आहे असे समजून त्या निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल आणि असा कायदा किंवा संलेख या जिल्हा परिषदेस लागू होईल ;]

(ठ) महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात, विदर्भ प्रदेशात किंवा हैदराबाद प्रदेशात अमलात नसलेल्या कोणत्याही कायद्यासंबंधीचा किंवा अशा प्रदेशात कार्य करीत नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या, संस्थेच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या संबंधीचा, या अधिनियमात करण्यात आलेला कोणताही निर्देश हा त्यावरुन निराळा उद्देश दिसून येत नसेल तर, तो महाराष्ट्र राज्याच्या मुंबई प्रदेशात, विदर्भ प्रदेशात किंवा यथास्थिती, हैदराबाद प्रदेशात अमलात असलेल्या तत्सम कायद्यासंबंधी किंवा त्यात कार्य करीत असलेल्या तत्सम अधिकाऱ्याच्या, संस्थेच्या किंवा प्राधिकाऱ्याच्या संबंधी केलेला निर्देश आहे असे समजून त्या निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल ;

(ड) वरील परिच्छेदात एखाद्या विद्यमान मंडळासंबंधी करण्यात आलेला कोणताही निर्देश हा, असे विद्यमान मंडळ निष्प्रभावित किंवा विसर्जित करण्यात आले असेल तर, अशा विद्यमान मंडळाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी किंवा त्याची कार्ये पार पाडण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्ती संबंधी किंवा व्यक्ती संबंधी करण्यात आलेला निर्देश आहे असे मानण्यात येईल ,

(ढ) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी—

(एक) या अधिनियमाखाली पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर जिल्हा परिषदेची पहिली बैठक घेण्यात येईपर्यंत प्रत्येक जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली जिल्हा परिषद, स्थायी समिती, विषय समित्या आणि पीठासीन अधिकारी यांच्या अधिकारांचा वापर करील व त्यांची कर्तव्ये पार पाडील.

---

[1] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३५, कलम ७९ द्वारे हा खंड समाविष्ट करण्यात आला.

(दोन) या अधिनियमाखाली पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर पंचायत समितीची पहिली बैठक घेण्यात येईपर्यंत प्रत्येक पंचायत समितीचा गट विकास अधिकारी या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली पंचायत समितीच्या आणि पंचायत समितीच्या सभापतीच्या आणि ७५ सभापतीच्या अधिकारांचा वापर करील व त्यांची कर्तव्ये पार पाडील.

(ग) (एक) जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ मतदारांची यादी तयार करुन घेण्याची, तसेच कलम ५७ च्या प्रयोजनासाठी निर्वाचक गणातील पंचायतीच्या सदस्यांची एक यादी तयार करुन घेण्याची ताबडतोब तजवीज करील आणि शक्य होईल तेथवर या अधिनियमाच्या तरतुदीनुसार निवडणुका घेईल.

(दोन) जी कोणतीही व्यक्ती, हा अधिनियम प्रवर्तनात आला नसता तर परिषद सदस्य म्हणून किंवा कोणत्याही विद्यमान मंडळाचा सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरली असती अशी कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाखाली प्रथमतः घेण्यात येणाऱ्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ या अधिनियमाखाली निवडून येण्यास व परिषद सदस्य होण्यास निरर्ह आहे असे समजण्यात येईल.

(त) या बाबतीत राज्य शासन जे कोणतेही अनुदेश देईल त्या अनुदेशांना अधीन राहून जिल्हाधिकारी, विद्यमान मंडळाच्या जागी येणाऱ्या उत्तराधिकारी जिल्हा परिषदेची आणि पंचायत समितीची पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्याच्या बाबतीत आनुषंगिक, अनुपूरक व परिणामभूत असणाऱ्या सर्व बाबींच्या संबंधात कर्तव्ये पार पाडील.

शा.मु.औ.-(एच) ३०८-२०५०-३-२००७.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद